Rahel pursues herstudies at the school of Architecture in Delhi. She meets Larry Me Caslin therewhen he visits the institute for his doctoral work. They fall in love and getmarried. The attitude of Rahel towards marriage is contrary to that of her greatgrand mother, grandmother and mother. For the latter, marriage is regarded asa serious, important and inevitable institution. But for Rahel, marriage has nosignificance. It is not an important event nor is it a permanent relationshipbetween man and woman. She thinks that the marriage is not an everlasting bondage.Rahel has developed this sort of tendency because of her early exposureto the oppressive characters of both traditional marriages and love marriages.She has heard about the suffering of her grandmother. Her mother has briefedto her how her grandmother was put to torture without any fault of her by hergrandfather. Rahel has personally witnessed how her mother was put to torturewithout any fault of her by her father. All these have an adverse effect on her psyche and made her cultivate theattitude of carelessness and negligence towards the notion of marriage. Shedoes not attach any importance and sanctity to marriage. She is prepared to leadher life without marriage and without the support of any male member outsideher own family. Thus her attitude of irreverence towards marriage exemplifiesthe tendency of subversion of the notion of not only Endogamy but also that ofmarriage as a whole. The novel seems to give a caution to the practice of Endogamy throughthe episode of Estha and Rahel. A close examination of their life will reveal that they are victims of the wickedsocial taboos. They are treated as outcastes. Since the social system prohibitsthem to enjoy the social intercourse with others for they are children of thereligiously mixed parents and of Ammu who is a divorcee. The concept of 'hybridization' is also well explored trough this couple andalso

trough Ammu and Velutha.

Impurity means defilement, pollution, contamination and notion of impurity includes the causes of impurity as well asthe ways and means of getting rid of impurity. There are two kinds of impurity- one is temporary impurity and the other is permanent impurity. *The God of Small Things* deals with the theme of impurity to a great extent.It records the history of untouchability and shows it as oppressive and finallysubverts it. The novel exposes how untouchables are exploited at the social,economical and political levels. In 'Velutha' the author has created a different image of the society ofuntouchables. Before coming to the character, it is worthwhile to note how thenovel represents the oppression in this society. The life history of theuntouchables is subtly narrated in the episode of Mammachi.As a young boy, Velutha would come with Vellaya Paapen to theback entrance of the Ayemenem House to deliver the coconuts they had plucked from the trees into the house. They were not allowed to touch anything.

Mammachi told Estha and Rahelthat she could remember a time, in her girlhood, when Paravanswere expected to crawl backwards with a broom sweeping awaytheir foot prints so that Brahmins or Syrian Christians would notdefile themselves by accidentally stepping into a Paravan's footprint. In Mammachi's time Paravans, like other Untouchables, were not allowed to walk on public roads, to carry umbrellas. They had to put their hands over their mouths when they spoke, to divert their polluted breath away from those whom theyaddressed.This description mirrors the practice of untouchability from timeimmemorial. What has happened to the untouchables in Ayemenem has beenhappening to the Untouchables in every nook and corner of India.Though the emergence of Christian Missionaries is thought to haveimproved the status of the untouchables, it is only a misnomer. The problem of untouchability was not paid sufficient attention by theEnglish who claim that they are intellectuals. They were more concerned withthe expansion of Christianity and their safe rule in India than abolishing thepractice of untouchability. Thus, the problem of untouchability was left unsolved.

The name 'Velutha' also is purposefully chosen because Veluthameans ‘Whiteness'. The author suggests that untouchables are not impure but pureand white by creating such an untouchable as Velutha. In creating anuntouchable with many distinct merits, the novel subverts the notion of untouchability but also the notion that the untouchable areincompetent. The untouchables have been betrayed by politicians. This thesis isdeveloped in the episode of Comrade Pillai. He is a founder of the communistparty in Kerala and projected as a crusader of the labourers. He is made todefend working class and to raise his voice against the exploitation of theclass. Velutha is a registered member of his party. In Pillai's biased attitudetowards Velutha, his hypocrisy and exploitation of untouchables by politiciansis exposed. In a conversation with Chacko, Pillai's original colour is

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

revealed. In order to make changes in society, Roy has selected women protagonists and through them conveyed her message crystal clear.

**References:**

1. Blake William. *Songs of Innocence and Experience*. Liverpool, 1923.
2. Mittapalli, Rajeshwar & Alessandro Monti. *Post-Independence Indian English Fiction*. New Delhi: Atlantic Publishers and Distributers, 2001.
3. Roy, Arundhati. *The God of Small Things*. New Delhi: Indiaink,1997.
4. Desai, Anita. *Fasting Feasting*, London: Vintage, 1999.
5. Singh, K. S. *Indian Communities*. (Vol.IV). Delhi: Oxford University Press, 1998.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान

**डॉ. संतोष दत्तात्रय बोडके**

*इतिहास विभाग,*

*चांडक- बिटको-चांडक महाविद्यालय,*

*नाशिकरोड, नाशिक, महाराष्ट्र.*

सूक्ष्मात समग्र निर्मितीचे सामर्थ्य असते, ही बाब आधुनिक काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्यातुन सिद्ध झाली आहे. स्थानिक पातळीवरील घटनांची राष्ट्रीय पातळीवर समग्रता वाढत जाऊन भारतीय स्वातंत्र्यलढा आकारास आला. ज्याचे फलित आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य ठरले, हा स्वातंत्र्यलढा सलग इतिहास परंपरा लाभलेल्या नाशिक जिल्ह्यात कशा प्रकारे लढला गेला. याचे विश्लेषण करण्याचा प्रस्तुत निबंधातून प्रयत्न आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी मवाळ, जहाल, क्रांतिकारी अशा विविध मार्गाने दीर्घकाळ चाललेला भारतीय स्वातंत्र्य संघर्ष हा आधुनिक काळातील महान असा स्वातंत्र्यलढा ठरला. यामध्ये सहभागी झालेल्या विविध प्रवाहांच्या व त्याच्या उपक्रमांच्या नियोजनात व कार्यपद्धतीत निश्चित अशी तफावत होती, मात्र या सर्वांचे अंतिम ध्येय हे देशाची स्वातंत्र्यप्राप्ती हीच होती. त्यामुळेच तेजस्वी, दैदिप्यमान अशा भारतीय इतिहासाचा हा स्वातंत्र्य संघर्ष महत्वपूर्ण भाग ठरला. हा इतिहास केवळ देशभक्तांच्या पराक्रमाचा किंवा त्यागाचा नसून तो त्यांच्या बलिदानाचाही आहे.त्यामुळेच संपूर्ण देशभर स्वातंत्र्यप्राप्तीचा अमृत महोत्सव साजरा होत असताना स्थानिक इतिहासाचा भाग म्हणून व भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात महत्वपूर्ण भूमिका बजावणारा जिल्हा म्हणून नाशिक जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीची वाटचाल संशोधन माध्यमातून अवलोकन करणे देखील क्रमप्राप्त ठरते.
परकीय सरकारविरुद्ध सबंध देशभर लढल्या गेलेल्या या आंदोलनात स्थलकालपरत्वे प्रत्येक टप्प्यावर बदल होत जाऊन प्रसंगी विकासही होत गेला व पुढे हे आंदोलन जनआंदोलन होऊन अगदी ग्राम पातळीपर्यंत विस्तारले. या संपूर्ण देशकार्यात महाराष्ट्र आघाडीवर होता. या राष्ट्रीय चळवळीच्या अनेक महत्वपूर्ण घटना घडामोडी महाराष्ट्राच्या प्रादेशिक तसेच स्थानिक पातळीवर नाशिक जिल्ह्यातही घडल्या तसेच राष्ट्रीय घडामोडींचा नाशिक जिल्ह्यावरही परिणाम झाला. हा परिणाम काय व कसा झाला, याचा आढावा पुढील विवेचनातून घेण्याचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील मध्ययुगाचा अंत होऊन आधुनिकतेची पहाट ब्रिटिशांच्या सत्तास्थापनेतुन झाली. पहाटेचा अंधार अधिकच गडद काळा असतो. जुने सोडता येत नाही व नव्याचा तात्काळ स्वीकारही करता येत नाही.

स्थित्यंतराच्या काळात यासारखी मराठी माणसाची द्विधा मनस्थिती होती. त्यामुळे महाराष्ट्राच्या आणि मुख्यता नाशिक परिसरा संदर्भात इंग्रजांच्या सत्ता स्थापनेपासूनच संघर्ष सुरू झालेला दिसतो. या कार्यामध्ये प्रामुख्याने नाशिक परिसरातील चांदवड, त्रंबक, मालेगाव हा परिसर आघाडीवर होता. या काळात त्रिंबकजी डेंगळे यांनी अहमदनगर, नाशिक व खानदेश या भागातील आदिवासी बांधवांना इंग्रजविरोधी संघर्षसाठी एकत्रित करण्याचे महत प्रयत्न केले. पुढे १८४५ मध्ये राघोजी भांगरे यांच्या नेतृत्वाखाली नाशिक व अहमदनगर भागात इंग्रजविरोधी प्रखर असे लढे लढले गेले. १८५७ चे स्वातंत्रसैनानी रघुनाथ पांडुरंग ऊर्फ तात्या टोपे हे येवल्याचे रहिवासी होते. त्यांना १८ एप्रिल १८५९ रोजी फाशी देण्यात आले.

सिन्नर जवळील नांदुर-शिंगोटे येथे भागोजी नाईक यांनी नाशिक-पुणे रस्त्यावरील बऱ्याच मोठ्या भागावर आपला प्रभाव निर्माण केला. त्यांच्या ठाण्यावर ०४ ऑक्टोबर, १८५७ रोजी इंग्रज अधिकारी हेन्री यांने हल्ला केला. यावेळी झालेल्या प्रखर अशा संघर्षात हेन्री मारला गेला. पुढील काळात इंग्रज सत्तेशी भागोजी नाईक यांनी मोठा संघर्ष उभा करून या परिसरातील बराच मोठा भाग काबीज केला व त्यावर आपला प्रभाव निर्माण केला तसेच त्यांनी आपला त्रिंबक, पेठ व हरसुल येथील उठावकर्त्यांशी देखील संपर्क ठेवला. दरम्यानच्या काळात त्यांचा इंग्रजविरोधी संघर्ष कडवा झाला. या संघर्षामध्ये त्यांचे बंधू महिपत नाईक व मुलगा यशवंत नाईक यांना देखील हुतात्म्य प्राप्त झाले. शेवटी पुढे इंग्रजविरोधी लढयात ११ नोव्हेंबर, १८५९ रोजी आपल्या साथीदारांसह भागोजी नाईक यांनाही वीरमरण आले.

०६ डिसेंबर, १८५७ रोजी शेकडो कोळी बांधवांनी हरसुल कचेरीवर हल्ला करून कचेरीतील कागदपत्रे जाळून टाकले व तेथील मामलेदार व काही शिपायांना अटक केली. पुढे त्यांनी पेठच्या सरकारी खजिन्याची लूट करून ही मंडळी सायंकाळी पेठचे राजे देशमुख यांना भेटले व यानंतर धरमपुर मार्गे जंगलात निघून गेले. पेठमध्ये झालेल्या या उठावाचे नेतृत्व केल्याबद्दल राजे भगवंतराव निळकंठराव देशमुख यांना इंग्रजांनी अटक करून ०४ जानेवारी, १८५८ रोजी पेठच्या मामलेदार कचेरीसमोर सर्वांसमक्ष फाशी दिले. यादरम्यान अनेक ठिकाणी सुमारे महिनाभराच्या काळात तीस लोकांना सर्वांसमक्ष फाशी देण्यात आले तर पंधरा उठावकर्त्यांना जन्मठेप / काळयापाण्याची शिक्षा देऊन अंदमान येथे पाठविण्यात आले. पुढे देशभरातील स्वातंत्र्य समराप्रमाणेच नाशिक परिसरात झालेले अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर हे ब्रिटिशांनी अमानुषपणे दडपून टाकले.त्यामुळे पुढील काळात सशस्त्र क्रांतीचा मार्ग सामान्य जनतेला दुष्कर वाटू लागला. दडपले गेलेले राष्ट्रीय समर हे सामान्यांसाठी भयंकर यातनादायी व राष्ट्रीय क्रांतिकारी प्रवाहापासून दूर नेणारे ठरले.

पुढे या सर्वांचा परिणाम होऊन ब्रिटिश प्रशासनात महत्वपूर्ण बदल झाले. त्यामुळे यानंतर ब्रिटिशांनी भारतीय समाज जीवन, धार्मिक जीवन, रूढी, परंपरा व संस्कृती बदलण्याच्या फंदात न पडता केवळ आपले

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

अर्थकारण व राजकारण साधण्यावर भर दिला व पुढे साधारणतः १८६० नंतर महाराष्ट्राप्रमाणे नाशिक जिल्ह्यातही संस्थात्मक जीवनाला सुरुवात झाली. पुढील काळात एकूणचइंग्रजांशी झालेल्या संघर्षाचे नेतृत्व हे नव्याने उदयाला आलेल्या नवशिक्षित मध्यमवर्गीयांकडे हस्तांतरित झाले व ब्रिटिश सत्तेच्या परिणाम स्वरूप समान कायदा, समान प्रशासन, समान प्रशासकीय भाषा व सर्व भारतीयांसाठी समान न्याय, समान शिक्षणपद्धती व समान वागणूक अशी ब्रिटिशांची नवी नीती व त्या अनुषंगाने भारतीयांसाठीच्या नव्या चौकटीची उभारणी झाली. ज्यामुळे भारतीयांचा पाश्चात्य भाषा, कला, वाङ्मय आणि नव्या संस्कृतीशी संबंध आला. त्यामुळे इंग्रजांना कनिष्ठ पदावर काम करणारा व तितकाच प्रभावी पाठीराखा असा नव्याने उदयाला आलेला सुशिक्षित मध्यमवर्ग मिळाला व भारतीयांनाही या नवसंस्कृतीपरीचयासोबत रेल्वे, पोस्ट, तारायंत्रांसारखी दळणवळणाची साधने व इंग्रजीसारखी समान भाषा मिळून विविधतेतील एकता मजबूत करण्यास पूरक माध्यम मिळाले. थोडक्यात, या सर्व घडामोडींचा सारस्वरूप मध्ययुगीन काळाचा अंत होवून सर्वसामान्य समाजजीवनाचे प्रश्न समजून घेणारा व ती सरकार दरबारात प्रभावीपणे मांडणारा सुशिक्षित मध्यमवर्ग उदयाला येवून समाजाचे नेतृत्व व भारतीय राजकारणाचे सूत्रे सांभाळताना दिसू लागला. या सर्व माध्यमांचा व इतरही अनेक महत्वपूर्ण घटकांचा परिणाम होवून पुढील काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली व तिने सुरुवातीला मवाळ व पुढे जहाल रूप धारण करून स्वराज्य व स्वातंत्र्याची मागणी केली. या सर्व घडामोडींदरम्यानच्या देशकार्यात नाशिकरांनीही वेळोवेळी आपला सहभाग नोंदविला.[१]

यादरम्यान नाशिक जिल्ह्यात उच्च शिक्षणासाठी पार्श्वभूमी निर्माण करणाऱ्या अनेक इंग्रजी, मराठी व उर्दू माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा स्थापन होवू लागल्या. त्यामधून प्रारंभिक शिक्षण पूर्ण केलेली व उच्च शिक्षणासाठी मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरात गेलेली तरुण पिढी आपले शिक्षण पूर्ण करून गावी परतल्यानंतर ती नवविचारांची व समाजजागृतीची कास धरू लागली. सोबतच समाजाला नवविचारांशी ओळख करून देणारे पुणे, मुंबईतील अनेक वृत्तपत्रे नाशिक जिल्ह्यातही उपलब्ध होवू लागली. या सर्वांचा एकत्रित परिणाम होवून नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा कमी अधिक फरकाने महाराष्ट्रभरातील घडामोडींप्रमाणेच आकाराला येवू लागला. जो स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत अतिशय निकराने व अविरत सुरू राहिला. नाशिक जिल्ह्यातील हा लढा सुरुवातीला एकेकट्याने, गटागटाने व नंतर संघटीत स्वरुपात समाजमानसांतून होवू लागला. त्यामध्ये जिल्ह्यातील अनेकांना आपल्या प्राणांचे बलिदानही करावे लागले. अनेकांना आपल्या वडिलोपार्जित मालमत्ता गमवाव्या लागल्या, तुरुंगात हालअपेष्ठा सहन कराव्या लागल्या तर अनेकांना सरकारच्या सावटाखाली अज्ञात जीवन जगावे लागले.[२]

ब्रिटिशांच्या सत्ता स्थापनेने महाराष्ट्रातील मध्ययुगाचा अंत होऊन आधुनिकतेची पहाट उजाडली. ही

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

पहाट प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करणारी असली तरी तिची वाट मात्र बऱ्याच अंशी काळ्या गडद अंधारातून जाणारी होती. त्यामुळे महाराष्ट्रातील इतर सामान्य जनतेप्रमाणे नाशिककरांचीही स्थिती अगदी गोंधळाची होती. जुने सोडता येत नाही व तात्काळ नव्याचा स्वीकारही करता येत नाही. अशा या समाज स्थित्यंतराच्या काळातच नाशिकमध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांनी समाजसेवेबरोबरच शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण व वैद्यकीय सेवा देणाऱ्या संस्थांची स्थापना केली. अर्थात ब्रिटिशांची सत्ता स्थापना व तिची मजबूत पायावर उभारणी हे यामागचे कारण असले तरी त्यामुळे येथील सामान्य जनता त्यांच्याकडे कुतूहल मिश्रित आश्चर्याने पाहू लागली, ज्यामुळे त्यांच्याविषयीचा नवा समाज दृष्टिकोन तयार होवू लागला. तर दुसरीकडे या काळात नाशिकमधील नवशिक्षित पिढी ही देखील नवे विचार व नव्या दृष्टिकोनातून परंपरागत समाज जीवनाकडे व व्यक्ती जीवनाकडे पाहू लागली. एकंदर हळूहळू का होईना मात्र सर्वसामान्य समाजातून शिक्षण घेतलेल्या तरुणांचा ओढा आता उच्च शिक्षणाकडे वाढू लागला. पुढे हेच शिक्षण व हिच तरुण शिक्षित पिढी स्वातंत्र्य विचार प्रसाराचे व समाज परिवर्तनाचे माध्यम बनू लागली.[3]

अर्थात, पुण्यामुंबईहून शिक्षण घेतलेली ही तरुण मंडळी आपल्या जिल्ह्यात नवे व स्वतंत्र विचारांचा प्रसार करू लागली. या दरम्यानच जनसामान्यांच्या विचारांना दिशा देण्याचे कार्य विविध वृत्तपत्रांनीही केले. यामध्ये लोकमान्य टिळकांचे ‘केसरी’ व ‘मराठा’, शि. म. परांजपे यांचे ‘काळ’ वृत्तपत्र, श्री. भोपटकर यांचे ‘भाला’ हे वृत्तपत्र याबरोबरच नाशिकमध्ये स्थानिक पातळीवरील ‘नाशिकवृत्त’ तसेच ‘नाशिक समाचार’ हे साप्ताहिक, ‘हिंदूमित्र’, ‘गंगालहरी’ व खरे वकिलांचे ‘नाशिक वैभव’, श्री. अनंत वामन बर्वे यांचे ‘लोकसेवा’ वृत्तपत्र तसेच ‘आर्यपंच’, ‘राघवभूषण’, ‘येवला वैभव’,‘सत्यमित्र’ इत्यादी वृत्तपत्रे या काळात निघाली. १८८५ मध्ये नाशिकमध्ये ‘विषय तरंगिणी’ हे नियतकालिक सुरू झाले. सन १९००च्या दरम्यान नाशिकमध्ये जिल्हाभरात ‘पुणेवैभव’, ‘केसरी’, ‘काळ’, ‘जगतहितेचछू’ तसेच ‘गुराखी’ ही वृत्तपत्रे पोहचू लागली. त्याचप्रमाणे ‘ज्ञानप्रकाश’ व ‘इंदुप्रकाश’ यासारखी सामाजिक सुधारणांवर भर देणारी वृत्तपत्रे देखील सार्वजनिक वाचनालयात येऊ लागली. या सर्व माध्यमांतून नाशिक जिल्ह्यातील तरुण मंडळींचे व एका अर्थात सबंध समाजजीवनाचे विचार प्रगल्भ होण्यास मदत होवू लागली व यातूनच पुढे नाशिक जिल्ह्याच्या संस्थात्मक जीवनाच्या वाटचालीस गती मिळू लागली.[४]

यावेळी जिल्हाभरात ठिकठिकाणी अनेक वक्तृत्व सभा, सार्वजनिक वाचनालयांची झालेली स्थापना तसेच नाशिक व सिन्नरमध्ये स्थापन झालेले प्रार्थना समाज, नाशिक शहरात स्थापन झालेले लवाद कोर्ट, नाशिक नगरपालिकेची स्थापना तसेच येवला, त्रिंबक, सिन्नर, इगतपुरी, मालेगाव अशा नाशिक जिल्ह्यातील अनेक शहरांमध्ये झालेली नगरपालिकांची स्थापना ही नाशिक जिल्ह्याच्या सार्वजनिक तसेच सांस्कृतिक जीवनाला दिशा

देणारे ठरले.[५] या सर्व घडामोडींदरम्यान नाशिकमध्ये प्रभावी अशा वाड्मयाची देखील निर्मिती होऊ लागली. श्री. गणेशशास्त्री लेले, श्री. बळवंत खंडूजी पारख, मालेगावचे श्री. बाळूसा मेहता, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वातंत्र कवी गोविंद, कवी नारायण टिळक या साहित्यिक मंडळींनी आपल्या क्षेत्रात नावलौकिक मिळविला. नाशिकच्या श्री. गणेशशास्त्री लेले यांनी लिहिलेले 'जानकीपरिणय' हे नाटक त्या काळात खूप गाजले. यावेळी कवी गोविंदांच्या कविता या महाराष्ट्रभर गणेशोत्सवात गायल्या जावू लागल्या तर वि. दा. सावरकरांनी भाषांतर केलेले मॅझिनीचे चरित्र व लिहिलेले अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ अनेकांना प्रेरणादायी ठरला.[६] अशा प्रकारे, नाशिक जिल्ह्याची वाटचाल स्वतंत्र विचाराकडे व या विचारातून स्वराज्य, स्वातंत्र्यप्राप्तीकडे होवू लागली.

**अभिनव भारत संघटना :**

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या सुरुवातीला देशभरातील काही मंडळी सरकारप्रतिची निष्ठा दाखविण्यात व्यस्त असताना नाशिकचा तरुणवर्ग मात्र समाजात क्रांतीची मशाल पेटविण्याच्या मार्गावर होता. त्यामधील अग्रणी नाव होते ते म्हणजे विनायक दामोदर ऊर्फ तात्याराव सावरकर यांचे. तात्यारावांनी केसरी व काळ पत्रातून लोकमान्य टिळक व शिवरामपंत परांजपे यांच्याकडून स्फूर्ती घेवून आपले विश्वासू मित्र म्हसकर व पागे यांच्यासोबत सन १८९९च्या अखेरीस राष्ट्रभक्त समूह नावाची संघटना स्थापन केली व पुढे या संघटनेत स्वातंत्र्यप्रेमी तरुणांची भरती व लोकसंग्रह करणारी मात्र दर्शनी निरुपद्रवी दिसणारी मित्रमेळा संघटनेची ०१ जानेवारी, १९०० रोजी स्थापना केली व ते या मित्रमेळयामार्फत लगेचच नाशिकच्या सांस्कृतिक जीवनात केवळ भागच नव्हे तर पुढाकार घेवून, तरुण मंडळींना एकत्र करून गणेशोत्सव व शिवजयंतीसारखे उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करू लागले. यामुळे नाशिकच्या तरुणांमध्ये अधिकाधिक उत्साह संचारू लागला.[७]

या मित्रमेळयाच्या आठवड्याच्या बैठकी होवून त्यामध्ये विविध विषयांची अभ्यासपूर्ण व्याख्याने व त्यावर सविस्तर चर्चाही होवू लागली. अर्थातच या चर्चेचा व अभ्यासाचा उद्देश समकालीन माहितीचे विश्लेषण करून या माध्यमातून सभासदांच्या प्रबोधनाचा व या सर्व माध्यमातून लोकसंग्रह करून स्वातंत्र्याकडे जाणारा मार्ग मोकळा करण्याचा आणि तरुणांना शाळेमध्ये न मिळणारे राष्ट्रप्रेमाचे शिक्षण देण्याचा होता.[८] सुरुवातीच्या काळात नवतरुणांनी सुरु केलेल्या या संघटनेची सार रूपाने माहिती घेण्याचे कारण म्हणजे ह्याच संघटनेच्या नेतृत्वामुळे व कार्यामुळे लवकरच नाशिकचे नाव केवळ देशभरातच नव्हे तर विदेशातही दुमदुमू लागले. अर्थात थोड्याच अवधीत या संघटनेच्या शाखा नाशिक जिल्ह्यात त्रिंबक, कोठुरे, भगूर व पुढील काळात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरही स्थापन झाल्या. मित्रमेळयाची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली, त्यामुळे गुप्तपणे बैठका घेवून कामाचा आढावा तसेच कार्याचे नियोजन करून याअगोदर झालेल्या चुका दुरुस्त करण्याची योजना आखल्या

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

जावू लागल्या. या कार्यात तरुणांसोबत अनेक स्थानिक मंडळी तसेच शासकीय सेवेतील मंडळींचाही समावेश होता. त्यामुळे अनेक वेळा सरकारचे नियोजन व धाडसत्र यांची अगोदरच खबरबात सदस्यांपर्यंत पोहचून पुढील अनर्थ टळत असे.[९] अशा प्रकारच्या अनेक सभा उदा. १९०३ मध्ये धुळयास, १९०४ मध्ये नाशिकला, १९०५ मध्ये कोठूरला, १९०६ मध्ये मुंबईला शीव येथे घेण्यात आल्या. १९०४ मध्ये नाशिकच्या मेळाव्यामध्ये मुंबई, पुणे, सोलापूर, खानदेश, वऱ्हाड व इतर असे सुमारे २०० प्रतिनिधी जमले असता त्यामध्ये मित्रमेळयाचे मँझनीच्या 'तरुण इटली' या संघटनेच्या धर्तीवर '**अभिनव भारत**' असे नामकरण करण्यात आले.[१०]

**नाशिकच्या तरुणांचा देशभरातील क्रांतिकारकांशी संबंध :**

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या निमित्ताने देशभरातील समविचारी कार्यकर्ते एकत्र आल्याने महाराष्ट्रातील गुप्त कार्यकर्त्यांचे मेळावे महाराष्ट्रासह १९०६ कलकत्ता व १९०७ मध्ये सुरत येथे पार पडले. कलकत्ता व सुरत येथे राष्ट्रीय सभेच्या निमित्ताने जमलेल्या या समविचारी मंडळींचा संवाद होवून त्यांच्यामध्ये समन्वय साधला गेला. बंगालच्या क्रांतिकारकांशी संबंध जोडण्यासाठी बाबाराव सावरकर, बाबासाहेब खरे वकील, डॉ. भट व अण्णा कर्वे गेले असता बंगालमधील संस्थेबरोबर त्यांनी गुप्तकार्याच्या माहितीची देवाणघेवाण केली, ज्यामुळे बंगालमधील अनुशीलन समिती, स्वाधीन भारत, युगांतर गट इ.शी नाशिकचा संबंध जुळून आला व सर्वांनी एकमेकांना विश्वासात घेवून एकाच वेळी देशभरात सशस्त्र क्रांतीची उठावणी करण्याचा सर्वानुमते निर्णय झाला. सुरत कॉंग्रेसच्या वेळी बारीन्द्रकुमार घोष (योगी अरविंद घोष यांचे बंधू), मद्रासचे क्रांतिकारक चि. द. देवर पिल्ले हे **अभिनव भारत**चे शपथबद्ध सभासद झाले. या सर्व माध्यमातून नाशिकमधील देशभक्तांची देशभरातील विविध ठिकाणच्या कार्यकर्त्यांशी संबंध दृढ होण्यास मदत झाली.[११]

अशा प्रकारे, आतापर्यंत निर्माण झालेल्या संबंधांतून देशभरातील क्रांतीकारकांची विचारसरणी एकसमान मात्र कार्यसिद्धीसाठीच्या तयारीची व ती प्रत्येक्षात अंमलात आणण्यासाठी लागणाऱ्या वेळीची तफावत असल्याचे लक्षात आले. एका अर्थाने, यावेळी देशात प्रातिनिधिक स्वरुपात क्रांतिकार्य सुरु होवून त्यांचे राष्ट्रीय पातळीवरील संघटनही होवू लागले. त्यामुळे या क्रांतिकारकांनी पुढील कार्यासाठी व नियोजनासाठी तसेच सभासद व जनजागृतीसाठी स्वातंत्र्यविचार प्रवर्तक अशा साहित्याचे लेखन व प्रकाशनावर भर देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे नाशिकमधील अनेक तरुणांनी पूर्वीपासूनच उत्स्फुर्तपणे लेखनाला सुरुवातही केलेली होती. कवी गोविंदांच्या राष्ट्रभक्तीपर कविता ठिकठिकाणी गायल्या जावू लागल्या होत्या तर वीर सावरकरांचे लेखन व त्यांच्या वाणीची सरकारला भीती वाटू लागली होती. या काळात सावरकरांचे मॅझिनीचे चरित्र हा ग्रंथ लोकप्रिय झाला व त्याचेच परिणामी स्वरूप त्यांचा **१८५७चे स्वातंत्र्य समर** हा ग्रंथ प्रकाशनापूर्वीच सरकारने जप्त करून त्यावर बंदीही घातली. खरे तर सरकारच्या या कृतीतून नाशिकमधील तरुणांच्या लेखणीची धार व त्यामुळे

सरकारने त्यांच्या लिखाणाची घेतलेली दखल, यांची जाणीव होते. हे साहित्य जवळ बाळगले व सरकारविरोधी साहित्य प्रकाशित केल्यामुळे पुढे बाबाराव सावरकरांना सरकारने अटक करून शिक्षाही केली.[१२]

या सर्व वातावरणाचा परिणाम होवून सरकारी अधिकारी वर्गाला व एकूणच परकीय सरकारला ही तरुण मंडळी जुमानेसी झाली. त्याचाच एक परिणाम म्हणून नाशिकमधील या तरुणांना 'वंदे मातरम' खटल्यात गोवले गेले. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रभर हा खटला खूप गाजला. त्यामध्ये वामनराव खरे वकील, ग.दा. उर्फ बाबाराव सावरकर, श्रीधर रघुनाथ वर्तक, नारायण दा. सावरकर अशी एकूण ११ मंडळी होती. शेवटी दडपशाहीचा पराजय होवून या खटल्यातून ही सर्व मंडळी सुखरूप बाहेर पडली.[१३]

नाशिक जिल्ह्यातील ठळक घटनांमध्ये गाडीवान प्रकरण, लोकमान्य टिळकांच्या शिक्षेविरुद्ध जनजागृती, खरे वकील व बाबाराव सावरकर यांना झालेली शिक्षा या सर्व घटनांचा एकत्रित परिणाम म्हणजे कलेक्टर जँक्सन वध प्रकरण (१९०९) हे होय. त्यामध्ये अनंत कान्हेरे, कृष्णाजी गोपाल कर्वे, विनायक देशपांडे या देशभक्त मंडळींना ठाणे तुरुंगात १९ एप्रिल १९१० रोजी फाशी देण्यात आले तसेच या प्रकरणात विनायकराव सावरकर यांनाही गोवले गेले व त्यांच्यासोबत ३८ व्यक्तींवर ब्रिटिश शासनाविरुद्ध कट करण्याच्या आरोपावरून **'नाशिक कटाचा खटला'** भरविण्यात आला. नाशिक खटल्याचे परिणाम केवळ नाशिकपर्यंतच मर्यादित न राहता महाराष्ट्रभर किंबहुना देशभर त्याचे परिणाम झाले.जिल्हाभर ब्रिटिश प्रशासनाच्या दडपशाहीचा कहर पहायला मिळाला. त्यामुळे यानंतरचा काही काळ नाशिकमध्ये राजकीय शांतता होती. [१४] पुढे १९१७ मध्ये नाशिक शहरात होमरूल लीगची स्थापना व सोळावी प्रांतिक परिषद होवून नाशिक जिल्हा पुन्हा देशकार्यासाठी सज्ज झाला.

**नाशिकमध्ये होमरूल लीगची स्थापना व सोळावी प्रांतिक परिषद :**

२८ एप्रिल, १९१६ रोजी लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात होमरूल लीगची स्थापना केली व त्यापाठोपाठ आपल्या सभांतून होमरूल लीगचा प्रसारही केला. लोकमान्य टिळकांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात होमरूल लीगची स्थापना झाल्याने लवकरच तिच्या जिल्हानिहाय शाखा देखील स्थापन होवू लागल्या. या चळवळीच्या लोकप्रियतेमुळे टिळकांना सरकारच्या दडपशाहीचे चटके देखील सहन करावे लागले. असे असले तरी नाशिकमध्ये १९१७ पर्यंत होमरूलची शाखा नव्हती. प्रांतिक सभेच्या निमित्ताने नाशिकमध्ये राष्ट्रीय चळवळीला होमरूल लीगची जोड मिळून लोकमान्यांच्या प्रेरणेने श्री. किसनलालजी तिवारी यांनी नाशिकमध्ये होमरूल लीगची स्थापना केली.[१५] नाशिकमधील प्रांतिक परिषदेबरोबरच नाशिकमध्ये स्वराज्यसंघाच्या वार्षिक परिषदेचेही आयोजन झाले. या दोन्ही परिषदांच्या निमित्ताने महाराष्ट्रभरातून हजारो प्रतिनिधी, कार्यकर्ते नाशिकला आले. नाशिकची ही प्रांतिक परिषद श्रीनिवासशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली व लोकमान्य टिळकांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या परिषदेच्या निमित्ताने टिळक नाशिकला आले असता त्यांची भव्यदिव्य मिरवणूक काढून स्वागत

करण्यात आले. या कार्यात नाशिकच्या अनेक कार्यकर्त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यावेळी गोदेकाठी यशवंतराव महाराज पटांगणावर लोकमान्य टिळक, दादासाहेब खापर्डे आदि पुढाऱ्यांची व्याख्याने प्रचंड गाजली.[१६] अशा प्रकारे प्रांतिक परिषद यशस्वीरित्या पार पडून नाशिकमध्ये होमरूल लीगची स्थापना होवून जिल्ह्यात पुन्हा एकदा देशकार्याचे वारे वाहू लागले.

**असहकार चळवळ :**

गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या असहकार चळवळीत नाशिक जिल्ह्याने सक्रीय सहभाग घेतला. गांधीजींनीही पंडित मोतीलाल नेहरू व इतर महत्वाच्या पुढाऱ्यांसह नाशिकला भेट देवून व या ठिकाणी सभा घेवून असहकार चळवळीविषयी जागृती केली.[१७] राष्ट्रीय पातळीवरील पुढाऱ्यांच्या भेटीमुळे नाशिक जिल्ह्यात चळवळीविषयी उत्साहाचे वातावरण पसरले. त्यामुळे जिल्हाभरात असहकार चळवळीच्या रचनात्मक व बहिष्कारात्मक अशा दोन्ही अंगांचा प्रभावीपणे प्रयोग सुरु झाला.

बहिष्काराचा भाग म्हणून श्री. विठ्ठल उपाध्ये वकिलांनी आपला वकिलीचा व्यवसाय सोडला व पुढे त्यांनी गद्रे वकील व पाटणकर वकील यांच्या सहायाने नाशिकमध्ये लवाद कोर्टाची स्थापना केली. श्री. शिवरामपंत कळवणकर, श्री. गोपाळराव जोशी, श्री. बर्वे यांनी आपल्या सरकारमान्य शाळेतील नोकरीचा राजीनामा देवून श्री. बाळासाहेब मराठे, कृ. ब. महाबळ, नरहरपंत क्षीरसागर यांच्या मदतीने नाशिकमध्ये टिळक राष्ट्रीय शाळेची स्थापना केली. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा सोडून राष्ट्रीय शाळेत प्रवेश घेतला. गोविंदराव देशपांडे, श्रीराम गोसावी, वामनराव यार्दी, द. बा. खाडिलकर ही त्याची काही प्रातेनिधिक उदाहरणे आहेत, जी पुढे देशकार्यात अग्रेसर ठरली.[१८]

यावेळी नाशिक जिल्हाभर विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्यात आला. सकाळी प्रभात फेरी, दुपारी खादी प्रचार, रात्री सभा व बैठका होवून परदेशी कापडाच्या होळया पेटविल्या जावू लागल्या. घरोघर चरखे फिरू लागले, खादीचा प्रचार प्रसार सुरु झाला. राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रप्रेमाचे प्रभावी विचार प्रसारित केले जावू लागले. येवल्यातील पांडुरंग आपटे गुरुजींची राष्ट्रीय शाळा ही महाराष्ट्रातील आदर्श राष्ट्रीय शाळा ठरली. या शाळेने राष्ट्रीय शाळेतील शिक्षकांसाठी राज्यस्तरीय परिषदेचे यशस्वी आयोजनही केले. यादरम्यान चांदवड येथे श्री. केशवलालजी आबड यांनी जैन गुरुकुलाची स्थापना केली, ज्यामध्ये बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण व भारतीय संस्कृती, परंपरा संवर्धनाचे धडेहीदिले जात होते.[१९]

सामाजिक समतेच्या लढ्यात नाशिकमधील काळाराम मंदिर सत्याग्रह संपूर्ण महाराष्ट्रभरच नव्हे तर देशभर गाजला.[२०] बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांची आंदोलने सरकारला शेतसारा पुनर्विचार करण्यास भाग पाडणारी ठरली. यावेळी सरदार वल्लभभाई पटेल, शंकरराव देव, मनीबेन यांनी बागलाणला भेट देऊन शेतकऱ्यांना

मार्गदर्शन केले.[२१]अशा प्रकारे असहकार चळवळ जिल्हाभरात राबविली गेली.

**नाशिक जिल्ह्यातील असहकार चळवळ:**

०१ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचा मृत्यु झाला. त्यांच्यानंतर भारतीय राजकारणात म. गांधी हे राष्ट्रीय नेतृत्व म्हणून पुढे आले. या अगोदर गांधीजींनी प्रादेशिक पातळीवरील लढ्यांचे नेतृत्व केले असले तरी यावेळी पहिल्या प्रथमच गांधीजी राष्ट्रीय पातळीवरील प्रश्न घेवून इंग्रज सरकारशी संघर्षास सज्ज झाले. त्यासाठी गांधीजींनी संपूर्ण देशवासियांना आपल्यासोबत देशकार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. यादरम्यान एक कोटी रुपयांचा टिळक फंड, एक कोटी काँग्रेस सदस्यांची नावनोंदणी, देशभर वीस लाख चरखे आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे एका वर्षात स्वराज्य इत्यादी घोषणांमुळे गांधीजींप्रति देशभरातील सर्वच लोकांना विलक्षण आकर्षण निर्माण झाले आणि त्यापुढील भारतीय राजकारणातील घटना या त्यामध्ये अधिकची भर घालणाऱ्या ठरल्या आणि याचे परिणाम स्वरूप गांधीजी राष्ट्रीय नेतृत्व व भारतीय राज्यकारभाराचे केंद्रबिंदू बनले.[२२]

सरकारने इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट बिल क्रमांक एक, १९१९ व क्रिमिनल इमर्जन्सी पॉवर बिल क्रमांक दोन, १९१९ ही दोन्ही बिले पारित करून भारतीयांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणली. या व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या बिलाविरुद्ध गांधीजींनी देशवासियांना चळवळीचे आवाहन केले. त्यानुसार, ३० मार्च १९१९ व ०६ एप्रिल रोजी देशभर हरताळ पाळून प्रार्थना सभा घेऊन या कायद्याचा निषेध केला गेला. यावेळी ०६ एप्रिल रोजी दिल्ली येथे पोलिसांनी केलेल्या लाठीमार व गोळीबारात अनेक लोक जखमी व मृत्युमुखी पडले. या घटनेचा देशभर निषेध होवून सरकारविरोधी सभा झाल्या. यादरम्यान पंजाबमधील परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊन स्थानिक प्रशासनाने अमृतसरचे स्थानिक पुढारी डॉ. सत्यपाल व डॉ. किश्चलू यांना अटक करून अज्ञात स्थळी ठेवले. परिणामी पंजाबमधील परिस्थिती अजूनच बिघडली. पंजाबमधील पुढाऱ्यांच्या अटकेच्या निषेधार्थ ३० एप्रिल रोजी अमृतसर, जालियानवाला बाग येथे जमलेल्या निशस्त्र लोकांवर इंग्रज अधिकाऱ्यांनी बेछूट गोळीबाराचा आदेश दिला, ज्यामध्ये शेकडो लोक मारले गेले व हजारो लोक जखमी झाले. या अमानवी व दुर्दैवी घटनेचा देशभरात तसेच जगभरात देखील निषेध नोंदविला गेला. नाशिकमध्ये देखील या घटनेचे पडसाद उमटले. सरकारच्या या कृत्याविरुद्ध नाशिकमध्ये प्रचंड सभा घेवून निषेध नोंदविला गेला. नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीने श्री. रघुनाथ हरी गद्रे वकील, श्री. पाटणकर वकील, श्री. केतकर वकील व इतर पुढाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सभेचे आयोजन करून संबंधित घटनेची जनतेला माहिती करून दिली व नाशिककरांच्या व संपूर्ण देशवासीयांच्या वतीने अमृतसरच्या घटनेचा व सरकारच्या कृत्याचा जाहीर निषेध केला.[२३]

यावेळी असहकार चळवळीबरोबर गांधीजींनी खिलाफत चळवळीचे देखील नेतृत्व स्वीकारून देशभरात

हिंदू-मुस्लिमांमध्ये ऐक्य साधून ब्रिटिश सरकारला जेरीस आणण्याचे प्रयत्न केले. या चळवळीदरम्यान गांधीजींनी अली बंधुंसह देशभर दौरे करून चळवळ अहिंसक मार्गाने चळवळ सुरू ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी गांधीजींनी नाशिक शहराला देखील भेट दिली. ०४ नोव्हेंबर, १९२० रोजी महात्मा गांधी, पंडित मोतीलाल नेहरू आणि मंजूअली रहमतअली खत्री यांनी नाशिकला भेट देऊन येथे प्रचंड सभा देखील घेतली.[२४] यावेळी नाशिककरांनी गांधीजींचे भव्य असे स्वागत केले. नाशिकमध्ये आल्यानंतर सुरुवातीला गांधीजींनी श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांची भेट घेतली. या भेटीवेळी काँग्रेसची अनेक कार्यकर्ती मंडळी उपस्थित होती. त्यानंतर गोदावरीकाठी यशवंतराव महाराज पटांगणावर गांधीजींची प्रचंड सभा झाली. सरकारी अहवालानुसार या सभेला तीन ते चार हजार लोक उपस्थित होते. या सभेचे अध्यक्ष श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी हे होते. यावेळी महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू व खत्री यांनी असहकार चळवळ, खिलापत चळवळ यांची नाशिककरांना माहिती करून दिली. त्याचबरोबर भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे व काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारण्याचेही आवाहन केले. सभेमध्ये परदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशीचा अधिकाधिक वापर करून खादीधारण करण्याचेही आवाहन करण्यात आले.[२५] अशा प्रकारे गांधीजींच्या रूपाने प्रभावी राष्ट्रीय नेतृत्व नाशिकमध्ये आल्याने नाशिकमधील असहकार चळवळीचा उत्साह अधिकच वाढला.

यादरम्यान नाशिकमध्ये असहकार चळवळीच्या सर्व कार्यक्रमांचा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली प्रारंभ करण्यात आला. श्री. शिवरामपंत कळवणकर, श्री. गोपाळराव जोशी व श्री. बर्वे यांनी सरकारमान्य शाळांतील आपल्या शिक्षक पदाचा राजीनामा देऊन त्यांनी बाळासाहेब मराठे व श्री. कृ. ब. महाबळ, श्री. नगरकर व श्री. क्षीरसागर यांच्या मदतीने टिळक राष्ट्रीय शाळेची स्थापना केली. यावेळी गोविंदराव देशपांडे, श्रीराम गोसावी व वामनराव यार्दी यांसारख्या अनेक तरुणांनी सरकारी शाळा सोडून राष्ट्रीय शाळेत प्रवेश घेतला. डॉ. खाडिलकर हे यावेळी मुंबईला एम.बी.बी.एस.च्या शेवटच्या वर्गात होते. त्यांनी देखील मुंबईचे सरकारी कॉलेज सोडून राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला व पुण्याच्या टिळक महाविद्यालयातर्फे स्थापन झालेल्या टिळक विश्वविद्यालयाच्या आयुर्वेद विशारद या परीक्षेत उत्तीर्ण होऊन आपली डॉक्टरेट ही राष्ट्रीय शिक्षण संस्थेतर्फे पूर्ण केली. श्री. चिंतामणराव पाटणकर वकील हे पुण्याच्या डेक्कन कॉलेजात इंटरच्या वर्गात होते. त्यांनी देखील यावेळी कॉलेज सोडून नाशिकमध्ये राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदविला. अशा प्रकारे अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या हिताचा व सरकारी नोकरीचा विचार न करता सरकारी संस्थावर बहिष्कार टाकून देशकार्यात सहभाग घेतला.[२६] नाशिक शहरातील व जिल्ह्यातील ही प्रातिनिधिक उदाहरणे असली तरी अनेक पालकांनी आपल्या मुलांना राष्ट्रीय शाळेत दाखल केले. त्यामुळेच पुढील काळात नाशिक जिल्ह्यात राष्ट्रीय शाळांना यश मिळालेले दिसते.

या चळवळीदरम्यानच नाशिकमध्ये वेगवेगळया पुढाऱ्यांची भाषणे देखील झाली. काळकर्ते श्री. शि.म.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

परांजपे हे नाशिकच्या तरुणांचे एक प्रेरणास्थान होते. यावेळी परांजपे यांची झालेली सभा मोठ्या उत्साहात पार पडली. सरकारने विनापरवानगी अशी सभा घेतल्याबद्दल आकुत वकील व गद्रे वकिलांना एक हजार रुपये दंड देखील केला. मात्र अशा प्रसंगातून नाशिकच्या पुढारी मंडळींच्या समाजजागृतीच्या उत्साहात अधिकची भरच पडली.[२७] अशा प्रकारे, असहकार आंदोलन नाशिक जिल्ह्यात आकारास येत होते.

नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकला जात होता. त्यासाठी नाशिकमध्ये आकुत वकील, आर. जी. प्रधान व श्री. गद्रे वकील यांनी विदेशी कापडावर बहिष्कार करून स्वदेशीच्या वापराचे आवाहन करण्यासाठी संपूर्ण जिल्हाभर दौरे काढून लोकांमध्ये खादी व स्वदेशीची जागृती केली. या चळवळीच्या परिणाम स्वरूप याकाळात नाशिकमधील अनेक तरुणांनी व अनेक कार्यकर्त्यांनी खादी धारण केली. नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीमार्फत यावेळी सार्वजनिक रीतीने सूतकताईचे कार्यक्रम व प्रशिक्षण वर्गही आयोजित करून खादीचे प्रचारकार्य व खादीचा विचार घरोघरी प्रसारित केले जावू लागले.[२८] यादरम्यान नाशिकमधील अनेक तरुण मंडळी गावांमध्ये फिरून विदेशी कापडांच्या होळया करू लागली. चांदवड शहरातील काँग्रेसचे पुढारी श्री. केशवलालजी आबड यांनी गावागावांमध्ये फिरून विदेशी कापड गोळा करून त्यांच्या चौकाचौकात होळया केल्या तसेच या विदेशी कापडाच्या एका होळीजवळ स्वतः तहसीलदार आले असताना या तरुणांनी तहसीलदारांच्या डोक्यावरील विदेशी टोपी होळीत टाकून त्यांना स्वदेशी टोपी भेट केली व सोबत राष्ट्रपुरुषांच्या नावाचा जयघोषही केला. तरुणांचा उत्साह व आवेश पाहून तहसीलदारांनी यावेळी काढता पाय घेतला.[२९] मात्र अशा घटनांतून नाशिक जिल्ह्यातील तरुणांचा देशकार्यातील उत्साह अधिकच वाढत गेल्याचे दिसते. अशाच प्रकारचे खादी प्रसाराचे व रचनात्मक कार्यामध्ये चांदवड तालुक्यातील श्री. वालचंद हिराचंद गुजराती यांनी देखील कार्य केले. बहिष्कार चळवळीत इगतपुरीचे लालचंदजी पारख यांनी काँग्रेस विचारांचा प्रचार प्रसार केला. त्यांनी स्वतः खादी धारण करून काँग्रेसचे कार्यकर्ते जमवण्यासाठी प्रयत्न केले. मालेगावमध्ये प्रा. एस. के. शहा यांनी देखील अशाच प्रकारचे कार्य केले. त्यांनी स्वतः स्वदेशीचे प्रदर्शन भरून परदेशी मालावर बहिष्काराचा प्रचार केला.[३०] अशा प्रकारे नाशिक जिल्ह्यामध्ये असहकार चळवळीच्या रचनात्मक व बहिष्कारात्मक अशा दोन्ही अंगांचा प्रचार होवू लागला. सोबतच जिल्हाभरात खादी व ग्रामोद्योगाला देखील महत्त्व दिले गेले.

**असहकार चळवळीदरम्यानचे नाशिक जिल्ह्यातील रचनात्मक कार्य:**

नाशिक जिल्ह्यामध्ये वर उल्लेख केलेल्या कार्याबरोबरच सर्वसामान्य जनतेचा देशकार्यातील सहभाग वाढविण्यासाठी रचनात्मक कार्यदेखील प्रभावीपणे राबविले गेले. या माध्यमातून गांधीजींनी दिलेल्या संदेशाचे पालन करून यावेळी चळवळीला विधायक कार्याची जोड दिली गेली. या कार्यक्रमात खादीप्रचार, अस्पृश्यता निवारण, ग्रामसंघटन, राष्ट्रीय शिक्षण, मध्यपान निषेध अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमांच्या

माध्यमातून नाशिक जिल्ह्यात सकारात्मक उर्जा निर्माण करून देशकार्यात लोकांना समाविष्ठ करून घेण्यात आले. जिल्हाभरात हे कार्य जोमाने पुढे नेणारे अनेक कार्यकर्ते यावेळी पुढे आले. बागलाणमधील श्री. नरहर गोपाळशेट यांनी या कार्यात स्वतःला वाहून घेतले. त्यांनी स्वतः खादीचा स्वीकार व प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणावर केला.[३१] इगतपुरी येथील श्री. लालचंद धूळचंदजी पारख यांनी देखील खादीला आपले जीवन कार्य मानले. त्यांनी ठिकठिकाणी फिरून खादीचा प्रचार प्रसार केला. मालेगावच्या प्रा. एस के शहा यांनी खादीचे अनेक वर्ष प्रचारकार्य केले. नरहर गोपाळ शेठ यांनी नामपुरला खादी निर्मितीचे केंद्र उभारून तेथे खादी खरेदी-विक्रीचे भांडारही उभारले.[३२] अशा प्रकारे चरखा, खादी, सूतकताईचे कार्यक्रम काँग्रेसचे व स्वराज्याचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे माध्यम बनले.

या वेळीच्या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय शिक्षण हा महत्त्वाचा घटक होता. नाशिक शहरात झालेली राष्ट्रीय शाळेची स्थापना हे त्याचेच प्रतीक होते. त्याचप्रमाणे लासलगाव येथील जैन शैक्षणिक संस्था व त्याचबरोबर चांदवड येथील श्री. आबड यांची संस्था याच पद्धतीचे कार्य करत होती. येवल्यातील 'टिळक राष्ट्रीय शाळा' हे महाराष्ट्रातील राष्ट्रीय शाळेचे उत्तम उदाहरण होते. स्वतः महात्मा गांधींनी येवल्याला भेट दिली असताना राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले होते. यावेळी स्थानिक व्यापारी श्री. भागचंद शेटजी यांनी लोकमान्य टिळकांची स्मृती गावात राहावी म्हणून शाळेसाठी २० हजार रुपयांची मदत गांधीजींकडे सुपूर्त केली होती व या मदतीच्या सहाय्याने श्री. नानासाहेब वाघ, श्री. काकासाहेब थत्ते, डॉ. साठे, डॉ. भट यांनी टिळक राष्ट्रीय शाळेची १९२१ मध्ये स्थापना केली.[३३] या शाळेमध्ये आदर्शवत अशा देशभक्त शिक्षकांची परंपरा होती. त्यामध्ये श्री. पांडुरंग आपटे गुरुजी. श्री ल. ब. कुलकर्णी, श्री. का.र. वैशंपायन, श्री. द. ध. पुराणिक व श्री. उद्धव वामन भाटवडेकर हे शिक्षक स्थानिक तरुणांचे व विद्यार्थ्यांचे आदर्श होते. ही शिक्षक मंडळी शाळेतील संपूर्ण कामे स्वतः करून विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवत. शाळा स्वच्छ करणे, सारवणे, शाळेत रंगरंगोटी करणे, शाळेतील मुलांसाठी पाणी भरणे, त्यासाठीचे भांडी स्वच्छ करणे, इत्यादी काम शिक्षकच करत. शिक्षकांच्या या दिनक्रमातून विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळत असे. येवल्यातील शाळेच्या विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने अधिक होती. या शाळेमध्ये सकाळी कसरती, सूर्यनमस्कार, विविध प्रकारचे खेळ हे शिक्षक विद्यार्थ्यांसोबत स्वतः खेळत. शाळेत विद्यार्थ्यांना सुतकताईचेही शिक्षण दिले जात असे. अशा प्रकारे येवल्याची शाळा राष्ट्रीय शाळांमध्ये आदर्शवत अशी शाळा ठरली. या शाळेतील उपक्रमांत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती, लो. टिळकांची पुण्यतिथी, गांधी जयंती यांसारखे राष्ट्रीय उत्सव साजरे केले जात असत व या उत्सवानिमित्ताने व्याख्यानासाठी अनेक राजकीय पुढारी, साहित्यिक, कीर्तनकार व शिक्षणतज्ञ यांना आमंत्रित केले जात असे. त्यामध्ये श्री. काकासाहेब कालेलकर, सेनापती बापट, साने गुरुजी, द. वि. गोखले, श्री. छापेकर, विनोबाजी भावे इत्यादी मंडळींनी देखील

व्याख्याने दिली होती. एकंदर ही शाळा महाराष्ट्र राष्ट्रीय शिक्षणाची आदर्श शाळा होती. सन १९२८ ची राष्ट्रीय शिक्षण परिषद येवला येथे भरली असता या शाळेने परिषदेची जबाबदारी अतिशय समर्थपणे पद्धतीने पार पाडली. पुण्याचे आचार्य वि. प्र. लिमये हे या परिषदेत अध्यक्ष होते. त्यांनी देखील या शाळेला विद्यार्थी व पालक वर्गाचा मिळालेला प्रतिसाद पाहून प्रशंसाही केली होती.[३४]

**मध्यपान निषेध:**

नाशिक जिल्ह्यात असहकार आंदोलनातील विदेशी कापडावरील व दारूवरील बहिष्कार हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम होता. जिल्हाभरातून या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत होता. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. गद्रे वकिलांनी जिल्हाभरातील काँग्रेस कार्यकर्त्यांना दारू निरोधन व त्यावरील बहिष्काराच्या सूचना दिल्याने, त्यानुसार नाशिक जिल्ह्यातील अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी जिल्हाभर मद्यपान निषेधाचा प्रचार-प्रसार केला व त्यासाठी प्रत्यक्ष दारू गुत्त्यांवर जाऊन पिकेटिंग करून लोकांना दारूपासून परावृत्त केले. या कार्यात नाशिकमधील अनेक तरुण मंडळी कार्यरत होती. त्यामध्ये श्री. गद्रे वकील, श्री. पाटणकर वकील, श्री. केतकर अशी काही प्रमुख मंडळी देखील होती.[३५]

असहकार आंदोलनामध्ये वर उल्लेख केलेल्या कार्यक्रमांसोबतच अस्पृश्यता निर्मूलनाचे व हिंदू मुस्लीम एकात्मतेचे देखील कार्य व त्याचा प्रचार प्रसार केला गेला. या कार्यात कॉंग्रेसचे जेष्ठ पुढारी श्री. गद्रे वकिलांनी जिल्ह्यातील नाशिक, मालेगाव व येवला भागात ठिकठिकाणी सभा घेऊन एकात्मतेचा संदेश दिला.[३६] येवल्यामध्ये वनिता संघाच्या सदस्या सौ. राधाबाई आपटे यांनी कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय जागृतीचे कार्य केले. सौ. राधाबाई व त्यांचे पती श्री. आपटे गुरुजी यांनी जातिभेद दूर करण्यासाठी विविध उपक्रम राबविले. यादरम्यान आपटे गुरुजींनी मुळशी सत्याग्रहात देखील भाग घेतला. नाशिक जिल्ह्यातील आपटे गुरुजी, श्री. वैशंपायन गुरुजी तसेच श्री. ना. प. दाते, श्री. म. ग. पतळी, श्री. द. प. साने, मालेगावचे श्री. आ. ह. वैद्य, त्रंबकेश्वरचे श्री. ब.शी. गोरे यांनी मुळशी सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांना अटक होऊन तुरुंगवास देखील भोगावा लागला.[३७]

यादरम्यान म. गांधींनी २२ मे १९२१ रोजी येवल्यास भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत श्री. माधवराव देसाई, श्री. रमणलाल गुजराती तसेच नाशिकचे उपाध्ये वकील इत्यादी मंडळी होती. यावेळी घेण्यात आलेल्या सभेमध्ये येवलेकरांनी टिळक फंडासाठी चारशे रुपये रोख रक्कम गांधीजींकडे सुपूर्त केली. याच आशयाची सभा म. गांधी यांनी मनमाड येथे देखील घेतली[३८] तसेच या संपूर्ण चळवळीदरम्यान नाशिक जिल्ह्यामध्ये सामाजिक समतेसाठी लढे देखील उभारले गेले. नाशिकमध्ये १९३०-१९३५ यादरम्यान नाशिकच्या काळाराम मंदिर या देवस्थानातील प्रवेशाचा प्रश्न खूप गाजला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली या सत्याग्रहाचे

नेतृत्व श्री. भाऊराव गायकवाड यांनी केले. यावेळी महाराष्ट्रभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळाला.[३९] यादरम्यानच बागलाणमधील सारावाढविरोधी चळवळीने देखील संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. नाशिक जिल्ह्यातील बागलाण, कळवण व मालेगाव हा भाग मुळातच कमी पावसाचा व त्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती असताना सरकारने वाढवलेला शेतसारा भरणे शेतकऱ्यांना अशक्य झाले व परिणामी त्या विरोधात स्थानिक पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांचे नेतृत्व करून या चळवळीला आकार दिला. त्यामध्ये डॉ. गंगाराम भुतेकर, सीतारामदासशास्त्री, श्री. रघुनाथ हरी गद्रे तसेच स्थानिक नेतृत्व श्री. नरहर गोपाळशेठ, श्री. शंकरराव पोद्दार, श्री. देवचंद पाटील ही मंडळी कार्यरत होती. पुढे या आंदोलनाला महाराष्ट्र प्रांतिक कमिटीने देखील पाठिंबा जाहीर केल्याने शेतकऱ्यांचे प्रश्न संपूर्ण महाराष्ट्राला लक्षात आले. या आंदोलनासाठी शेतकऱ्यांना एकजूट करण्यासाठी श्री. मोहिनीराज काथे, डॉ. भुतेकर, श्री. दे. भि. पाटील, श्री. शंकरराव पोतदार, श्री. नारायण खोटाडे, श्री. सजन राघो पाटील, श्री. गोपाळराव पाटील, श्री. शंकरराव शेवाळे, श्री. काळू तानाजी पाटील यांनी जायखेडे, ताहराबाद, मुल्हेर, विरगाव, डांगसौंदाने, सटाणा, लोहनेर, लखमापूर इत्यादी गावात सभा घेवून जनजागृती केली आणि महत्त्वाचे म्हणजे या चळवळीला सरदार वल्लभभाई पटेल यांचे देखील मार्गदर्शन लाभले. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून सरकारला या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन दुष्काळ पाहणी समितीचे गठन करावे लागले व शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्या लागल्या.[४०]

**असहकार चळवळीला स्थगिती:**

अशा प्रकारे, असहकार चळवळीने सबंध महाराष्ट्राप्रमाणेच नाशिक जिल्ह्यातील जनतेला देखील देशकार्याचे बाळकडू दिले. पुढे या चळवळीला चौरीचौरा प्रकरणामुळे गांधीजींनी स्थगिती दिली व येथे जनआंदोलनाचा एक भाग संपला. गांधीजींनी ही चळवळ मागे घेतल्याबरोबर त्यांच्यावर झालेल्या टीकेचा फायदा घेण्यासाठी सरकारने गांधीजींना अटक केली. १० मार्च १९२२ रोजी सरकारने गांधीजींना अटक केली. त्यांच्यावर अहमदाबाद येथील सेशन कोर्टामध्ये खटला चालून कलम १२४ प्रमाणे सहा वर्षाची शिक्षा झाली.[४१] गांधीजींची अटक ही घटना देशवासियांसाठी मोठा आघात होता. सरकारच्या या निर्णयाविरुद्ध देशभरात ठिकठिकाणी सभा, मोर्चे व निदर्शने झाली. नाशिक जिल्ह्यातील सभेमध्ये श्री. रघुनाथ हरी गद्रे वकिलांनी गांधीजींच्या कार्याचा गौरव करून सरकारी निर्णयाचा निषेध केला व जमलेल्या लोकांना देशकार्यात सहभागाचेही आवाहन केले. या सभेत आकुत वकील, आर. जी. प्रधान वकील, उपाध्ये वकील, श्री. वि.ग. केतकर ही स्थानिक पुढारी मंडळींबरोबरच हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.[४२]

या दरम्यानच्या काळात सायमन कमिशन नेमले गेले, मात्र या कमिशनने भारतीयांच्या राजकीय इच्छा-आकांक्षा पूर्ण न केल्यामुळे सर्वांनी त्यावर बहिष्कार टाकला. भारतीयांचे राजकीय अधिकार ठरविण्याचा देखील

अधिकार भारतीयांना नाही व या कमिशनमध्ये एकही भारतीय सदस्य नाही, या गोष्टीमुळे अपमान झाल्याने या कमिशनविरोधी देशभर ठिकठिकाणी सभा, मोर्चे झाले. लाहोरमधील अशाच एका मोर्चाचे नेतृत्व करीत असताना लाला लजपतराय यांना लाठीहल्ल्यात जबर दुखापत झाली व पुढे त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण देशभर हळहळ व्यक्त केली गेली तसेच सरकारच्या या क्रूर वागणुकीचा देखील निषेध केला केला.[४३] पुढे १९२९च्या डिसेंबर महिन्यात पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. यावेळी २६ जानेवारी, १९३० हा दिवस सर्व भारतीयांनी स्वातंत्र्य दिन म्हणून पाळण्याचे ठरले. लाहोरच्या या अधिवेशनाला नाशिक जिल्हा काँग्रेसचे कार्यकर्ते श्री. रघुनाथ हरी गद्रे वकील, श्री. गोविंदराव देशपांडे, महंत सीतारामदासशास्त्री वगैरे मंडळी उपस्थित होती. या मंडळींनी काँग्रेसकडून मिळालेल्या सूचना जिल्हाभरात पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सूचनेनुसार देशभराप्रमाणे नाशिक जिल्ह्यातही स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला. यावेळी काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या पत्रकाचे वाचन देखील करण्यात आले.[४४] अशा प्रकारे, स्वातंत्र्याचे हमीपत्र देशभर प्रसारित होऊन जनतेतील उत्साह दुणावला व स्वातंत्र्यप्रतिची भावनाही बळावली.

**सविनय कायदेभंग चळवळ :**

गांधीजींनी आपल्या सत्य, अहिंसा व सत्याग्रह या विचारतत्वांसह संपूर्ण भारतवासीयांना असहकारानंतर कायदेभंग चळवळीचा संदेश दिला. त्यासाठी त्यांनी दांडी येथे आपल्या अनुयायांसह मिठाचा कायदा मोडून कायदेभंग चळवळीला सुरुवात केली. याबरोबरच नाशिकमध्ये श्री. बाळकृष्ण जनार्दन मराठे, श्री. गो. ह. देशपांडे, दादासाहेब गद्रे वकील, के. आर. सुमंत, सीतारामदास शास्त्री यांनी प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत सभा घेऊन सविनय कायदेभंग चळवळीला पाठिंबा देऊन जनतेला या चळवळीत सहभागाचे आवाहन केले. या चळवळीदरम्यान जिल्हाभरात शंकरराव देव, डॉ. खाडिलकर या पुढाऱ्यांचे दौरे व भाषणे झाली. त्याचबरोबर सभा, बैठका तसेच स्वयंसेवक नोंदणी, प्रतिबंधित मिठाची विक्री, राष्ट्रीय सप्ताह, गांधीजयंती यांसारखे राष्ट्रीय उपक्रम देखील उत्साहात साजरे झाले.[४५] यादरम्यान राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या अटकेच्या निषधार्थ सभा, बैठकी देखील झाल्या. महात्मा गांधी,पंडित जवाहरलाल नेहरू,अब्बास तय्यबजी,सरोजिनी नायडू,डॉ. सय्यद महंमद,वल्लभभाई पटेल, मदनमोहन मालवीय अशा अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांना सरकारने अटक केल्याने कायदेभंग चळवळीचे लोन सर्वसामान्य जनतेपर्यंत अधिक तीव्रतेने पोहचले.[४६]

कायदेभंग चळवळीदरम्यान जिल्हाभरात सरकारी नोकर व अधिकारी यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला. त्याचबरोबर काहींवर आपल्या नोकरीचा राजीनामा देण्यासाठी दबाव तंत्राचाही वापर करण्यात आला. दारू दुकाने व या दुकानांच्या लिलावांवर निरोधने, परदेशी कपड्यांवर बहिष्कार व परदेशी कापडाच्या होळ्या,

स्वदेशी, कायदेभंग व बहिष्काराच्या सभा, त्याचप्रमाणे प्रभात फेरी, ध्वजावंदन, जंगल सत्याग्रह नाशिक जिल्ह्यातील कार्यक्रम महाराष्ट्रभर गाजले.

**नाशिक जिल्ह्यातील सविनय कायदेभंग चळवळ:**

यावेळी महात्मा गांधींनी जनतेला परकीय सत्तेशी सत्याग्रहाच्या माध्यमातून संघर्ष केल्याशिवाय स्वातंत्र्यप्राप्ती अशक्यप्राय असल्याची जाणीव करून दिली. त्यामुळे या संघर्षाच्या माध्यमातूनदेशभर अधिकाधिक जनजागृती होवू लागली.गांधीजींनी सुरुवातीला असहकार आंदोलनाच्या माध्यमातून जनतेला सत्याग्रहाचे प्रशिक्षण दिले व मुंबई, चौरीचौरासारख्या घटना या सत्याग्रहासारख्या नैतिक कार्यक्रमाला घातक असल्याचेही अधोरेखित केले. त्यामुळे भारतीय जनतेला व पुढाऱ्यांना पुन्हा एकदा सत्याग्रहाच्या संदर्भातील तत्वे स्पष्ट होऊ लागली व या माध्यमातून गांधीजींना अपेक्षित असलेला सत्याग्रहाचा मार्ग व कार्यक्रम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू लागला. २०मार्च, १९३० रोजीच्या राष्ट्रसभेच्या बैठकीत सविनय कायदेभंग सुरू करण्याचा ठराव संमत होवून त्याचे नेतृत्व गांधीजींकडे सोपविण्यात आले. यावेळी गांधीजींनी सरकारला पत्र लिहून आपल्या काही मागण्या कळविल्या व या मागण्या पूर्ण न झाल्यास सविनय कायदेभंग चळवळीला पर्याय नसल्याचेही पत्रात नमूद केले. अशा प्रकारे, आगामी कायदेभंग चळवळीत अन्याय्य अशा कायद्यांची व सरकारी हुकुमांची निवड करून त्यांचा सविनय भंग करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले.[४७]

**सविनय कायदेभंग चळवळीचे स्वरूप:**

गांधीजींनी सरकारकडे सोपविलेल्या मागण्या मान्य न झाल्यामुळे सविनय कायदेभंग चळवळ निश्चित झाली व त्यानुसार मिठाच्या कायद्यांचा भंग करून, भारतीय किनारपट्टीवर मीठ तयार करून व या मिठाची विक्री करून सरकारी कायद्यांचे उल्लंघन करून, जंगल सत्याग्रह करून, जंगल कायद्यांचा भंग करून, सरकारी कुरणातील गवत कापून, गुरे चारून, लाकूड तोडून, जंगल कायद्यांचा भंग करणे, दारू दुकानांवर व दारूच्या लिलावावर बहिष्कार टाकून, परदेशी कापडावर बहिष्कार टाकून, देशभर खादीचा प्रचार प्रसार करून, स्वातंत्र्याचे प्रतीक असलेले तिरंगी ध्वजाचे वंदन करणे तसेच प्रभातफेऱ्या काढून सरकारी जमाबंदीच्या आदेशाचे उल्लंघन करणे व याबरोबरच अस्पृश्यता निवारणाचे कार्य हाती घेणे, अशा प्रकारचे सर्व कार्यक्रम हे सविनय कायदेभंग चळवळीचे स्वरूप होते.[४८]

या चळवळीसाठी गांधीजींनी १२ मार्च, १९३० रोजी साबरमती आश्रमातून दांडीकडे प्रयाण केले व ही ऐतिहासिक घटना व तिला संपूर्ण देशभरातून नव्हे तर जगभरातून पाठिंबा मिळाला. नाशिक जिल्ह्यामध्ये दांडी यात्रेच्या पाठिंब्यासाठी सभा घेण्यात आली. नाशिक काँग्रेस कमिटीने जाहीर सभेचे आयोजन करून उपस्थितांना देशकार्याचे आवाहन केले. २९ मार्च १९३० रोजी नाशिक शहरात झालेल्या सभेत सरकारी अहवालानुसार सुमारे

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

एक हजार लोक उपस्थित होते. यावेळी श्री. बाळकृष्ण जनार्दन मराठे, श्री. गोपाळ हरी देशपांडे, श्री. रघुनाथ हरी गद्रे वकील, श्री. के.आर. सुमंत तसेच सीतारामदास शास्त्री यांची भाषणे झाली.[४९]

या भाषणात त्यांनी लोकांना गांधीजींनी सरकारला लिहिलेल्या पत्राचे विश्लेषण करून कायदेभंग चळवळीचे स्वरूप व कार्यक्रम समजावून सांगितले. अशा प्रकारे जिल्हाभरात सविनय कायदेभंग चळवळीचे लोण पसरविले गेले. त्याचबरोबर नाशिकमध्ये श्री. दत्तात्रय यादव पिंगळे, श्री. देशपांडे, श्री. अभ्यंकर, श्री. गो. ह. देशपांडे, श्री. सुमंत यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक ठिकाणी सभा झाल्या. २ एप्रिल १९३० रोजी महाराष्ट्र काँग्रेस प्रांतिक सभेचे अध्यक्ष शंकरराव देव यांनी नाशिकमध्ये सभा घेऊन, आपल्या भाषणात नाशिकच्या श्री. बाळकृष्ण मराठे यांना भारतीय दंड संहिता १२४ अ प्रमाणे नऊ महिन्यांची शिक्षा झाल्याचा आनंद व्यक्त करून, त्याबद्दल त्यांचे अभिनंदनही केले. त्याचबरोबर शंकरराव देवांनी परकीय सरकारविरुद्ध असंतोष पसरविणे, हे आपले आद्य कर्तव्य असल्याचे देखील लोकांना समजावून सांगितले.[५०]

अशा प्रकारे नाशिकमध्ये सविनय कायदेभंग चळवळीला सुरुवात होवून विविध ठिकाणी सभा व स्थानिक पुढाऱ्यांच्या माध्यमातून सविनय कायदेभंग चळवळीला स्वयंसेवकांची व आर्थिक मदतीची मागणी देखील करण्यात आली. त्रंबक येथील सभेत या आवाहनाला प्रतिसाद मिळून श्री. मोतीराम दयाराम खत्री व श्री. बळवंत सदाशिव गोरे यांनी स्वयंसेवक म्हणून नावनोंदणी केली. १ एप्रिल १९३० रोजीच्या भगूर येथील सभेत श्री. गोपाळराव आनंदराव देसाई, श्री. सुमंत, श्री. सी. व्ही. काळे, श्री. सीतारामदास शास्त्री यांच्या स्वयंसेवक नोंदणी आव्हानाला प्रतिसाद म्हणून १४ तरुणांनी स्वयंसेवक म्हणून नावनोंदणी केली. नांदगाव येथील सभेत श्री. प्रल्हाद छोटीलाल यांनी देशकार्याला पाचशे रुपयांची मदत केली तसेच अनेक तरुणांनी स्वयंसेवक म्हणून नावनोंदणी देखील केली. बागलाणमध्ये तर या स्वयंसेवकांची संख्या शंभरपर्यंत पोहोचली. नामपूरला ३१ मार्च रोजीच्या श्री. नरहर गोपाळशेठ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी हजेरी लावली. या सभेत श्री. शंकर बाबाजी पोद्दार, श्री. नथू भिला पाटील यांची प्रभावी भाषणे झाली.[५१]

अशा प्रकारे, बागलाण परिसरातून स्वातंत्र्य चळवळीला व देशकार्याला चांगला प्रतिसाद मिळाला. ०६ एप्रिल रोजीच्या नाशिक येथील सभेत प्रतिबंधित मिठाची विक्री करण्यात आली. या सभेत नागपुरचे डॉ. नारायण भास्कर खरे हे उपस्थित होते. यावेळी डॉ. खरे यांनी कायदेभंग चळवळीची आवश्यकता उपस्थितांना पटवून दिली. त्याचबरोबर या सभेत श्री. वि. ग. केतकर यांचेही भाषण झाले. आपल्या भाषणात केतकरांनी उपस्थितांना चळवळीत सहभागाचे आवाहन केले.[५२]

**नाशिकमध्ये राष्ट्रीय सप्ताह उत्साहात साजरा:**

०५ एप्रिल रोजी महात्मा गांधी दांडीला पोहोचले व ०६ एप्रिल रोजी पहाटे गांधीजींनी प्रतिकात्मक

मिठाचा कायदा मोडून देशवासीयांना मिठाचा कायदा भंग करण्याचे आवाहन केले. गांधीजींच्या या आवाहनाबरोबरच देशातील समुद्रालगतच्या भागात मिठाचा कायदा मोडण्यास सुरुवात झाली. ज्या भागात मीठ तयार होत नाही, अशा ठिकाणी लोकांनी उत्स्फूर्त सभा घेवून, परदेशी मालावर बहिष्कार टाकून, स्वदेशी व काँग्रेस विचारांची पत्रके ठिकठिकाणी वाटून, तिरंगी ध्वज फडकवून व त्याला मानवंदना देऊन, जमीन महसूल कायद्याचे उल्लंघन करण्याचा निर्धार करून, असे अनेकविध कार्यक्रम राबवून काँग्रेसकडून हा संपूर्ण सप्ताह राष्ट्रीय सप्ताह म्हणून घोषित करण्यात आला. नाशिकमध्ये देखील राष्ट्रीय सप्ताहाचे उत्साहात स्वागत व पालन करण्यात आले. नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीचे पुढारी सीतारामदास शास्त्री, श्री. दत्तात्रय यादव पिंगळे, श्री. रामचंद्र भिकाजी महाजन या मंडळींनी स्थानिक तरुणांबरोबर शहरातून प्रभातफेरी काढून देशभक्तीचे गीत, राष्ट्रपुरुषांचा जयजयकार करून व सोबतच जनतेकडून परदेशी कपडे जमा करून ही प्रभात फेरी पेशवेवाड्यासमोर (सध्याचा सरकारवाडा) पटांगणावर सभेमध्ये रूपांतरीत झाली. या तरुणांच्या सभेत नाशिकमधील जेष्ठ पुढारी दादासाहेब गद्रे वकिलांनी ध्वजवंदन करून सभेला मार्गदर्शन केले.[५३]

दि. ०७ एप्रिल, १९३०रोजी अशीच उत्साही तरुणांची सभा डॉ. दत्तात्रय खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सभेला श्री. मोहिनीराज गणेश काथे यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर डॉ. खाडिलकरांनी देखील तरुणांना कायदेभंग चळवळीचे महत्व व आवश्यकता पटवून दिली. या सभेच्या पुढील दिवशी म्हणजे ०८ एप्रिल रोजी नाशिकमध्ये श्री. गोपाळ हरी देशपांडे व श्री. दत्तात्रय यादव पिंगळे यांनी देखील वरील आशयाची सभा घेऊन तरुणांना मार्गदर्शन केले तसेच भगूर येथील सभेत काँग्रेसचे स्थानिक कार्यकर्ते श्री. गोपाळराव आनंदराव देसाई तसेच डॉ. गंगाराम भुतेकर यांनी सविनय कायदेभंग चळवळ, मीठ सत्याग्रह आणि सध्याच्या राजकारणाची उपस्थितांना जाणीव करून दिली. याबरोबरच विदेशी कपडे व विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशी वापराचे देखील आवाहन केले. यादरम्यान येवला येथे देखील श्री. आपटे गुरुजी, कुलकर्णी गुरुजी, वैशंपायन गुरुजी या काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठमोठ्या सभा घेऊन तेथील तरुणांना स्वदेशीचे महत्व पटवून दिले. त्याचबरोबर कायदेभंग चळवळीची आवश्यकता देखील समजावून सांगितली.[५४]

**नाशिकमधील सत्याग्रही शिबीर:**

गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेली सविनय कायदेभंग चळवळ संपूर्ण महाराष्ट्रभर राबवण्यासाठी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कायदेभंग मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या निर्देशाप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात सत्याग्रहींसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सूचनेनुसार नाशिक जिल्ह्यात दौरे, प्रचार सभा, मोर्चे, बैठका घेऊन काँग्रेसच्या मंडळींनी तरुणांना स्वयंसेवक होण्याचे आवाहन केले. नाशिक जिल्ह्यात या आवाहनाला प्रतिसाद मिळून शेकडो तरुणांनी आपली स्वयंसेवक म्हणून

नावनोंदणी केली. या सत्याग्रही तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी नाशिकमध्ये केतकर टाऊन हॉलमध्ये सत्याग्रह शिबीर उघडण्यात आले.[५५] या शिबिरामध्ये कॉंग्रेसच्या सूचनेप्रमाणे सत्याग्रहींना मार्गदर्शन व आवश्यक त्या सत्याग्रहाच्या ठिकाणी पाठविण्याची व्यवस्था केली गेली. यावेळी शिबिराचे प्रमुख म्हणून श्री. दादासाहेब गद्रे वकील यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्यासोबत नाशिकमधील कॉंग्रेसची अनेक मंडळी कार्यरत होती. जिल्हाभरातील ठिकठिकाणच्या तुकड्या येथे दाखल होत, त्यांना योग्य त्या सूचना व मार्गदर्शन मिळाले म्हणजे त्या पुढील कार्यासाठी रवाना होत. यावेळी जिल्हाभरातून सभासद नोंदणीसाठी डॉ. गंगाराम भूत्तेकर व श्री. नरहर गोपाळशेठ तसेच श्री. आत्माराम धोंडू शिंपी, नामपुर यांनी बागलाण परिसरात अनेक ठिकाणी सभा, बैठका घेऊन सरकारविरोधी वातावरणात भर घातली. परिणामी बागलाणमधील नामपुर, टेंभी या गावातील अनेक तरुणांनी आपली स्वयंसेवक म्हणून नावनोंदणी करून सत्याग्रहात सहभागी होण्याचे ठरविले व त्यांच्या तुकड्या नाशिकमध्ये येऊन दाखल झाल्या व त्यांना महाराष्ट्रभरात आवश्यक त्या ठिकाणी पाठविण्यात आले.[५६]

**राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या अटकेच्या निषेधार्थ नाशिकमधील गाजलेल्या सभा:**

सविनय कायदेभंग चळवळीदरम्यान राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांना सरकारने अटक केली व या अटकेच्या निषेधार्थ नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात सभा घेऊन निषेध नोंदवला गेला. यावेळी सभेला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. या सभेत सरकारच्या दडपशाहीचा निषेध केला गेला. अशाच आशयाच्या सभा अब्बास तय्यब्जी यांना अटक झाल्यानंतर जिल्ह्याभरात अनेक ठिकाणी झाल्या तसेच सरोजनी नायडू यांना अटक झाल्याच्या निषेधार्थ देखील नाशिकच्या जनतेने जमावबंदीचा आदेश धुडकावून सभा घेतली. अशा प्रकारे सविनय कायदेभंग चळवळ सरकार दडपू पाहत असले तरी जनता मात्र अधिकच उत्साहाने व प्रेरणेने देशकार्याकडे आकर्षिली जाऊ लागली. मोतीलाल नेहरू यांच्या अटकेच्या निषेधार्थ नाशिक शहरात झालेली ०१ मे रोजीची सभा ही त्यामुळेच गाजली. जिल्हाभरात अशा प्रकारच्या सभा होऊन सरकारी अत्याचारी कृतीचा निषेध केला गेला. ०१ जुलै रोजी येवल्यात आपटे गुरूजी व कॉंग्रेस मंडळींनी देखील जाहीर सभा घेऊन सरकारी दडपशाहीचा सुमारे तीन हजार लोकांच्या साक्षीने निषेध केला. याच आशयाच्या सभा ०१ जुलै रोजी नांदगाव, ०२ जुलै रोजी भगूर, सिन्नर, विंचूर, नामपुर, सटाणा येथे झाल्या. अशा प्रकारे अटक झालेल्या व्यक्तींचा गौरव व सरकारी यंत्रणेचा निषेध या सभांतून होवू लागला.[५७]

अशा प्रकारे, वर उल्लेख केलेल्या सभांच्या माध्यमातून नाशिकमध्ये राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांचे कार्य जनमानसापर्यंत पोहचविले गेले. यादरम्यान सरकारने वल्लभभाई पटेल व मदनमोहन मालवीय यांना देखील अटक केली, या घटनेचे पडसाद देशभराप्रमाणे महाराष्ट्रात व नाशिक जिल्ह्यातही उमटले. नाशिक शहरात सुमारे एक हजार लोकांची सभा होवून या सभेत राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या अटकेचा निषेध केला गेला. नाशिक जिल्ह्यातील भगूर,

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

घोटी, सिन्नर, लासलगाव, त्र्यंबक, इगतपुरी, निफाड, चांदवड, येवला, सटाणा इत्यादी ठिकाणी देखील याच आशयाच्या सभा झाल्या व जिल्ह्यातील बहुसंख्य गावात शहरात हरताळही पाळण्यात आला.[५८]

कायदेभंग चळवळीदरम्यान सरकारविरोधी जनजागृती करणाऱ्या कार्यक्रमांत नाशिक जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने ग. वि. केतकर, गो. ह. देशपांडे, डॉ. गंगाराम भुतेकर, आपटे गुरुजी, श्री. दत्तात्रय यादव पिंगळे, श्री. बन्सीलाल चुनीलाल मारवाडी, श्री. शंकर रामदास मारवाडी, जसराज मोतीराम मारवाडी तसेच लासलगावचे श्री. परशुराम मारवाडी व श्री. मोहनराज हंसराज राखा यांना देखील अटक करण्यात आली. यादरम्यान विदेशी कापडावर बहिष्कार टाकून, दारू दुकानावर निरोधने करून, सरकारी नोकरांवर बहिष्कार टाकून, ठिकठिकाणी सभा व निदर्शने करण्यात आली. सरकारी नोकरांवर टाकलेला बहिष्कार हा सामाजिक दडपणाचा एक मार्ग होता. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील अनेक अधिकाऱ्यांनी व अनेक सरकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे देऊन देशकार्यात सहभाग नोंदवला.[५९]

या चळवळीदरम्यान नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी परदेशी कापडावर बहिष्कार टाकण्याच्या सभा झाल्या व स्वदेशी वापराचेही आवाहन केले गेले. अशा प्रकारच्या सभा सिन्नर, मालेगाव या तालुक्यात मोठ्या प्रमाणात झाल्या. काही सभांमध्ये परदेशी टोप्या जमा करून खादीच्या गांधी टोप्यांची वाटप देखील करण्यात आली. २९ जून रोजी नांदगाव येथे, २५ जुलै रोजी अंदरसूल येथे अशा प्रकारच्या सभा पार पडल्या. २८ जुलै रोजी नांदगाव येथे सुमारे दोनशे महिलांनी सभा घेऊन परदेशी वस्तू न वापरण्याची व परदेशी साखरेचा चहा न पिण्याची शपथ घेतली. याच आशयाची सभा २६ जून रोजी येवला येथे सौ. राधाबाई आपटे यांच्या वनिता संघाने देखील घेतली व वनिता संघाने स्वदेशी वस्तूंचे दुकान सुरू करून पुढे स्वदेशी प्रसाराचे कार्य देखील केले.[६०] या संपूर्ण चळवळीदरम्यान जिल्हाभरात प्रभात फेरी व ध्वजवंदनाचेही कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात आले.

**जंगल सत्याग्रहाकडे वाटचाल:**

कायदेभंग चळवळीदरम्यान ज्या शहर वा गावांलगत समुद्रकिनारा आहे, अशा ठिकाणी मिठाचा सत्याग्रह करण्यात आला. मात्र ज्या ठिकाणी समुद्रकिनारा उपलब्ध नाही. अशा ठिकाणी पावसाळ्यामध्ये जंगल सत्याग्रहाद्वारे अन्यायी सरकारी कायद्यांचा भंग केला जावू लागला. महाराष्ट्रातील कायदेभंग मंडळाने यावेळी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेरच्या मध्यवर्ती परिसराची कायदेभंगासाठी निवड केली व या जंगल सत्याग्रहासाठी महाराष्ट्रभर प्रचार प्रसार सुरू झाला. त्यासाठी ठिकठिकाणी सभा घेऊन, भजन कीर्तनाच्या कार्यक्रमांत देखील कायदेभंगाची आवश्यकता व त्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले गेले. श्री. रघुनाथ हरी गद्रे, वकील, डॉ. खाडिलकर, डॉ. गंगाराम भुतेकर, श्री. सीतारामदास शास्त्री, येवल्याचे आपटे गुरूजी तसेच बागलाणमध्ये श्री. शंकर गणपत शेवाळे वकील, श्री. विठ्ठल बळवंत पाठक यांनी यादरम्यान बागलाणमध्ये तसेच

जिल्हाभर जंगल सत्याग्रहाचे लोण पसरविले. त्याचेच परिणाम स्वरूप जिल्हाभरात जंगल सत्याग्रहाला उस्फूर्त प्रतिसाद मिळून नाशिकच्या अनेक तरुणांनी संगमनेरच्या जंगल सत्याग्रहात भाग घेतला.[६१] त्याचबरोबर नाशिकमधील भिलवाड जंगल सत्याग्रह व पठावे जंगल सत्याग्रह या दोन घटना बऱ्याच गाजल्या. या काळात बागलाण परिसरामध्ये संपूर्ण जिल्ह्याचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष होते. जंगल सत्याग्रहाला उपस्थित असलेल्या लोकांची संख्या हजारांवर आणि त्यांचा बंदोबस्त करणारी शासकीय यंत्रणा, पोलीस यंत्रणा ही अवघ्या बोटावर मोजण्याइतकी असायची. त्यामुळे याकाळात सरकारी यंत्रणा अगदी निश्चल झाल्यासारखी होती. त्यामुळे पोलिसांना बऱ्याचदा जंगल सत्याग्रहाचे कार्यकर्ते व पुढाऱ्यांना अटक न करता सोडून देण्याची वेळ येत असे. अशा प्रकारे, बागलाणातील जंगल सत्याग्रह हा गद्रे वकिलांच्या, श्री. सितारामदास शास्त्री यांच्या पुढाकाराने व शेवाळे वकील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पाठबळाने यशस्वी झालेला दिसून येतो.[६२]

**कायदेभंग चळवळीपासून वैयक्तिक सत्याग्रहापर्यंतच्या घडामोडी:**

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ देशभर राबवली गेली. कायदेभंगाचे देशव्यापी आंदोलन सुरू असताना ब्रिटिश सरकारने नोव्हेंबर १९३० मध्ये सायमन कमिशन अहवालावर चर्चा करण्यासाठी पहिली गोलमेज परिषद बोलावली. राष्ट्रीय सभेने या परिषदेवर बहिष्कार टाकल्यामुळे या परिषदेमधून सरकारला काही साध्य झाले नाही. परिणामी भारतीय जनक्षोभ लक्षात घेऊन व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी गांधीजींशी बोलणी करून ०५ मार्च १९३१ रोजी गांधी-आयर्विन करार घडून आणला. त्यामुळे गांधीजींनी कायदेभंग चळवळीला स्थगिती दिली. सरकारनेही राजबंदींना मुक्त केले व करारानुसार गांधीजींनी दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहण्यास संमती दिली. दुसरी परिषद ७ सप्टेंबर १९३८ रोजी झाली. ही परिषद देखील अपयशी ठरली. त्यामुळे गोलमेज परिषदेहून भारतात परत येताच गांधीजींनी सत्याग्रह चळवळ सुरू केली. पुन्हा एकदा देशात हजारो कार्यकर्त्यांना सरकारने तुरुंगात डांबले. नाशिकमधील अनेक सत्याग्रहींना अटक झाली व ते जेलबंद झाले, असे असले तरी नाशिकमध्ये स्वातंत्र्याची चळवळ ही स्थानिक कार्यकर्त्यांनी गुप्तपणे चालवली. त्यासाठी पत्रके काढून, बैठकांतून, सभा घेऊन कार्यक्रमांचा जोर सतत सुरू ठेवला. त्यामुळे नाशिकमध्ये अनेक तरुण देशकार्याकडे वळले.[६३]

दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या अपयशानंतर तिसरी गोलमेज परिषद १७ नोव्हेंबर १९३२ रोजी भरली. या परिषदेनेही काही महत्त्वाचे निर्णय साध्य झाले नाही. यादरम्यानची महत्त्वाची घटना म्हणजे इंग्लंडचे पंतप्रधान र[illegible] म[illegible]नाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून स्वतंत्र मतदार संघ घोषित केले. या निर्णयाद्वारे समाजात सरकारने दुहीची बिजे रोवली. त्यामुळे हा निर्णय रहित करण्यासाठी महात्मा गांधींनी तुरुंगात प्राणांतिक उपोषण केले. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यामध्ये ‘पुणे करार’ होऊन अधिक राखीव जागांचा तोडगा निघून

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

जातीय निवाड्याचा प्रश्न मिटला.[६४] सन १९३५च्या कायद्यानुसार देशात फेब्रुवारी १९३७ मध्ये प्रांतिक सरकारसाठी निवडणुका झाल्या. या निवडणूक प्रचारासाठी सरदार वल्लभाई पटेल, मणीबेन तसेच शंकरराव देवांनी महाराष्ट्रासह नाशिक जिल्ह्यातही दौरे केले. यावेळी नाशिक जिल्ह्यातून श्री. भाऊसाहेब हिरे, लालचंद हिराचंद, गोपाळ हरी देशपांडे, श्री. पृथ्वीराजशेठ निमाणी आणि श्री. वसंतराव नारायणराव नाईक यांना काँग्रेसने आपले अधिकृत उमेदवार म्हणून निवड केली. या निवडणुकांमध्ये काँग्रेसला भरपूर यश मिळाले. नाशिक मतदारसंघात काँग्रेसचे श्री. गोविंदराव देशपांडे, श्री. वसंतराव नाईक, श्री. पृथ्वीराजशेठ निमाणी हे यशस्वी झाले तर मालेगाव विभागात श्री. भाऊसाहेब हिरे हे काँग्रेसचे व श्री. रावसाहेब थोरात हे शेतकरी कामगार पक्षाचे आमदार म्हणून निवडून आले.[६५]

या निवडणुकीत बऱ्याच राज्यात काँग्रेसचे बहुमत आले. अनेक राज्यात काँग्रेसने आपली मंत्रिमंडळे स्थापन केली. मुंबई प्रांतात श्री. बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्यामध्ये श्री. भाऊसाहेब हिरे यांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड झाली. पुढे २६ जानेवारी, १९३९ हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून प्रचंड उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर सप्टेंबर, १९३९ मध्ये इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले व भारताला इंग्लंडच्या बाजूने युद्धात ओढले. ही बाब काँग्रेस पुढाऱ्यांना मान्य नव्हती परिणामी राष्ट्रसभेच्या प्रांतिक मंत्रिमंडळाने नोव्हेंबर १९३९ मध्ये राजीनामे दिले व पुन्हा काँग्रेस सरकारविरुद्ध संघर्षाला सज्ज झाली. यावेळी गांधीजींनी संघर्ष पद्धतीत बदल करून सामूहिक सत्याग्रहाऐवजी वैयक्तिक सत्याग्रहाचा मार्ग निवडला व त्यातून वैयक्तिक सत्याग्रह चळवळ सुरू झाली.[६६] हा कालावधी संपूर्ण देशभर भारतीय जनतेचा राजकीय जागृतीचा कालखंड ठरला. या काळात राष्ट्रसभा देशकार्याचे आव्हान करून महायुद्धावर बहिष्काराचे आवाहन करीत होती व या उलट सरकार जनतेला मदतीची याचना करीत होते. अशा परस्परविरोधी दोन्ही माध्यमातून जनतेने राजकीय ज्ञान वाढीचा हा काळ होता.

**वैयक्तिक सत्याग्रह चळवळ :**

सर्वच बाजूंनी प्रतिकूल परिस्थिती व सरकारची दडपशाही वाढणार याची जाणीव असतानाही हा स्वातंत्र्य लढा सबंध देशभराप्रमाणे नाशिक जिल्ह्यातही तितक्याच तीव्रतेने व आत्मीयतेने लढला गेला. या लढयाचे मार्ग वेगवेगळे असले तरी प्रेरणा व भावना ह्या स्वातंत्र्यावर केंद्रित झालेल्या होत्या. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील वैयक्तिक सत्याग्रहाचे पर्व नाशिक जिल्ह्यात महत्वपूर्ण ठरले. स्वतः महात्मा गांधींकडून वैयक्तिक सत्याग्रहींची निवड होणे, हीच बाब मुळी गौरवाची होती. सत्याग्रहाची पात्रता धारण करणारी बरीच मंडळी नाशिक जिल्ह्यात होती. ज्यांनी प्रत्यक्ष सत्याग्रह पुकारून आंदोलनात भाग घेतला व देशकार्याला आपले जीवन वाहून राष्ट्राप्रतीचे आपले कर्तव्य बजावले. प्रभातफेरी, ध्वजावंदन, सभा, बैठका, मोर्चे, सूतकताई, खादी प्रचार, खादी विक्री अशा

अनेकविध रचनात्मक मार्गाने राष्ट्रीय सप्ताह, टिळक पुण्यतिथी, गांधी जयंती असे राष्ट्रीय उत्सव या चळवळीदरम्यान राबविले गेले.[६७]

दुसरे महायुद्ध सुरु होताच ब्रिटिशांनी (व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी 'Defense of India Ordinance' द्वारे) भारतीय पुढाऱ्यांना वा जनतेला विश्वासात न घेता भारताला इंग्लंडच्या बाजूने महायुद्धात ओढले, ही बाब अव्यवहार्य व न पटणारी होती. त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे ह्या युद्धाचा हेतू हुकुमशाहीचा पाडाव, लोकशाहीचे संवर्धन की आणखी काही हे स्पष्ट करण्यात देखील सरकारला अपयश आले. सरकारने यावेळी व्यक्तीस्वातंत्र्यावर बंधने घालून भाषण स्वातंत्र्यही हिरावून घेतले, जबरीची सैन्य भरती, महागाई, नाणेटंचाई, दुष्काळ याबरोबर सरकारी दडपशाहीसह अनेक कारणांनी जनता त्रस्त झाली. यादरम्यानच सरकारची 'ऑगस्ट घोषणा' फोल ठरल्याने, पुन्हा एकदा काँग्रेसला राष्ट्रीय चळवळीची आवश्यकता भासली.[६८] ही आवश्यकता वैयक्तिक सत्याग्रह चळवळीने पूर्ण केली. राष्ट्रीय ते स्थानिक पातळीवर वैयक्तिक सत्याग्रह चळवळ एकसूत्रात बांधण्यात आली. नाशिक जिल्ह्याने देखील यामध्ये आपला सहभाग नोंदवून महत्वपूर्ण कार्य केले.

**वैयक्तिक सत्याग्रह चळवळ :**

दुसऱ्या महायुद्धादरम्यान गांधीजींनी सेवाग्राम आश्रमात तीन दिवसीय बैठकीत वैयक्तिक सत्याग्रह चळवळीचा निर्णय घेतला. वैयक्तिक सत्याग्रह आंदोलन हे यापूर्वीच्या जनआंदोलनापेक्षा निराळे होते. एका सत्याग्रहीला अटक झाल्यास दुसऱ्या सत्याग्रहीने सत्याग्रह पुकारणे, हा वैयक्तिक सत्याग्रहाचा वैयक्तिक स्वरूपाचा कार्यक्रम होता. यावेळी काँग्रेसने सरकारशी संघर्ष कमी केला असला तरी संघर्ष संपविला नव्हता. या सत्याग्रहासाठी सत्याग्रही म्हणून काँग्रेसचा पूर्णवेळ कार्यकर्ता असलेल्या, खादी अर्थशास्त्राचे ज्ञान असलेल्या, अहिंसक तत्वांवर विश्वास, सामाजिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रांचा अनुभव असलेल्या कार्यकर्त्यांची निवड स्वतः गांधीजी करणार होते. त्यामुळे सत्याग्रहींची देखील यावेळी कसोटी लागणार होती. अशा तत्वनिष्ट राष्ट्रीय सत्याग्रहाची सुरुवात १७ ऑक्टो. १९४० रोजी झाली.[६९] गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून आचार्य विनोबाजी भावे यांची निवड केली. गांधीजींच्या सूचनेनुसार विनोबाजींनी पवणार या गावापासून युध्दविरोधात प्रचाराला सुरुवात केली. 'युध्दविरोधी प्रचारा'चा परिणाम म्हणजे आचार्यांची अटक व तीन महिन्यांची कारावासाची शिक्षा ठरली. त्यांच्यानंतर पं. जवाहरलाल नेहरू व त्यांच्या पाठोपाठ गांधीजींच्या सूचनेनुसार देशभरातील अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी युध्दविरोधात प्रचार करून सत्याग्रह पुकारला.[७०]

**नाशिक जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह चळवळ :**

दुसऱ्या महायुद्धादरम्यान सरकारशी मंदावलेले संघर्ष वैयक्तिक सत्याग्रह चळवळीने सुरु ठेवला. सरकार पक्षाकडून याकाळात ठिकठिकाणी सभा, बैठका घेवून जनतेला मदतीचे आवाहन होत होते तर दुसरीकडे

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

काँग्रेसकडून युद्धाला असहकाराचे आवाहन होत होते. अशा प्रकारच्या सभा, बैठका अगदी राष्ट्रीय ते स्थानिक नाशिक जिल्हा पातळीवर होवून दुतर्फा जागृतीची मोहीम राबविली जात होती.[७१]

जिल्हा काँग्रेस कमिटी- महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी- गांधीजी अशी क्रमाने अनुमती मिळाल्यानंतर सत्याग्रहींना वैयक्तिक सत्याग्रह करण्याची संमती मिळत होती. संबंधित सत्याग्रहींनी प्रशासनाला पूर्वसूचना देवून जाहीर सभेत युद्धविरोधी भाषण करून, लोकांना युद्ध प्रयत्नांना असहकार करण्याचे आवाहन करणे, ही सत्याग्रहाची ठरलेली पद्धत होती. नाशिकमध्ये काँग्रेसचे जेष्ठ पुढारी श्री. रघुनाथ हरी गद्रे वकील हे पहिले सत्याग्रही ठरले. त्यांनी २८ नोव्हेंबर, १९४० रोजी सभा घेवून युद्धविरोधी भाषण करून सत्याग्रह पुकारला. परिणामी त्यांना अटक होवून त्यांच्यावर ०२ डिसेंबर रोजी खटला भरून एक वर्षाची शिक्षा झाली. दादासाहेब गद्रेंच्या अटकेविरोधात नाशिकमध्ये सभा-बैठका होवून जिल्हाभर युद्धविरोधी प्रचाराला सुरुवात झाली.[७२]

देशातील या वातावरणावर उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने युध्द प्रयत्नांना होणारा विरोध कमी करण्यासाठी नेहमीप्रमाणे काँग्रेस पुढाऱ्यांचे अटक सत्र सुरु केले. यादरम्यान मौलाना अब्दुल कलाम यांना झालेल्या अटकेविरोधात नाशिक जिल्ह्यात (नाशिक शहर, भगूर, देवळाली गाव, मालेगाव, कळवण, नांदगाव) व्यापाऱ्यांनी बाजारपेठा बंद ठेवून, हरताळ पाळून सरकारविरुद्ध असंतोष प्रकट केला.[७३]तसेच मालेगाव, चांदवड शहरांत जाहीर सभा घेवून सरकारचा निषेध नोंदविला. यादरम्यान जिल्हाभरात ठिकठिकाणी सभा होवून सरकार व युद्धविरोधी जनजागृती मोहीम सुरु झाली. त्याचाच एक भाग म्हणून विंचूर ता. निफाड, देवळाली गाव, वडनेर भैरव ता. चांदवड या छोट्याशा गावांत प्रभात फेरींद्वारे जनजागृती केली गेली.[७४] या उदाहरणांतून देशकार्याची जाणीव अगदी स्थानिक पातळीपर्यंत पोहचल्याचे दिसते.

**२६ जाने. १९४१ हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा :**

१९३०च्या काँग्रेस अधिवेशनातील पं. जवाहरलाल नेहरूंच्या आवाहनाप्रमाणे देशभर २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा होवू लागला. वैयक्तिक सत्याग्रह चळवळीदरम्यान 'स्वातंत्र्य दिवस' साजरा करण्यासाठी या दिवशी सत्याग्रह न करता रचनात्मक कार्य करण्याचे आवाहन म. गांधींनी केले. (The Bombay Chronicle- "No Satyagraha on Jan. 26, Independence Day will be devoted to Constructive Work."- Gandhiji)[७५]गांधीजींच्या सूचनेनुसार देशभराप्रमाणे नाशिक जिल्ह्यातही स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा झाला. जिल्हाभरात नाशिक शहर, दिंडोरी, विंचूर, मालेगाव, सटाणा, वडनेर भैरव, येवला, कळवण, भगूर, चांदवड येथे प्रभातफेरी, ध्वजावंदन, सभा, बैठका, सूतकताई, खादी प्रचार, खादी विक्री इत्यादि कार्यक्रम उत्साहात साजरे झाले.[७६]

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

**केंद्रीय निवडणूक व युद्धविरोधी प्रचार मोहीम :**

१९४१ मध्ये होणाऱ्या केंद्रीय निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यात निवडणुकीचा प्रचार सुरु झाला. या प्रचार सभेत सरकारविरोधी जनमत चेतविले गेले. जिह्यातील कॉंग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांबरोबर महाराष्ट्रातील पुढारी मंडळी या मोहिमेत सहभागी झाली. साताऱ्याचे श्री. बाबुराव मारोतराव जेधे, प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे श्री. त्रिंबक रघुनाथ देवगिरीकर, श्री. राजमल लखीचंद, श्री. ना.ग. गोरे, श्री. अण्णासाहेब लठ्ठे, श्री. गंगाधर रामचंद्र देशपांडे (बेळगाव), लक्ष्मणशास्त्री जोशी (वाई), मुंबईचे जमनादास मेहता, श्री. ना. दा. सावरकर या महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव असणाऱ्या अनेक व्यक्तिमत्वांनी नाशिक जिल्हाभरात सभा घेवून लोकांना मार्गदर्शन केले.[७७] परिणामी जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण पसरले.

**राष्ट्रीय सप्ताह उत्साहात साजरा :**

कॉंग्रेसतर्फे वैयक्तिक सत्याग्रह चळवळीदरम्यान राष्ट्रीय सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमांची स्थानिक पातळीवरील अंमलबजावणीतून कार्यक्रमांत एकसंघता सांधली गेली. नाशिक जिल्ह्यात या राष्ट्रीय सप्ताहात दररोज प्रभातफेरी, ध्वजावंदन, सभा, बैठका, सूतकताई, खादी प्रचार, खादी विक्री असे अनेक रचनात्मक कार्यक्रम राबवून सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला गेला.[७८]

**नाशिक शहरात व्याख्यानांचे आयोजन :**

वैयक्तिक सत्याग्रहाचा व जनजागृतीचा भाग म्हणून नाशिक शहरात मे व जून, १९४१ दरम्यान महाराष्ट्रातील अनेक तज्ज्ञ मंडळींना व्याख्यानांसाठी आमंत्रित करून नियमित सभा व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. या मंडळींनी व्याख्यानाद्वारे आपले अनुभव प्रकट करून समाजविचारांना दिशा देण्याचे कार्य केले. या व्याख्यानांमध्ये प्रामुख्याने अंधेरी महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जे. भट (जीवनातील नवी दृष्टी), भुसावळचे श्री. मुरलीधर विठ्ठल दास्ताने (आत्मसंरक्षण), सातारा-मसूर आश्रमाचे ब्रह्मचारी हरिहर बुवा (आदर्श तरुण), मुंबईचे वकील श्री. राजाराम पांडे (युध्द व भारतीय राजकारण), वर्धा येथील श्री. अनंत वासुदेव सहस्त्रबुद्धे (खादीचे अर्थशास्त्र), मुंबईचे श्री. वसंत कर्णिक (युद्ध व लोकशाही), महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे श्री. दत्तात्रय गोसावी (सध्यपरिस्थिती), वर्धा येथील प्राचार्य श्रीमत नारायण अग्रवाल (विद्यार्थ्यांचे कर्तव्य), अमरावतीचे श्री. नारायणराव अमृतकर (भारताचे भविष्य)[७९] पुण्याचे श्री. हरी रामचंद्र महाजनी (युध्द व कॉंग्रेस), डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य (पुढील आव्हाने), आचार्य श्रीराम गोसावी (सध्यपरिस्थिती), पुण्याचे श्री. अप्पासाहेब सहस्त्रबुद्धे (खादीचे अर्थशास्त्र)[८०]इ. विषयांवर तज्ञांनी नाशिककरांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. परिणामी स्थानिक जनतेला देश व देशाबाहेरील युद्धजन्य व राजकीय परिस्थितीचे आकलन होण्यास मदत झाली.

यादरम्यान भगूरचे श्री. विश्वनाथ आडके यांनी सत्याग्रह पुकारून नाशिककरांना पुन्हा एकदा वैयक्तिक

सत्याग्रह चळवळीची प्रेरणा दिली. आडके यांना भारत संरक्षण कलम ३८ (५) अन्वये तीन महिन्याची शिक्षा झाली. त्यांच्या अटकेचा निषेध व्यापाऱ्यांनी बाजारपेठा बंद ठेवून, हरताळ पाळून केला.[८१]

**वैयक्तिक सत्याग्रह चळवळीदरम्यानचे विविध कार्यक्रम:**

वैयक्तिक सत्याग्रह चळवळीदरम्यान नाशिक जिल्ह्यात नाशिक शहर, येवला, मालेगाव येथे मासिक ध्वजावंदन कार्यक्रम नियमित साजरे झाले. या कार्यक्रमांत प्रभातफेरी- ध्वजावंदन- सभा- भाषणे- वंदे मातरमचे जय घोष व त्यानंतर सभा विसर्जन असा नियमित कार्यक्रम असे. वैयक्तिक सत्याग्रह चळवळीदरम्यान येवल्याचे श्री. पांडुरंग आपटे गुरुजी यांनी २९ जून, १९४१ रोजी विनय मंदिरात शांतता सेवादलाची स्थापना करून जिल्ह्यात आदर्श घालून दिला. या सेवादलामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन होत असे.[८२] यादरम्यान नाशिक शहरात खादी प्रचारविषयक विविध प्रयोग राबविले गेले. त्यामध्ये प्रामुख्याने व्याख्याने, सूतकताई कार्यक्रम, खादी विक्री अशा माध्यमातून देशकार्याप्रतीचा आदरभाव व्यक्त केला गेला. त्याचप्रमाणे लोकमान्य टिळक पुण्यतिथी,[८३] महात्मा गांधी जयंती[८४]यांसारखे राष्ट्रीय उत्सवही ठिकठिकाणी उत्साहात साजरे झाले. वैयक्तिक सत्याग्रह चळवळीदरम्यान डॉ. गंगाराम भूत्तेकर यांनी सिन्नर व बागलाण तालुक्यातील संपूर्ण गावे पिंजून शेतकऱ्यांना त्याच्या अधिकारांची, हक्कांची, दुष्काळी परिस्थितीची आणि त्यामधील सरकारच्या भूमिकेची जाणीव करून दिली.[८५]याचदरम्यान श्री. रामचंद्र दामोदर पद्मनाभी यांनी (१० नोव्हें., १९४१) वैयक्तिक सत्याग्रह पुकारून नाशिककरांपुढे आदर्श उभा केला.[८६]मालेगाव येथे श्री. केशवलाल दगडूसा गुजराथी यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सेवादलाची स्थापना (१५ नोव्हेंबर, १९४१) झाली.[८७]तरम्हसरूळ येथे श्री. पुनमचंद शहा यांची व्यापारी बांधवांसाठीची सभा रचनात्मक कार्याला प्रेरणादायी ठरली.[८८] अशा प्रकारे नाशिक जिल्हाभरात विविध माध्यमांद्वारे सरकार विरोधात जनमत चेतविले गेले.

**नाशिक जिल्ह्यातील सत्याग्रही :**

नाशिक जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह चळवळीत सहभागी झालेले स्वातंत्र्य सैनिक- श्री. लखमीचंद रामचंद्र आबड, श्री. दत्तात्रय गोविंद कुलकर्णी, श्री. राजाराम भिकाजी कुलकर्णी, सौ. लक्ष्मीबाई बापूराव कुलकर्णी, श्री. रघुनाथ हरी गद्रे वकील, श्री. रामचंद्र संभाजी गवारे, मुकुंद रंगनाथ गुजराथी, श्री. प्रभाकर त्रंबक गोसावी, श्री. जयराम तात्याजी चव्हाण, श्री. शंकर रघुनाथ चंद्रात्रेय, श्री. भिकाजी रामचंद्र जाधव, श्री. गोविंद गणेश जोशी, श्री. त्रंबक फुला ठोके, श्री. भिका मालजी ठोके पाटील, श्री. भिमाजी बुवा त्रंबकराज, श्री. गोविंद हरी देशपांडे, श्री. वसंतराव नारायणराव नाईक, श्री. रामाचार्य दामोदराचार्य पद्मनाभी, श्री. विश्वनाथ चिमाजी पवार, श्री. अमृत पांडू पाटील, श्री. नानाजी भाऊ पाटील, श्री. वारू भिवसन पाटील, श्री. सजन राघो पाटील, श्री. जगन्नाथ रामनाथ पारीख, श्री. जगन्नाथ महादेव पैठणकर, श्री. दत्तात्रय नरहर बर्वे, श्री. बापूराव काशिनाथ भावसार, श्री.

वामन गंगाधर यार्दी, श्री. गोपीनाथ शंकर लचके, श्री. काशिनाथ पुरुषोत्तम वैशंपायन, श्री. केशवलाल दगडूसा शहा, सौ. मालतीबाई पांडुरंग सबनीस, मुनशी असगरअली हकीम, श्री. भाऊसाहेब सखाराम हिरे, श्री. श्रीसागर श्रीधर धोंडोपंत या देशभक्तांनी ब्रिटिश सरकारच्या युद्धनीतीला तसेच महायुद्धाला सहकार्य न करण्याचे आवाहन करून गांधीजींच्या सूचनेप्रमाणे वैयक्तिक सत्याग्रह पुकारला.[९] अशा प्रकारे, वैयक्तिक सत्याग्रह चळवळीत नाशिक जिल्ह्यातील अनेक देशभक्तांनी हिरीरीने भाग घेतला. त्यांनी प्रभातफेरी, ध्वजावंदन, सभा, बैठका, सूतकताई, खादी प्रचार-विक्री, राष्ट्रीय उत्सव व राष्ट्रीय सप्ताह साजरे करून अनेक कार्यक्रमांद्वारे समाजात स्वातंत्र्याचे व देशभक्तीचे विचार पोहचविले.

**छोडो भारत आंदोलन :**

गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह चळवळीच्या माध्यमातून भारतीय जनमनाची स्वातंत्र्यविषयक चाचपणी केल्यामुळे यानंतरचा संघर्ष हा अंतिम ठरणार, अशी त्यांची खात्री पटली. म्हणूनच त्यांनी सबंध देशवासीयांना स्वातंत्र्यासाठी या लढ्यात प्राणपणाला लावून 'करो या मरो'चा, 'Do or Die'चा संदेश दिला.

मुंबई अधिवेशनात पारित झालेल्या 'छोडो भारत' ठरावामुळे सरकार काँग्रेस पुढाऱ्यांशी तडजोड करेल असा अंदाज असताना सरकारने त्याचदिवशी मध्यरात्रीपासून काँग्रेस पुढाऱ्यांचे अटकसत्र सुरू करून सर्वत्र मिरवणूक बंदी, लाठीकाठी, हत्यार बंदी, संचारबंदी, जमावबंदी अशा प्रकारचे आदेश काढून आगामी आंदोलन चिरडण्यास सुरुवात केली. या आदेशांचे पालन न करणाऱ्यांवर पोलीस बेभान लाठीमार करून कैदेत टाकून किंवा त्यांची संपत्ती जप्त करून शिक्षाही करू लागले. यावेळी काँग्रेसच्या एका गटाने भूमिगत राहून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. हे भूमिगत कार्यक्रम म्हणजे समाजात देशकार्याविषयी विचार मांडून, जनतेला विश्वासात घेवून त्यांना या आंदोलनात समाविष्ट करून घेणे, हे होते. या सर्व कार्यात श्री. जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली, अच्युतराव पटवर्धन यांसारखी मंडळी भूमिगत राहून नेतृत्व करू लागली तर स्थानिक पातळीवर स्थानिक कार्यकर्त्यांना या लढ्याचे नेतृत्व मिळाले.[१०]

**चळवळीचे स्वरूप:**

देशभर व महाराष्ट्रभर या लढ्याचे स्वरूप व तपशीलही सामान्यपणे समानच होता. या काळातील घातपाती कृत्यांचा तपशील तर देशभर एक सारखाच होता. निरोधने, कायदेभंग करून काढलेल्या मिरवणुकी, टेलिफोन व तारायंत्र यांच्या तारा तोडणे, रेल्वेचे पूल व रूळ यांचा नाश करणे, रेल्वेत धोक्याची साखळी ओढून रेल्वे थांबवणे, विनातिकीट प्रवास करणे, सरकारी कचेऱ्या व पोलीस ठाणे यांची जाळपोळ करणे, सरकारी नोकरांना राजीनामा देण्यास भाग पाडणे, सरकारी परिसरात बॉम्बचे स्फोट करणे, वारंवार मिरवणुकी काढून, हरताळ पाळणे, प्रचंड समुदायाने कायदेभंग करणे, गुप्तपणे छापखाना चालवणे, सरकारी खजिना लुटणे, सरकारला सामील लोकांशी

असहकार करणे, इत्यादी प्रकारचे कार्यक्रम या आंदोलनात समाविष्ट होते. सरकारने पकड वॉरंट काढल्यानंतर भूमिगत झालेल्या व गुप्तपणे दिवसा व विशेषतः रात्रीबेरात्री संचार करणाऱ्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या आदेशाने ही सर्व कृत्ये घडत होती. कॉंग्रेस कार्यकर्ते चळवळीचे आदेश छापून किंवा टंकलिखित प्रती काढून बुलेटीन किंवा हस्तपत्रकांच्या स्वरूपात वाटप करीत. अशा प्रकारच्या घटना नाशिक जिल्ह्यात वारंवार घडून जनतेने ठिकठिकाणी कायदेभंग करून सरकारी यंत्रणेला जेरीस आणण्याचा प्रयत्न केला.[११]

'छोडो भारत'चा ठराव मंजूर झाल्याबरोबर अनेक कॉंग्रेस पुढाऱ्यांना अटक झाल्याने संपूर्ण देशभर चळवळीचा भडका उडाला व जनता संघर्षाला सज्ज होऊन मिळेल त्या मार्गाने सरकारी यंत्रणेचा विध्वंस करू लागली. यादरम्यान देशभर सरकारी यंत्रणेची मोठी हानी झाली. शाळा-कॉलेजच्या तरुण विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा, कॉलेज बंद पाडले, ठिकठिकाणी घातपाताच्या घटना घडल्या. अनेक वृत्तपत्रांतून या घातपाताच्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या व त्यातून इतरांनाही देशकार्याचे मार्गदर्शन मिळू लागले. परिणामी सरकारने या बातमीपत्रांवर व वृत्तपत्रांवर आंदोलनाच्या बातम्या छापण्यावर बंदी घातली. यादरम्यान कॉंग्रेसच्या भूमिगत पुढाऱ्यांनी बैठक घेऊन बारा कलमी योजना आखून ही देशभर अगदी खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था केली. यादरम्यानच श्री. किशोरीलाल मशरूवाला यांनी देखील 'हरिजन' वृत्तपत्रांद्वारे संघर्षात्मक मार्गांचे देशवासियांना मार्गदर्शन केले व या एकंदर परिस्थितीच्या परिणाम स्वरूप ऑगस्ट क्रांतीच्या सुरुवातीपासून पुढील चार सहा महिने अशा हिंसक घटना वाढत गेल्या, पुढे मात्र या घटनांची तीव्रता कमी होवून आंदोलन दुसऱ्या टप्प्यात पोहचले.[१२]

**नाशिक जिल्ह्यातील छोडो भारत आंदोलनाची सुरुवात:**

०९ ऑगस्ट रोजी देशभर झालेल्या कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरली. त्यामुळे संपूर्ण देशाचे वातावरण ढवळून निघाले. देशभर सभा, मोर्चे, निदर्शने होऊ लागली. मुख्य म्हणजे या सर्वांवर सरकारने बंदी घातलेली असूनही मोठ्या प्रमाणात निदर्शन होवून हिंसक घटना घडू लागल्या. सामान्य जनता रस्त्यावर उतरून कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या अटकेचा निषेध करू लागली. नाशिक जिल्ह्यात देखील अशा प्रकारच्या अनेक घटना घडल्या. कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या अटकेची बातमी नाशिकला येऊन धडकताच विद्यार्थ्यांनी नाशिक शहरातून मोर्चाचे आयोजन केले. हा मोर्चा शहराच्या मध्यभागातून 'महात्मा गांधी की जय', 'भारत माता की जय', 'छोडो भारत' अशा घोषणा देत असताना पोलिसांनी मोर्च्यावर लाठीमार करून मोर्चाला परतवून लावले. तरीदेखील काही ठिकाणी अशा प्रकारचे मोर्चे निघाले. त्यामुळे पोलिसांनी मोर्चाच्या प्रतिनिधीला अटक केली. परिणामी थोड्याच वेळात अचानक शहरातून अनेक लोक एकत्र आले व त्यांनी देशभक्तांच्या विजयाच्या घोषणा देऊन पोलिसांना न जुमानता मोर्चाचे आयोजन केले. यादरम्यान पोलीस व नागरिकांमध्ये झालेला संघर्ष

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

सोडविण्यासाठी स्वतः नाशिकचे जिल्हाधिकारी व पोलिस प्रमुखांना घटनास्थळी पोहचावे लागले.[९३]

अशा प्रकारचे मोर्चे व देशकार्याच्या घटना जिल्हाभरात अनेक ठिकाणी घडत होत्या. यावर उपाय म्हणून जिल्हाधिकारी जे. बुथ यांनी जिल्ह्यातील काँग्रेस पुढाऱ्यांना अटक करण्याचे ठरविले. याबरोबरच त्यांनी कलम १२९ व कलम २६ लागू करून नागरिकांना सभा, बैठकी, मोर्चे, निदर्शने यावर बंदी घातली. असे असले तरी नाशिक जिल्ह्यातील आंदोलनाचा उत्साह दिवसेंदिवस वाढत गेला.[९४]

जिल्ह्यातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी नाशिकहून मुंबई अधिवेशनाला गेलेल्या पुढाऱ्यांना (श्री. गोपाळ हरी देशपांडे व दत्तात्रय शंकर पोतनीस) नाशिकरोड रेल्वेस्टेशनवरच अटक करण्यात आली. त्यामुळे अद्याप अटक न झालेले श्री. रघुनाथ हरी गद्रे उर्फ दादासाहेब गद्रे यांनी नाशिकमध्ये पोहोचल्यानंतर लागलीच जाहीर सभा घेवून, या सभेत नाशिककरांना 'छोडो भारत' आंदोलनाची माहिती दिली व या आंदोलनामध्ये सहभागी होण्याचे आवाहनही केले. या सभेदरम्यान नागरिक व पोलिसांत संघर्ष होवून बराच गोंधळ उडाला, परिणामी दादासाहेब गद्रे, डॉ. खाडिलकर व श्री. आर.एन. चौधरी यांना अटक करण्यात आली. त्यामुळे नाशिकमधील इतर कार्यकर्ते व पुढारी सतर्क होऊन देशकार्य सुरु ठेवण्याच्या उद्देशाने तात्काळ भूमिगत झाले. त्यामुळे जिल्हाधिकारी जे. बुथ यांनी गृहविभागाला पाठवलेल्या पत्रामध्ये पुढील मजकूर आढळतो. 'I tried to get hold of some local leaders to talk about the Panchavati disturbances yesterday, but out of eight called only one could be found. The rest had gone to earth!'[95]

अशा प्रकारे, नाशिक शहरातून जिल्हाभरात छोडो भारत आंदोलनाचे लोण पसरु लागले व त्यातूनच पुढे जिल्ह्यात चळवळीला पोषक व पूरक वातावरण निर्माण झाले.

०९ ऑगस्ट रोजी श्री. बी. एम. भावसार यांनी मालेगाव शहरातून प्रचंड मोर्चा काढला. त्यांनी यावेळी सभाबंदीचा आदेश मोडून नागरिकांना स्वदेशी वापराचे व स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याचेही आवाहन केले. सरकारी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी श्री. भावसार यांना अटक होवून एक वर्ष कारावासाची शिक्षा देखील झाली.[९६] अशाच प्रकारचा भव्य मोर्चा १० ऑगस्ट रोजी सिन्नर येथे निघाला. यावेळी झालेल्या सभेत श्री. मारवाडी व श्री. जी. एम. शिंपी यांनी सरकारविरोधी भाषण केले. त्यामुळे या दोन्ही पुढाऱ्यांना अटक झाली. मात्र त्याचे परिणाम स्वरूप सिन्नरमध्ये नागरिक व पोलिसांमध्ये बराच संघर्ष झाला. त्यामध्ये एक पोलिस उपनिरीक्षकासह पाच पोलीस शिपाई जखमी झाले. संतप्त जमावाने यावेळी पोलीस चौकीची मोडतोडही केली.[९७] अशा प्रकारच्या घटना जिल्हाभरात होऊ लागल्या. येवल्यामध्ये सरकारविरोधी भाषण केल्यामुळे आपटे गुरुजींना अटक करण्यात आली तर भगूरमध्ये देखील अशाच प्रकारे मोर्चाचे आयोजन झाले. भगूर परिसरातील परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये, म्हणून देवळाली येथे एक सैनिकी तुकडी तैनात करण्यात आली तसेच स्थानिक पुढाऱ्यांना पोलिसांनी अटकही

केली.[९८] अशा प्रकारे, सरकार दडपशाही करत असले तरी नाशिक शहराबरोबरच संपूर्ण जिल्हाभरात इंग्रज सरकारविरुद्ध निषेध सभा, मोर्चे, निदर्शने होवून ठिकठिकाणी जनता व पोलिसांमध्ये संघर्ष होवू लागले. यादरम्यान अनेक ठिकाणी विदेशी कापडाच्या होळ्या देखील झाल्या तर भगूरसारख्या ठिकाणी स्वयंसेवकांनी जेलभरो आंदोलन केले. सिन्नर परिसरामध्ये यादरम्यान अनेक ठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडून सरकारी यंत्रणेच्या दळणवळणाची साधने नष्ट करण्यात आली तसेच सरकारी कार्यालय, कचेऱ्या, अधिकाऱ्यांचे बंगले यावरही दगडफेक झाली. हे चित्र स्थानिक पातळीवरील असले तरी देशभर याकाळात अशाच घटना घडत होत्या. अशा प्रकारे, नाशिक जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापलेले असताना भगूरसारख्या ठिकाणी काही स्वयंसेवकांनी अहिंसात्मक सत्याग्रह करून गांधीजींच्या जयघोषात स्वतःला अटक करून घेतली तर जिल्ह्यातील बऱ्याच ठिकाणी जनतेचा सरकारी यंत्रणेशी संघर्ष देखील होऊ लागला.यावेळी सिन्नरमधील एक मिरवणुकीला पोलिसांनी अटकाव केला असता लोकांनी संबंधित पोलिसाच्या हातामध्ये तिरंगा ध्वज देऊन मिरवणूक पार पाडली. कळवण येथे सरकारी कचेरीवर मोठे निदर्शने करण्यात आली. तसेच या तालुक्यात ठिकठिकाणी सरकारी यंत्रणेचा संपर्क व दळणवळणही नष्ट करण्यात आले.सरकारी यंत्रणेला गाफील ठेवण्यासाठी व देशकार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी यावेळी गुप्तपणे कॉंग्रेसचे बुलेटीन वाटून तरुणांना देशकार्याचे आवाहन करण्यात आले.अशा प्रकारे, या चळवळीदरम्यान जिल्हाभरातील वातावरण देशभक्तीने प्रेरित होवून जिल्ह्यात काही ठिकाणी शांततेच्या मार्गाने तर काही ठिकाणी आक्रमकपणे जनतेने देशकार्यात भाग घेतल्याचे दिसून येते.[९९]

छोडो भारत आंदोलनाच्या सुरुवातीपासूनच नाशिक जिल्ह्यातील वातावरण तापलेले होते. सरकारी यंत्रणा केवळ संशयावरून सर्वसामान्यांना अटक करू लागली होती. असे असले तरी एकंदर या वातावरणातून लक्षात येणारी बाब म्हणजे समाजातील सर्वच घटक या अंतिम लढ्यासाठी तयार होवून जिल्ह्याभरात अनेक ठिकाणी सभा, मोर्चे होऊन सरकारविरोधी निदर्शने देखील झाली. या काळात केवळ सामान्य जनताच सरकारचे नियम मोडत नव्हती तर बरेच सरकारी अधिकारी देखील जनतेला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपपणे मदत करीत होते. याकाळात बऱ्याच अधिकाऱ्यांनी आपल्या नोकरीचे राजीनामे देखील दिले होते.

मालेगावमध्ये या चळवळीला उत्तेजन देण्यासाठी श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. केशवलाल दगडूसा शहा, वकील ही पुढारी मंडळी कार्यरत होती. ज्याचे परिणाम स्वरूप त्यांना अटक होऊन शिक्षाही झाली. या काळात मालेगावमध्ये जंगल सत्याग्रहाचे आयोजनही होऊ लागले तसेच अनेक शाळांमधील सरकारी शिक्षकांना शाळा बंद करण्यासाठी आवाहन देखील होवू लागले.[१००] दिंडोरी येथे देखील श्री. नरवाडकर यांनी आंदोलनासाठी पार्श्वभूमी तयार केली. या कार्यात श्री. भंडारी व श्री. किसन दौलतराव बोरा या मंडळींनी भूमिगत कार्य करून देशभक्तीपर संदेश जनमानसात पोहोचविले.[१०१] हेच कार्य इगतपुरी तालुक्यात श्री. लालचंद मुळचंद पारख यांनी

केले. त्यामुळे त्यांना अटक होऊन शिक्षा देखील झाली. निफाड तालुक्यामध्ये भूमिगत कार्य केल्याबद्दल श्री. भैरूलाल दगडूसा बरडिया यांना तुरुंगवास भोगावा लागला.[१०२] अशा प्रकारे जिल्ह्याच्या अनेक ठिकाणी व तालुक्याच्या महत्त्वाच्या शहरांत सरकारी यंत्रणेवर दबाव आणला गेला. निफाडमध्ये झालेल्या सभेत पोलीस व जनतेमध्ये बराच संघर्ष होवून अनेक ठिकाणी परदेशी कापडाच्या व कपड्यांच्या होळ्या देखील पेटविल्या गेल्या. यादरम्यान निफाड येथे मामलेदार कचेरी जाळण्याचा देखील प्रयत्न झाला. नाशिक जिल्ह्यात भूमिगत कार्य करणाऱ्या मंडळीत श्री. वसंतराव नारायणराव नाईक हे ठिकठिकाणी सभा घेऊन भूमिगतांना मार्गदर्शन करीत होते. त्यांना देखील नांदगावमध्ये झालेल्या एका सभेत सरकारविरोधी भाषण केल्याबद्दल अटक करण्यात आली व तुरुंगात टाकण्यात आले.[१०३] सरकारी यंत्रणा अशा प्रकारे स्थानिक पुढाऱ्यांना अटक करू लागल्याने नाशकातील बऱ्याच मंडळींनी भूमिगत होऊन जिल्ह्याभर आपले कार्य सुरू ठेवले व त्याचे परिणाम स्वरूप राष्ट्रीय पातळीवरील चळवळीचे पडसाद प्रादेशिक पातळीवर व नाशिक जिल्ह्याच्या स्थानिक पातळीवर देखील उमटले जाऊ लागले. यावेळी स्थानिक पातळीवरील संपूर्ण चळवळीचे नेतृत्व स्थानिक पुढाऱ्यांनी अगदी खंबीरपणे पार पाडले. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील चळवळीला चांगला उत्साह आला व त्यावर नियंत्रणासाठी सरकारला नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी पोलिसांबरोबरच सैनिकांच्या तुकड्या देखील तैनात कराव्या लागल्या.[१०४]

पुढील काही काळातच छोडो भारत चळवळीचे दुसरे पर्व सुरु झाले, ज्यामध्ये भूमिगत कार्याला महत्व होते. प्रत्येक्ष कार्य करताना सरकारकडून पकडले जाण्याची शक्यता असल्याने बरीच मंडळी यावेळी भूमिगत कार्यातून देशसेवा करू लागली. देशकार्याच्या बातम्या प्रसारित करण्यासाठी सायक्लोस्टाईल पत्रके, हस्तलिखिते यांचेही वाटप ही मंडळी करू लागली. अर्थात सामान्य जनतेला नक्की काय करावे?, काय करू नये? याचे मार्गदर्शन त्यातून मिळू लागले. अशा प्रकारची पत्रके जिल्ह्यातील प्रमुख शहरांत, हमरस्त्यावर वाटप केली जावू लागली. ही पत्रके वाटण्यात शाळकरी, तरुण मुले यांचा अधिक भरणा असे. मालेगावातील काही विद्यार्थ्यांनी तर मोर्चा काढून परदेशी कापड, टोप्या, कोट जमा करून सरकारविरोधी निदर्शने केली व राष्ट्रपुरुषांचा जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला. अशा प्रकारच्या घटना व घातपाताच्या घटना ह्या इतर तरुणांना मार्गदर्शक ठरत. त्यामुळेच नाशिकचे जिल्हाधिकारी जे. बुथ गृहसचिवांना आपल्या अहवालात, 'Rumors may easily be more dangerous then the factual news of the sort that was freely published.' असे नमूद करतात.[105]

अशा प्रकारे नाशिक जिल्ह्यातील वातावरण हे देशकार्याला पूरक होते. जिल्हाभरात मोर्चा, सभा, निदर्शने होत होती. स्वातंत्र्यकार्यातील जनतेचा सहभाग दिवसेंदिवस वाढत चालला होता व हा जनआंदोलनाचा प्रवाह शहराकडून गावाकडे, खेड्यांकडे व खेड्यांकडून पुन्हा शहराकडे सतत सुरू होता.[१०६]

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

**नाशिक जिल्ह्यातील घातपाताच्या घटना:**

छोडो भारत आंदोलनातील सभा, मोर्चे व निदर्शने यांचे सत्र संपून आता राष्ट्रीय, प्रादेशिक पातळीवरील घातपाताचे सत्र नाशिकसारख्या जिल्हा पातळीवर येऊन पोहोचले. यादरम्यान सरकारी कर्मचारी, अधिकाऱ्यांना आपल्या पदावरून राजीनामा देण्याचे आवाहन होवून इंग्रजी अधिकाऱ्यांना 'Q' for Quit India' अशा प्रकारचे पत्रके पाठविली जावू लागली.[१०७] आता हे सत्र घातपाताकडे वळून जिल्हाभरात अनेक ठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडून, खांब उध्वस्त करून, पोस्ट ऑफिसवर हल्ले करून, पत्रपेट्या व पत्राच्या पिशव्या पळवून घातपातासारख्या घटनांकडे वळले. यादरम्यान मालेगावमध्ये एका सरकारी शाळेची मोडतोड करून अनेक वस्तू जाळण्यात आल्या, चांदवड व सिन्नर तालुक्यात पोस्टाच्या पेट्या पळविण्यात आल्या. येवला, बागलाण व नाशिक तालुक्यात मोठ्या प्रमाणात टेलिफोनच्या तारा व खांब तोडण्यात आले. घोटीसारख्या ठिकाणी रेल्वेस्थानकावर घातपाताचे प्रयत्न झाले तर इगतपुरी परिसरात रेल्वे उडविण्याचा प्रयत्न झाला. चांदवडमध्ये मामलेदारांचा टांगा त्यांच्या समक्षच जाळण्यात आला. त्याचप्रमाणे चांदवड मोटर स्टैंडवर हातबॉम्बचा स्फोट करण्यात आला.[१०८]

अशा प्रकारे नाशिक जिल्ह्यातील जनता आता अंतिम संघर्षाला तयार झाली होती. नाशिक जिल्ह्यातील विविध कार्यक्रमात नाशिक शहरातील महिला देखील आघाडीवर होत्या. त्यांनी अनेक वेळा मोर्चे काढून सरकारचा निषेध करून 'महात्मा गांधी की जय' 'वंदे मातरम', अशा घोषणा देऊन अनेक ठिकाणी यशस्वी मोर्चाचे आयोजनही केले.[१०९]

अशा प्रकारे हा काळ सर्वसामान्यांसाठी खरोखरच कृतीप्रवण काळ होता. देशभर दुष्काळ, अन्नटंचाई, अर्थव्यवस्थेत नानेटंचाई, विदेशी आक्रमणाची भीती, यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शहरातील व खेड्यातीलही जनता रस्त्यावर उतरू लागली.

यादरम्यान राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर होणाऱ्या पुढाऱ्यांच्या अटकसत्राचे तीव्र पडसाद नाशिक जिल्हाभरातून उमटू लागले. सोबतच 'गांधी जयंती उत्सव' व 'गांधी जयंती सप्ताह' यांसारखे उत्सवही जिल्ह्यात उत्साहात साजरे करण्यात येवू लागले. गांधी जयंती सप्ताहात नाशिक जिल्ह्यात कोणतीही घातपाताची घटना घडली नाही तर यादरम्यान जिल्ह्यात ठिकठिकाणी प्रभात फेरी काढून गांधीजींच्या जयघोषात तरुण मंडळी, महिलावर्ग गांधीजीं प्रतिचा आदर व त्यांच्या विचारांचा प्रचार प्रसार करू लागली व या सर्व माध्यमातून देशकार्याचे विचार प्रसारित होवू लागली. त्यानंतर पुढे अनेक ठिकाणी ध्वजवंदन, मिरवणुकी, प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या होऊ लागल्या.[११०] या संपूर्ण घटना व घडामोडींचा सार हा जिल्हाभरातील जनजागृती हा तर होताच व त्याहीपुढे या घटना व घडामोडींना एक मोठा अर्थ होता व तो म्हणजे जनता आता स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आतुर झाली

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

होती.

पुढे कॉग्रेसच्या सूचनेनुसार दि. २६ जानेवारी १९४३ हा दिवस जिल्हाभरात अनेक ठिकाणी ‘स्वातंत्र्य दिन’ म्हणून साजरा करण्यात आला. या दिवसासाठीचे स्वतंत्र पत्रक छापून त्याचे वाटपही करण्यात आले. या दिवशी काँग्रेस पुढाऱ्यांनी झेंडा उभारून त्याचे वंदन करून देशकार्याचे विचार प्रकट केले व या सर्वांची सांगता स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचे वाचन करून झाले.[१११]

नाशिक जिल्ह्यात अशा प्रकारचे वातावरण असतानाच गांधीजींनी आगाखान पॅलेसमध्ये दीर्घ उपोषण सुरु केल्याची बातमी आली. परिणामी नाशिक शहरात मिरवणुका निघून गांधीजींविषयी आदर व सरकारप्रतिचा द्वेष प्रकट केला गेला तसेच जिल्हाभरातील अनेक व्यापाऱ्यांनी यादरम्यान बंद पाळला. सिन्नर, नाशिक, मालेगाव, भगूर त्याचप्रमाणे अनेक खेड्यात हरताळ पाळण्यात आले तर काही ठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडून सरकारी मालमत्तेचे नुकसान करून सरकारविरुद्धचा असंतोष व्यक्त झाला.[११२] यादरम्यान गांधीजींची प्रकृती खालावल्याने त्यांच्याविषयी जनमानसात चिंता अधिकच वाढली. यादरम्यान त्यांच्या प्रकृतीसाठी अनेक ठिकाणी प्रार्थना सभा देखील झाल्या. पुढे गांधीजींच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाल्याने नाशिकमध्ये पुन्हा चैतन्याचे व उत्साहाचे वातावरण पसरले. नाशिक जिल्ह्यात नाशिक, येवला, मनमाड तसेच अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी मोर्चे काढून महात्मा गांधीजींचा जयघोष करून आपला आनंद व्यक्त केला.[११३] अशा प्रकारे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण पसरताच जिल्हाधिकारी जे. बुथ यांनी देखील गांधीजींचे उपोषण संपल्यानंतर सुटकेचा श्वास टाकला. ते आपल्या गोपनीय अहवालात लिहितात, ‘After the tension of Gandhi’s fast the general feeling is now relaxed.’[114]

अशा प्रकारे,नाशिक जिल्ह्यातील जनसमुहाने छोडो भारत आंदोलनात आपल्या वाट्याला आलेले कार्य अगदी नेटाने केल्याचे दिसून येते. त्यासाठी त्यांनी सभा, मोर्चे, आंदोलने, निदर्शने करून देशकार्याचा प्रचार व प्रसारासाठी गुप्तकार्यही सुरूच ठेवले.

**सत्तांतराकडे वाटचाल व स्वातंत्र्यप्राप्ती :**

६ मे १९४४ रोजी लॉर्ड वेव्हेल यांनी महात्मा गांधीजींची प्रकृतीच्या कारणाने कैदेतून सुटका केली व पुढे जून १९४५ मध्ये कॉग्रेसच्या अनेक पुढाऱ्यांना देखील बंधमुक्त केले. खऱ्या अर्थाने देशातील परिस्थिती आता शांत होवून राजकीय वाटाघाटी सुरू झाल्या. यावेळी दुसरे महायुद्ध संपून त्यामध्ये विजयी झालेल्या इंग्लंडमध्ये प्रचंड वित्त व जीवित हानी झाल्यामुळे विजय महोत्सव साजरा करण्याचेही त्राण राहिले नाही. याबरोबरच भारतातील स्वातंत्र्यासाठीचे राष्ट्रव्यापी आंदोलने, क्रांतिकारकांच्या सशस्त्र चळवळी, आझाद हिंद सेनेचा सशस्त्र लढा, या संपूर्ण घटना व घडामोडींचा परिणाम होवून भारतातील ब्रिटिश सत्तेचा पाया खिळखिळा झाला व

त्याचीच फलश्रुती म्हणजे दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. यावेळी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'नियतीशी करार' हे जगप्रसिद्ध भाषण करून संपूर्ण भारतीयांना स्वातंत्र्याच्या शुभेच्छा दिल्या. देशभरात ठिकठिकाणी ध्वजावंदन होवून स्वातंत्र्याचा उत्सव मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. नाशिकमध्ये श्री. रघुनाथ हरी गद्रे उर्फ दादासाहेब गद्रे यांच्या हस्ते मध्यरात्री नगरपालिकेवर तिरंगी ध्वज मोठ्या उत्साहात फडकविण्यात आला.[११५] जिल्हाभरात अशा प्रकारचे कार्यक्रम ठिकठिकाणी झाले.

थोडक्यात, भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे केवळ योगायोग नव्हते तर त्यासाठी अनेकांना आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली होती. आधुनिक काळाच्या सुरुवातीला ज्याप्रमाणे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भारतीय स्वातंत्र्यलढा हा राष्ट्रीय पातळीवर पायाभरणी, क्रांतिपर्व, टिळकयुग, गांधीपर्व, स्वातंत्र्यप्राप्ती या उतार-चढावाच्या टप्प्यातून गेले. त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवरील नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनही कमी अधिक प्रमाणात या टप्प्यांतून गेले. दरम्यानच्या काळात नाशिक जिल्ह्यातील शेतकरी आंदोलने, कामगार चळवळी, समतेसाठीचे लढे महत्वपूर्ण ठरले. स्वातंत्र्यलढ्याच्या या उपप्रवाहांनी स्वातंत्र्यलढ्याला अधिकची धार व जनाधार देवून तीव्र बनविण्याचे कार्य केले. अर्थात, पारतंत्र्याच्या प्रदीर्घ अंधारातून भारताचे स्वातंत्र्य उदयाला आले. यामध्ये सबंध भारतीयांनी आपला स्वार्थत्याग करून एकजुटीने, एक दिलाने एकत्र येऊन मोठा संघर्ष दिला. अर्थात, ही स्वातंत्र्यप्राप्ती स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षाची व संपूर्ण त्यागाची फलश्रुती होती.

**संदर्भ**

१. राजा दीक्षित, ***एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र- मध्यम वर्गाचा उदय***, डायमंड पब्लिकेशन, पुणे, डिसेंबर, २००९.

२. ***Gazetteer of Bombay Presidency***, Nasik District Vol. XVI, Government Central Press, Second Edition, 1994, Pp. 329-335.

३. वि.वा.शिरवाडकर, ***जीवनगंगा,*** नाशिक नगरपालिका शताब्दीग्रंथ, नाशिक, १९६४, पृ. ११३-११४.

४. सरल धारणकर, ***पश्चिम महाराष्ट्राच्या नागरीकरणाच्या संदर्भात नाशिक या नगराचा विशेष अभ्यास (इ.स. १८८२-१९४७)***,पीएच. डी. अप्रकाशित प्रबंध, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई, १९९२, पृ. १४४, वि.वा.शिरवाडकर, उपरोक्त, पृ.९६-९७.

५. संतोष दत्तात्रय बोडके, नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्यसंग्रामातील जैनांचा सहभाग : एक अभ्यास ( इ.स. १८८५-१९४७), पीएच. डी. प्रबंध, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, उमवि नगर, जळगाव, २०१५, पृ. ५६-६१.

६. वि.वा.शिरवाडकर, उपरोक्त, पृ. १३३-१४४.
७. य. दि. फडके, ***लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक***, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. ६३- ६४.
८. तत्रैव.
९. सरल धारणकर, उपरोक्त, पृ.२८५-२८८.
१०. य. दि. फडके, उपरोक्त, पृ. ६३- ६४, सरल धारणकर, उपरोक्त, पृ.२८५-२८८.
११. य. दि. फडके, ***विसाव्या शतकातील महाराष्ट्र***, खंड १ला, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. ७९, सरल धारणकर, उपरोक्त, पृ.२९२.
१२. ***Source Material for the History of the Freedom Movement in India,*** Vol. II, 1885-1920, Bombay Govt. Records, 1958, Pp. 663.
१३. श्रीधर रघुनाथ वर्तक, ***भारतीय स्वातंत्र्याचे रणझुंजार***, अभिनव भारत चित्रप्रबोधिनी, काळ प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८५, पृ. २६-२९.
१४. गो. ब. देगलूरकर, चिं. ना. परचुरे(संपा.), ***नाशिक त्र्यंबक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक यथादर्शन***, भारतीय इतिहास संकलन समिती, महाराष्ट्र प्रकाशन, १९९८, पृ. १५५.
१५. पुरुषोत्तम बुरकुले, ***दे. भ. रघुनाथ हरी उर्फ दादासाहेब गद्रे जीवन चरित्र***, प्रकाशक-सरचिटणीस, गद्रे सत्कार समिती, नाशिक, १९५४, पृ. १-१२
१६. तत्रैव.
१७. ***Source Material for the History of the Freedom Movement in India,*** Vol. III, Part-I, 1915-1992, (Mahatma Gandhi), Govt. of Maharashtra, Bombay, First Edition, 1965, Pp. 340.
१८. शिरवाडकर, वि.वा., उपरोक्त, पृ. १२८
१९. माणिकलाल बोरा, ***संघर्षरथी (जीवन चरित्र)***, श्री. नेमीनाथ जैन, ब्रह्मचर्याश्रम, चांदवड, नाशिक, प्रथम संस्करण, १९९२, पृ. ०८.
२०. भावना भार्गवे, ***पद्मश्री दादासाहेब गायकवाड***, प्रकाशक- शांताबाई दाणी, दादासाहेब गायकवाड सत्कार समिती, नाशिक, प्रथमावृत्ती, १९६८, पृ. ५६- ८०.
२१. शंकर कापडणीस, ***बागलाण इतिहास दर्शन***, प्रका. सौ. शकुंतला कापडणीस, नाशिक, पृ. १६१.
२२. शंकर दत्तात्रय देव (अनु.), ***कॉंग्रेसचा इतिहास***, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमेटी, पुणे, १९३५, पृ. २४८.
२३. बिपन चंद्र, (अनु. एम. व्ही. काळे), ***भारताचा स्वातंत्र्य संघर्ष***, के. सागर पब्लिकेशन, पुणे, तृतीयावृत्ती,

२००८, पृ. २०२- २०७, शंकर दत्तात्रय देव (अनु.), उपरोक्त, पृ. १८१-१८५, पुरुषोत्तम रामचंद्र बुरकुले, उपरोक्त, पृ. १२.

२४. ***Source Material for the History of the Freedom Movement in India,*** ibid, Pp. 340.

२५. Ibid, Pp. 340- 341.

२६. शिरवाडकर, वि.वा., उपरोक्त, पृ. १२८

२७. रामचंद्र पुरुषोत्तम बुरकुले, उपरोक्त, २०-२२

२८. तत्रैव.

२९. माणिकलाल बोरा, उपरोक्त, पृ. ०८

३०. भ.ग.कुंटे (संपा.), ***स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश***, पश्चिम महाराष्ट्र (खंड ३ रा), दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ. ३४४, ३८३, ४१५.

३१. प्रभाकरमांडे, ***बागलाणचे बाबा***, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००४, पृ. ८१-८२.

३२. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१७, पृ. ९२-९५, प्रभाकरमांडे, उपरोक्त, पृ. ८१-८२.

३३. राधाबाई आपटे, ***उमटलेली पाऊले***, साधना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६१, पृ. ७८- ८४.

३४. तत्रैव, पृ. १३९.

३५. रामचंद्र पुरुषोत्तम बुरकुले, पूर्वोक्त, पृ. १८-२४.

३६. भ.ग.कुंटे (संपा.), पूर्वोक्त, पृ. ४१५.

३७. विनायक वामन भुस्कुटे, ***मुळशी सत्याग्रह,*** रामचंद्र दास्ताने आणि कंपनी, पुणे, १९६८, पृ. २४३.

३८. ***Source Material for the History of the Freedom Movement in India,*** ibid, Pp. 397, 436.

३९. हरिभाऊ पगारे, ***दादासाहेब गायकवाड जीवन व कार्य,*** अनिल प्रकाशन, नाशिक, १९८७, पृ. १५५.

व भावना भार्गवे, पूर्वोक्त, पृ. ५६-८३,

४०. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, उपरोक्त, पृ. १०९-११४.

४१. तत्रैव.

४२. ***Source Material for the History of the Freedom Movement in India,*** ibid, Pp. 469.

४३. शंकर दत्तात्रय देव (अनु.), ***कॉंग्रेसचा इतिहास***, पूर्वोक्त, पृ. ४०५-४०६

४४. वि.वा.शिरवाडकर, पूर्वोक्त, पृ. १२८.

४५. ***Source Material C.D.O. Movement***, April –September, 1930, Vol. XI, Ibid, Pp. 577-600.

४६. Ibid, Pp. 650, 656, 662, 667, 734, 797 व य. दि. फडके, ***विसाव्या शतकातील महाराष्ट्र***, खंड ४ था, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९३, पृ. ५९-६४.

४७. अप्पासाहेब पटवर्धन, ***सत्याग्रह व स्वराज्य***, ग्रामसेवा मंडळ, वर्धा, जानेवारी, १९४७, पृ. २००-२०१.

४८. तत्रैव.

४९. ***Source Material C.D.O. Movement***, Ibid, Pp. 577

५०. शंकर दत्तात्रय देव, ***दैव देते कर्म नेते***, प्रकाशक – देवकीनंदन नारायण, अध्यक्ष सासवड आश्रम विश्वस्थ मंडळ, सासवड, पुणे, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. १६२-१६३, ***Source Material C.D.O. Movement***, Ibid, Pp. 578.

५१. सुरत जिल्हाधिकाऱ्यांचे शिमला गृहविभागाला पत्र, दि. ०६ एप्रिल १९३०, शंकर दत्तात्रय देव, ***दैव देते कर्म नेते***,पृ. ७५-७६

५२. ***Source Material C.D.O. Movement***, Ibid, Pp. 585, य. दि. फडके, ***विसाव्या शतकातील महाराष्ट्र,*** पूर्वोक्त, पृ. ५६.

५३. सुरत जिल्हाधिकाऱ्यांचे शिमला गृहविभागाला पत्र, दि. ०६ एप्रिल १९३०, ***Source Material C.D.O. Movement***, Ibid, Pp. 595.

५४. ***Source Material C.D.O. Movement***, Ibid, Pp. 595- 596.

५५. रामचंद्र पुरुषोत्तम बुरकुले, पूर्वोक्त, पृ. ६०-६१.

५६. ***Source Material C.D.O. Movement***, Ibid, Pp. 607-617.

५७. Ibid, p. 656, 662, 797, सुरत जिल्हाधिकाऱ्यांचे शिमला गृहविभागाला पत्र, दि. १८ मे, १९३०.

५८. Ibid, Pp. 797.

५९. Home Dept. Special; File No. 800, 14(A) & (B), 12 / 1932, संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ. १४३-१४५.

६०. राधाबाई आपटे, पूर्वोक्त, पृ. १४८-१४९.

६१. य. दि. फडके, ***विसाव्या शतकातील महाराष्ट्र***, पूर्वोक्त, पृ. ६९-७०, ***Source Material C.D.O. Movement***, Ibid, Pp. 684.

६२. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ. १५४-१६४.

६३. तत्रैव, पृ. १६६.

६४. Home Dept. Special; File No. 800, (40) (4) A-I-1932., बिपन चंद्र, (अनु. एम. व्ही. काळे), ***भारताचा स्वातंत्र्य संघर्ष***, उपरोक्त, पृ. ३३२-३३४.

६५. वि.वा.शिरवाडकर, पूर्वोक्त, पृ. १३०.

६६. रा. श्री.मोरवंचीकर, ***आधुनिक भारत***, विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९६, पृ. ११५- १२०.

६७. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ. १७५-२१०.

६८. रा. श्री.मोरवंचीकर, उपरोक्त, पृ. ११५- १२०.

६९. बिपन चंद्र, अनु. एम. व्ही.काळे, उपरोक्त, पृ. ५२३.

७०. रा. श्री.मोरवंचीकर, उपरोक्त, पृ. ११५- १२०.

७१. Home Dept. Special; File No. 924, D-PT-I, II, 1940-42, Weekly confidential reports.

७२. रामचंद्र पुरुषोत्तम बुरकुले, पूर्वोक्त, पृ. ३३.

७३. Home Dept. Special; File No. 924, D-PT-I, II, 1940-42, ibid, 16th Jan., 23rd Jan., 1941.

७४. Ibid.

७५. The Bombay Chronicle Dated- 03rd Jan. 1941.

७६. Home Dept. Special; File No. 924, D-PT-I, II, 1940-42, ibid, 30th Jan., 06th Feb.,1941

७७. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ. १८१-१८३.

७८. तत्रैव, पृ. १८१-१८४.

७९. Home Dept. Special; File No. 924, D-PT-I, II, 1940-42, ibid, 29th May, 12 Jun., 1941

८०. Ibid, 10th Sep., 1941

८१. Ibid, 18th Jun., 1941

८२. Ibid, 09th, 23rd July, 1941

८३. Ibid, 06th, 13th August., 1941

८४. Ibid, 07, 14th Oct., 1941
८५. Ibid, 05th Nov.,19th Nov., 1941
८६. Ibid.
८७. Ibid, 27th Nov., 1941
८८. Ibid, 03rd Dec., 1941
८९. भ.ग.कुंटे (संपा.), ***स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश***, पूर्वोक्त, संपूर्ण नाशिक जिल्हा.
९०. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ. २१४-२१७.
९१. पुंडलीकजी कातगडे, छोडो भारत पर्व, अरुणराज प्रकाशन, पुष्प २ रे, मुंबई, १९७०, प्रास्ताविक, पृ. ०५.
९२. शंकर जावडेकर, आधुनिक भारत, कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, १९७९, पृ. ४७४- ४७६.
९३. Home Dept. Special; File No. 800, (74)(12) III, 1941-43, Letter Dated- 09th August, 1942
९४. Ibid.
९५. Ibid, Letter Dated- 11th August, 1942
९६. Ibid.
९७. Ibid.
९८. Ibid.
९९. Ibid, Letter Dated- 13th August, 1942, संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ. २३४- २३७.
१००. तत्रैव, पृ. २३४- २४०, Home Dept. Special; File No. 800, (74)(12) III, 1941-43, Letter Dated- 16th August, 1942
१०१. Home Dept. Special; File No. 800, (74)(12) III, 1941-43, Letter Dated- 17th August, 1942,भ. ग. कुंटे ( संपा.), स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश, पूर्वोक्त, पृ. ३८३, ४१४, ३९२.
१०२. तत्रैव.
१०३. Home Dept. Special; File No. 800, (74)(12) III, 1941-43, Letter Dated- 18th August, 1942, भ. ग. कुंटे (संपा.), उपरोक्त, पृ. ४०८, ४१९.
१०४. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ.१६३-

२६४.

१०५. Home Dept. Special; File No. 800, (74)(12) III, 1941-43, Letter Dated- 20th August, 1942

१०६. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ. २५२-२५३.

१०७. Home Dept. Special; File No. 800, (74)(12) III, 1941-43, Letter Dated- 26th Sep., 1942

१०८. Ibid, Letter Dated- 31st Oct., 07th Nov., 1942, भ.गकुंटे ( संपा.), ***स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश***, पूर्वोक्त.पृ ,३३१-३३२.

१०९. Ibid.

११०. संतोष दत्तात्रय बोडके, ***भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान***, पूर्वोक्त, पृ.२२४-२६६.

१११. Home Dept. Special; File No. 800, (74)(12) III, 1941-43, Letter Dated- 03rd Feb., 1943

११२. Ibid, Letter Dated- 17th Feb., 1943

११३. Ibid, Letter Dated- 24th Feb.,03rd, 11th March, 1943

११४. Ibid.

११५. वि.वा.शिरवाडकर ,पूर्वोक्त, पृ. १३१.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# शरद पाटील यांचा माफुआ विचारप्रवाह : आदिवासींच्या सामाजिक व ग्रामीण चौकटीचा अभ्यास.

**डॉ. श्रीहरी रामचंद्र थोरवत**
*डॉ. विजय बिडकर महाविद्यालय, अभोणे,*
*ता. कळवण, जि. नाशिक*

**प्रास्ताविक**

इ.स. १९५० पासून इ.स. १९७० पर्यंत आंबेडकरांकडे विशेष लक्ष गेले नाही, कारण इतिहास लेखनावर राष्ट्रवादी आणि मार्क्सवाद्यांचा प्रभाव होता. राष्ट्रवादी आणि मार्क्सवाद्यांनी जाती व्यवस्थेकडे दुर्लक्ष केले. दोन्ही प्रवाहांकडे भारतीय इतिहासामधील जातींची भूमिका, अवर्ण आदिवासींकडे आणि तळागाळातील वंचित जातींकडे व त्यांच्या समस्याकडे पाहण्यासाठी वेळ नव्हता. कार्ल मार्क्स, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तात्त्विक विचारांचे परिप्रेक्ष्य आदिवासींच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते. या आधारे आदिवासी समाजाचा अभ्यास आकलनाचा गाभा अधिक वास्तवाशी जवळीकता साधतो. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाचा जेवढा खोलवर विचार केला तेवढा कोणीही केला नाही.

शरद पाटील यांचा माफुआ विचारप्रवाह

आजतागायत भारताच्या इतिहासाचे वस्तुनिष्ट आकलन करण्यात मार्क्सवाद्यांना बऱ्यापैकी यश आले आहे. परंतु त्यांच्या ऐतिहासिक अधिभौतिकवादाचे स्वरूप **एकप्रवाही** राहिले आहे. कार्ल मार्क्सने वर्गवादाची मांडणी केली, परंतु जातीव्यवस्थेला त्यात स्थान नव्हते. जातीव्यवस्थेचा पहिला आघात व्यक्तिस्वातंत्र्यावर होता. मार्क्सच्या वर्गवादात व्यक्तिस्वातंत्र्याला स्थान नाही, त्यात सारा भर कामगार वर्गाच्या हुकुमशाहीवर आहे. हुकुमशाही मग ती कामगारांची असो किंव्हा भांडवलदारांची त्यात जातिव्यवस्था नष्ट होऊ शकत नाही. मार्क्सवादात समता आहे आणि बंधुताही आहे, परंतु स्वातंत्र्य नाही. स्वातंत्र्याअभावी येथे (भारतात) परिवर्तन शक्य नाही, हे बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे सार आहे.[१]

आदिवासी समाज आज हिंदू समाजाचा भाग म्हणून व्यवहार करतो. सहाजिकच हिंदू धर्मांतर्गत जात अस्मितेचे असलेले बंध हा समाज स्वीकारतो. आदिवासी समाजातील काही घटकांनी हे

अस्मितेचे बंध झुगारलेले असले तरी आपल्याकडील आदिवासींच्या बाबतीत मात्र हे आढळत नाही. सामाजिक आणि ग्रामीण इतिहास अभ्यासाच्या चौकटीत त्याचा सैद्धांतिक विचार करावा लागतो. त्यासंदर्भात परकीय व स्थानिक अभ्यास पद्धतीच्या प्रवाह आकलनशी एकरूप व्हावे लागते. स्थानिक अभ्यास पद्धतीमध्ये वर्गवादी अन्वेषण पद्धतीला बहुप्रवाही करण्यात शरद पाटील यांना यश आले आहे. त्यांनी फुले-आंबेडकर यांची सांगड मार्क्सवादी[२] प्रवाहाशी घातला. कार्ल मार्क्स हा हेगेल व अडम स्मिथ या दोघांचा शिष्य होता. त्याने हेगेलची 'विश्वचेतनाच्या चतुराईची' संकल्पना व स्मिथची 'अदृश्य हस्त' संकल्पना सामनार्थी मानून, वर्ग-लढ्याच्या रुपात क्रांतीचे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आणले.

ऐतिहासिक शोध घेण्यासाठी शरद पाटील यांनी माफुआ अन्वेषण पद्धतीचे दालन उभारले.[३] त्यांचे बहुप्रवाही अन्वेषण हे वादाच्या गुंतावळ्यात अडकले असल्याने, त्यातून निश्चित निष्कर्ष अद्याप बाहेर आले नाहीत. फुले-आंबेडकरी विचारधारा म्हणजे सर्वकष परिवर्तनाचे संपूर्ण शास्त्र आहे. हा विचार केंद्रस्थानी मांडून आदिवासी समाजाचाचा इतिहास लिहण्यासाठी माफुआ विचारप्रवाह उपयुक्त ठरतो. आदिवासी लोकांचा अभ्यास हा प्रामुख्याने सामाजिक इतिहासाचे प्रमुख अंग आहे. या जाणीवेतून सामाजिक इतिहासाचे भान ठेवणे आवश्यक आहे. सामाजिक इतिहास, ज्याचा काहीवेळा 'लोकांचा इतिहास' (history of the people) किंवा 'तळातून इतिहास' (history from below) असे वर्णन केले जाते.

परंपरागत राजकीय इतिहासाला पर्याय म्हणून सामाजिक इतिहास उदयास आला. आवडीची घटिते आणि खोलवर रुजलेल्या आर्थिक आणि सामाजिक इतिहास हे विश्वासाच्या दृष्टीने इतिहास परिवर्तनाचे प्रतीनिधिक विषय ठरले.[४]सामाजिक इतिहास, ज्याला अनेकदा नवीन सामाजिक इतिहास म्हटले जाते. ही इतिहासाची एक विस्तृत शाखा आहे. जी सामान्य लोकांच्या अनुभवांचा अभ्यास करते. हे विद्वानांमध्ये इ.स. १९६० ते १९७०च्या दशकात एक प्रमुख वाढीचे क्षेत्र होते. अजूनही याचे इतिहास विभागांमध्ये चांगले प्रतिनिधित्व केले जाते. सामाजिक इतिहास लेखनाची परंपरा मार्क्सवादी चौकटीत उत्तर मार्क्सवादापर्यंत विकसित झाली.[५] मार्क्सवाद प्रभावातून संपूर्ण जग आपले विचार प्रदर्शित करू लागले. महाराष्ट्रात हा प्रवाह व या प्रवाहाबाहेर स्वतंत्र लेखन करणारे

विद्वान होते. यामध्ये स्वतंत्र विचारांचे म्हणून आचार्य जावडेकर, दि.के. बेडेकर, गं.बा. सरदार व डी.डी. कोसंबी यांचा विचार केला जातो. जग, भारत व महाराष्ट्र या परिप्रेक्ष्यात मार्क्सवादाचे स्वरूप भिन्न राहिले.

फुले-आंबेडकर चळवळ व त्यांची महान विचारधारा आदिवासींना यशाच्या शिखरावर नेणारी आहे. तिचा तात्विक अधिष्ठानावर विचार करून त्यास मार्क्सवादाची जोड देण्याची आवश्यकता महत्वाची ठरते. भारतातील मार्क्सवादी वर्ग-लढ्यास महत्व देतात पण ते जातिनिर्मुलनास महत्व देत नाहीत. मार्क्सवादी एकप्रवाही भौतिकवादी रूप बदलून ते बहुप्रवाही करण्यास तयार नाहीत. शिवाय त्यांचा दृष्टीकोन जाणीवेशी निगडीत आहे. ई.एच. कार लिहितात की, 'इतिहास म्हणजे जाणीवेच्या जागृतीमुळे निसर्गाशी घडून आलेली फारकत.' परंतु आपणास येथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल ती म्हणजे व्यक्तीच्या आत्मपरीक्षणाची बाजू मांडणे.

**मार्क्सवादाच्या मर्यादा**

आधुनिकोत्तर काळात मार्क्सवादाच्या मर्यादा दाखवण्याचा प्रयत्न सुरु झाला. सिंग्मंड फ्राईड याने मार्क्सच्या विचारला पाठबळ देऊन इतिहासकाराला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त केले. मार्क्सच्या जाणीवेच्या कप्प्याच्या पलीकडे जाऊन नेणीवेचा कप्पा उलघडण्याचा विचार त्याने मांडला. अब्राह्मणी ऐतिहासिक भौतिकवादी अन्वेषण पद्धतीचे सामर्थ्ये देखील नेणीवेचा रहस्यभेद करणे हेच आहे. इतिहास आणि संस्कृतीच्या विविध रूपांचे बाजारीकरण करणे या गोष्टीपण उत्तर आधुनिकवादात येतात. त्यामुळे सांस्कृतिक संघर्षाची मिमांसा उत्तर आधुनिकवादात क्रमप्राप्त बनल्याचे आढळते.

एडवर्ड सैद यांनी मार्क्सच्या उणिवा दाखवून पश्चिम व पूर्व या संदर्भात 'सांस्कृतिक वर्चस्वाची' सैद्धांतिक मांडणी केली.[६] फुकोने मांडलेली सत्ता स्थापनेमागील अनाम संबंधाची साखळी देखील सैद यांनी नाकारली.[७] शासनामुळे सत्ता निर्माण होत नाही, हा फुकोचा विचार सैद यांनी नाकारला. त्यांनी पश्चिमेकडील देशांची सत्ताकांक्षा ही जाणीवपूर्वक असणारी क्रिया सांगतली. पाश्चिमात्यांनी पूर्वेला मूक, वैषयिक स्त्रीरूपी, निरंकुश, अतार्किक आणि विखंडीत असल्याचे म्हंटले आहे. मार्क्सने समाजाला केवळ दोनच धुर्वाच्या स्वरुपात पहाण्यास नकार दिला होता.[८] आदिवासींच्या

अभ्यासासाठी मार्क्सचा उत्पादनाची साधने (Mode of Production) हे सूत्र प्रभावी ठरते. परंतु त्याची सांगड स्थानिक विचारप्रवाहांशी जोडावी लागते.

एडवर्ड सैद यांनी आपली पाश्चिमात्य व पौर्वात्त्य सांस्कृतिक संघर्षाची मांडणी केलेली आहे. उत्तर आधुनिकवादाने इतिहास आणि समाजशास्त्र यांना मोडीत काढून पुराण, मिथक आणि संस्कृतीच्या अभ्यासाला महत्व दिले. त्यापूर्वीच्या आधुनिकवादाने विज्ञान व बुद्धिवाद यांनाच धर्म मानलेले होते. जागतिक स्तरावरील मिमांसा राष्ट्रीय स्तरावर पहाताना आर्थिक हितसंबंधाना अधिक महत्व असते, हे ध्यानात घ्यावे लागेल. भारताच्या बाबतीत विचार करताना जाती-जमातीचे हितसंबंध लक्षात घ्यावे लागतात. इतिहास अभ्यासाची पूरक अन्वेषण पद्धती स्वीकारताना पुढील मत लक्षात घेणे आवश्यक आहे. वसंत आबाजी डहाके यांच्या मतानुसार, 'उत्तर आधुनिकवाद, उत्तर वसाहतवाद समांतर काळात आंबेडकरवाद व देशीवाद यांची सैद्धांतिक मांडणी करून, पाश्च्यात सांस्कृतिक रुपसरणी तसेच देशी चातुर्वर्ण्याधिष्ठीत रुपसरणीऐवजी वर्ण-जातीविहीन असे प्रतिरूप यास्थानी ठेवावे का? या प्रश्नाची सविस्तर चर्चा झाली पाहिजे.[९]

शरद पाटील यांनी अश्या प्रकारची चर्चा केलेली आहे. त्यांची अब्राह्मणी अन्वेषण पद्धती ही बहुप्रवाही आहे. तिच्या वापरामुळे आदिवासी, दलित, आणि इतर डाव्या शक्ती या ब्राह्मणीकरणावर मात करू शकतात. आदिवासी जमातीची व्याख्या शरद पाटील यांनी, 'उपजीविकेपुरत्या उत्पादनापर्यंत आलेल्या जमाती अशी केली आहे.' या सीमारेषेवरून पितृसत्ताक आदिवासी जमाती व नवजात स्त्रीसत्ताक गण वरकड उत्पादनाकडे व विषमतेकडे जातात.[१०] या प्रारूपाव्यतिरिक्त इतर प्रारूप देखील पाहावे लागेल. उदा. आदिवासी समाजाचे ग्रामीण जीवन वास्तव. जे सामाजिक इतिहासाचा आधार घेऊन तपासवे लागते.

**आदिवासींच्या सामाजिक व ग्रामीण चौकटीचा अभ्यास**

आदिवासी लोकांचा अभ्यास हा प्रामुख्याने ग्रामीण (Rural) भागाशी निगडीत आहे. त्यांच्या आर्थिक उद्धारीकरणाचा मार्ग शेतीवर निर्धारित असतो. त्यांचे शेतीचे अर्थशास्त्र भांडवली व्यवस्थेला पोषक असते. पाश्चिमात्यांच्या बाबतील ग्रामीण भागातील शेतीचे अर्थशास्त्र याचा विचार करता इंग्लंडमधील शेतीशी निगडीत जीवन पहावे लागते. येथील सामाजिक अंगाचे स्वरूप पुढील प्रमाणे

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

अभ्यासलेले आढळते. प्रामुख्याने ग्रामीण इतिहास सामाजिक परिमाण हाताळतो. जेरेमी बर्चर्ड यांचे काम आधुनिक इंग्लंडमधील ग्रामीण इतिहासाच्या स्थितीचे मूल्यमापन करते. शेतीच्या आर्थिक इतिहासावर केंद्रित असलेला जुना वा सनातन प्रवाह (ऑर्थोडॉक्स) म्हणून ओळखला जातो. या इतिहासलेखनाने 'कृषी क्रांती' पासून इंग्लंडमधील शेतीचे उत्पादन, उत्पादकता सिद्धी मोजमाप स्पष्ट करण्यात प्रभावी प्रगती केली.[११] सनातन प्रवाहाच्या दृष्टीकोणाला असंतुष्ट परंपरेने आव्हान दिले. ज्यात कृषी प्रगतीच्या सामाजिक खर्चावर भर दिला गेला. विशेषत: बंदिस्तता, ज्याने गरीब भाडेकरू शेतकऱ्यांना जमीन सोडण्यास भाग पाडले. अलीकडे, 'रूरल हिस्ट्री' या जर्नलशी संबंधित असलेली एक नवीन प्रवाह, कृषी बदलाच्या या कथनापासून दूर गेला आहे. ज्याने व्यापक सामाजिक इतिहास विशद केला.

**भारताच्याग्रामीण विशेषत: आदिवासी भागातील शेती विकास हा वर्ग भेद आणि जात-जमात भेद यामधून तपासावा लागतो. तरच आदिवासींच्या सामाजिक इतिहासाची मीमांसा करणे सुलभ बनते. इंग्लंडमधील सामाजिक अभ्यासाची परंपरा** अलीकडच्या इतिहासलेखनात अलुन हॉकिन्सच्या अभ्यासात आढळते. ते देखील त्याच्या पूर्वसुरींप्रमाणेच शेती आणि ग्रामीण भागाच्या वाढत्या कालदोष (अनाक्रोनिस्टिक) समीकरणामुळे विवश ठरले. या अभ्यासकांनी म्हणजेच भूगोलशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांनी 'ग्रामीण रमणीयते'च्या कल्पनेला सुस्थापित केले. त्यांनी इतिहासलेखनाच्या संयोगाने, उपभोग आणि प्रतिनिधित्वाने वर्चस्व असलेल्या 'उत्पादकोत्तर' ग्रामीण भागाची संकल्पना विकसित केली.

**इंग्लंडमधील सामाजिक अभ्यासाची परंपरा** अलुन हॉकिन्सने सांगितलेल्या तीन परंपरांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरते.[१२] **एक म्हणजे**, इ.स. १९५० पर्यंत उत्तरेकडील 'नवीन ग्रामीण इतिहास' याकडे लक्ष केंद्रीत केले. ते चांगले कृषी भांडवलदार बनण्याऐवजी, शेतकरी कुटुंब आणि समुदायावर जोर देणाऱ्या पूर्वऔद्योगिक भांडवलशाही मूल्यांना धरून राहिले. ग्रामीण भागात लोकसंख्या स्थिरता राखली. दुसरे म्हणजे, नातेसंबंध संबंध ग्रामीण स्थलांतरित सेटलमेंट आणि समुदाय संरचना निर्धारित करण्यास प्रोत्साहन दिले गेले. आणि तिसरे म्हणजे, शेतीच्या कामाच्या स्त्रीकरणाने 'महिला क्षेत्रा'च्या ग्रामीण प्रवृत्तीला देखील प्रोत्साहन दिले. हे निष्कर्ष जुन्या सीमावर्ती

इतिहासातील तसेच नवीन शहरी इतिहासात सापडलेल्या निष्कर्षांशी तीव्र विरोधाभास असलेले आहेत.[१३]इ.स. १९४७ पर्यंत भारतातील आदिवासींचे जीवन हे वसाहतवादी आर्थिक धोरणांशी जुळलेले होते. त्यांची वनाधिष्ठीत अर्थव्यवस्था शेतीशी निगडीत होती. ती केवळ शेतीवर अवलंबून बनली होती. तिने ब्रिटिश अर्थव्यवस्थेचे भरण-पोषण केले. स्वातंत्र्योत्तर काळात स्वकीयांचे शासन आले, तरी आदिवासी ग्रामीण जीवन शहरी अथवा इतर ग्रामीण जिवनमानाच्या तुलनेत भिन्न राहिले.

भारतीय समाजमनाच्या समग्र मुक्तीचा प्रश्न हा नवआंबेडकरवादाच्या स्विकारातून सुटणार आहे, अशी माझी धारणा आहे, असे श्रीपाल सबनीस यांनी म्हंटले आहे.[१४] परंतु नवआंबेडकरवादाचे सैद्धांतिक विश्लेषण अथवा अन्वेषणमूलक बैठकीचे अधिष्ठान त्यांना साकारता आले नाही. शरद पाटील यांनी मात्र, 'प्रत्येक देशाने आपला इतिहास बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादी अन्वेषण पद्धतीने लिहिल्याशिवाय त्यांच्या मुक्तीची कोंडी फुटणार नाही.' असा विचार मांडून माफुआ अन्वेषण पद्धतीचा आयाम उभारला आहे. जो आदिवासींच्या सामाजिक व ग्रामीण अभ्यासाच्या अन्वयार्थासाठी उपयुक्त ठरू शकतो.

**संदर्भ व तळटीपा**

१. मनोहर पाटील, (२०१०) *फुले आंबेडकरी चळवळीचे क्रांतीशास्त्र,* सुगावा, पुणे, पृ. ४२९.
२. ई.एच. कार, अनुवाद- वि.गो. लेले, (२०१२) *इतिहास म्हणजे काय?,* कॉन्टिनेन्टल, पुणे.
३. मनोहर पाटील, पूर्वोक्त, पृ. ४.
४. https:www.google.co.in#social+history
५. अशोक चौसाळकर, (२०१०) *मार्क्सवाद-उत्तरमार्क्सवाद,* प्रतिमा, पुणे.
६. उदय नारकर, (२०१४) *मार्क्स काय म्हणाला,* लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ. १७७.
७. मनोहर जाधव (संपा.-२००१) *समीक्षेतील नव्या संकल्पना,* स्वरूप, औरंगाबाद, पृ. २०६.
८. उदय नारकर, पूर्वोक्त, पृ. १९०.
९. वसंत आबाजी डहाके, (२०११) *मराठी समीक्षेची सद्यस्थिती,* पॉप्युलर, मुंबई, पृ. २०६.
१०. शरद पाटील, (२००३) *जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती- खंड: ३,* सुगावा, पुणे, पृ. ४९.

११. https:www.google.co.in#social+history

ब्रिटिश ग्रामीण इतिहासावर जेरेमी बर्चर्ड, कृषी इतिहास, ग्रामीण इतिहास पहाणे. (ऐतिहासिक जर्नल, २००७) इ.स. १९७५ ते १९९५ या दोन दशकांत, सामाजिक इतिहासाची ओळख असलेल्या अमेरिकन विद्यापीठांमध्ये इतिहासाच्या प्राध्यापकांचे प्रमाण ३१% वरून ४१% पर्यंत वाढले. तर राजकीय इतिहासकारांचे प्रमाण ४०% वरून ३०% पर्यंत घसरले. राजनैतिक ५% वरून ३% पर्यंत घसरले. आर्थिक इतिहास ७% वरून ५% आणि सांस्कृतिक इतिहास १४% वरून १६% वर आला.

१२. https:www.google.co.in#social+history-

अलून हॉकिन्स, *'द डेथ रुरल इंग्लंड'*, (२००३)

१३. https:www.google.co.in#social+history

Hal S. Barron, Rediscovering the Majority: The New Rural History of the Nineteenth-Century North, Historical Methods, Fall 1986, Vol. 19 Issue 4, pp. 141-152.

१४. श्रीपाल सबनिस, (१९९२) *भारतीय प्रबोधन आणि नव-आंबेडकरवाद,* मधुराज, पुणे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नाशिक जिल्ह्यातील स्नेहयात्री दादासाहेब बिडकर आणि दादासाहेब पोतनीस

**प्रो (डॉ). वाय. एम. साळुंके**
*म.वि.प्र.समजाचे, कर्मवीर रावसाहेब थोरात*
*कला आणि वाणिज्य महाविद्यालय,*
*वणी, ता. दिंडोरी, जि.नाशिक , महाराष्ट्र.*

**प्रास्तविक**

स्थानिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहासाची बांधणी होत असते. म्हणून स्थानिक इतिहासाचे स्थान राष्ट्राच्या इतिहासात महत्वपूर्ण असते .आपण भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास भारतीय राष्ट्रीय सभा अंतर्गत मावळ,जहाल ,गांधी युग असे करत असतो.तसेच विविध संघटना ,वेगवेगळया विचाराच्या चळवळी या विविध अंगाने झालेली राष्ट्रीय चळवळ असा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास होत असतो. अशा भारतीय स्वातंत्र चळवळीत भारतीय राष्ट्रीय कांग्रेसची भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे . स्वातंत्र्यपूर्वीचा नाशिक जिल्हा हा भारतीय स्वातंत्र चळवळीतील योगदानात महत्वपूर्ण होता.अशा नाशिक जिल्ह्यात भारतीय स्वातंत्र चळवळीतील सर्वच विचारसरणीने भाग घेतल्याचे दिसते.त्यातील एक विचारसरणी म्हणजे गांधी विचारसरणी होय. नाशिक जिल्ह्याला या गांधी विचारसरणीने फक्त स्वातंत्रसेनानी दिले नाही तर परिपूर्ण असे सामाजिक,राजकीय,सहकार,ग्रामीण, आदिवासी, शैक्षणिक क्षेत्रात निस्वार्थी काम करणारे ऋषीतुल्य नेतृत्व दिले.अशा नेतृत्वापैकी एक म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील, म.गांधी आणि सर्वोदयी नेते आचार्य विंनोबा भावे यांच्या विचारांने प्रेरित नाशिक जिल्ह्यातील स्नेहयात्री मा.श्री दत्तात्रेय (दादासाहेब) मल्हार बिडकर आणि दत्तात्रेय (दादासाहेब) शंकर पोतनीस होय. प्रस्तुत लेखात या स्नेहयात्रींच्या नाशिकमधील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील या स्नेहयात्रींच्या सहवासाच्या कार्याचा धांडोळा घेतला आहे.

**सविनय कायदेभंग चळवळ आणि चरखा केंद्र**

गोविंदभाई श्रॉफ , अच्युतभाई देशपांडे व नारायणराव चव्हाण असे अनेकजण हैदराबादहून इ.स. १९३० मध्ये सत्याग्रहात भाग घ्यावयाचा म्हणून मुंबईस नवजीवन संघात आले त्यांच्या बरोबर दादासाहेब बिडकर पण होते . त्यावेळी सरोजिनी नायडूंची कन्या पद्मजा नायडू यांनी या सर्वांना

मुंबईला नवजीवन संघाचे सेक्रेटरी श्रीलाल भट यांच्यासाठी पत्र दिले . त्यानुसार हे सर्व सत्याग्रह शिबिरात दाखल झाले .याचवेळी पुण्याहून जे सत्याग्रही तेथे आले होते , त्या समूहामध्ये मध्ये दादासाहेब पोतनीसही आले होते .या सविनय कायदेभंग चळवळ काळात रोज पहाटे प्रभातफेरी निघत होती, दुपारी चरख्यावर सूत कातण्याचे शिक्षण दिले जात होते. परंतु पुढे इ.स. १९३० चा सत्याग्रह व म. गांधी – लॉर्ड आयर्विन समझोता झाला. सविनय कायदेभंग चळवळ सत्याग्रह स्थगित केली गेली.समजोता कराराप्रमाणे ब्रिटिशांनी सर्व सत्याग्रंहिची कारागृहातून सुटका केली . काही सत्याग्रही परत घरी गेले. काही सत्याग्रही ज्यात अच्युतभाई देशपांडे, दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांनी परत घरी न जाता विधायक कामात राहावयाचे ठरवले . नवजीवन संघाने नाशिक व पुणे येथे चरखा वर्ग सुरू केले. त्यात दादासाहेब पोतनीस नाशिकला आले तर दादासाहेब बिडकर पुण्यास बाळूकाका कानिटकर यांच्याकडे चरखा वर्ग सुरू करण्यास गेले .नाशिकला पोतनीस यांनी काकासाहेब गद्रे यांच्या जुन्या घरी रविवार पेठेत चरखा वर्ग सुरू केला . नाशिकमधील अनेक तरुण - तरुणी चरखा वर्गात दाखल झाले. देशभक्तीपर वाङ:मयाचे एक वाचनालय सुरु करण्यात आले. नाशिकमध्ये प्रभातफेरी सुरू केली. सामुदायिक गीते व छोटी छोटी देशभक्तीपर व्याख्याने सुरू केली. पुढे दादासाहेब बिडकर पुण्यातील चरख्यावरील कताई शिक्षणाचे काम आटोपून नाशिकला आले. परंतु यावेळी नाशिकचे चरखा केंद्र बंद करावे लागले होते कारण ब्रिटीश सी.आय.डी.अधिकाऱ्यांनी काकासाहेब गद्रे यांना हे केंद्र बंद करण्याबद्दल सूचना दिली. गांधी विचाराने प्रेरित दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या स्नेहयात्रींनी स्वदेशी सूत्राचे चरखा केंद्र मूल्य बंद पडू दिले नाही. नंतर मनमाडला मामा नाईक यांच्या राममंदिरात चरखा केंद्र सुरू केले .नाशिक जिल्ह्यातील मनमाड परिसरातील अनेक तरुण - तरुणी या चरखा वर्गात दाखल झाले .नाशिक प्रमाणेच प्रभातफेरी, वाचनालय, देशभक्तीपर समूहगीते हे कार्यक्रम चालू ठेवले. मनमाडच्या आसपासच्या गावातही स्वातंत्र चळवळ व कॉंग्रेस विचार प्रचाराचे कार्य सुरू केले.

**ग्रामसेवेतून गांधी विचार प्रसार**

नाशिक जवळील येवले येथे आपटे गुरुजींनी राष्ट्रीय शाळा अनेक वर्षे चालवली होती. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस येवले येथे जाऊन आपटे गुरुजींना भेटले. इ.स. १९३० च्या चळवळीत शाळेतील अनेक शिक्षकांना कारागृहात टाकले. त्यामुळे ही शाळा बंद होती. आपटे गुरुजींना दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस भेटले आम्हाला ग्रामसेवेचे काम करावयाचे आहे, आपण आम्हाला

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

मार्गदर्शन करावे व एखादे चांगले गाव निवडून आमची तेथे व्यवस्था करावी अशी विनंती केली असता,यावेळी या दोन्ही स्नेहयात्रींना आपटे गुरजींनी बागलाणमधील नामपूरचे गांधी विचाराचे, इ.स. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतलेले व कारागृहातून नुकतेच सुटलेले स्वातंत्रसैनिक, मोठे शेतकरी व सावकार नरहरशेठ वाणी यांना भेटण्यास सांगितले. त्यांना तेथे कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांची गरज आहे, असे सांगून नरहरशेठ यांच्या नावाने आपटे गुरजींनी एक पत्र दिले. ते पत्र घेऊन दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस हे दोघे येवल्याहून नामपूरला पायी जाण्यास निघाले . येवला ते नामपूर हे जवळजवळ ८०किलोमीटर अंतर २ दिवसात पार करून नामपूरला हे स्नेहयात्री पोहोचले . आपटे गुरुजींचे पत्र त्यांना दिले. त्यांनी एकदा आमच्याकडे निरखून पाहिले व आस्थेने चौकशी केली . पायी आलो हे सांगितले असता. त्यांना नवल वाटले . विश्रांती घेण्यास सुचवले. रात्री जेवण झाल्यावर या दोन्ही स्नेहयात्रीकडून सर्व हकिगत ऐकून घेतली. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांची ग्रामसेवेची तळमळ पाहून नरहरशेठ यांनी टेंभे या गावी पाठवले. तेथील आपले घर देऊन सर्व व्यवस्था केली. नरहरशेठ यांनी टेंभे येथील आपल्या जुन्या घराची किल्ली या स्नेहयात्रींना दिली . प्रवासातील बैलगाडीत अंथरूण पांघरूण , काही भांडी व सर्व प्रकारचे धान्य या स्नेहयात्रींना दिले टेंभे गावातील पोलिस पाटील सजन राघो पाटील हे स्वातंत्र्यसैनिक आपल्याला मदत करतील. त्यांच्या सल्ल्याने पुढील कार्यक्रम करावा असे सांगितले. दुसऱ्या दिवशी बैलगाडीतून टेंभे या गावी स्नेहयात्री पोहचले . सजन राघो पाटील यांना दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस भेटले. त्यांच्याकडे ग्रामसेवा विषयी विचारविनिमय सुरु झाला. लवकरच या कामात दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस अच्युतभाई देशपांडे, दांडेकर हे येऊन मिळाले. या गांधी विचाराच्या कार्यकर्त्यांनी ते जुनाट घर सारवून, लिंपून स्वच्छ करून घेतले . पांढरा चुन्याचा रंग दिला . मागची पुढची जागा साफ केली . टेंभे गावातील स्त्री - पुरुष व तरुण मंडळी आश्चर्याने पाहात होती. हे काम करण्यासाठी या स्नेहयात्रींनी गावाकडे मदत मागितली नाही. पुढे आसपासच्या गावात जाऊन ओळखी करून घेतल्या .यावेळी या स्नेहयात्रींचे एकच ध्येय होते ते म्हणजे राष्ट्रीय शाळेद्वारे राष्ट्र जागृती व ग्रामसेवा करणे होय.

**सविनय कायदेभंग चळवळ दुसरे पर्व आणि स्नेहयात्रींना आचार्य विनोबा भावेंचा सहवास**

दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांचे सजन पाटील यांच्या बरोबर काँग्रेस विचाराचा प्रचार व समूहगीते हे कार्यक्रम जोमाने चालू होते. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस,सजन पाटील यांनी निरनिराळ्या गावात राष्ट्रीय शाळा सुरू केल्या. काही गावात तरुण मंडळे, व्यायामाचे वर्ग ,छोटे मोठे उत्सव सुरू करून याद्वारे गांधी विचार व काँग्रेसचे महत्त्व स्नेहयात्रीं सांगत होते. समूहगीताद्वारे

ब्रिटीश अन्यायाविरुद्ध स्वातंत्र जनतेत निर्माण केली.या सर्व घडामोडींवर ब्रिटीश पोलिसांचे लक्ष होतेच. म.गांधी लंडनवरून दुसऱ्या गोलमेज परिषदेतून निराशाने भारतात आले .म.गांधीनी कॉंग्रेसी कार्यकत्यांना भावी लढ्याविषयी विषयी मार्गदर्शन करण्यास सुरवात केली यावेळी ब्रिटीशांनी दडपशाही सुरु केली.खास वटहुकुम काढून लोकांवर अत्याचार सुरु केले लॉर्ड विलिंग्टन याने राष्ट्रसभेची चळवळ दडपशाहीने नष्ट करता येईल असे त्याला वाटत होते म्हणून गांधीजी इंग्लंडहून भारतात येण्याच्या अगोदर पं .जवाहरलाल नेहरूंना इ.स. १९३२ मध्ये अटक झाली होती.म.गांधीनी ३ जानेवारी इ.स. १९३२ ला सविनय कायदेभंग चळवळ दुसरे पर्व सुरु करण्याचे अह्वान केले. त्यानंतर ४ जानेवारीला म. गांधी, सरदार पटेल व इतर नेत्यांना अटक करून पुणे येथे येरवडा कारागृहात ठेवले.

ब्रिटिशांनी याचप्रमाणे ठीकठिकाणी कॉंग्रेसी कार्यकर्त्यांची धरपकड सुरु केली. इ.स.१९३२ मध्येच दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस, अच्युतभाईं देशपांडे यांना अटक झाली . या सर्वांना धुळे येथील कारागृहात ठेवले .या धुळे कारागृहात आश्चर्याची बाब म्हणजे विनोबाजी ,जमनालाल बजाज , मणिभाई कोठारी , साने गुरुजी , बाळूभाई मेहता , देवकीनंदन नारायण , आण्णासाहेब दास्तानेही सर्व वरिष्ठ मंडळी आधीच तेथे होती . इ.स. १९३२च्या काळात विनोबाजींची माहिती फार जणांना नव्हती. या वरिष्ठ मंडळींना कारागृहात ब वर्ग दिला होता . बाकी सर्व वर्गात क होते. परंतु विनोबाजींनी ब वर्ग न स्वीकारता क वर्गच पसंत केला . कारागृहामध्ये विहिरीचे पाणी मोटेने ओढणे, जात्यावर धान्य दळणे , विणकाम , शेतीकाम , खडी फोडणे ही कामे होती . दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस, अच्युतभाईं देशपांडे यांना दळणाचे, पाणी ओढणे काम दिले होते . इ.स. १९३२ मध्ये धुळे कारागृहामध्ये विनोबाजींची गीतेवरील प्रवचने दर रविवारी होत असत . सर्व कैदी , राजकीय कैदी प्रवचनास हजर असत . साने गुरुजी प्रवचनाचे टिपण करीत होते .याकाळात विनोबांच्या सहवासात दादासाहेब पोतनीस कारागृहामध्येच आले . त्यांचे वैयक्तिक संबंधही वाढले .तर दादासाहेब बिडकर वेगळया बराकीत असल्याने दादासाहेब पोतनीस यांच्याशी रविवार सोडून सविस्तर भेट होत नव्हती . फक्त रोजच्या कामाच्या ठिकाणीही भेट होत असे . दादासाहेब पोतनीस विनोबांच्या विशेष परिचयात आले.कारागृहात राजकीय कैदीमध्ये काही कुरबुरी झाल्यास विनोबाजी त्या मिटविण्यासाठी दादासाहेब पोतनीस यांना सांगत असत . विनोबाजींनी पोतनीसांचे नाव डी.एस.पी.असे ठेवले होते . राजकीय कैदींचे काही काम निघाले , काही अडचण असली तर विनोबाजी डी.एस.पीं.च्याकडे पाठवीत . त्यामुळे सर्व राजबंद्यांमध्ये पोतनीस डी.एस.पी. म्हणूनच परिचित झाले .पुढे विनोबाजी सुटून वर्ध्यास गेले . दादासाहेब पोतनीस व अच्युतभाई कारागृहातून सुटल्यानंतर काही दिवस विनोबाजींकडे आश्रमात गेले . तर दादासाहेब

बिडकर यांना विसापूरला जेलमध्ये पाठवण्यात आले . पुढे इ.स. १९३३ मध्ये कारागृहातून सुटले.

**खादी भांडार आणि चरखा वर्गाची स्थापना**

इ.स. १९३३ मध्ये कारागृहातून सुटल्यावर काही दिवसांनी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस परत नामपूरला आले. आता नामपूर येथे न राहाता सटाणे येथे राहावयाचे असे ठरवून तेथे राहण्यास आलो . दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या मंडळीना गावात जागा मिळू नये , असा प्रयत्न तेथील पोलिस पाटील अभिमन नानाजी यांनी केला . मात्र पुढे त्यांनीच एक खोली मिळवून दिली .सटाण्यात प्रभातफेरी, मुलांना एकत्र गोष्टी सांगणे , गाणी म्हणून घेणे , थोरांची चरित्रे सांगणे ही कामे स्नेहयात्रींनी सुरू केली . सटाणे येथे खादी भांडार आणि चरखा वर्गही सुरू केला संपर्क वाढत गेला . दादासाहेब पोतनीस मालेगाव तालुक्यात कामास गेले . बाळूभाई मेहता यांच्याकडे अच्युतभाई मदतनीस म्हणून कासारे , ता . साक्री येथे गेले. इ.स. १९३४ मध्ये दादासाहेब पोतनीस बिहार भूकंपात मदत करण्यासाठी स्वयंसेवक म्हणून गेले. त्यावेळी त्यांच्याबरोबर दादासाहेब बिडकर यांनी वसंतराव नाईक यांनाही नेले होते . दादासाहेब पोतनीस यांनी मालेगाव येथे थांबून मालेगाव तालुक्यातील गावोगाव फिरून ज्या गावी शाळा नव्हती तेथे ग्रामीण शाळा सुरू केल्या . मालेगाव तालुका शिक्षण प्रसार मंडळ ही संस्था स्थापन करून सर्व शाळा या संस्थेमार्फत चालत असत . सरकारी अनुदान नव्हते . गावकरीच सर्व व्यवस्था करीत असत . पाचवी सहावीपर्यंत शिकलेले तरुण शाळा चालवित असत . जनता संपर्क वाढला . त्यामुळे त्यांनी मालेगाव येथे दादासाहेब पोतनीस गांवकरी हे साप्ताहिक सुरू केले . त्यावेळी म्हणजे इ.स.१९३६-३७ साली नाशिक जिल्ह्यात कोणतेही साप्ताहिक किंवा दैनिक वृत्तपत्र नव्हते . गांवकरी साप्ताहिक लोकप्रिय करण्यासाठी दादासाहेबांनी प्रयत्न केले .बिहारमधून परतल्यानंतर दादासाहेब बिडकर सटाण्यात परत आले . मलेरियाने आजारी झाल्याने दादासाहेब बिडकर यांना सटाणे येथून वर्धा येथे विनोबाजींच्या आश्रमात नेले . आश्रमात काही दिवस राहून नंतर दादासाहेब बिडकर गांधी सेवा संघाचे चिटणीस भाईसाहेब धोत्रे यांच्याकडे राहिलो . बरा झाल्यानंतर परत सटाण्यास आले . भाईसाहेब घोत्रे यांच्यामुळे दादासाहेब बिडकर यांचा अनेक थोर मंडळींशी परिचय झाला .

इ.स.१९३५ मध्ये दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस गांधी सेवा संघाचे सभासद करून घेण्यात आले होते . दादासाहेब पोतनीस मालेगाव येथे काही काळ राहिले साप्ताहिक गांवकरी चांगला चालू झाला .यावेळी दादासाहेब पोतनीस मालेगावी तर दादासाहेब बिडकर सटाण्यास होते.असे असले तरी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या स्नेहयात्रींचा सतत संपर्क असे .या काळात साप्ताहिक गांवकरी दादासाहेब बिडकर सटाण्यात व इतर गावातही विकत होते . साप्ताहिक गांवकरी बातम्या

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

पाठवीत होते . दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस दोघेही काँग्रेसचे कार्यही करीत होतो . या स्नेहयात्रींनी मालेगाव व बागलाण तालुक्यात तालुका काँग्रेस कमिट्या स्थापन केल्या . इ.स. १९३६ मध्ये फैजपूर येथे अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन झाले . तेव्हा दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस एक महिनाभर फैजपूर येथे होते. इ.स.१९३७ मध्ये असेम्ब्लीच्या निवडणुकी झाल्या . मालेगाव विभागात भाऊसाहेब हिरे, लालचंद हिराचंद व सजन राघो पाटील असे ३ जण काँग्रेसचे उमेदवार होते . भाऊसाहेब हिरे व लालचंद हिराचंद निवडून आले . सजन राघो पाटील हे पराभूत झाले . ही निवडणूक प्रचाराची जबाबदारी काँग्रेस कमिटीने दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांच्यावर सोपवली होती . इ.स.१९३७ मध्ये मुंबई राज्यात व इतरत्र सर्वच राज्यात काँग्रेसची मंत्रिमंडळे आली होती.

**डांग सेवा मंडळ**

साप्ताहिक गांवकरी दैनिक झाल्यानंतर दादासाहेब पोतनीस नंतर गांवकरी नाशिकहून प्रसिध्द करू लागले. दादासाहेब बिडकर यांनी इ.स.१९३७ मध्ये आदिवासींमध्ये काम करण्याचे ठरवून डांग सेवा मंडळ ही संस्था स्थापन करून कामास सुरुवात केली.डांग सेवा मंडळ स्थापन करण्यात दादासाहेब पोतनीस यांचा सहभाग होता . दादासाहेब पोतनीसांनी कष्टाने वृत्तपत्र व्यवसायास सुरुवात केली. दैनिक गांवकरी जरी काँग्रेसप्रेमी वृत्तपत्र होते तरी काँग्रेसने हे आपले पत्र आहे , असे मानले नाही व मदतही केली नव्हती. इ.स.१९४२ मध्ये दादासाहेब पोतनीस मुंबईस काँग्रेस अधिवेशनास गेले. अधिवेशनाहून परत आलेल्या सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांना नाशिकरोड स्टेशनवरच अटक होऊन त्यांना नाशिकरोड कारागृहात ठेवले. दादासाहेब बिडकर यांच्यावरही पकड वॉरंट होते.यावेळी दादासाहेब बिडकर सटाण्यात होते. त्यांनी दोन महिने भूमिगत राहून राष्ट्रीय चळवळीचे विचार मार्गदर्शन ग्रामीण भागात करत होते. शेवटी ब्रिटीश पोलीसांनी दादासाहेब बिडकर यानाही अटक करून नाशिकरोड कारागृहात ठेवले .त्यांना सब डिव्हिजनल मॅजिस्ट्रेटनी २ वर्षांची शिक्षा ठोठवून दादासाहेब बिडकर यांची रवानगी धुळे कारागृहात केली दादासाहेब पोतनीस कारागृहात असल्याने इ.स. १९४२ ते १९४४ या कालावधीत गांवकरी बंद होता.

दादासाहेब पोतनीस इ.स. १९४४ मध्ये सुटले दैनिक गांवकरी पूर्ववत सुरू झाला. दैनिक गांवकरीचे काम दिवसेंदिवस वाढत गेले. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस हे सतत नाशिक जिल्ह्याच्या विकासासाठी काही करता येईल हा विचार करत , विनोबाजी , गांधीजी यांच्या विचारांचा पगडा त्यांच्या स्वभावात व आचरणात होता .विधायक कार्य करत असतांना दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या दोघांचे विचार काही बाबतीत भिन्न असत . पण दोघांनी आपापले विचार एकमेकांवर लादले

नाहीत .

आर्थिक,सामाजिक व इतर अडीअडचणींच्या प्रसंगी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस एकमेकाला सावरूनच घेत गेले . सर्व विचारात विधायक दृष्टीच होती . दादासाहेब बिडकर दैनिक गांवकरीच्या स्नेहयात्री या स्मृती ग्रंथात म्हणतात "दादासाहेब पोतनीस यांचा संतवाङ्मयाचा अभ्यासही बराच होता.गीता,ज्ञानेश्वरी, उपनिषदातील उतारे व उदाहरणे सतत देत असत . त्यामुळे रामदास सेवा मंडळ , संत भारती , गणेशोत्सव मंडळ या संस्थांमधून सद्विचार व सदाचार प्रचाराचे वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. नाशिक सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले. नाशिक सहकारी साखर कारखानाचे ते शासन नियुक्त संचालक मंडळाचे ते अध्यक्ष होते . नाशिक औद्योगिक वसाहत व नाशिक मर्चंट बँक स्थापण्यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले व या संस्था नावारूपास आणल्या . नाशिक सहकारी ग्राहक भांडाराची त्यांनी स्थापना केली . नाशिकच्या व नाशिक जिल्हयाच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अवर्णनीय आहेत , हे विसरून चालणार नाही .उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्हावे , यासाठी त्यांनी प्रयत्न केले . उत्तर महाराष्ट्रात धुळे , जळगाव , अहमदनगर येथेही गांवकरी स्वतंत्र रितीने चालत आहे . पोतनीसांच्या या वाटचालीत मी त्यांचे बोट धरूनच चाललो"

जीवनातील अनेक प्रसंगात इ.स. १९३० साली धरलेली रलेली संगत दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांनी कधी सोडली नाही . अनेक बाबतीत निराळे विचार असणारे दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस एकत्र राहिले, व आपापले जीवन संपन्न केले . नासलेल्या राजकारणात आपले विचार व आचार व शुध्द ठेवूनच ते कसे वागावे याचे स्वरूप म्हणजे दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस हे स्नेह्यात्री होय. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या स्नेहयात्रींमुळे दिनदुबळे,ग्रामीण,आदिवासी जनतेची जीवने संपन्न झाली. दादासाहेब पोतनीस यांचा जन्म २२ नोव्हेंबर इ.स. १९०९ चा तर दादासाहेब बिडकर यांचा जन्म १९ मार्च इ.स. १९१० चा म्हणजे दोन्ही स्नेहयात्री तसे समवयस्क समजले पाहिजे.जसे दोन्ही स्नेहयात्री समवयस्क होते तसे समविचारी रंजल्या गांजल्या सामन्य जनतेचे कनवाळू होते. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस स्वातंत्र्यसेनानी, ,योगाभ्यासी, निष्ठावान गांधीवादी अशा दोन्ही स्नेहयात्री दादासाहेबांचे ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व सुंदर व मोहक दीपस्तंभ भावी पिढीला मार्गदर्शक आहे.

**संदर्भ साधने**


१ जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र.संपा), मराठी विश्वकोश खंड १२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई ,१९८५.

२ पोतनीस वंदनराव (संपा), स्नेहयात्रा ,गांवकरी भवन, नाशिक, १९९८ .

३ जायखेडकर विनय (मुलाखतकार), स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांची मुलाखत, आकाशवाणी, नाशिक,१९९८ .

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# नाशिक शहराच्या विशेष संदर्भात स्थानिक इतिहास लेखनाची आवश्यकता

**डॉ. एम. आर. थोरात**

*कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय,*

*ओझर (मिग) जि. नाशिक*

नाशिकला प्राचीन ते आधुनिक काळातील मोठा इतिहास लाभलेला आहे. त्यामुळे स्थानिक इतिहासाचा वेगवेगळ्या परीप्रेक्षातून अभ्यास करणे शक्य आहे. आज नाशिकबाबत अनेक अंगांनी अभ्यास केला जात असला तरी काही घटक दुर्लक्षित राहिले तर काही घटकांबाबत सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. प्रामुख्याने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नाशिककरांचे मोठे योगदान असून स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शहराची वाढ व विकास झपाट्याने घडून आला आहे. त्या अनुषंगाने नाशिकच्या इतिहासलेखनाच्या आवश्यकतेचा आढावा सदर शोधनिबंधातून घेण्यात आला आहे.

**उद्देश :-**

१. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नाशिकचे योगदान या विषयाचे स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्व अधोरेखित करणे.

२. नाशिक शहराच्या स्थानिक इतिहास लेखनाची आवश्यकता प्रकट करणे.

**संशोधनपद्धती :-** ऐतिहासिक संशोधनपद्धती.

इतिहास लेखनामध्ये व्यक्ति, समाज, स्थल व काल या चार घटकांना अतिशय महत्वाचे स्थान आहे.[१] या घटकांच्या आधारे मानवी जीवनाच्या विकासाच्या टप्प्यांचा अभ्यास केला जातो. (इति + ह + आस) इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ ‘असे घडले, अशा प्रकारे घडले’. सर्वसाधारणपणे इतिहास म्हणजे भूतकाळातील माहितीचा शोध घेवून जे घडले त्याचे जसेच्या तसे वर्णन तर्कशुद्ध व अर्थपूर्णरित्या करणे होय.[२] ग.ह. खरे यांच्या मते गतकालीन स्थित्यंतराचे यथास्थितज्ञान म्हणजे इतिहास होय. सदाशिव आठवले यांच्या मते इतिहास म्हणजे बदल, इतिहास म्हणजे स्थित्यंतर होय.[३] या व्याख्यावरून गतकालीन मानवी जीवनातील स्थित्यंतरांचे इतिहासातील महत्त्व समजते.

स्थानिक इतिहास ही एक इतिहाची महत्त्वाची शाखा होय. स्थानिक परिसराचा अथवा एखाद्या गावाचा सूक्ष्म पातळीवरील अभ्यास या अंतर्गत केला जातो. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासामुळे राष्ट्राच्या इतिहासातही मोलाची भर पडते.[४] याचा अर्थ राष्ट्रीय स्तरावरील इतिहास लेखनास स्थानिक इतिहास लेखन पूरक ठरते.स्थानिक इतिहास लेखनासाठी प्रत्येक गाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.प्रथम गावचे इतिहासलेखन, तालुक्याच्या स्थलाचे इतिहासलेखन अशी मांडणी केल्यास प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासामध्ये भर घालता येईल.[५] सर्वसाधारणपणे स्थानिक इतिहास म्हणजे स्थानिक इतिहासकाराने, स्थानिकांसाठी, स्थानिक इतिहासाचा, स्थानिक उपलब्ध संदर्भ साधनांच्या

मदतीने घेतलेला शोध आणि बोध होय.[६]तर अरुण टिकेकर यांनी स्थानिक इतिहास याऐवजी स्थानीय इतिहास हा शब्द अधिक समर्पक मानला. त्यांच्या मते स्थानीय इतिहास हा एक प्रकारे सामाजिक इतिहास असतो. शहराचा वा प्रभागाचा इतिहास सामाजिक बदलांचा इतिहास असतो. त्यामुळे तो आंतरविद्याशाखीय असतो. एखाद्या शहराच्या वाटचालीत अनेक प्रकारचे बदल होत असतात. कपड्यांच्या बदलत्या फॅशन्स, पादत्राणे, घरे, वाहने, खाद्य सवयी, केशभूषा, विविध क्षेत्रातील अभिरुचीत झालेले बदल इ. घटकांचा स्थानीय इतिहास लेखनात समावेश होतो.[७]प्रामुख्याने या व्याख्याच्या आधारे नाशिक शहराबाबत झालेल्या विविध बदलांचा अभ्यास करणे शक्य आहे. आज नागरीकरणाच्या प्रक्रियेत नाशिक शहराच्या विस्तारात मोठी वाढ झाली आहे. त्यातून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक इ. स्वरूपाचे अनेक बदल येथे घडून आले. तसेच नाशिककरांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही मोठा सहभाग राहिला आहे. हे सर्व घटक नाशिकच्या स्थानिक इतिहासलेखनाचे महत्त्व अधोरेखित करतात. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**ऐतिहासिक घटक :**

एखाद्या गावाचे ऐतिहासिक महत्त्व, गावाच्या इतिहासाची प्राचीनता व परंपरा, गावाच्या नावाची व्युत्पत्ती, गावाशी संबंधित पुराणकथा, दंतकथा, लोक समजुती इ. चा अभ्यास यामध्ये करता येतो.[८]नाशिकच्या प्राचीन इतिहासाचे महत्त्व १९५२ साली येथे सापडलेल्या अश्मयुगीन हत्यारे, उपकरणे व अवशेषांवरून समजून येते. सातवाहन काळात गोवर्धन व नाशिक परिसर भरभराटीस होता. या काळातील अनेक घडामोडींची साक्ष देणाऱ्या प्राचीन बौद्ध लेणी तसेच ११-१२ व्या शतकातील जैन लेणीही येथे आहेत. तर पेशवेकालीन नाशिकच्या वैभवाची साक्ष देणारी अनेक हिंदू धर्मीय मंदिरे, गोदावरी नदीतील कुंडे, घाट, वाडे, इ . वास्तु आजही उभ्या आहेत.त्याचा उपयोग स्थानिक इतिहास लेखनासाठी होवू शकतो.

**भारतीय स्वातंत्र्य चळवळ व नाशिक :**

नाशिकच्या दृष्टीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील घटनांचे स्वतंत्ररीत्या सूक्ष्म पातळीवर अध्ययन करणे शक्य आहे. प्रामुख्याने ब्रिटिशकालीन प्रशासकीय, सार्वजनिक, शैक्षणिक, धार्मिक, निवासी वास्तुयेथे आहेत.[९]तसेच स्वातंत्र्य चळवळीच्या अनुषंगाने समकालीन वृत्तपत्रांचे योगदान, विविध सामाजिक संस्था, अभिनव भारत संघटना, नाशिक मधील क्रांतिकरकांचे कार्य, लो. टिळक, स्वा. सावरकर, म. गांधीचा नाशिकच्या स्वातंत्र्य चळवळीवरील प्रभाव, असहकार, सविनय कायदेभंग, चले जाव चळवळीत नाशिकचे योगदान[१०]इ. घटकांचा स्थानिक इतिहासलेखनाच्या दृष्टीने अधिक सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**भौगोलिक घटक :**

स्थानिक इतिहासात डोंगर, दऱ्याखोऱ्या, नद्या, पर्यावरण, जमीन, पाऊस, कृषी व खनिज उत्पादन[११]हे भौगोलिक

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

घटक महत्वाचे असतात. या घटकांचे नाशिकच्या स्थानिक इतिहासातील महत्वपूर्वीपासूनच राहिले आहे. नाशिकच्या प्राचीन इतिहासात दक्षिणेकडील डोंगरातील बौद्ध लेणी, उत्तरेकडील डोंगरातील चामरलेणी महत्त्वाच्या होत. गोदावरी नदी तर शहराची जीवनगंगाचहोय. गोदावरीकाठच्या सिंहस्थ कुंभमेळयाची ऐतिहासिक परंपरा स्थानिक इतिहासाचे प्रमुख वैशिष्ट्य होय. शहराच्या विकासास गती देणारे आधुनिक काळातील इंडिया सिक्युरिटी प्रेस, नोट प्रेस, म. गांधीनगर प्रेसच्या स्थापनेपाठीमागेही स्थानिक हवामान हा घटक कारणीभूत ठरला. ब्रिटिशकालीन अनेक आरोग्यधाम आजही शहर परिसरात दिसून येतात. नाशिकचे हवामान, जमीन, पाण्याची उपलब्धता इ. घटक औद्योगिक वसाहतीची स्थापना व विकासात महत्त्वाचे ठरले.[१२] यावरून नाशिक शहराच्या इतिहासातील भौगोलिक घटकांचे महत्त्व अधोरेखित होते. याशिवाय जिल्हयातील भौगोलिक विविधतादेखील शहराच्या लोकजीवनावर मोठा प्रभाव टाकणारी आहे. त्याचाही अभ्यास स्वतंत्रपणे होणे आवश्यक आहे.

**सामाजिक घटक :**

यामध्ये गावातील सामाजिक रचना, वर्ग, जात, लिंगनिहाय घटक, कुटुंब संस्था, सामाजिक संस्था, सामाजिक प्रथा, स्त्री जीवनाची वाटचाल इ . घटकांचा अभ्यास महत्त्वाचा असतो.[१३] नाशिकच्या इतिहास लेखनात लोकसंख्या वाढ हा घटक महत्त्वाचा ठरतो. १९८१ ते २००१ दरम्यान स्थानिक लोकसंख्या वाढीचा वेग देश व राज्याच्या तुलनेत अधिक होता.[१४] निश्चितच सामाजिक जीवनातील अनेक बदलांना हा घटक कारणीभूत ठरणारा ठरला. तसेच स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात नाशिकमध्ये मुख्यत: संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती; त्यात बदल होत एकल कुटुंब पद्धतीत वाढ झाली.[१५] खाद्यसंस्कृतीचा विचार करता १९७० च्या दशकापासून दाक्षिणात्य खाद्य पदार्थांची ओळख शहरवासीयांना झाली. तर १९८५ नंतर चायनीज पदार्थांचे गाडे बहुसंख्येने दिसू लागले. खाद्य पदार्थांच्या स्वरूपावरून दहीपूल, दूध बाजार अशी नावे चौकांना मिळाली, हॉटेल संस्कृतीतवाढ झाली.[१६] बदलत्या गृहरचनेत वाडा संस्कृती ते फ्लॅट संस्कृतीचा प्रवास, करमणुकीच्या साधनातील बदल व वाढ, पारंपरिक विवाह पद्धती ते पॅकेज पद्धती, वेशभूषेतील बदल अशा विविध सामाजिक घटकांच्या अंगाने स्थानिक इतिहास लेखन करण्याची आवश्यकता आहे.

**धार्मिक व सांस्कृतिक घटक :**

या घटकात प्रामुख्याने गावातील मंदिरे, मशीद, विहार, चर्च इ. प्रार्थनास्थळे परंपरा, सण, उत्सव, खेळ,यात्रा, थोर महापुरुषांच्या जयंती, संगीत, नाट्य, चित्रकला, शिल्पकला, साहित्य, ग्रंथालये, सभागृह, इ. बाबींचा समावेश होतो. नाशिक शहर प्रामुख्याने मंदिरांचे शहर व तीर्थक्षेत्र असून येथे विविध धार्मिक विधी होत असतात. सिंहस्थ कुंभमेळा संपूर्ण देश व जगाचे लक्ष वेधून घेणारा प्रमुख धार्मिक व सांस्कृतिक उत्सव येथे संपन्न होतो. स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीपासून सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेक संस्था येथे आहेत. उदा: १९२२ पासूनची वसंत व्याख्यानमाला, १८४० पासूनचे सार्वजनिक वाचनालय, लोकहितवादी मंडळ इ. संस्था स्थानिक सांस्कृतिक जीवनाच्या मुख्य धारा होत. तसेच कवी

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

कुसुमाग्रज, लोककवी वामनदादा कर्डक, बाबुराव बागूल, प्रा. वसंत कानेटकर आदी साहित्यिकांची मोठी परंपरा शहरास लाभली आहे. थोर महापुरुषांचे अनेक पुतळे व स्मारक येथे आहेत. गणेशोत्सव साजरी करणारी अनेक जुनी मंडळे तसेच नावाजलेल्या क्रीडा संस्थांनी स्थानिक लोकजीवनाचा स्तर उंचावत ठेवला आहे.[१७] अशा विविध वैशिष्टयांनी परिपूर्ण असलेल्या नाशिक शहराचा स्थानिक इतिहास धार्मिक व सांस्कृतिक दृष्टीनेही स्वतंत्रपणे लेखन करणे शक्य आहे.

**आर्थिक घटक :**

एखाद्या गावाच्या आर्थिक विकासास अनेकघटक कारणीभूत असतात. त्यामध्ये प्रामुख्यानेभौगोलिक स्थिती, तीर्थक्षेत्राचे ठिकाण, पर्यटन, ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्थानिक प्रशासन इ. बाबींचा यात अंतर्भाव असतो. नाशिक हे एक मुख्य तीर्थक्षेत्र असल्यानेपर्यटक व भाविकांचा राबता कायमच राहिल्याने अनेक व्यवसायांना चालना मिळाली. पूर्वी येथे तांब्या पितळेची भांडी बनविण्याचा मोठा उद्योग होता;येथील भांड्याना देशभरातून मोठी मागणी राहिली. याशिवाय विणकाम, विडी उद्योग, तेल व भात गिरणी, सॉ मिल्स, सराफ व्यवसाय, प्रिंटिंग प्रेस इ. घटक स्थानिक आर्थिक जीवनाची वैशिष्ट्ये राहिली. १९६२ मध्ये औद्योगिक वसाहतीची स्थापना झाल्याने पूरक व्यवसाय व उद्योगांना चालना, रोजगाराच्या संधीत वाढ,वेगवान नागरीकरण, कामगार चळवळी, दळणवळण व संपर्क साधनात वाढ, सेवा क्षेत्राचा विकास,बँक व पतसंस्था, उपनगरे व बाजारांची वाढ इ. अनेक बाबी शहरात घडून आल्या. एकूणच नाशिक शहराचे आर्थिकदृष्ट्या इतिहास लेखन करणे शक्य आहे.

**शैक्षणिक घटक :**

या घटकात पारंपरिक व धार्मिक शिक्षण पद्धती, शैक्षणिक संस्थांची वाढ, विकास व योगदान, विद्यापीठ, केंद्रीय शाळा, महानगर पालिका शिक्षण व्यवस्था, विशेष शिक्षण देणाऱ्या संस्था, अनौपचारिक शिक्षण व्यवस्था, संशोधन व प्रशिक्षण संस्था, वसतिगृहे, महिलांचे शिक्षण, विद्यार्थी संघटना अशा विविध बाबींचा समावेश होतो.

प्रामुख्याने नाशिकच्या शैक्षणिक विकासातस्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक, गोखले एज्युकेशन सोसायटी यासह नाशिकएज्युकेशन सोसायटी, नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, म. गांधी विद्या मंदिर इ. संस्थानी महत्त्वाचे योगदान दिले.तसेच सैनिकी शिक्षण देणाऱ्या भोंसला सैनिकी स्कूलसह धार्मिक शिक्षणाची परंपराही शहरास लाभली आहे. अशा विविध शैक्षणिक घटकांच्या आधारेही नाशिकचा शैक्षणिक इतिहास लिहिणे शक्य आहे.

**राजकीय व प्रशासकीय घटक :-**

कोणत्याही शहराच्या वाढ व विकासात स्थानिक राजकारण व प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यादृष्टीने नाशिकच्या विकासात स्वातंत्र्यपूर्वकाळापासून नगरपालिकेची भूमिका महत्त्वाची राहिली.स्वातंत्र्यानंतर शहराच्या नागरीकरणात मोठी वाढ होत,१९८२ पासून नाशिक महानगरपालिका अस्तित्वात आली.एकूणच स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या प्रशासनाचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनातून करता येईल.

**उपसंहार :-** अशा प्रकारे स्थानिक इतिहास लेखन राष्ट्रीय इतिहासलेखनास पूरक आहे. नाशिकच्या स्थानिक इतिहासातील वंचित घटकाचे इतिहासलेखन करणे आवश्यकआहे.भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतही नाशिककरांचा मोठा सहभाग असून त्याचे अधिक सूक्ष्म पातळीवर लेखन करण्यास वाव असल्याचे लक्षात येते. स्वातंत्र्योत्तर काळात तर नाशिक शहराच्या लोकजीवनात आमूलाग्र बदल घडून आल्याचे लक्षात येतात. त्यामुळे नाशिकचा स्थानिक इतिहास सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक इ. अंगांनी लेखन करण्यास वाव आहे.

**संदर्भ :**

१. दीक्षित राजा, 'प्रादेशिक इतिहास' लेख, इतिहासातील नवे प्रवाह, संपा. वांबूरकर जास्वंदी, डायमंड प्रकाशन, पुणे २०१४, पृ. १४
२. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. क्र. १
३. गाठाळ एस. एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, पृ. क्र. १०-१७
४. राजदेरकर सुहास, इतिहासलेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. २४
५. गायकवाड लहू , 'स्थानिक इतिहासलेखन' लेख, इतिहासातील नवे प्रवाह, संपा. वांबूरकर जास्वंदी, डायमंड प्रकाशन, पुणे २०१४,पृ. १४
६. बोडके संतोष, स्थानिक इतिहास लेखन नाशिक जिल्हा, नाशिक, २०१९, पृ.३
७. टिकेकर अरुण, स्थल काल, मौज प्रकाशन, मुंबई, २००४, पृ.९
८. गायकवाड लहू , 'स्थानिक इतिहासलेखन' लेख, इतिहासातील नवे प्रवाह, संपा. वांबूरकर जास्वंदी, डायमंड प्रकाशन, पुणे २०१४,पृ. ७
९. मोरवंचीकर रा. श्री., नाशिक दर्शन, पुरातत्त्व व वस्तु संग्रहालयाचे विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९४, पृ.३-९
१०. बोडके संतोष व देसले वसंत, भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील योगदान, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०२१,पृ. क्र. ११२- १५३
११. गाठाळ एस. एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, पृ. क्र. २७
१२. मुलाखत,कमोद कैलास, दि. २४ जानेवारी २०२१.
१३. गायकवाड लहू , 'स्थानिक इतिहासलेखन' लेख, इतिहासातील नवे प्रवाह, संपा. वांबूरकर जास्वंदी, डायमंड प्रकाशन, पुणे २०१४,पृ. ७
१४. CDP of Nashik Municipal Corporation Under JNNRUM, 2006, p. 19
१५. शतकातील स्थित्यंतरे, दै. सकाळ, २३ सप्टेंबर २०००,पृ. ५
१६. कमोद कैलास, डिस्कव्हरी ऑफ नाशिक, शब्द मल्हार प्रकाशन, नाशिक, २०१६, पृ. १०८-१०९

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब बिडकर यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान

**प्रा. डॉ. जी. डी. रूपवते,**

*(इतिहास विभाग प्रमुख)*

*दादासाहेब बिडकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पेठ,*

*नाशिक.*

## प्रस्तावना

नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग आणि त्यातही पेठ, सुरगाणा हे तालुके अतिदुर्गम आहेत. या परिसरात आल्यावर आपण जगापासून दूर आल्यासारखे वाटणारा हा प्रदेश होता. या परिसरात निवासी असणारी जनता प्रामुख्याने आदिवासी आहे. कोकणा, भिल्ल, वार्ली यांचा समावेश होतो. या भागातील जनतेचे जीवन फारच कष्टाचे, पिकेल तेवढे खावे, कंदमुळे ही निसर्गातील वस्तू खाव्यात, अनकुचीदार खिळा ठोकलेली काठी, विळा सतत बरोबर बाळगत त्यामुळे जंगली प्राणी समोर आले तरी न घाबरता संकटाला तोंड देण्याची तयारी ठेवणारा हा आदिवासी समाज आहे. या जनतेच्या जीवनात असलेले दारिद्रय, अज्ञान आणि त्याचे शोषण दादासाहेब बिडकर यांनी पाहिले होते. तेंव्हा या जनतेच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले होते.

आदिवासींच्या जीवनात बदल घडवून आणण्याकरीता दादासाहेब बिडकर यांनी ठक्कर बाप्पा यांना भेटून त्यांचे आशीर्वाद घेतले आणि आपल्या कार्याला सुरूवात केली होती. त्यानुसार त्यांनी 23 जून 1937 रोजी बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे 'डांगसेवा मंडळ'' नावाची संस्था स्थापन केली. सुरूवातीच्या काळात या मंडळाचे कार्यालय सटाणा येथे सुरू केले होते. या संस्थेच्या सुरूवातीचे पदाधिकारी मंडळी खालीलप्रमाणे होते.

| अ. नं. | पदाधिकाऱ्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मिस. जे. एल. लॅथम | अध्यक्ष |
| 2 | श्री. वैकुंठभाई मेहता | उपाध्यक्ष |
| 3 | श्री. दत्तात्रय मल्हार बिडकर | चिटणीस |
| 4 | श्री. भाऊसाहेब सखाराम हिरे | सदस्य |
| 5 | श्री. सरदार नारायण विंचूरकर | सदस्य |
| 6 | श्री. दामोदर हरी पाठक | सदस्य |
| 7 | श्री. दत्तात्रय शंकर पोतनीस | सदस्य |
| 8 | श्री. नारायण बुधा कोकणी | सदस्य |
| 9 | श्री. लालचंद्र हिराचंद | सदस्य |
| 10 | श्री. नारायण हरी झोडगे | सदस्य |
| 11 | हरी अमृत पाटील | सभासद |

या पदाधिकारी मंडळाची नियुक्ती करून त्यांनी तीन उद्दिष्टे समोर ठेवली होती.

1. आदिवासींची कर्जमुक्ती होण्यासाठी प्रयत्न करणे.
2. सावकाराकडून होणारा अन्याय आणि तक्रार याचे निवारण करणे.
3. शिक्षण देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

यातुन त्यांनी डांगसेवा मंडळाच्या माध्यमातून शाळा सुरू करण्याच्या कार्याला सुरूवात केली होती. बागलाण तालुक्यातील गोलवाड या गावी डांगसेवा मंडळाने इ.स. 1939 मध्ये आदिवासीसाठी पहिली शाळा सुरू केली होती. या शाळेत लक्ष्मीकांत पंडित यांनी शिक्षक म्हणून खुशीने काम स्विकारले होते. सुरूवातीच्या काळात ही शाळा एका झोपडीत सुरू केली होती.

बागलाण नंतर कळवण तालुक्याच्या पश्चिम भागात असलेले अभोणे, कनाशी या परिसरात डांगसेवा मंडळाच कार्य सुरू केले. तेथेही शाळा सुरू केली होती. डांगसेवा मंडळाच्या कार्यातून शाळा वाढीस लागल्यावर त्यांना वसतिगृहाची स्थापना करणे गरजेचे वाटू लागले. त्यांनी अनेक ठिकाणी वसतिगृहाची स्थापना करून आदिवासी विद्यार्थी विद्यार्थिनींची निवासाची व जेवणाची सोय केली होती. बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे इ.स. 1941 मध्ये वसतिगृह सुरू केले होते. तेथे विद्यार्थ्यांना राहण्याकरीता छात्रालय सुरू केले होते.

त्यानंतर इ.स. 1944–45 मध्ये पेठ तालुक्यात शिक्षण फार दुर्मिळ होते. तेव्हा ही परिस्थिती लक्षात घेऊन दादासाहेब बिडकर यांनी संपूर्ण तालुक्यात 45 व्हालिंटियरली शाळा सुरू केल्या

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

होत्या. या काळाचे पर्यवेक्षक गंगाराम आवारी ज्यांना पुढील काळात आवारी गुरूजी या नावाने प्रसिध्दी मिळाली होती. ते हेच गंगाराम आवारी होय.

### शैक्षणिक विस्तार

डांगसेवा मंडळाने नाशिक जिल्ह्यातील बागलाण, सुरगाणा, कळवण आणि पेठ या तालुक्यातील आदिवासी भागात वसतिगृह, आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करून शिक्षण प्रसाराचे कार्य केले आहे.

### वसतिगृहे

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात ज्या गावात प्राथमिक व आश्रमशाळा आहेत त्या शाळांमध्ये येणारी मुले–मुली ही डोंगर दऱ्याखोऱ्यातून पायी येत होती. त्यामुळे अशा ठिकाणी त्या विद्यार्थ्यांना निवासी राहण्याकरिता वसतिगृहे सुरू करण्याचा विचार केला. त्यातुन अगदी सुरूवातीला बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे 4 एप्रिल 1941 रोजी विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. त्यानंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे 1 जुलै 1945 रोजी वसतिगृह सुरू केले आहे. तसेच अभोणा येथे 1 डिसेंबर 1947 रोजी विद्यार्थिनींकरिता कला वसतिगृह सुरू केले आहे. आज या दोन्ही वसतिगृहात अनुक्रमे 132 इतके विद्यार्थी आणि 129 इतक्या विद्यार्थिनी निवासी राहून शिक्षण घेत आहेत. तद्नंतर नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात बोरगाव येथे एप्रिल 1946 मध्ये विद्यार्थी वसतिगृह सुरू केले आहे. या वसतिगृहात आज रोजी 120 एवढे विद्यार्थी निवासी राहतात. त्यानंतर पेठ येथे 1 जुलै 1957 रोजी डांगसेवा मंडळाने विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली. या वसतिगृहात 96 इतके विद्यार्थी निवासी आहेत.

दादासाहेब बिडकरांनी नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील बाऱ्हे येथे जून 1962 मध्ये विद्यार्था व विद्यार्थिनींसाठी अशी दोन्ही वसतिगृहांची स्थापना केली आहे. आज या दोन्ही वसतिगृहात अनुक्रमे 66 इतके विद्यार्थी आणि 30 इतक्या विद्यार्थिनी निवासी राहतात. या वसतिगृहाच्या माध्यमातुन आदिवासी दुर्गम भागातील दीनदुबळ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे. अशिक्षित, मागासलेल्या अज्ञानी व आदिवासी जनतेच्या जीवनोध्दारासाठी मार्ग दाखविला आहे.

**माध्यमिक विद्यालये**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भाग दुर्गम आहे. या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण मिळावे याकरीता डांगसेवा मंडळाने बागलाण, कळवण, पेठ, सुरगाणा तालुक्यात माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली आहे. पेठ तालुक्याच्या ठिकाणी परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी 1 जून 1958 रोजी जनता विद्यालय, पेठ या शाखेची स्थापना केली. या विद्यालयातून 1378 एवढे विद्यार्थी आज रोजी शिक्षण घेत आहेत. तद्नंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे 1 जून 1962 रोजी जनता विद्यालय, अभोणा या शाखेची स्थापना केली. या विद्यालयाची इमारत अभोणा गावाच्या जवळ असून तेथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तेथे 1522 इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यानंतर बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे 22 जून 1963 रोजी जनता विद्यालय, मुल्हेर हे विद्यालय सुरू केले. या विद्यालयात आज 1134 इतक्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची भूक भागवली जात आहे. इ.स. 1976 मध्ये सुरगाणा तालुक्यातील बाऱ्हे या दुर्गम आदिवासी व कळवण तालुक्यातील ओतूर या गावी माध्यमिक विद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. अशा रितीने दादासाहेबांनी आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार करण्याकरिता सतत प्रयत्न केले गेले.

**माध्यमिक आश्रमशाळा**

डांगसेवा मंडळाने आदिवासी विद्यार्थ्यांना निवासी राहण्याची व्यवस्था करून माध्यमिक आश्रमशाळाची स्थापना केली आहे. सुरूवातीला सुरगाणा तालुक्यातील अति दुर्गम असलेला भाग म्हणजे उंबरठाण होय. या ठिकाणी 16 जून 1986 रोजी एकलव्य माध्यमिक आश्रमशाळा, उंबरठाण सुरू केले आहे. या ठिकाणच्या विद्यालयाच्या कायमस्वरूपी इमारतीचे अगदी साध्या पध्दतीने भक्कम इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे. आज या आश्रमशाळेत 961 इतकी विद्यार्थीसंख्या आहे. त्यानंतर दिंडोरी तालुक्यातील आंबेगण येथे आद्य आदिवासी सेवक ठक्कर बाप्पा यांच्या नावाने 8 जून 1992 रोजी माध्यमिक आश्रमशाळा सुरू केली. या आश्रमशाळेत 313 विद्यार्थी शिक्षण घेतात. कळवण तालुक्यातील सुळे येथे सिध्देश्वर माध्यमिक आश्रमशाळा या नावाने 14 जून 1993 रोजी माध्यमिक आश्रमशाळा सुरू केलेले आहे. आज रोजी या शाळेत 452 एवढे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**प्राथमिक आश्रमशाळा**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात त्या काळात रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. तेव्हा या परिस्थितीत तेथे शिक्षणचा लवलेशही नव्हता. या भागात दादासाहेब बिडकर यांनी पुढाकार घेऊन डांगसेवा मंडळाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार केला होता. सुरगाणा तालुक्यातील उंबरठाण येथे 16 ऑक्टोंबर 1954 रोजी एकलव्य प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली आहे. या आश्रमशाळेत सुरूवातीला 15 मुले आणि 4 मुलींनी प्रवेश घेतला होता. या आश्रमशाळेच्या इमारतीकरीता उंबरठाण येथील चंद्रा भगत नावाच्या व्यक्तिने 1 एकर जमीन दान दिली होती. त्या जागेत डांगसेवा मंडळाने आश्रम शाळेची इमारत उभारली आहे.त्यानंतर दिंडोरी तालुक्यातील आंबेगण येथे 1 जानेवारी 1959 रोजी ठक्कर बाप्पा यांच्या नावाने प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली आहे. आज या शाळेतून 313 एवढ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणची व्यवस्था झालेली आहे. तद्नंतर सुरगाणा तालुक्यातील कुकुडणे येथे 1 जून 1964 रोजी पंडित जवाहरलाल नेहरू ही प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली. पुढील काळात या शाळेच्या इमारतीच्या बांधकामाकरीता शासनाकडून अनुदान मिळवून इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे. कळवण तालुक्यातील सुळे येथे सिध्देश्वर प्राथमिक आश्रमशाळा 1 जून 1966 रोजी सुरू केली. या शाळेत सुरूवातीला विद्यार्थीसंख्या फारच कमी होती. पुढील काळात विद्यार्थीसंख्या वाढत गेल्याने आज 452 एवढे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तद्नंतर सुरगाणा तालुक्यातील दुर्गम भागात गिरजादेवी प्राथमिक आश्रमशाळा, शिंदे (दिगर) येथे 1 जून 1966 रोजी स्थापन केली. प्रारंभीच्या काळात या शाळेत विद्यार्थीसंख्या 268 इतकी होती. परंतु या परिसरातील जनतेला जसजसे शिक्षणाचे महत्व लक्षात येत गेले तसतशी येथील विद्यार्थीसंख्या वाढत गेली. या परिसरातील जनतेला ज्ञानाची गरज लक्षात आली आहे. त्यामुळे या परिसरातील जनतेचा शिक्षणाकडे ओढा वाढलेला दिसून येतो. डांगसेवा मंडळाने 1 जून 1991 रोजी नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यातील वारे आणि बागलाण तालुक्यातील धांद्रीपाडा या दोन प्राथमिक आश्रमशाळा सुरू केलेल्या आहेत.

**कनिष्ठ महाविद्यालये**

डांगसेवा मंडळाने बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे 1 जुलै 1971 रोजी जनता कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले. त्यानंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे जनता कनिष्ठ महाविद्यालय

21 जून 1973 रोजी सुरू केले. आज या कनिष्ठ महाविद्यालयातून 115 एवढे आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेतात. या कनिष्ठ महाविद्यालयामुळे या परिसरातील उच्च माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय झाली आहे.

**महाविद्यालये –**

आदिवासी भागात असलेली जनता आपल्या मुलांचे उच्च माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे दूरवर शहरी भागात पुढील शिक्षणासाठी आपल्या मुलांना पाठवत नव्हती. तेव्हा ही परिस्थिती लक्षात आल्यानंतर डांगसेवा मंडळाने या विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची गरज विचारात घेऊन पेठ या तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी 15 जुलै 1993 रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू केलेले आहे. या महाविद्यालयातून आज विद्यार्थी पदवी वर्गाचे शिक्षण घेत आहे. त्यानंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे 15 जुन 1997 रोजी कला महाविद्यालय, अभोणा तसेच 15 जून 2012 रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण, ता. सुरगाणा हे पदवी वर्गाचे शिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले आहे. आणि 15 जून 2019 रोजी मुल्हेर येथे कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय सुरू झाले आहे. या महाविद्यालयामुळे आजूबाजूच्या परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या पदवी शिक्षणाची सोय झाली आहे. आज या चारही महाविद्यालयातून सुमारे 2492 विद्यार्थी पदवीचे शिक्षण घेत आहेत. या महाविद्यालयात काही विषयांचे पदव्युत्तर शिक्षण देणारे काही विभाग सुरू करण्यात आले आहेत.

अशा रीतीने दादासाहेबांनी आदिवासी भागात उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचविली आहे. अज्ञानी, अशिक्षित, दरिद्री आदिवासी समाजाचे जीवनमान सुधारण्याकरीता त्यांच्या आर्थिक परिस्थितीत वाढ होण्यासाठी या संस्थेने हातभार लावला आहे. या संस्थेतून शिक्षण घेतलेल्या अनेक व्यक्तिंनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.

**संदर्भ सुची**

1. शैलजा देवगांवकर, आदिवासी जीवन आणि संस्कृती, नागपूर, 1989.
2. बाबुराव पवार, सोनहिरा, नाशिक, मार्च, 1998.
3. वि. शिरवाडकर (संपा.), जीवनगंगा, नाशिक, 1964.

4. आर. भामरे व साळुंके वाय. एम. (संपा.), विचारवेध, नाशिक, 2004.
5. शं. क. कापडणीस (संपा.), नामस्मृती स्मृतीग्रंथ, नाशिक, जुलै 2012. पृ. 252.
6. दैनिक गावकरी, नाशिक, आवृत्ती दि. 15 ऑगस्ट 2011.
7. गोविंद गारे, आदिवासी जीवनाचे शिल्पकार, औरंगाबाद, 1997, पृ. 100.
8. सरल धरणकर, आदिवासी सेवक दादा बिडकर, पुणे, 2005, पृ. 37 ते 38
9. सरल धारणकर, दादासाहेब बिडकर वसाः आदिवासी सेवेचा, पुणे, 2012, पृ. 28–29.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# नाशिक जिल्हयातील समाजसुधारकांनी वंचित घटकांसाठी केलेले कार्य

**प्रा. थविल कलावती जयवंत**
*कला व वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण,*
*ता. सुरगाणा, जि. नाशिक*

**प्रास्ताविक**

नाशिक जिल्हयात बहुजनांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक परिस्थितीच्या सुधारणा प्रक्रियेत असलेल्या अनेक समस्यांवर मार्ग काढीत अनेक समाज सुधारकांनी विकासाचा वसा घेतलेला होता. त्यांनी केलेल्या या कार्याचे फार मोठे ऋण आजच्या समाजावर आहे. बहुजनांच्या सुधारणा क्षेत्रात कार्य करणा-या सुधारकांच्या वेगवेगळया विचारधारा होत्या. बहुजन समाजातील जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा ही त्यांची तळमळ होती. समाजाचा विकास साधायचा असेल तर तळागाळातील लोकांपासुन सुरुवात केली पाहिजे. या मानवतावादी दृष्टिकोनातून समाजकार्यास सुरवात झाली. यात भाऊसाहेब हिरे, दादासाहेब बिडकर, गणपतदादा मोरे, दादासाहेब गायकवाड, हरिभाऊ महाले यांचे कार्य मोलाचे आहे.

**1) कर्मवीर भाऊसाहेब हिरे**

महाराष्ट्र ही शिक्षणाची उज्वल व यशस्वी परंपरा लाभलेली भूमि असून कर्मवीर भाऊसाहेब हिरे या भूमिचे थोर पुत्र आहेत. भाऊसाहेबांचे समाजकारण, अर्थकारण, राजकारण असे विविधांगी कार्य असुन आदिवासी शिक्षणातील त्यांच्या मौलिक योगदानामुळे त्यांना श्रेष्ठत्व लाभले आहे. आदिवासी विकासासाठी शिक्षण ही मुलभुत गरज असल्याचे ओळखून भाऊनी बुवा गुरूजीच्या साथीने “आदिवासी सेवा समितिची” स्थापना केली. नाशिक जिल्हयात या संस्थेच्या माध्यमातुन आदिवासी शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. सामाजिक परिस्थिती व त्यातही आदिवासींची स्थिती विचारात घेता आदिवासी सेवा समितीची स्थापना ही वंचितांसाठी संधी ठरली.

महाराष्ट्रात ठक्कर बाप्पा, अनुताई वाघ यांच्याप्रमाणेच आदिवासीच्या शिक्षणासाठी स्वत:ला वाहुन घेतलेल्यामध्ये कर्मवीर हिरे व दादासाहेब बिडकर यांचेही योगदान महत्वाचे आहे. कर्मवीर हिरे यांनी कुळकायद्याद्वारे आदिवासींना शेतजमिनीचे मालक बनविण्याचे मोलाचे कार्य केले. यामुळे वेठबिगारी, सर्वकष, शोषण असे जीवन वाट्याला आलेल्या आदिवासींना माणूस म्हणून जगण्याची संधी

मिळाली. दुर्गम भागात दारिद्रयाच्या दुहेरी रेषेखालचे जीवन जगणा-या समाजासाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचे कार्य भाऊसाहेब हिरे यांनी केले. मुख्य प्रवाहापासुन दुर जंगल सान्निध्यात जीवन जगण्याचा संघर्ष करणा-या आदिवासीसाठी समस्यांचा डोंगर असतांना शिक्षणाची गंगा पोहचवण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले. जिल्हयातील बहुजन, दलित व आदिवासींसाठी कार्य करतांना कर्मवीरांना अनेक खंद्या सेनानींची साथ लाभली. कोकणा, महादेव कोळी, भिल्ल, कातकरी अशा आदिवासी जमातींना शोषण मुक्तीचा शिक्षणमंत्र कर्मवीरांनी दिला. नाशिक हा आदिवासी बहुल जिल्हा असुन सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर, कळवण, दिंडोरी, इगतपुरी व सटाणा हे आदिवासी लोकसंख्येचे तालुके आहेत. या तालुक्यांमध्ये भाऊसाहेब हिरे यांनी स्थापन केलेल्या 'महात्मा गांधी विद्या मंदिर व आदिवासी सेवा समिती' या संस्थाच्या माध्यमातुन आदिवासी शिक्षणाचे कार्य अवरतपणे सुरु आहे.

**2) आदिवासी सेवक दादासाहेब बिडकर**

नाशिकचे ज्येष्ठ 'स्वातंत्र्यसेनानी, आदिवासी सेवक व डांग सेवा मंडळाचे संस्थापक दादासाहेब बिडकर' यांचा जन्म 19 मार्च 1910 रोजी झाला. मुळातच लढाऊ वृत्ती आणि सामाजिक कार्याचा वसा अंगी असल्याने त्यांनी अनेक अडचणीवर मात करून दलित, आदिवासी, ग्रामीण भागातील जनतेसाठी कार्य केले. दलित, आदिवासी समाजाच्या प्रगती आड येणा-या समस्यांचा शोध घेऊन त्यांची मांडणी सरकार दरबारी करुन त्या समस्या सोडविण्यासाठी ते प्रयत्नशील राहत. नाशिक जिल्हयातील सर्वच आदिवासी, मागासवर्गीय दलित समाजाच्या न्याय हक्कासाठी, अन्यायाच्या विरोधात डांग सेवा मंडळामार्फत आपले सर्व आयुष्य पणाला लावले. दलित व आदिवासींना मोफत व सक्तीचे शिक्षण अशी त्यांनी आग्रही भुमिका घेतली होती. आदिवासी लोकांकडे पावसाळ्यात धान्य नसायचे त्यावेळी हे लोक सावकाराकडून धान्य घेत असत. त्यावर सावकार अवाजवी धान्य या लोकांकडून वसुल करून मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण करीत असे. त्यावर उपाय म्हणून दादासाहेब बिडकर यांनी धान्य कोठार योजना सुरु केली.

**3) सत्यशोधक कर्मवीर : गणपतदादा मोरे**

गणपतदादांचे मुळ गाव पिपळगाव बसवंत. गणपतदादांच्या कार्यामुळे पिंपळगावची खरी ओळख संपुर्ण महाराष्ट्राला झाली. त्यांनी नाशिक जिल्हयातील बहुजन समाजाच्या विकासासाठी शिक्षणरूपी यज्ञात आपल्या आयुष्याची समिधा टाकली. परिस्थितीला न डगमगता स्वाभिमानी व बंडखोर प्रवृत्तीने अंधश्रध्देला अंधकारात असणा-या समाजाला नवी दिशा दिली. दुष्काळात होरपळणा-या शेतक-यांना त्यांच्या अस्तीत्वाची जाणिव करुन दिली. देवभोळेपणा, अंधश्रध्दा यामुळे समाजाची अधोगती होते हे

त्यांनी पाहिले. समाजातील दु:खाचे कारण मुळापासुन काढुन कसे टाकता येईल, याचा ते सतत विचार करत असायचे. त्यांच्या विचारांना ऐन तारूण्यात सत्यशोधक समाजाच्या विचारांची साथ मिळाली. 1905-06 पासुन गणपतदादा सार्वजनिक चळवळीत ख-या अर्थाने काम करु लागले व सत्यशोधक समाजाचे विचार गावोगावी पोहचवले. सत्यशोधक विचारांचा प्रसार करण्यासाठी गणपतदादा मोरे यांनी ‘जलसाचा’ प्रयोग सुरु करुन बहुजन समाजात जनजागृती केली. गणपतदादा मोरे यांनी आपल्या प्रपंचाची तमा न बाळगता समाजकार्यासाठी, बहुजन समाज उध्दारासाठी स्वत:ला वाहुन घेतले.

**4) पद्श्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी त्याच्या पश्चात दलित समाजाचा काफिला एक वेळ पुढे नेला नसेल परंतु तो मागेही सरकू दिला नाही.यात अत्यंत महत्वपुर्ण कार्य पद्श्री दादासाहेब गायकवाड यांचे आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली समाजकार्य केले. समाजाला एकसंध करित चळवळी, सत्याग्रह, शैक्षणिक व धार्मिक कार्य यशस्वी नेतृत्व करणा-याच्या रूपाने दादासाहेब गायकवाड यांचे कार्य मोलाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाडांच्या समाजसेवेची क्षमता पाहूनच आपला वारस म्हणून स्वीकारले होते. बाबासाहेबांनंतर दलितांचे कैवारी म्हणून दादासाहेबांना दलित समाजाने मान्यता दिलेली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रज्वलित केलेली दलित चळवळीची ज्योत अखंडपणे तेवत ठेवण्याचे काम दादासाहेबांनी केले. दादासाहेब गायकवाडांनी नाशिक जिल्हातून व जिल्हाबाहेर समाजसेवा, शिक्षण क्षेत्र, अंधश्रध्दा, राजकारण, भूमीहीनांसाठी आंदोलन,रेल्वे कामगारांच्या नैमित्तक रजेचा प्रश्न, सुवर्णकारांचा प्रश्न, नवबौध्दांच्या राखीव जागांचा प्रश्न, दलितांना मिळणा-या शैक्षणिक सवलतीमधील मुदतवाढीचा प्रश्न असे अनेक उल्लेखनीय कार्य दादासाहेबांनी केलेले आहे.

**5) हरिभाऊ महाले**

हरिभाऊ महाले यांनी नाशिक जिल्हयातील आदिवासी भागात सामाजिक व आर्थिक बदल घडविण्याचा प्रयत्न केला होता. धान्य कोठारे,दारुबंदी, जनजागृती मेळावे, सावकरांकडून होणारे शोषण, वन जमिनीचा प्रश्न अशा अनेक चळवळीत त्यांनी सहभाग घेतला होता. हरिभाऊ शंकर महाले यांनी आपल्या राजकीय जीवनाला गाव पातळीपासुन सुरूवात करून थेट दिल्लीपर्यंत मजल मारली होती. या वेगवेगळया पदावर काम करतांना त्यांनी एकाधिकार धान्य खरेदी, जात प्रमाणपत्र तपासणी, सरकारी नोक-यांमध्ये आदिवासींना असणा-या राखीव जागा, शाळा, शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी पाटबंधारे अशा वेगवेगळया क्षेत्रात सेवा कार्य केले आहे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

अशा प्रकारे सर्व समाजसुधारकांनी समाजसेवेचे कार्य केलेले आहे. त्यानी वंचित घटकासाठी केलेले कार्य आजही अवरीतपणे चालू आहे.

**संदर्भ**

1) डॉ. सरल धारणकर, दादासाहेब बिडकर वसा : अदिवासी - सेवेचा
2) डॉ. अमोल विद्यासागर,घाडगे शामराव मल्हारी, आधुनिक भारत,
3) प्रा. डॉ. व्ही.पी. बिरारी, आधुनिक महाराष्ट्र
4) विकिपीडिया

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# पेठ सुरगाण्याचे झुंजार आदिवासी नेतृत्व
## (स्वातंत्र्य सैनिक श्री. सितारामजी भोये)

**प्रा. डॉ. प्रदीप विष्णु देशपांडे,**
*विभाग प्रमुख–राज्यशास्त्र विभाग,*
*दादासाहेब बिडकर, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,*
*पेठ, जि. नाशिक,*

नाशिक जिल्हयातील पेठ तालुका, गुजरात राज्याला लागुन असलेला एकेकाळी या तालुक्यात प्रचंड वनसंपदा होती. घनदाट जंगल, महाराष्ट्रातील आदिवासी तालुका म्हणून प्रसिध्द कोकणा समाज, दारिद्रय, निरक्षरता, अंधश्रध्दा, वीज नाही, पाणी नाही, उद्योग व्यवसाय नाहीत, फक्त शेतीवर व जंगल संपदेवर अवलंबून राहणारी माणसे. शेती म्हणजे भात, नागली, वरई वर्शातून एकदाच पीक, ना शासनाचे लक्ष ना समाजाचे, उपेक्षित आणि दुर्लक्षित भाग, कुपोषण, बालमृत्यू यांचे भयावह प्रमाण या भागात होते. रस्ते, वीज, शाळा यांची वानवा असलेल्या पेठ तालुक्यातील चिंचवड गांव.

नागुजी भोये हे सिताराम भोये यांचे आजोबा काही कामामुळे निरगुडे गावी आले आणि तेथेच स्थायिक झाले. सिताराम भोये यांनी आपले प्राथमिक शिक्षण करंजाळी येथे घेतले. डांग सेवा मंडळाच्या शाळेत शिक्षक म्हणुन काम केल्यानंतर सरकारी नोंकरीत त्यांचे मन रमले नाही. ते दादासाहेबांकडे परत आले. दादांनी त्यांना सहकारी प्रशिक्षणसाठी पुणे येथे पाठविले. प्रशिक्षणानंतर दादांनी त्यांना डांग जिल्हयात जंगल कामगार सोसायटीत नोकरी दिली. या संस्थेत भोये यांनी प्रचंड काम केले. त्यांची हुषारी व कामाची पध्दत पाहून दादांनी त्यांची जंगल कामगार सोसायटीच्या सेक्रेटरी पदी नेमणुक केली.

डांग सेवा मंडळाच्या शाळेत अवघ्या 15/– रूप्ये महिना मिळवणाऱ्या व्यक्तीची प्रचंड व्याप असलेल्या जंगल कामगार सोसायटीच्या सेक्रेटरी पदी निवड झाली. डांग जिल्हयात काम करीत असतांना त्यांचा संबंध आला तो नानासाहेब दिक्षित यांच्याशी मुल्हेर येथे राहणाऱ्या नानासाहेबांनी व सिताराम भोये यांनी येथील आदिवासी समाजासाठी खुप काम केले. जंगल

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

कामगार सोसायटीचे काम त्यांनी जवळजवळ 10 वर्षे केले. सहकारी क्षेत्रातील जाण असलेला कार्यकर्ता अशी त्यांची ओळख नाशिक व डांग जिल्हयात तयार झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नाशिक व डांग जिल्हयातील वातावरण वेगाने बदलू लागले. यांच काळात केंद्रीय वनविभाग कायद्यांमध्ये आमुलाग्र बदल होऊ लागले. जंगल कामगार सोसायटयांवर वेगवेगळे निर्बंध येऊ लागले. त्यांच्या कामात सरकारचा हस्तक्षेप वाढला. द्विभाषिक राज्यात असमाधानी असणारी मराठी व गुजराथी मंडळी आंदोलने करू लागली. महाराष्ट्रात तर मोठा संघर्ष सुरू झाला.

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राच्या इतर राज्यांशी असलेल्या सीमेवरील शेकडो गांवे (मराठी भाषिक) कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र राज्याला जोडली गेली. महाराष्ट्र व गुजरातच्या सीमेवर असलेला डांग जिल्हा गुजरातला जोडला गेला. नानासाहेब दिक्षितांनी डांग जिल्हा महाराष्ट्रात रहावा म्हणून मोठा संघर्ष केला. मोठे आंदोलन झाले. परंतू हा लढा लढण्यात मराठी भाषीक कमी पडले. दिक्षीत व सिताराम भोये यांना डांग जिल्हा गेल्याचे फार वाईट वाटले. सिताराम भोये मुळगावी निरगुडे येथे परतले. तर नानासाहेब नाशिकला. प्रचंड मेहनत व कष्ट करणाऱ्या नानासाहेबांचे अखरेचे दिवस वाईट अवस्थेत गेले. तर त्यांचे सहकारी सिताराम भोये यांनी पेठ तालुक्यातील समाजकारणात व राजकारणात आपले लक्ष केंद्रीत केले.

डांग जिल्हा मराठी भाषिक की गुजराती या वादात डांग सेवा मंडळालाही नाहक त्रास सहन करावा लागला. मंडळाच्या शेकडो शाळा गुजरात सरकारकडे हस्तांतरीत कराव्या लागल्या.

सीताराम भोयेंनी पुढील काळात पेठ तालुक्याच्या राजकारणावर घट्ट पकड बसवली. दादासाहेब बिडकरांनी डांगच्या आंदोलनात सिताराम भोयेंसह ज्या अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली होती. त्यांना सर्वतोपरी मदत केली. सिताराम भोये डांग जिहयात असताना तेथील जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्यावेळेच्या मुंबई सरकारने त्यांची जिल्हा शिक्षण मंडळ सदस्य म्हणून नेमणूकही केली होती. डांग जिल्ह्याचे आंदोलनात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्त्वाखाली लढले. आंदोलनातील आचार्य अत्रे, श्रीपाद डांगे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, गोदाताई परुळेकर, मधु दंडवते, मधु लिमये इत्यादी नेत्यांशी सिताराम भोये यांचा जवळून संबंध आला. अनेक वर्षे नानासाहेब दिक्षीतांबरोबर राहिल्यामुळे डांग व नाशिक जिल्ह्यातील जनता या दोघांना गुरु शिष्यांची जोडी म्हणून संबोधीत असे. डांग जिल्ह्यातील कॉग्रेसचे काम करीत

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

असतांना आलेला अनुभव व अंगी असलेली संघटनशक्ती यामुळे अल्पावधीत त्यांनी पेठ तालुक्यात कार्येकर्त्याचे मोठे जाळे तयार केले. 1962 साली स्थापन झालेल्या पंचायत समितीत व जिल्हा परिषद निवडणूकीत त्यांनी कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आणले. ते स्वतः पेठ पंचायत समितीचे पहिले बिनविरोध सभापती झाले.

पंचायत समिती सभापतीपदी असताना श्री. सिताराम भोये यांनी तालुक्यातील बहुसंख्य गावांना भेटी देऊन तेथील अडी अडचणी सोडवल्या, जनेतचा विश्वास संपादन केला. नाशिक जिल्हयातील नेते दिंडोरी तालुक्यातील निगडोळ गावाचे कचरूभाऊ राऊत. जिल्ह्यातील अनेक नेत्यांचा सिताराम भोये यांना कॉंग्रेसचे तिकीट मिळावे असा प्रयत्न होता परंतू कचरु भाऊंना कॉंग्रेसचे तिकीट मिळाले. पेठ तालुक्यात सिताराम भोये हे निवडणूकीला अपक्ष म्हणून उभे राहिले. कॉंग्रेसच्या दोन नेत्यांमधील लढाईत कचरुभाऊंना 9475 मते मिळवून ते विजयी झाले तर सितासम भोये यांना 8308 मते मिळाली. फार थोड्या फरकाने ते पराभूत झाले. परंतू थोडयाच अवधीत झालेल्या पंचायत समितीच्या निवडणूकीत ते निवडून आले.

**1967 विधानसभा निवडणूकीत दणदणीत विजय**

1962 च्या निवडणूकीत सिताराम भोये यांचा फारच थोड्या फरकाने पराभव झालेला होता. परंतू 1969 च्या निवडणूकीत तालुक्यातील जनतेच्या मनातले उमेद्वार होते. मागील निवडणूकीतील विजयी उमेदवार कचतभाऊ राऊत हे कॉंग्रेसच्या तिकीटावर दिंडोरी मतदार संघात उभे राहिले तर पेठ तालुक्याचा समावेश सुरगाणा मतदार संघात झाला. या वेळी सिताराम भोयेंना डावलून कॉंग्रेसने आंबुजी रामभाऊ जाधव यांना उमेदवारी दिली. सिताराम भोये यांनी रिपब्लिकन पक्षाच्या तिकीटावर ही निवडणुक लढविली व त्यांना तब्बल 18076 इतकी प्रचंड मते मिळाली. तर पराभूत उमेदवार आंबुजी जाधव यांना फक्त 6496 मतांवर समाधान मानावे लागले. दिंडोरीतून कचरुभाऊ राऊत, शेकापच्या शंकर पोटींदे यांचेकडून पराभूत झाले.

**विधानसभेतील कार्य**

सन 1967 साली आमदार झाल्यावर सिताराम भोये यांनी विधानसभा गाजवली. पेठ, सुरगाणा, हरसुल, त्र्यंबक या भागात वीजेची उपलब्धता जवळजवळ नव्हतीच. या प्रश्नावर त्यांनी सभागृह दणाणून सोडले. **आमच्या डोक्यावरुन एकदा तरी विजेच्या तारा जाऊ द्या.** उपयोग कसा करायचा ते आम्ही ठरवू असे म्हणत आदिवासी समाजाला व क्षेत्राला, सरकार दुय्यम वागणूक देत

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

असल्याचे अनेक दाखले त्यांनी सभागृहात दिले.

पेठ तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळा विविध ठिकाणी स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्यात काळात तालुक्यात काही आश्रमशाळांची स्थापना झाली. आदिवासी समाजाच्या समस्या समजावून घेण्यासाठी, सोडविण्यासाठी नामदार वसंतराव नाईक यांनी स्थापन केलेल्या आदिवासी आमदारांच्या गटाचे ते प्रमुख होते. संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासी भागात फिरून तेथील समास्यांची त्यांनी सरकारला जाणीव करुन दिली. त्यामुळे आदिवासींचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत झाली. पेठ, सुरगाणा तालुक्यातील रस्त्याचीं अवस्था दैनंदनीय होती. जिल्हा परिशद व शासनांमार्फत श्री. भोये यांनी तालुक्यातील अनेक गावांना चांगले रस्ते तयार करवून घेतले. नाशिक–पेठ या रस्त्याचे चांगले काम त्यांच्याच काळात झालेले होते.

**1972 विधानसभा निवडणूक**

श्री. सिताराम भोये हे पेठ तालुक्याचे विद्यमान आमदार असले तरी महाराष्ट्रातील व नाशिक जिल्ह्यातील विशेषतः आदिवासी मतदारसंघाची रचना प्रत्येक निवडणूकीत बदलत होती. मागील निवडणुकीतील कळवण विधानसभा मतदार संघ हा सुरगाण्याला जोडला जाऊन पेठ, सुरगाणा, कळवण असा मतदार झाला. त्यामुळे काँगेसचे तिकीट जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. ए. टी. पवार या तरुण व लोकप्रिय कार्यकर्त्याला मिळेल अशी अपेक्षा होती. परंतू या जिल्ह्यात काँग्रेसचे दोन गट पडले होते. सुरगाण्याचे राजे धैर्यशीलराव पवार व ए. टी. पवार भारतीय क्रांती दलात सामील झाल्याने श्री. भोये यांना तिकीट मिळाले. कळवण तालुक्यातील पवारांची लोकप्रियता त्यांनी जिल्हा परिषदेत केलेले काम व मुख्य म्हणजे कळवण तालुक्यातील मतांची आकडेवारी यामुळे सिताराम भोये यांना या निवडणूकीत मोठ्याा पराभवाला सामोरे जावे लागले. श्री. ए. टी. पवार यांना निवडणूकीत 20649 इतकी मते मिळाली. तर श्री. सिताराम भोये यांना 8201 मते मिळून ते पराभूत झाले. 1972 च्या निवडणूकीत पराभव झाला तरी श्री.सिताराम भोये काँग्रेसचे नेते म्हणून जिल्ह्यात व तालुक्यात सक्रीयपणे काम होते.

1978 साली काँग्रेस पक्षात मोठी फुट पडली. महाराष्ट्रातील अनेक नेते कॉग्रेस सोडून गेले. परंतू श्री. भोये यांनी पक्ष सोडला नाही. 1979 च्या जिल्हा परिशद व पंचायत समिती निवडणुकीत त्यांनी काँग्रेसचे 7 उमेदवार निवडून आणले. ते स्वतः जिल्हा परिषदेवर निवडून आले. पेठ पंचायत समितीचे सभापती झाले ते बिनविरोध.

**1981 औद्योगिक विकास महामंडळाचे संचालक**

कॉंग्रेसच्या पडत्या काळात कॉँग्रेस पक्षाचे निष्ठेने काम केल्याची जाणीव कॉंग्रेसने ठेवली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अे. आर. अंतुले यांनी श्री. भोये यांची औद्योगिक विकास महामंडळावर (एम.आय.डी.सी.) संचालक म्हणून नियुक्ती केली. या काळात त्यांनी मोठे काम केले. मालेगांव, सिन्नर, विंचूर, पेठ येथील औद्योगिक वसाहतींना चालना देण्याचे काम त्यांनी या काळात केले. आमदार असतांना श्री. भोये यांनी आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना कोणत्याही कारणाने दिल्या जाऊ नयेत, गहाण ठेवता येऊ नयेत. या कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न केले. आदिवासी विकासासाठी शासनाने स्वतंत्र निधी द्यावा. वीज, पाणी, शिक्षण यांचे प्रश्न अग्रक्रमाने सोडवावेत अशी मागणी करुन या भागात लघु पाटबंधारे तलाव, पाझर तलाव बांधण्यासाठी स्वतंत्र निधीची मागणी केली.

**1984 लोकसभा निवडणूक**

इंदिरा कॉँग्रेस पक्षाचे 1980 च्या लोकसभेतील विजयी उमेदवार/विद्यमान खासदार झेड. एम. कहांडोळ यांना तिकीट नाकारून कॉँग्रेसने सिताराम भोये यांना 1984 च्या मालेगांव लोकसभा (अनुसचीत जमातीत राखीव) मतदार संघातून लोकसभेची उमेदवारी दिली. श्री. भोये यांचे काम व इंदिरा गांधी यांच्या दुर्देवी हत्येच्या पार्श्वभुमीवर होत असलेल्या या निवडणूकीत श्री. सिताराम भोये यांना 202424 इतकी प्रचंड मते मिळाली व ते विजयी झाले. तर जनता पार्टीचे श्री. हरीभाऊ शंकर महाले यांना 164149 इतकी मते मिळाली. 1984 च्या निवडणुकीत श्री. भोये यांनी आदिवासी भागातील आपली लोकप्रियता सिध्द करुन दाखविली.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे संचालक व खासदार अशी दोन पदे असल्यामुळे या काळात त्यांनी आदिवासीच्या विकासासाठी मोठे योगदान दिले.

**1984 ते 1989 खासदार म्हणून केलेले कार्य**

खासदार म्हणून कार्य करीत असतांना संसदेत आदिवासीच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने विविध समस्या मांडल्या. खासदार निधीतून भरीव कार्य करण्यात ते अग्रेसर होते. खासदार असतांनाच त्यांची जिल्हा नियोजन व विकास समितीच्या उपाध्यक्षपदी नेमणूक झाली. 1986 ते 1998 या कालावधीत ते जिल्हा कॉँग्रेस समितीचे ही उपाध्यक्ष होते. आदिवासी भागाला जोड़णारे चांगले रस्ते, वाहनांची सुविधा असल्याशिवाय या भागाचा विकास होणार नाही आणि समाज

शहराशी जोडला जाणार नाही असे त्यांचे ठाम मत होते.

1988 ते 1994 या कालावधीत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभाग, सल्लागार समितीचे ते अध्यक्ष होते. याच काळात भोये यांनी सातत्याने मागणी केल्याने सरकारने नवापूर, नंदूरबार, कळवण व पेठ अषा चार एस.टी.डेपोंना मान्यता दिली. कळवण, नंदूरबार व नवापूर एस.टी डेपोचे काम वेगाने चालू झाले. परंतू पेठ येथे जागा मिळत नसल्याने ते काम रखडले होते. महाराष्ट्राचे उर्जामंत्री भरत बेंद्रे यांची बहिण पेठ येथे दिलेली होती व त्यांची तिथे मोठी जमीन होती. परंतु तिच्या पतीचे निधन झाल्याने ती बेंद्रे साहेबांकडे राहत होती. श्री. भोये यांनी बेंद्रे साहेब त्यांची बहिण, गावातील व्यापारी श्री. नागुषेठ यांना एकत्र आणून ही जमीन एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांमार्फत एस. टी. महामंडळासाठी विकत घेतली. या कामी बेंद्रे साहेबांनी खूप सहकार्य केले.

पुढील काळात तेथे एस.टी. डेपो सुरु झाला. आदिवासी भागातील जनतेच्या सुरगाणा तालुक्यातील अनेक गावांना स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच त्यांच्या गावात एस. टी. प्रवासाची सोय उपलब्ध झाली. एस. टी. डेपोचे काम व विविध रस्त्याची कामे केल्याने या काळात श्री. सिताराम भोये यांचेवर जनता खुष होती. 1984 ते 1989 हा काळ सिताराम भोये यांच्या जीवनातील सुवर्णकाळ होता.

श्री. सिताराम भोये यांनी खासदार असताना मालेगाव येथील पॉवरलूमचा प्रश्न लोकसभेत मांडून पॉवरलुमसाठी वीजबिलात सवलत देण्याची मागणी लोकसभेत नाग्यासाक्या धरणाची परवानगी मिळवून त्याचे काम सुरु करण्यास परवानगी मिळवली. मनमाड–पेठ–बलसाड रेल्वेमार्ग करण्यात यावा अशी लोकसभेत मागणी करून त्यासाठी रेल्वेमंत्र्यांकडे आग्रह धरला. नाशिक जिल्ह्यातील पिण्याच्या चा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकारने विशेष निधी द्यावा असा आग्रह त्यांनी होता. श्री. सिताराम भोये यांच्या प्रयत्नाने आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीतील झाडे तोडून विकण्याचा अधिकार मिळाला.

**गुरुकृपा आदिवासी शिक्षण मंडळ**

1993 साली श्री. भोये यांनी गुरुकृपा आदिवासी शिक्षण मंडळ या संस्थेची केली. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबरच आश्रमशाळेची स्थापना करण्यात ते यशस्वी ठरले. या संस्थेमार्फत आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी अध्यापक विद्यालयाची स्थापना करण्याचा त्यांचा विचार होता व

तसा प्रस्तावही त्यांनी तयार केला होता. पंरतू त्या आधीच 21 जुलै 1995 रोजी वयाच्या 68 व्या वर्षी श्री. सिताराम भोये यांनी अल्प आजाराने जगाचा निरोप घेतला, याच दिवशी श्री. शरद पवार, पिंपळगाव बसवंत येथे नियोजित कार्यक्रमासाठी आले होते. त्यांनी लगेच (निरगुडे) पेठ येथे धाव घेतली. श्री. शरद पवार, दादासाहेब बिडकर, अनेक खासदार, आमदार व हजारोंच्या उपस्थितीत श्री. सिताराम भोये यांचा अंत्यविधी पार पडला.

श्री. सिताराम भोये यांच्या कार्यात त्यांना त्यांचे बंधू श्री. विठोबा भोये यांनी मोलाची साथ दिली. श्री. विठोबा भोये सतत त्यांच्या मागे सावलीसारखे उभे राहीले.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# DEPRIVED FACTOR: DIFFERENTLY ABLED

**Prof. Phapale Anita Shankar**

*Art's & Commerce's College, Umbarthan,*

*Tal. Surgana, Dis.: Nashik*

**Abstract**

**People with disabilities are substantially less likely to be working than other people. However, the extent of the differences varies sharply by disability type, with those with mental illness, mental retardation and visual impairments the most disadvantaged. The gap in employment between disabled and non-disabled people has increased over the 1990s, which is a cause of major concern. People with disabilities appear to face different obstacles to employment according to their gender and to whether they live in rural or urban areas. This heterogeneity has important implications for policy and program design, as one size is unlikely to fit all. for the most part, education has a limited effect on the probability of being employed for People with disabilities it appears that observable characteristics of disabled people do not explain most of their "Employment deficit", but rather than other factors – including discrimination – are driving their poor employment outcomes • having disabled family members has significant impacts on the employment behaviour of other adult members, both in terms of whether or not the men in the house work and in how much work all other adults are able to do.**

**Key Words** : Differently abled Person, Deprived, Human Resource Management, Handicapped, Welfare Function, Employment, scenario

## 1.1 Introduction

In the mid to late 1980's human resource management activities were driven by some forty individual program divisions (health, education, labour, manufacturing etc.), based on

their local operational needs. Human Resources is the set of individuals who make up the workforce of an organization, business sector or an economy. "Human capital" is sometimes used synonymously with human resources, although human capital Typically refers to a more narrow view; i.e., the knowledge the individuals embody and can contribute to an organization. Likewise, other terms sometimes used include "manpower", "talent", "labor" or simply "people".

Deprived is a different factor in the lives of the people of the world. Backward Classes, Tribals, Orphans, Homeless, Blind, Handicapped, Slow Deaf, Deaf, Elderly, Leprosy, Devadasi, Hundabali, Widow, Virgin Mother, Child Widow, Beggar, Juvenile Criminal. Helping them to live like other people by releasing their word is to develop them, but still these elements are living a neglected life.

**1.2 Definition**

**"The person who is not easily provided proper employment, good education, low cost health care, basic facilities by the local system falls into the category of deprived."**

On the one hand growing cities and on the other hand declining villages. This is the public Also migrated due to lack of proper facilities.

The current paper provides brief introductions on an overview of the issue of the human resources of persons with disabilities at the local level issues concerning a special instrument on the Disable employment of persons with disabilities and options for future action to promote the employment of persons with disabilities.

**1.3 Percent scenario**

Disability is a global issue. More than half a billion disabled people in the world today, approximately one in ten of the population, this number is set to rise dramatically over the next twenty-five years; both in richer technological societies and in the poor majority (International Disability Foundation, 1998). There are number of people in the world who suffer from some form of disability or the other. The problem is a growing one with a number of factors contributing to the incidence of-disability.

- **International level**

Ongoing efforts in Japan, Russia and Europe are being reported. In Europe, the

slowdown is divided into three categories. Accelerated to teach, agile to teach skills, and extremely agile. The more children there are, the more staff they have. They are guided by a variety of people, including directors, doctors, teachers, business guides, social workers, psychologists, art teachers and musicians. In India, however, most of the work has to be done by the teacher in the institute for the deaf, and neither the society nor the government thinks that he or she is doing anything special. Children are considered a 'privilege class' in Europe. Children are defined as 'the only social element with privileges'. Institutions caring for orphans and destitute children strictly follow this. Individuals, home and society are the three factors that create problems. Institutions caring for orphans and destitute children strictly follow this. Individuals, home and society are the three factors that create problems. Therefore, the problem is solved at the level of these three factors. Trying to solve a problem through an organization is considered as the last resort in the local society. Not because there is prosperity in Europe but because of the government's approach to public welfare schemes and policies as a whole.

- **In India**

The role of society as well as government is important in this development. However, despite a lot of planning in the country and in Maharashtra, development has not been able to reach the underprivileged. There are many such examples, but for that, people and society need to change the way they look at the underprivileged. The underprivileged are also a part of the society and proper efforts must be made for their rehabilitation.For this, the society needs to take initiative. Comparing the efforts of India and the developed countries to bring the underprivileged into the mainstream of the country and the world, it is clear that the efforts being made in the country are very limited.

The plant of personality remains scratched. The sap of life does not bloom. His shortcomings remain. In the past, rehabilitation of the disabled and deprived was considered a part of compassion, religion and compassion. The same feeling is felt by the underprivileged today. But rehabilitating all the deprived and bringing them into the mainstream of society is their right, their right, the number of poor in India is very large. This poverty raises many questions and complex problems.

### 1.4 Measure of Development

Development is any improvement in the standard of living of people in a specific country.

- **Vocational training**

Improving vocational training and employment opportunities for people with disability is a critical element for enhancing the quality of life for individual with disability, their families, but there are also substantial gains for the broader economy.

- **Increasing Skilled Worker**

Man provides labour power for production and if in a country, under the assumption that labour is efficient and skilled, its capacity to contribute to growth will decidedly be high. The productivity of illiterate, unskilled, sick, superstitious and handicapped and persons is generally low and they are not capable to contribute significantly to development of national economy.

- **IncreasingLabour force participation**

There are substantial costs to individuals and to society associated with these poor employment outcomes for people with disability. Globally, the World Bank considers that leaving people with disability outside the economy translates into a foregone GDP of about **5 per cent to 7 per cent**. To ensure the principle of "Leaving No One Behind" of the 2030 Agenda for Sustainable Development and also makes important contributions to economic development.In addition to the individual and family benefits, there is also a strong economic imperative to increased labour force participation which will help to address country's shortage of skilled labour force, at the same time reducing fiscal pressures associated with welfare dependency.

- **Reduce the rate of Dependency**

High rate of dependent population on a relatively small earning population is one of the main hurdles to economic development. Nevertheless, man makes positive contribution to growth.

- **To Provide Barrier free environment**

The disabled would not take lying' down any more their' being segregated as a group,

to be pitied, to be looked down upon and to be given doles throughout their life. They would like to join the mainstream of life as equal members in a society that con not any more wilfully ignore the rights and privileges of a mass of humanity merely because of their physical limitations.

- **Enjoy life in full measure**

It is important to recognize that the disabled are human beings with tremendous potential to contribute to society; just because they are disabled, they do not forfeit their right to enjoy life in full measure is the realization that has at last dawned upon the world community.

**Summary**

We should try to bring these poor into the mainstream by treating them as deprived. It is essential for social health. Governments and citizens should make every effort to bring the underprivileged into the mainstream at the individual level, keeping in mind that disadvantaged groups can be detrimental to society in one way or another.

**References:**

1. Phapale A.S.(Feb.2022): "Analysis Of Employment Of Disabled Persons In Nashik Municipal Corporation Area (2001 To 2011)" Report of PHD thesis, Nashik
2. Finkelstein, V. 1980. Attitudes and Disabled People. New York: World Rehabilitation Fund.
3. Abberley P. 1999. The Significance of Work for the citizenship of disabled people, Paper presented at University College Dublin.
4. Thomas, M. 2000. Feasibility of integrating people with disabilities in savings and credit programmes in Bangladesh. Asia Pacific Disability Rehabilitation Journal.
5. https://prahaar.in/वंचितांच्या-जगाचा-आढावा/

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# २० शतकातील नाशिक जिल्यातील एक बहुआयामी व्यक्तिमत्व: आवारी गुरुजी

**प्रा. एकनाथ आहेर**
*डांग सेवा मंडळ नाशिक,*
*कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण*
*ता. सुरगाणा, जि. नाशिक- ४२२२११.*

**प्रास्ताविक:**

विसावे शतक हे भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक महत्त्वाचे शतक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून अनेकांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा उभा केला. महात्मा गांधीजी यांच्या विचाराने प्रेरित होऊन अनेकांनी राष्ट्र उभारणीत योगदान दिले. यात नाशिक जिल्हा व गुजरातच्या सीमेवर असणाऱ्या डांग प्रदेशातील आदिवासी बांधवांकरिता भरीव योगदान थोर स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब बिडकर यांचे आहे. त्याचबरोबर पेठ तालुक्यातील 'बोरवट' या गावचे आवारी गुरुजी यांचे सुद्धा महत्त्वाचे योगदान विचारात घेण्यासारखे आहे, मात्र इतिहासाने त्यांची फारशी दखल घेतलेली दिसत नाही. त्यांना इतिहासाच्या पानात उपेक्षित व वंचित ठेवले गेले त्यामुळे त्यांच्या कार्याला वव्यक्तिमत्वाला उजाळा देण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

**आवारी गुरुजींचा परिचय:**

गुरुजींचे पूर्ण नाव **'गंगाराम जानू आवारी'**.सर्व लोक त्यांना प्रेमाने व आदराने **'गुरुजी'** असे म्हणत. गुरुजींचा जन्म दि. ५ जुलै १९१९ रोजी पेठ तालुक्यातील (जि. नाशिक) **'बोरवट'**यागावी झाला. घरात अठराविशे दारिद्रय होते. रोजच्या जगण्यासाठी संघर्ष हा कायमचा, पण कुटुंब भक्तिमार्गावर चालणारे होते.

गुरुजींचे चौथीपर्यंतचे शिक्षण बोरवट गावीच झाले. त्यानंतर पुढे इयत्ता सातवीची परीक्षा त्यावेळची व्हर्नाक्युलर फायनल (1936 ) उत्तीर्ण केली.त्या काळात फायनल पास केलेल्यांना प्राथमिक शिक्षक म्हणूनसहज नोकरी मिळत असे.गुरुजीनासुद्धाशिक्षकाची नोकरी मिळाली. पेठ तालुक्यातील जातेगाव, शिरसगाव,बोरवट आदी गावांत त्यांनी शिक्षकाची नोकरी केली,

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

**स्वांतत्र चळवळ व गुरुजींचे सामाजिक योगदान :**

त्यावेळी म. गांधीजींच्या प्रेरणेने ब्रिटिश राजवटीविरुध्द काँग्रेसची चळवळ जोरात चालू होती. आवारी गुरुजी शिक्षक म्हणून कार्य करीत असताना ते बागलाण तालुक्यातील स्वातंत्र सेनानी,थोर समाजसेवक दादासाहेब बीडकर आणि दैनिक गावकरीचे संस्थापक आणि संपादक दादासाहेब पोतनीस तसेच देशभक्त अमृता पाटील यांच्या संपर्कात आले. घरची परिस्थिती अत्यंत बिकट असूनही त्यांनी आपल्या मास्तरकीचा राजीनामा दिला. ते काँग्रेसच्या चळवळीत सहभागी झाले आणि १९५०पर्यंत पेठ तालुका काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी आणि डांग सेवा मंडळाचे कार्यकर्ता अशा दुहेरी भूमिका गुरुजी पार पाडू लागले.

भारताला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी भारतातील तरुण वर्ग स्वातंत्र्य चळवळीने, देशभक्तीने भारावलेला होता. महात्मा गांधी, ठक्कर बाप्पा यांच्या कार्याने अनेक तरुण प्रभावित झालेले होते. त्यावेळी १९४२ साली  नाशिक जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडला. माणसांच्या जगण्याचे हाल होऊ लागले. उपासमारी, बेकारी, दारिद्र्यामुळे आदिवासी माणूस बेजार झाला. त्याला स्थलांतरा शिवाय पर्यायच उरला नाही,अशावेळी  गुरुजींनी ठक्कर बाप्पांशी भेट घेऊन पेठ, सुरगाणा या आदिवासी भागातील  दुष्काळाची दाहकता लक्षात आणून दिली तेव्हा ठक्करबाप्पा त्यांना म्हणाले, "चळवळीत जाणे वाईट नाही, पण दुष्काळातीलहे कामही राष्ट्रीय चळवळी इतकेच महत्त्वाचे आहे. आपल्या समाजाची जर आपणाकडून सेवा घडते, तर ते ठीक होईल." प.पू. बाप्पांच्या प्रेरणेने दुष्काळ निवारण कामात त्यांनी स्वत:ला झोकून दिले. आदिवासी बांधवांचा सर्वार्थाने उद्धार करण्याच्या भावनाने पेटून उठलेल्यादादासाहेब बिडकर यांच्यासोबत गुरुजींनी दुष्काळाच्या या सामाजिक कार्यात खारीचा वाटा उचलला.पेठ, कोहर,पाहुचीबारी, जुनोटी, सुरगाणा तालुक्यातील दुर्गम गावात  डोंगर दाऱ्यात असणाऱ्या आदिवासी खेड्यापाड्यातधान्य वितरण केंद्र सुरु केलीत. हे काम त्यांनी इतक्या जोमाने व तळमळीने केले की, त्यांनी त्यांचे राहते घर सुद्धा धान्य वितरण केंद्राकरिता खुले केलेत. धान्य वितरण केंद्राची सुविधा सुरु करून त्यांनी आदिवासी बांधवांकरिता मोठा आधार दिला.

मिस.जे.एल.लॅथम ( लंडन) यांचे मार्गदर्शन, मा.गांधीजीच्या विचारांनी प्रेरित होऊन व ठक्करबाप्पा यांचे आशीर्वाद घेऊन,आदिवासी मुलांना शिक्षण देऊन त्यांना सुजाण करणे, त्यांच्याअज्ञानाला ज्ञानाची जोड देण्यासाठी वआदिवासीसमाजातील सामाजिक, सांस्कृतिक उत्थान करण्यासाठी सामाजिक कार्यांनी प्रेरिक झालेले स्वातंत्र सेनानीदादासाहेब बिडकर यांनी बागलाण मधील मुल्हेर यागावी २३ जून १९३७ रोजी डांग सेवा मंडळाची स्थापना केली. या डांग सेवा मंडळाच्या कार्यात गुरुजी सहभागी

झालेत.

१४४२ ची ब्रिटीशांविरूद्ध सुरु केलेली'चले जाव'ची चळवळ ओसरली. लोक आपापल्या घरी परतले. दादासाहेब बिडकरसटाणा येथे परत आले आणि त्यांचे डांग सेवा मंडळाचे कार्य पुन्हा जोमानेसुरू झाले.डांग सेवा मंडळाने १९४४-४६ या काळात पेठ तालुक्यातील गावे व पाडे मिळून ३५० वस्त्यांची पाहणी केली. तेव्हा संपूर्ण तालुक्यात फक्त १९ शाळा असल्याचे दिसून आले. तेव्हा आदिवासी मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठीडांग सेवा मंडळाने पेठ तालुक्यात ४५ व्हालंटरी म्हणजेच(स्वतंत्रपणे निर्णय घेऊन सुरू केलेल्या शाळा) शाळाकाढल्या. याशाळांचे सुपरवायझर (पर्यवेक्षक) म्हणून डांग सेवा मंडळाने आवारीगुरुजींवर काम सोपविले. पायी फिरून त्यांना हे काम करावे लागे त्यामुळे त्यांना पेठ तालुक्याचा अभ्यास करण्याची संधी मिळाली.

तत्कालीन संस्थनांच्या विलीनीकरणापूर्वी धरमपूर संस्थानात डांग सेवा मंडळाने ३५ शाळा चालविल्या होत्या. त्या शाळांचेही गुरुजी पर्यवेक्षक होते. या निमित्ताने त्यांना या संस्थानातील घनदाट अरण्यातील वाघांचे, जुलमी नोकरशाहीचे, पारशी शेठ-सावकारांचे साम्राज्य पाहावयास मिळाले. तेथे डांग सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांना आणि आवारी गुरुजींना राजा आणि नोकरशाही विरुध्द असंतोष नुर्मुलनाचे कार्य करावे लागले. या भागातील आदिवासी लोक निरक्षर, अज्ञानीहोते. १० जून १९४८ रोजी संस्थान विलिनीकरण मोहिमेत हे संस्थान भारतीय संघराज्यात कसे, केव्हा व का विलीन झाले याचा आदिवासी प्रजेला पत्तादेखील लागला नाही. संस्थान विलीनीकरणानंतर २-४ वर्षांतच पारशी लोकांचे साम्राज्यही लयाला गेले. पारशी लोक आणि सरकारी नोकरवर्ग विरुध्द आवारी गुरुजी असे समीकरण या काळात तयार झालेले होते. तरीसुध्दा या भागातील आदिवासी माणसाला विश्वासात घेऊन त्यांनाह्या सर्व परिस्थितीचा उलगडा आवारी गुरुजींसह अन्य कार्यकर्त्यांनी करून दिला.

१९६० ते १९६६पर्यंत पेठ तालुक्यात शासनाची**'सर्वोदय योजना'** राबविण्याची संधी आवारी गुरुजींना मिळाली. सर्वोदय योजनेच्या कामाद्वारे जनतेच्या सर्वांगीण सुधारणांचा आराखडा त्यांनी आखला व शासनाला सादर करून तो यशस्वी करून दाखविला.या'सर्वोदय योजना' बरोबरच ओहोळ बांधणी, साकव (पायपूल) जपानी पध्दतीची भातशेती, सहकारी संस्था, जंगल कामगार सहकारी संस्था, कर्ज सोसायटया, खरेदी-विक्री संघ, सहकारी बँका, पाटबंधारे इ. सहकारी योजनाही या भागात मान्य झाल्या. अशा रितीने आवारी गुरुजींच्या प्रयत्नातून पेठ तालुक्यात विकासाचा पाया घातला गेला.

वेगवेगळयाकामानिमित्त आदिवासी भागातून हिंडत असताना त्यांच्या लक्षात आले की, काही परधर्मीय गट आदिवासींच्या गरिबीचा, त्यांच्या भोळेपणाचा, अज्ञानाचा गैरफायदा घेऊन धर्मांतर करायला, प्रोत्साहन देत आहेत. हे पाहून त्यांचा राष्ट्रप्रेमी आत्मा खवळून उठला. त्या वेळी कल्याण आश्रमाने 'श्रध्दाजागृती' समितीची स्थापना करून गुरुजींना अध्यक्ष म्हणून नियुक्त केले ( १९९७-९८) व धर्मांतरविरोधी मोहीम हाती घेऊन नेटाने चालविली आणि धर्मविरोधी प्रवृत्तींना आळा घातला.

'भारतीय जनजाती संस्कृती रक्षा' मंचातर्फे दि. ८ व ९ फेब्रुवारी २००३ या दोन दिवसांत नंदुरबार येथे 'हिंदू आदिवासी अस्मिता संमेलन' संपन्न झाले. या संमेलनाचेउद्घाटनआवारी गुरुजींच्या हस्ते झाले. त्या उद्घाटनप्रसंगी भाषण करताना ते म्हणाले, "आदिवासींचा प्रमुख देव बडा देव, महादेव, भगवान श्री शंकर आहे. महादेवाची अर्धांगिनी पार्वती माता ही जगाची माता आहे. अशी आदिवासींची श्रध्दा आहे, भक्ती आहे. सर्वत्र महादेव-पार्वतीची आराधना करतात. त्यांना पूजतात. हिंदूंचा हाच प्रमुख देव आहे. असे असताना 'आदिवासी हिंदू नाहीत' हे कोणत्या आधारावर सांगितले जात आहे? विदेशी शक्तींच्या आहारी जाऊन काही संघटना असा अपप्रचार करीत असतात. त्यांचा हा अराष्ट्रीय बेत उधळून लावला पाहिजे." असे परखड विचार त्या वेळी त्यांनी प्रतिपादित केले. अशी त्यांची हिंदुत्वाची भावना होती.त्यांनी विश्व हिंदू परिषदेचे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले.१९८४पासून वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र प्रांताच्या कार्यात सहभागी झाले. ६ वर्षे ते महाराष्ट्र प्रांताचे उपाध्यक्ष होते. २००१ पासून महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष म्हणून अखेरपर्यंत सेवारत होते.

**गुरुजींची संशोधकाची दृष्टी:**

आवारी गुरुजी हे सरळ, साध्या स्वभावाचे होते.त्यांची राहणी साधी होती मात्र विचारसरणी उच्च होती. अंगामध्ये पांढराशुभ्र सदरा, धोतर, डोक्यावर टोपी, खांद्यावर पिशवी, पिशवीमध्ये वन औषधांच्या मुळया असा त्यांचा नेहमीचा पेहराव.

गुरुजींना वनौषधींची ही ज्ञानसंपदा त्यांना ज्यांच्याकडून प्राप्त झाली, ते पेठ तालुक्यातील **'ठाणापाडा'** येथील **'रामभाऊ सापटा गुरुजी'** यांचा ते गुरू म्हणून आवर्जून उल्लेख करीत. नंतर गुरुजींनी स्वत:च जंगलात हिंडून वेगवेगळया वनस्पतींची माहिती गोळा केली. आजारी आदिवासीं बांधवावर त्यांनी उपचार केलेत,अशा रितीने त्यांच्या सेवा यज्ञाला सुरुवात झाली.**'लखवा'** आणि **'मूळव्याध'** हे आजार बरे करण्यात त्यांचा हातखंडा होता.

आदिवासी परिसरात सामाजिक कार्य करण्यासाठी दीर्घकाळ गेल्यामुळे गुरुजींना आदिवासी बांधवांच्यासामाजिक, धार्मिक चालीरिती, वृक्ष-वनस्पतींचे प्रकार, त्यांच्या पारंपरिक औषधोपचार पध्दती, त्यांच्या श्रध्दा आणि समजुती, लोककला, लोकगीते यांचा अभ्यास करण्याची मोठी संधी मिळाली. हे सर्व ज्ञान पुढील पिढीकडे संक्रमित व्हावे यासाठी त्यांची धडपड होती. त्यासाठी ते अखंड भ्रमंती करत. वैदू संमेलने, ग्राम पुजारी बैठका, आदिवासी संस्कृतीच्या अभ्यासकांच्या भेटी, वनौषधी उपचार केंद्र, लकवा निवारण केंद्र, वनौषधी उत्पादन केंद्र आदी अनेक उपक्रमांना त्यांनी चालना दिली.

त्यांचे निसर्ग ज्ञान अफाट व दांडगे होते. याची प्रचीती त्यांनी केलेल्या त्यांच्या जवळील वहीतील नोंदीवरून दिसून येते. पक्षांच्या पीसापासूनही विविध गुणकारी औषधी बनविता येतील याची नोंद त्यांच्याकडे होती. माशांचे प्रकार , १२२ पक्षी आणि त्यांची घरटी, त्यांचे प्रकार, वेलींची नावे आणि प्रकार, कीटक, वन्यपशू, पक्षी, सर्पाच्या जाती यांच्या नोंदी त्यांनी वहीत केलेल्या आहेत. थोडक्यात ग्रामजीवन, वनोपज, निसर्ग सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण करुन गुरुजींनी ही टिपणे अनुभवातून घेतली आहेत..

१९५७मध्ये **'आदिवासींची लोकगीते'** आणि १९८५ साली **'आदिवासींचे परंपरागत उपचार'** ही दोन पुस्तके प्रसिध्द झाली. वनौषधींच्या साहाय्याने उपचार पध्दती परंपरागत असली, तरी आपल्याला माहीत असलेले ज्ञान स्वत:च्या मुलालाही न देण्याची कंजुषी आदिवासी जाणकारात-भगतात असल्यामुळे गुरुजींनी त्यांचा विश्वास संपादन करून मोठया कौशल्यानेवनौषधींचे हे ज्ञान मिळविले.**'औषधे रानावनातली'** हे त्यांचे दुसरे पुस्तक नाशिक आयुर्वेद सेवा संघाच्या सहयोगाने २००२मध्ये प्रसिध्द झाले. या पुस्तकात सुमारे ६५० वनौषधींच्या उपयोगाची सखोल माहिती दिलेली आहे. गुरुजींनी पेठ, सुरगणा, धरमपूर भागातील कोकणा, कातकरी, वारली, महादेव कोळी आदिवासी समाजातील प्रचलित असलेल्या ३००० कोकणी कोकणा बोली भाषेतील शब्दांचा कोश तयार केला.

कर्जत येथील‘कशेळे’ याठिकाणी‘वनौषधी’ संबंधाने पाठशाळा निघाली. या संस्थेचे ते आजीव सल्लागार होते. शिवाय भारतात आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या ज्या सेवाभावी संस्था आहेत, त्यातील **‘लोकस्वास्थ्य परंपरा’ संवर्धन समिती कोइमतूरने** (तामिळनाडू) संस्थेचे त्यांना 'पहिले अध्यक्ष' पद देऊन त्यांचा सन्मान केला.

**गुरुजींना मिळालेले सन्मान/ पुरस्कार:**

आदिवासी माणसांना जागृत करण्यासाठी, त्यांना संघटित करण्यासाठी,गुरुजींनी दिलेल्या योगदानाचीदखल घेऊन१९७४मध्ये शासनाने **'दलित मित्र'**, १९८६मध्ये **'आदिवासी सेवक'** हा पुरस्कार, १९८८मध्ये **'स्वातंत्र्यसैनिक'** म्हणून मान्यता देऊन त्यांचा गौरव केला.गुरुजींच्या कार्याची दखल घेऊन अनेक संस्थांनी त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले. १९७१मध्ये **'पु.भा. भावे'** हा पुरस्कार, **'नंदिनी'**, **'जीवनव्रती'**, दै. देशदूतचा **'गुणवंत'** पुरस्कार, तसेच वनवासी कल्याण आश्रमाने २६ जून २००१ मध्ये **'वनयोगी'** पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार केला. रा.स्व. संघ डॉ. हेडगेवार सेवा समितीतर्फे दि. २२जून२००३ रोजी नंदुरबार येथे **'डॉ. हेडगेवार सेवा पुरस्कार'** देऊन त्यांना त्यांच्या सेवेची पावतीच दिली.

**समारोप:**

अशाप्रकारे सबंध आयुष्यभर निरपेक्ष सेवाभाव व समर्पित आयुष्य जगणारे, कुठल्याही आर्थिक वा मानापमानाची अपेक्षा न ठेवणारे,जवळपासपाच दशकांपर्यंत अविरतसेवा कार्य चालू ठेवणारे आवारे गुरुजी यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. त्यांच्यातील देशभक्ती, राष्ट्रभक्ती, समाजसेवेचा वसा,निसर्गप्रेम, संशोधक वृत्ती, साहित्यिक या गुणांचा निश्चितपणे प्रत्यय येतो.

**संदर्भ सूची:**

१) डॉ.सरल धारणकर, 'दादासाहेब बिडकरवसा आदिवासी सेवेचा', राजहंस प्रकाशन, दुसरी आवृत्ती-एप्रिल-२०१६

२) विनया खेपेकर ( संपा.), 'विजय स्मृती कै.डॉ.विजय बिडकर स्मृतिग्रंथ' पहिली आवृत्ती – मार्च २०१९.

३) आवारी गुरुजी, 'आदिवासींचीलोकगीते', प्रथम आवृत्ती-१९५७.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# विसाव्या शतकातील आदिवासींची राजकीय चळवळ

**प्रा. सुभाष किसन पवार**
*राज्यशास्त्र विभाग*
*डांग सेवा मंडळ नाशिक संचलित,*
*कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण ता.सुरगाणा जि.नाशिक*

**प्रस्तावना**

२० व्या शतकात 'भारत स्वतंत्र राष्ट्र' म्हणून उदयास आले. हे सुवर्णक्षण भारतासाठी अत्यंत महत्वाचे ठरले आहेत. आदिवासी हाच मूळनिवासी आहे, हे जरी खरे असले तरी तो मात्र स्वतःच्या सर्वांगीण विकासापासून नेहमी वंचितच राहिला. स्वातंत्र्यानंतर नाशिक जिल्ह्यात आदिवासींचा विकास आणि आदिवासींच्या जीवनातील मुलभूत परिवर्तन घडविण्यासाठी झालेल्या प्रयत्नाचा आदिवासींसाठी महत्त्वाचा कालखंड ठरतो. यामध्ये दादासाहेब बिडकर, सीताराम भोये, हरिभाऊ महाले, ए.टी.पवार व जे.पी.गावित यांचे राजकीय चळवळ उभी करण्यातील योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे. परंतु, त्यांच्या राजकीय चळवळीतील योगदानाची दखल घेतलेली फारशी दिसत नाही. त्यामुळे त्यांचे आदिवासींच्या राजकीय चळवळीतील योगदानाचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

**आदिवासींचे नेतृत्व व राजकीय चळवळीतील योगदान :**

❖ **आदिवासींच्या जन आंदोलनाचे प्रेरक : दादासाहेब बिडकर**

नाशिकचे जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी, कर्मवीर, दलित मित्र, आदिवासी सेवक व डांग सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब बिडकर तथा दत्तात्रय मल्हारराव बिडकर याचा जन्म १९ मार्च १९१० रोजी झाला. मुळातच लढाऊ वृत्ती आणि सामाजिक उर्मी अंगी असल्याने त्यांनी अनेक संकटावर, अडचणीवर मात करीत आदिवासी जनतेसाठी कार्य केले. 'आदिवासींचा विकास !' ह्या एकच ध्येयाने प्रेरित होऊन दादासाहेब बिडकर यांनी २३ जुन १९३७ रोजी डांग सेवा मंडळ स्थापन करून सेवा कार्य हाती घेतले. सेवा निवृत्त इंग्रज स्त्री मिस जे.एल.लॅथम आणि वैकुंठभाई मेहता यांचे मार्गदर्शन व सहकार्याने या महान कार्याला सुरुवात केली. 'आदिवासी समाज शिकला पाहिजे, स्वतःच्या पायावर उभा राहून स्वभिमानाने जगला पाहिजे' या प्रांजळ भावनेतून गुरुतुल्य दादासाहेब बिडकर यांनी मिशन समजून आदिवासी भागामध्ये प्रयत्न सुरु केले.

आदिवासींचे मुलभूत प्रश्न ओळखून ते सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुरु केल्या. आदिवासींची सर्वांगीण उन्नती करावयाची असेल तर त्यांना प्रथम शिक्षण मिळाले पाहिजे, हे त्यांनी

ओळखले होते. यातूनच १९३९ मध्ये आदिवासींसाठी पहिली शाळा बागलाण तालुक्यात गोलवाड यागावी सुरु केली. आणि, आदिवासींच्या जीवनात शिक्षण ज्ञानगंगेचा झरा दादासाहेबांच्या रूपाने डोंगर दऱ्यातील सर्वसामन्यांच्या घरोदारी पोहचला. आदिवासींची दैन्यावस्था पाहून उदरनिर्वाहकरिता धान्य कोठारे उभी केली, त्यातून धान्य पुरविण्याची योजना सुरु केली. १९४८ च्या सुमारास पेठ तालुक्यात आणे यागावी 'आदिवासी जंगल कामगार सोसायटी' त्याचबरोबर 'डांग जंगल कामगार संघ' ही स्थापन केला. 'आदिवासी मजुराने मालक म्हणून काम करावे व मजुरी मिळवावी" याच मुख्य उद्देशाने जंगल सहकारी चळवळ दादासाहेबांनी निर्माण केली. या शैक्षणिक, समाजिक, आर्थिक चळवळीतूनच आदिवासी समाजामध्ये राजकीय नेतृत्वाचे व राजकीय चळवळीचे बीज रोपले गेले. या अथांग प्रयत्नाने आदिवासीच्या जीवनात मुलभूत परिवर्तन घडविणारे 'मैलाचे दगड' आदिवासी सेवक दादासाहेब बिडकर हेच होते, हे कोणीही नाकारू शकत नाही.

❖ **डांगचा सिंह : सीताराम सयाजी भोये**

नासिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यात सीताराम भोये यांचा निरगुडे यागावी दि. १ मे १९२८ रोजी आदिवासी गरीब घरात जन्म झाला. आईवडिलांच्या प्रबळ इच्छाशक्तीने ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतले. कुटुंबाला आधार मिळावा म्हणून डांग सेवा मंडळ, नाशिक संस्थेत शिक्षक म्हणून नोकरी केली. सरकारी नोकरीच्या इच्छेमुळे पुढे तलाठी पदाची नोकरी स्वीकारली. चाकोरीबद्ध नोकरीमुळे तलाठी पदाचा राजीनामा देऊन दादासाहेबांच्या जंगल कामगार सहकरी संस्थेत मुकादम म्हणून काम स्वीकारले. त्यांच्यातील समाजसेवेचा भाव, राजकीय मुत्सद्देगिरी, वकृत्वकला, भाषाशैली, विद्वता आणि दादासाहेब बिडकर, नानासाहेब दीक्षित यांची प्रेरणा व मार्गदर्शन ही त्यांच्या जीवनातील गुरुकिल्ली ठरली. डांगचा भाषिकवाद, डांगचे महाराष्ट्र व गुजरातमधील समायोजन या प्रमुख प्रश्नांमध्ये सक्रीय भूमिका पार पडली, त्यामुळे त्यांना लोक डांगचा सिंह म्हणून ओळखू लागले.

**राजकीय चळवळीतील योगदान :**

सीताराम भोये यांनी कॉंग्रेस पक्षाचे नेतृत्व करत १९६२ च्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये उत्तुंग यश प्राप्त केले. या पहिल्या पेठ पंचायत समितीचे सभापती म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. खेडोपाड्यामध्ये जनतेशी संपर्क करून राजकीय जनजागृती वाढविली. १९६७ मध्ये ते महाराष्ट्र विधानसभेत आमदार म्हणून निवडून आले. १९६७, १९७२ आणि १९७९ ची पंचायत समिती निवडणुकांमध्ये ही आपलेच वर्चस्व ठेवले. १९७९ च्या आदिवासी राखीव लोकसभा निवडणुकांमध्ये खासदार म्हणून निवडून आले. पुन्हा १९८४ ते १९८९ मध्ये खासदार म्हणून निवडून आले. या राजकीय कारकीर्दीमध्ये अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. त्यामध्ये प्रामुख्याने आदिवासी विकास खाते समाज कल्याण खात्यापासून स्वतंत्र असावे, आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे गहाण

अथवा हस्तांतरित होऊ नये, आदिवासी भागात अग्रक्रमाने वीज पोहचावी, आदिवासी विकास गटांची द्वितीय व्यवस्था संपल्यानंतर त्याक्षेत्रात उपाययोजना लागू करणे, आदिवासी भागात लघु पाटबंधारे- पाझर तलावे बांधले जावेत व त्यासठी स्वतंत्र निधी द्यावा, मालेगाव येथील पॉवरलुमचा प्रश्न, नागसाक्या धरणाला गती देणे, मध्य व पश्चिम रेल्वेची मागणी, सार्वजनिक पाण्याचा प्रश्न, अंकाई किल्ला व सप्तशृंगी गडावर टी.वी केंद्र उभारण्याची मागणी, नार-पार नद्यावर मोठे प्रकल्प उभारणे, इ. अनेक प्रश्न आदिवासींच्या विकासासाठी मार्गी लावले.

सीताराम भोये हा एक गरीब व अडाणी आदिवासी कुटुंबात जन्मलेला, कमी शिकलेला माणूस, प्रतिकूल परिस्थितीतून केवळ जिज्ञास, महत्वकांक्षा आणि विनम्रता या गुणांची जोपासना करत करत आणि थोर माणसांचे आशीर्वाद, सहकार्य घेत कार्यकर्त्यांचे संगटन करत आदिवासी जनतेमध्ये राजकीय चळवळ उभी करण्याचे महानत्तम कार्य केले. त्यांचे कार्य राजकीय चळवळीच्या योगदानापुरते मर्यादित न राहता शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात ही योगदान दिले. ही आदिवासी समाजासाठी अभिमानाची बाब आहे.

❖ **आदिवासींचा लोकप्रिय कार्यकर्ता - हरिभाऊ शंकर महाले**

हरिभाऊ महाले यांचा जन्म १ जून १९३८ मध्ये वारे, ता.दिंडोरी येथे झाला. घरची परिस्थिती गरिबी होती, त्यावर मात करीत त्यांनी ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतले. आदिवासीसाठीची दादासाहेब बिडकर, कचरू भाऊ राऊत व बाळू काका यांची सामाजिक, शैक्षणिक कार्याची धडपड पाहून ते प्रभावित झाले. पुढे दादासाहेबांनी त्यांना डांग सेवा मंडळ, नाशिक संस्थेत प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीवर घेतले. हरीभाऊ महाले यांच्यातील सेवाभाव, सामाजिक कार्याची आवड यामुळे डांग सेवा मंडळाच्या सचिव पदाची जबाबदारी दिली. डांग सेवा मंडळ, संस्थेच्या कार्यामुळे आदिवासींची दैन्यावस्था व परिस्थिती पाहिली होती. दादासाहेब बिडकर यांच्या कुशल मार्गदर्शनाने हरीभाऊच्या रूपाने जंगल कामगार सहकारी सोसायटयांच्या चळवळीतून आदिवासीचे नवे नेतृत्व उदयास आले.

**राजकीय चळवळीतील योगदान :**

१९६२,१९६७ ते १९७३ च्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये जनतेने निवडून दिले. दिंडोरी पंचायत समितीचे उपसभापती झाले. १९७७ ते १९८० मधील जनता राजवटीत संसद सदस्य होते. १९८० ते १९८९ विधानसभेवर सदस्य निवडून आले. त्यानंतर राजकीय अस्थिरतेचा काळ असताना देखील जनता पक्षातर्फे १९९९ मध्ये खासदार म्हणून निवडून आले. याकाळात आदिवासींच्या विकासासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. त्यात आदिवासी उपाययोजना राबविणे, एकाधिकार धान्य खरेदी योजना, जातीच्या प्रमाण पत्राची तापसणी, शासकीय सेवेतील नोकरीची टक्केवारी, सिंचन आणि पाट बंधारे, शाळा व आश्रमशाळा मधील अनुशेष नोकरभरती, इ. अनेक प्रश्न मार्गी लावले. आदिवासीं सामाजामध्ये विकासाची गंगा प्रवाहित व्हावी, यासाठी कायम धडपड करीत राहिले. त्यांनी

आदिवासींसाठी उत्तम शिक्षण, शेती, उद्योग, वनसंवर्धन व रक्षण, व्यसनमुक्ती ही मुलभूत विकासाची पंचतत्वे गृहीत धरून कार्य केले. यातूनच आदिवासींचा लोकप्रिय सच्चा कार्यकर्ता म्हणून त्यांना लौकिक मिळाला. त्यांच्या राजकीय, सामाजिक कार्यामुळे आदिवासींमध्ये प्रखर राजकीय चळवळ उभी राहिली असे म्हणता येते.

❖ **आधुनिक भगीरथ - अर्जुन तुळशीराम (ए.टी) पवार**

अर्जुन पवार यांचा जन्म दळवट ता.कळवण जि.नाशिक येथे झाला. घरची परिस्थिती गरिबीची असून ही एम.ए. शिक्षण पूर्ण केले. काही दिवस प्राध्यापक म्हणून नोकरी केली. ए.टी.पवार स्वतः अत्यंत कृतज्ञतेने व आदराने सांगतात की, 'दादासाहेब बिडकर यांनी प्रचंड कष्ट सोसून डांग सेवा मंडळ सुरु केली नसती तर कदाचित ए.टी.पवार यांचे शिक्षण झाले नसते.' साधी राहणी अन् उच्च कार्यशैली असा स्वत:चा वेगळाच ब्रँड यशस्वी करणारा आदिवासींचा हा आधुनिक भगीरथ होता. ८ वेळा आमदार, ४ वेळा मंत्री हा प्रवास पाहिल्यावर कोणालाही ही व्यक्ती बडी आसामी वाटू शकते, पण साधा पांढरा शर्ट व लेंगा अन हात सतत जोडलेले हीच त्यांची खरीखुरी प्रतिमा होती.

**राजकीय चळवळीतील योगदान :**

१९६७ मध्ये जिल्हा परिषदेवर निवडून आले व कृषी समितीचे सभापती पद लाभले. आदिवासींच्या घरादारापर्यंत राजकीय चळवळ उभी करण्याचे श्रेय अर्जुन पवार यांना जाते. अजातशत्रू राजकारणी म्हणून ए.टी.पवार यांची ओळख राजकीय क्षेत्रात निर्माण केली. पक्ष हितापेक्षा आदिवासींचे हित अधिक महत्वाचे आहे , याच दृष्टीकोनातून राजकीय चळवळ उभी केली. जनतेनेही त्यांना पक्ष मानून त्यांच्या पाठीशी सदैव उभी राहिली. रूढार्थाने ते राजकारणी, साधेपणा हा त्यांचा स्थायीभाव असला तरी सत्ता हे साधन आहे आणि आदिवासी बांधवांचे हीत हेच साध्य आहे, याची खूनगाठ बांधूनच त्यांनी सारी कारकीर्द पणास लावली. शिक्षण, आरोग्य व दळणवळणाच्या सुविधा हे आदिवासींच्या विकासातील अडथळे असल्याचे पाहून त्यांनी नाशिक जिल्ह्यातील कळवण या आपल्या मतदारसंघाचा शब्दशः कायापालट केला. आदिवासींचा जीवन व्यवहार अधिक सुखकर व्हावा यासाठी त्यांनी आमदार, मंत्री असताना कोणाही पुढे हात जोडायला कमी मानले नाही. मंत्रालयातील शिपायाला ही हात जोडणारा हा माणूस अस्सल मातीतला होता. त्यामुळेच ४ वेगवेगळे पक्ष बदलूनही लोकांनी सतत त्यांनाच निवडून दिले.

लोकांच्या दृष्टीने ए.टी. हाच पक्ष होता. सरपंच, जिल्हा परिषद अध्यक्ष ते मंत्री अशी ५० वर्षाची त्यांची राजकीय कारकीर्द महत्वाची ठरते. स्वतंत्र आदिवासी विभागाची स्थापना, आदिवासी आयुक्तालायचे मुख्यालय नाशिकला आणणे, शबरी वित्त महामंडळाची स्थापना, ग्रामीण रुग्णालये, आश्रमशाळा योजनेचा विस्तार, पुनंद प्रकल्प ( अर्जुन सागर), नवसंजीवनी योजना, लघु पाटबंधारे व

मध्यम पाटबंधारे योजना, रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण, नवीन आदिवासी राज्याची मागणी इ. असंख्य जनतेचे प्रश्न मार्गी लावले. यामधून आदिवासींच्या जीवनमनात अमुलाग्र परिवर्तन घडून आलेले पाहायला मिळते.

❖ **एक कट्टर कम्युनिस्ट - जिवा पांडू गावित**

जीवा गावित यांचा जन्म १७ डिसेंबर १९४९ रोजी अलंगुण ता.सुरगाणा जि.नाशिक यागावी एका गरीब कुटुंबात झाला. त्यांनी बी.एस्सी पर्यंत शिक्षण घेतले. कॉ.गोदुताई परुळेकर व कॉ.नाना मालुसरे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन किसान सभेचे कामकाज सुरु केले. १९७२ च्या भीषण दुष्काळात मस्टर असिस्टट म्हणून काम केले. मजूर वर्गाला कामाची पूर्ण मजुरी दिली जात नाही. तसेच, बोगस हजेरी लावून खोटी मस्टर्स भरून पैसे काढले जातात. या विरोधी आवाज उठवून लोकांना संघटीत केले. १९७७ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सक्रीय सभासद बनले. पुढे आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना १९८९ मध्ये केली.

**राजकीय चळवळीतील योगदान :**

१९७८ च्या विधानसभा निवडणुकीत कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) पक्षाकडून विधानसभेवर निवडून आले. नाशिक जिल्ह्यात पहिल्यांदा मा.क.पा पक्षाचे त्यांच्या माध्यमातून खंबीर नेतृत्व उदयास आले. यांनतर १९८०, १९८५, १९९०, १९९९, २००४ व २०१४ च्या विधानसभेवर निवडून आले. महाराष्ट्र राज्य किसान सभेचे अध्यक्ष म्हणून सातत्याने काम पाहतात. महाराष्ट्राच्या १३ व्या विधानसभेतील एकमेव डाव्या गटातील सदस्य होते. राजकीय कारकिर्दीत अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी केले. यामध्ये वन हक्कांचे दावे, रोजगार हमी योजना, दारिद्य रेषेखालील कुटुंबांना रेशनकार्ड मिळवून देणे, घरकुल योजना, शिक्षण, शेतकऱ्यांच्या हितासाठी नाशिक ते मुंबई पर्यंत पायी लॉंग मोर्चा इ. कार्य यशस्वी रीतीने पार पाडली.

**सामारोप**

आदिवासी समाज हा आपल्या रूढी, परंपरागत संस्कृतीला जोपासणारा असल्यामुळे नेहमीच विकासापासून वंचित राहिलेला आहे. २० व्या शतकातील नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या विकासामध्ये दादासाहेब बिडकर, सीताराम भोये, हरिभाऊ महाले, ए.टी.पवार, जिवा पांडू गावित या राजकीय नेतृत्वाने आदिवासींच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्य व विचारसरणीमुळे आजचा आदिवासी माणूस राजकीय व सामाजिक नेतृत्व सक्षमपणे करू लागला आहे.

**संदर्भ सूची :**

१. डॉ.सरल धारणकर, ‘दादासाहेब बिडकर वसा : आदिवासी-सेवेचा’, राजहंस प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती : एप्रिल २०१६

२. सुरेश पवार, ‘लोकनेता कॉम्रेड जिवा पांडू गावित’, गिरणादूत प्रकाशन नाशिक, प्रथम आवृत्ती : २०१३

३. प्रल्हाद दुधाने, ‘नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि कल्याणकारी योजनाची अंमलबजावणी’ नोव्हेंबर -२०१३

४. www.wikipedia.com

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# २० व्या शतकातील नाशिक जिल्ह्यातील कामगार चळवळी आणि सक्षमीकरण

**प्रा. हेमलता कृष्णा महाले**
*(वाणिज्य विभाग )*
*डांग सेवा मंडळ कला व वाणिज्य महाविद्यालय*
*उंबरठाण ता. सुरगाणा, जि.नाशिक ४२२२११*

**प्रस्तावना**

देशात कामगार चळवळ ह्या १९०० ते १९२० या काळात अस्तित्वात आल्या. भारतातील कामगार चळवळ ही वेतन, महागाई भत्ता, बोनस कारणांमुळे झाली. औद्योगिकीकरणामुळे देशात उद्योग सुरू झाले आणि कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला त्यामुळे अस्थिर रोजगार, कंत्राटी कामगार, आर्थिक असुरक्षितता, कामगार कायद्याचे संरक्षण नसणे, अमर्याद कामाचे तास, कामाच्या ठिकाणी असणारी असुरक्षितता आणि अनारोग्य इत्यादी समस्या वाढल्याही वाढू लागल्या. या समस्या सोडवण्यासाठी १९२० मध्ये " ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस " या व्यापक संघटनेची स्थापन होऊन कामगार चळवळी जोम धरू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळातही कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक युनियन्स ची स्थापना झाली. भारतामध्ये उद्योगधंद्यांची सुरुवात जरी १८५० च्या सुमारास झाली, तरी स्थायी स्वरूपाच्या कामगार संघटना स्थापन व्हावयाला जवळजवळ साठ वर्षे उलटावी लागली. आधुनिक स्वरूपाची पहिली कामगार संघटना १९१८ साली मद्रास येथे ‘मद्रास लेबर युनियन’ या नावाने स्थापन झाली.

महाराष्ट्र राज्यातील नाशिक हा एक जिल्हा आहे. या जिल्ह्यात सुरगाणा, पेठ, कळवण, बागलाण, मालेगाव, चांदवड, नांदगाव, येवला, निफाड, सिन्नर, इगतपुरी, देवळा आणि त्रंबकेश्वर असे १५ तालुके आहेत. २०व्या शतकात कामगारांच्या हितासाठी तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्यांची फळी नेतृत्वात आली. नाशिकच्या कामगार चळवळीनेही योगदान दिले आहे. यात समाजवादी चळवळीतून आलेले, त्याचप्रमाणे कम्युनिस्ट चळवळीशी संबंधित कार्यकर्त्यांचाही समावेश होता.

**कामगारांच्या न्याय , हक्कासाठी कामगार चळवळी**

कालांतराने १९७२ नंतर व्यवसायाला सुरुवात झाल्यानंतर उद्योगभूमी म्हणून नावारूपाला आली. उद्योग व्यवसायाची भरभराट सुरू होती, त्याप्रमाणे अनेक कामगारविषयक नियम, कायदे बसवून उद्योगमालकांनी आपले व्यवसाय सुरू ठेवले होते. त्यामुळे मालक आणि कामगार असे दोन वर्ग निर्माण होऊन कामगार वर्गाचे शोषण होऊ लागले. म्हणून कामगारांचे शोषण थांबवावे, यासाठी अनेक कामगार संघटना उदयाला आल्या. त्यातील दत्ता सामंतप्रणित युनियन, हिंद मजदूर, सीटू, आयटक, इंटक

यांसारख्या मोठ्या कामगार संघटनांनी संप करून कामगारांचे प्रश्न सोडवले. इ.स. १९०५ मध्ये ठक्करबाप्पा यांनी आदिवाशी जनतेच्या जीवनात बदल घडवून आणण्याकरिता 'आदिजामती सेवक संघ ' ची स्थापना केली. बागलाण येथे कार्य करत असणारे दत्तात्रय बिडकर ( दादासाहेब ) यांना त्या भागातील जनतेच्या तसेच कामगार ,मजूर यांच्या परिस्थितीची, समस्यांची जाणीव झाली आणि त्यांच्या कल्याणासाठी स्वत: व त्यांचे सहकारी यांच्या मदतीने इ.स.१९३७ मध्ये सटाणा (बागलाण )या ठिकाणी डांग सेवा मंडळ स्थापन केले. त्यानंतर इ.स.१९४६ च्या काळात 'आदिजामती सेवक संघाचे तत्कालीन अध्यक्ष मोरारजी देसाई होते, तर उपाध्यक्ष दादासाहेब बिडकर होते. त्यावेळी त्यांनी बागलाण तालुक्यात मुल्हेर येथे जंगल कामगार सहकार चळवळीचे अधिवेशन भरविले.अधिवेशनाच्या अध्यक्ष स्थानी जुगत रामभाई, राज्यातील जंगल कामगार सहकारी संस्थाचे प्रतिनिधी तसेच आचार्य भिसे, भाऊसाहेब हिरे, द.ण. बांद्रेकर उपस्थित होते.

त्याचबरोबर व्हीआयपीमध्ये झालेला ऐतिहासिक संप हा महाराष्ट्राला विचार करायला लावणारा होता. या काळात अनेक कामगारांवर अन्याय झाला होता. त्याचप्रमाणे सर्वांत जास्त कामागारांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणारे सीटूच्या डॉ. डी. एल. कराड यांच्याकडे बघितले जाते. त्यानी अनेक छोट्या-मोठ्या कंपन्यांमधून कामगारांना न्याय मिळवून दिला आहे. राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगारांचे प्रश्न सोडवून उद्योगांमध्ये एक वेगळा दबदबा निर्माण केला आहे. कराड यांच्या पावलावर पाऊल ठेवून राजू देसले यांनीदेखील कामगार चळवळीला वाहून घेतले आहे. कामगार नेते डॉ. कराड यांनी सुरुवातीला नाशिक जिल्हा व महाराष्ट्रात ठेवीदार संघटनेच्या माध्यमातून अपप्रवृत्तींविरुद्ध लढा उभारला आहे. राज्यात उत्तमरीतीने काम करत असलेल्या पतसंस्थांना अडचणीत आलेल्या पतसंस्थाचे पालकत्व दिल्यास निश्चितच बंद पडलेल्या, तसेच अडचणीत आलेल्या पतसंस्थांच्या ठेवीदार व खातेदारांना दिलासा मिळेल व त्यांचे पैसे टप्प्याटप्प्याने परत मिळतील. या दृष्टीनेही कामगार संघटनांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

नाशिकच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात पुरोगामी नेतृत्वाने लक्षणीय योगदान दिले होते. १९५० मध्ये इंडिया सिक्युरिटी प्रेसमध्ये इंटकची युनियन कार्यरत होती. त्यानंतर चार-पाच वर्षांनी लगेच एचएमएसची साथी मधू लिमये, बाबा खेडगीवार यांच्या नेतृत्वाखाली युनियनची स्थापना होऊन चळवळीत वेगळे स्थान निर्माण केले होते. मुंबईमध्ये गिरणी कामगारांचा संप मोठ्या प्रमाणात सुरू होता. त्यावेळी नाशिकमध्ये त्याचे लोण फारसे पसरले नव्हते. ज्यावेळी नाशिकमध्ये फॅक्टरी, कारखाने सुरू झाले, त्यावेळी कामगार संघटना अस्तित्वात यायला लागल्या. इंडिया सिक्युरिटी प्रेसमध्ये युनियनची स्थापना झाल्यानंतर एसटीमध्ये मजदूर युनियनची स्थापना करण्यात आली. तिचे नेतृत्व साथी जॉर्ज फर्नांडिस व भाऊ फाटक यांच्याकडे होते. नाशिकमध्ये झालेल्या आंदोलनांमध्ये वेतन करारासाठी होणाऱ्या आंदोलनांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. पूर्वी आंदोलनांचे स्वरुप उग्र नव्हते. पारंपरिक

पद्धतीने निवेदने देणे, निदर्शने करणे, शिष्टमंडळाच्या चर्चा परिषदा घेणे एवढ्यापुरते मर्यादित होते. एवढे करुनच मागण्या मान्य व्हायच्या. एखाद्या कंपनीत संप करायचा असेल तर मोठी तयारी करावी लागायची. नाशिकमध्ये १९६० मध्ये पोस्ट अँड टेलिग्राफ कर्मचाऱ्यांनी ऑटोमेशनच्या संदर्भात एक दिवसाचा संप केला. १९६२ मध्ये आयएसपीच्या कर्मचाऱ्यांनीदेखील एक दिवसाचा संप केला. त्याला साथ म्हणून १९६२ मध्ये एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढीसाठी एक दिवसाचे आंदोलन केले. त्यानंतर खऱ्या अर्थाने कामागारांना आपले हक्क समजू लागले व कामगार चळवळीने जोर धरला. आयएसपीच्या कामगारांनी १९६२मध्ये स्टाफ क्वॉर्टर आणि हॉस्पिटलच्या मागणीसाठी मधू लिमये यांच्या नेतृत्वाखाली ३२ दिवसांचा संप केला. त्यानंतर आयुर्विमा कर्मचाऱ्यांनीही संगणकाच्या वाढत्या वापराबद्दल व ऑटोमेशनच्या विरोधात संप पुकारला होता. या संपांना नाशिकच्या कामगारांनी मोठ्या प्रमाणात साथ देऊन हे संप १०० टक्के यशस्वी करून दाखवले आहेत. हा लढा सरकारच्या विरोधात असल्याने तो सात ते आठ वर्षे सतत सुरू होता. ८ मे १९७४ ते २३ मे १९७४ या कालावधीत रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात संप केला होता. त्यावेळी अत्यावश्यक सेवेत असताना संप केला म्हणून तीनशे कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. यात नाशिकच्या कर्मचाऱ्यांचादेखील समावेश होता. त्यानंतर नाशिकमध्ये स्थानिक पातळीवर अनेक संप झाले. त्यातून कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला आहे. सध्या आंदोलनांचे प्रमाण कमी झाले असले तरी कामगारांपुढील आव्हाने आजही कायम आहेत. जागतिकीकरणात कामगारांचे मुलभूत हक्क डावलले जात असून, कॉर्पोरेट आणि भांडवलदारांच्या विळख्यात कामगार आजही पिचला जात आहे.

**जनकल्याणाची सहकारी चळवळ!**

महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा पायाच सहकारासारख्या क्षेत्राने बांधला आहे. नव्या प्रवाहातील विषमतावादी धोरणांना बांध घालून समतेची पेरणी करणारे आर्थिक तत्त्वज्ञान म्हणून सहकार चळवळीचा पुरस्कार ज्याप्रमाणे राज्यात केला गेला, त्याप्रमाणे तो नाशिक जिल्ह्यातही केला गेला. महाराष्ट्रात सहकार क्षेत्रासाठी धनंजयराव गाडगीळ, वैकुंठलाल मेहता हे प्रवर्तक ठरले. त्यांना नाशिकच्या ग्रामीण भागामध्ये सहकार चळवळ रुजविण्यासाठी भाऊसाहेब हिरे, कर्मवीर काकासाहेब वाघ, पंडित धर्मा पाटील आदी धुरिणांनी मोलाची साथ दिली. या धुरिणांनी शेतकरी, कामगार, महिला वर्ग, दुर्बल घटक, औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी यांसारख्या विविध लक्ष्यगटांची मोट बांधत झपाट्याने सहकारी संस्थांची स्थापना केली. आदिवासीबहुल भाग असणाऱ्या नाशिकसारख्या जिल्ह्याला या चळवळीचा मोठ्या प्रमाणावर लाभ झाला. उत्पादन, पतपुरवठा, विपणण, सामजिक सेवा, ग्राहक संरक्षण आदी कामे सहकार प्रसारातून उभारली गेली. या जनतेच्या आर्थिक स्वावलंबन आणि प्रगतीच्या संधींचा पायाही याद्वारे घातला गेला. साखर कारखान्यांच्या उभारणीसोबतच आधुनिक शेतीपद्धतीचा पुरस्कार व

सावकार, व्यापारी यांच्याकडून शेतकरी वर्गाचे होणारे शोषण रोखण्यासाठीही सहकाराचे योगदान मोठे आहे. राज्याच्या सहकारी चळवळीस दिशा दाखविणारा कारखाना म्हणून निफाड सहकारी साखर कारखान्याकडे एकेकाळी बघितले जायचे. काही दशकांच्या कालावधीत झालेले राजकीय सत्तांतर व दूरदृष्टीच्या अभावामुळे निसाकासोबतच रानवड व गिरणासारख्या कारखान्यांनीही मान टाकली, तर वसाका अन् कादवालाही वेळोवेळी अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागला. मात्र, या धुरिणांच्या राजकीय वारसदारांच्या कालावधीत चळवळीचा वारसा अपेक्षितपणे पुढे सांभाळला गेला नाही. निफाड कारखान्याला दुलाजीनाना पाटील, माधवराव बोरस्ते, मालोजीराव मोगल, प्रल्हाद पाटील-कराड आदींनी यशाच्या शिखरावर नेले होते. सरकारचे बदलते धोरण अन् राजकारणाने मात्र या कारखान्यांचे अर्थकारण वेळोवेळी बदलत गेले. सहकाराच्या विस्तारामुळे आदिवासी नागरिक, स्त्रिया, दुर्बल व वंचित घटकही विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मोठी मदत झाली. राज्यात नाशिक जिल्ह्याची शेती व उद्योगविषयक विकास क्रमवारीही पहिल्या पाच स्थानात राहण्यामागे सहकाराचे योगदान मोठे आहे. गुणी, चारित्र्यवान व ध्येयवादी माणसांच्या हाती सहकाराची सूत्रे असावीत, अशी भूमिकाही भाऊसाहेब हिरे यांनी मांडली होती. या तत्त्वाचे पालन भविष्यात झाल्यास जिल्ह्यातील सहकाराची पडझड थांबण्यास नक्कीच मदत होईल.

**उद्योग धंद्याच्या दिशेने वाटचाल**

एकोणिसाव्या शतकापर्यंत नाशिकची अर्थव्यवस्था तीर्थक्षेत्रामुळे बहरत होती. त्यानंतर इतर व्यापाराने येथील बाजारपेठ काबीज केली. नंतर अनेक उद्योगांनी आपले पाय रोवले. त्यामुळे याज्ञिकीवरच विसंबून असलेल्या या शहरात इतर व्यवसाय व उद्योगांनी आपले वेगळेपण सिद्ध करत यशस्वीपणे व्यापार व उद्योग विस्तारत नेला. आज किराणापासून कापडबाजार, इलेक्ट्रॉनिक्स, मेडिकल व सराफ बाजारही प्रचंड मोठा झाला आहे. एकेकाळी जळगावची सराफ बाजारपेठ ही राज्यातील सर्वांत मोठी समजली जात होती. मात्र, त्याहीपेक्षा मोठी बाजारपेठ नाशिकमध्ये तयार झाली आहे. किराणाची बाजारपेठ अहमदनगर, पुणे व जळगाव होती; पण आता नाशिकने त्यात मोठी उडी घेतली आहे. कापड बाजारासाठी सुरत व इंदूरचे नाव होते; पण आता नाशिकने त्यात आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. मोठमोठे मॉल, दुकानाचा नव्या वळणाचा थाट याबरोबरच सेवा क्षेत्रातही नाशिक पुढे गेले आहे. येथील किरकोळ व्यापाराबरोबरच घाऊक व्यापाराची उलाढालही मोठी झाली आहे. तीर्थक्षेत्रामुळे पूर्वी फळे, भाजीपाला, फुले, धान्य, दूधदुभते, तसेच तांबे, चांदीची भांडी, दागिने, अन्य पूजेचे सामान, भेटवस्तू या सगळ्या वस्तूंची बाजारपेठ म्हणून नाशिक ओळखले जात होते. नंतर १८६२ मध्ये मध्ये नाशकात रेल्वे आली व शहराला त्याचा मोठा फायदा झाला. रेल्वेमुळे अनेक शहरे कनेक्ट झाली.

**संदर्भ :**

१) डॉ.जी.बी.शहा :२० व्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास
२) प्रा.डॉ.शामराव घाडगे, प्रा.दिगंबर सोनवणे, ‘आधुनिक भारत’
३) डॉ.सरळ धारणकर, ‘दादासाहेब बिडकर वसा : आदिवाशी सेवेचा’,राजहंस प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती :एप्रिल २०१६
५) www.wikipdia.com

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# नाशिक जिल्हयातील शेती क्षेत्रात झालेले आर्थिक परिवर्तन

**प्रा. देशमुख उमा प्रकाश**
*अर्थशास्त्र विभाग*
*कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण,ता. सुरगाणा, जि. नाशिक*

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यामध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. लोकांच्या उपजिविकेचे साधन म्हणून शेती या व्यावसायाला मानले जाते. जवळजवळ 75 टक्के लोक हे शेती या प्राथमिक व्यवसायात गुंतलेले होते. ब्रिटिशांनी भारतात राबविलेल्या अर्थव्यवस्थेमुळे येथे चालणारे सर्व लहान लहान उद्योगधंदे मोडकळीस आले. त्यामुळे वाढती लोकसंख्या, दुष्काळ , सावकारांची कर्जे अशा कठीण परिस्थितीत वंचित घटक जिवन जगत होता. शेतकरी हा कर्जात जन्माला येतो, कर्जात वाढतो आणि कर्जातच मरण पावतो. शेतकरी व कर्ज यांची सांगड ही फार पुर्वी पासूनची आहे.

त्याचप्रमाणे नाशिक जिल्हा हा देखील शेतीप्रधान आहे. येथील समाज मोठयाप्रमाणात शेती या व्यवसायावर अवलंबुन आहे त्याचबरोबर लहान मोठे उद्योगधंदे औद्योगिक वसाहती आहेत. त्यात काम करणारा मजुर वर्ग आहे. त्यांच्या काही समस्या आहेत त्या समस्या सोडविण्याकरीता ज्या चळवळी झाल्या आहेत. त्यामध्ये शेतकरी चळवळ, व्यापार व उद्योगधंदे, सहकार चळवळ, सहकारी साखरकारखाने, जलसिंचनाच्या दिशेने वाटचाल इत्यादी. हया चळवळींमुळे समाजामध्ये बरेचसे परिवर्तन झालेले दिसते. त्यासाठी समाज सुधारकांनी, नेत्यांनी, राजकीय कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिले आहे.

**शेतकरी चळवळ :**

स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर कॉंग्रेस पक्ष होता. या पक्षाच्या मंत्रिमंडळाने 28 डिसेंबर 1948 रोजी कायदा करुन संरक्षित कुळांना जमिन विकत घेण्याचा अधिकार दिला होता. तेंव्हा शेतक-यांवरील हा अन्याय दुर करण्यासाठी नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यातील पुंजाबाबा गोवर्धन यांनी शेतक-यांना जागृत करण्याचे धोरण स्विकारुन गावोगावी पायी फिरुन प्रत्येक गावातील शेतक-यांच्या सभा घेऊन शेतक-यांना संघटित केले. 1952 मध्ये महाराष्ट्र राज्यात मोठा दुष्काळ पडला होता. इगतपुरी

तालुका अवर्षण ग्रस्त होता. या दुष्काळाच्या काळात जनता व गुरे ढोरे यांचे हाल होते. त्यावर उपाय म्हणून सरकार कडुन अन्नधान्य पुरविण्या करिता स्वस्तधान्य दुकानांची सोय करण्यात आली होती. हे गरजु लोकांसाठी असतांना देखील साठेबाज काळाबाजार करणा-या व्यापा-यांना जास्तीच्या भावात धान्य विकत होते. त्यामुळे गरिब शेतकरी यांची उपासमार होऊ लागली, त्यावेळी पुंजाबाबा गोवर्धन यांनी इगतपुरीच्या तहसिलदारांची भेट घेऊन परिस्थिती लक्षात आणून दिली होती.

**व्यापार व उद्योगधंदे:**

एकोणिसाव्या शतकापर्येंत नाशिकची अर्थव्यवस्था तीर्थक्षेत्रामुळे बहरत होती. त्यानंतर इतर व्यापाराने येथील बाजार पेठ काबीज केली. अनेक उद्योगांनी आपले पाय रोवले. त्यामुळे याज्ञिकीवरच विसंबून असलेल्या या शहरात व्यवसाय व उद्योगांनी आपले वेगळेपण सिद्ध करत यशस्वीपणे व्यापार व उद्योग विस्तारत नेला. आज किराणापासुन कापडबाजार, इलेक्ट्रॉनिक्स, मेडिकल व सराफ बाजार ही प्रचंड मोठा झाला आहे. याची कोटयावधी उलाढाल डोळे दीपवणारी आहे. एकेकाळी जळगावची सराफ बाजारपेठ ही राज्यातील सर्वात मोठी समजली जात होती. मात्र त्याहीपेक्षा मोठी बाजारपेठ नाशिक मध्ये तयार झाली आहे. किराणाची बाजारपेठ अहमदनगर, पुणे व जळगाव होती, पण आता नाशिकने त्यात मोठी उडी घेतली आहे. कापड बाजारासाठी सुरत व इंदूरचे नाव होते, पण आता नाशिकने त्यात आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. मोठमोठे मॉल, दुकानाचा नव्या वळणाचा थाटयाबरोबरच सेवा क्षेत्रातही नाशिक पुढे गेले आहे. येथील किरकोळ व्यापाराबरोबरच घाऊक व्यापाराची उलाढालही मोठी झाली आहे.

**सहकार चळवळ :**

शेतक-यांनी आपल्या शेतात उत्पादित केलेल्या शेतक-यांच्या शेतमालाची विक्री व्यापा-यांना करावी लागत होती. त्यामुळे शेतक-यांना उत्पादना करिता लागणारा खर्च वजा होता त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नव्हता. त्यात दलाल, अडते, व्यापारी यांचा नफा जास्त होता. तेव्हा त्यांच्या या वृत्तीला पायबंद घालण्याकरिता शेतमालाची खरेदी-विक्री जर सहकारी संस्था स्थापन करून केली तर शेतक-यांच्या उत्पादित मालाला योग्य भाव मिळेल. या विचारातून भाऊसाहेब हिरे यांनी 1948 मध्ये नाशिक जिल्हा सहकारी खरेदी –विक्री संघ स्थापन केला.या संघातून शेतक-यांना खते , बि-बियाणे,

किटकनाशके शेतीची अवजारे इत्यादी शेती करिता उपयोगी असणा-या वस्तुची संघामार्फत पुरवठा करण्यात येऊ लागला. पुढील काळात भाऊसाहेब हिरे यांनी जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील कार्यकत्यांच्या मदतीने शेतकी संघाची स्थापना केली.

**सहकारी साखर कारखाने**

कृषीप्रधान भारत देशात साखर उद्योग हा एक अतिशय महत्त्वाचा उद्योग आहे. देशाच्या एकुण साखर उत्पादनामध्ये महाराष्ट्राचा वाटा सुमारे 35 टक्के इतका आहे.

**1) गिरणा सहकारी साखर कारखाना :**

6 ऑगस्ट 1955 रोजी गिरणा सहकारी साखर कारखाना रजिस्टर करण्यात आला. या कारखाण्यांमुळे नाशिक जिल्हयातील मालेगाव व बागलाण परिसरातील खाजगी साखर कारखाना मालकाची एकाधिकार शाही संपली होती. या परिसरातील एक विकसित औद्योगिकिकरण झाले होते. त्यामुळे परिसरातील अनेक रिकाम्या हातांना रोजगार उपलब्ध झाला होता.

**2) निफाड सहकारी साखर कारखाना :**

नाशिक जिल्हयातील ऊस उत्पादनात दुस-या क्रमांकावर असलेल्या निफाड तालुक्यातही सहकारी तत्वावर कारखाना सुरु करण्याकरिता काकासाहेब वाघ व भाऊसाहेब हिरे यांनी निफाड येथे तालुक्यातील शेतक-यांची सभा घेऊन सहकार्य करण्यांचे आव्हान केले. यांच्या सहका-यांमुळे 26 जानेवारी 1960 रोजी अफाट परिश्रमाने कारखाण्याचे रजिस्टेशन मंजुर झाले व निफाड तालुक्यातील पिंपरी आणि पिंपळस या दोन खेडेगावांच्या मधील जमिन मिळवून कारखाना उभारण्यात आला. यामुळे अनेक कामगार व मजुर वर्गाला रोजगार मिळणार होता.

**3) कादवा सहकारी साखर कारखाना :**

कादवा नदीवर धरण बांधण्याची योजना ब्रिटिश काळापासुन होती. ऊनंदा नदीवर ओझरखेड गावाजवळ धरण बांधण्याची पाहणी सुरु केली होती. त्यावेळी यशवंतराव चव्हाण हे संरक्षण मंत्री होते. त्यांनी वरिल योजना बदलुन या परिसरातील सर्व नदयांवर एकच धरण बांधण्याची अधिका-यांना सुचना केली. परंतु या योजनेमुळे व दिंडोरी तालुक्यातील संपुर्ण सुपिक जमिन धरणाच्या पाण्याखाली जाणार होती. त्यामुळे येथील जनतेने नाशिक जिल्हयांचे तात्कालीन आमदार वसंतराव नाईक यांच्याकडे आपली समस्या मांडली होती. त्यांनी येथील जनतेच्या समस्या दिल्ली येथील मंत्रालयात माडली. त्यामुळे

तात्कालीन पाटबंधारे मंत्री श्री.रावयांनी प्रत्यक्ष पाहणी करून वाघाड, करजंवण, ओझरखेड व पालखेड अशी चार धरण बाधण्यांचे मान्य केले. तसेच दिंडोरी व कळवण तालुक्यांच्या पश्चिम भागातील गावे समाविष्ट करून कादवा सहकारी साखर कारखाना उभारण्याची योजना तयार करण्यात आली. ही योजना कार्यान्वित करण्यात राजाराम वाघ यांचा सिंहाचा वाटा होता. पुढे हया योजनेत बदल करून चांदवड तालुक्याचाही समावेश करण्यात आला. कादवा सहकारी कारखाना उभारण्यास मान्यता मिळाली. कारखाना उभारणीसाठी दिंडोरी तालुक्यातील मातेरेवाडी हे स्थळ निवडण्यात आले व त्याठिकाणी कादवा सहकारी साखर कारखान्याची उभारणी झाली आहे.

**जलसिंचनाच्या दिशेने वाटचाल :**

नाशिक जिल्हयातील कळवण, सुरगाणा, पेठ, इगतपुरी या तालुक्यांमध्ये जिल्हयातील इतर तालुक्यांपेक्षा जास्त पाऊस पडतो. इगतपुरी तालुक्यात काही मोठी धरणे आहेत तसेच कळवण तालुक्यात चणकापुर वगळता फार मोठी धरणे नव्हती. त्यामुळे या परिसरात चांगला पाऊस पडूनही उन्हाळयात पाण्याची टंचाई जाणवत होती. तसेच शेतीलाही बारमाही पाणी पुरवठा उपलब्ध होत नसल्याने शेती उत्पादनात वाढ होत नव्हती. तेव्हा शेतक-यांच्या या समस्येवर उपाय म्हणून जिल्हयातील काही व्यक्तीनी पुढाकार घेऊन विविध प्रकल्पाची आखणी करून या संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला. तसेच कळवण तालुक्यातील सुपले या गावाजवळ धरण बांधल्यास कळवण, सुरगाणा, मालेगाव, देवळा, सटाणा या तालुक्यातील किती क्षेत्र सिंचनाखाली येईल याची माहिती तज्ञांकडून मिळवून शासनाला त्याचे महत्व पटवून दिले. शासनाची मान्यता मिळाल्या नंतर त्यांनी धरणांसाठी लागणारी जमिन हस्तांतरित करुन विस्तापित होणा-या विविध गावातील जनतेचे पुनर्वसन करण्याचे काम केले. या धरणातून डावा व उजवा कालवा काढुन शेतक-याच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास हातभार लावला आहे.

**संदर्भ:-**

1) प्रा.डॉ.शामराव घाडगे,प्रा.दिगंबर सोनवणे, आधुनिक भारत
2) डॉ.जी.बी.शहा, 20 व्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास
3) विकिपीडीया

# नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्य काळातील दलित साहित्यिक

**प्रा. अनिता दिलीप कोळी**

*डांग सेवा मंडळ संचलित*

*कला व वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण, ता.सुरगाणा,जि.नाशिक*

## प्रास्ताविका

स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपले सर्व प्रश्न सुटतील अशी आशा पालवली, पण समस्या वाढत गेल्या. बेकारी, दारिद्रय, वाढती लोकसंख्या, जातीय दंगली, भ्रष्टाचार, जातीवर आधारित राजकारण आणि त्यामुळे जातींना प्राप्त झालेले महत्त्व, प्रतिगामी शक्तींचे थैमान, अत्याचार आणि दुष्काळ यामुळे सामान्य मागासवर्गीय लोकांचा स्वातंत्र्यावरील विश्वास संपुष्टात येऊ लागला. स्वातंत्र्यानंतरही सर्वसामान्य माणसांच्या रोजीरोटीचे न सुटलेले प्रश्न, त्याचबरोबर वाढत जाणारे दारिद्रय, अन्याय,महागाई आणि लोकसंख्या ह्यांमुळे सर्वसामान्य माणसाच्या मनात असंतोषाची बीजे रुजली. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, एक माणूस एक मूल्य ह्या तत्वाचा प्रसार, ज्ञान, विज्ञान आणि कायद्याच्या प्रसारामुळे सामान्य माणसाला संघर्ष आणि संघटनेची आवश्यकता भासू लागली. आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी लोकांच्या चळवळी मूळ धरू लागल्या. “लोकात रक्त विहीत मार्गाने सर्व प्रकारचे परिवर्तन घडवून आणून त्यांना दु:ख निरोधनाचा मार्ग दाखवणे म्हणजे चळवळी” ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रवाहातून प्रेरित होऊन नाशिक जिल्ह्यात अनेक साहित्यिकांनी क्रांतिकारी व आदिवासींच्या जीवनावर प्रकाश टाकणारे लेखन केले.यात बाबुराव बागूल व वामन कर्डक यांचे लेखन महत्त्वपूर्ण ठरते.

### 1) बाबुराव बागूल

बाबुराव बागूल यांचा जन्म 17 जुलै 1930 रोजी महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील ‘विहितगाव’ येथे झाला. आंबेडकरवादी साहित्यासाठी ओळखले जाणारे मराठी लेखक, कवी होते. विद्रोही आंबेडकरवादी कथांचे प्रमुख उद्गाते आणि प्रखर वास्तववादी कादंबरीकार तसेच शोषित, उपेक्षित, झोपडपट्टीतील, फुटपाथवरील भग्न जनजीवनाचे भेदक चित्रण करणारे लेखक म्हणून त्यांची ओळख होती. प्रभावी व विद्रोही भाषाशैली,जिवंत प्रसंगचित्रण,कारुण्य आणि क्रुरता रेखाटन हे त्यांच्या लेखनाचे विशेष गुण होते.दलित साहित्यामध्ये मोठे योगदान देणारे एक प्रतिभावंत लेखक साहित्यिक म्हणून बाबूराव बागूल यांना एक नवीन ओळख मिळाली आहे. त्यांनी लिहिलेल्या कथा कादंबऱ्या या

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

गावकुसाबाहेर राहणाऱ्या समाजाच्या सामाजिक जाणिवांचं वर्णन करणारे आहेत. स्त्रीप्रधान कथालेखन हा देखील त्यांच्या लिखाणाचा महत्त्वाचा भाग राहिलेला आहे. "सूड" कथेमध्ये बाबुराव बागूल यांनी वाडी-वस्तीवरील स्त्रीच्या हृदयद्रावक व तिच्यावर ओंढावलेल्या प्रसंगाचे चित्रण केलेलं आहे, या कथेतील स्त्री पात्र हे समाजातील स्त्रियांच्या शोषित पीडित स्त्रीच्या सामाजिक स्थितीचं चित्रण करणारे आहे.

माटुंग्याच्या लेबर कॅंम्प येथे राहत असताना तेथील महानगरपालिकेच्या शाळेत असताना डॉ. आंबेडकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी प्रथम इयत्ता चौथीच्या वर्गात असताना आंबेडकरगीत लिहिले. माटुंग्याच्या लेबर कॅंम्प मध्येच राहत असलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या संपर्कातून ते कामगार चळवळीत सहभागी झाले. या काळात त्यांनी साम्यवादी विचारवंताच्या साहित्याचा अभ्यास केला. बेरोजगारी, आर्थिक-सामाजिक विषमता यांविरुद्ध या कालखंडात त्यांनी रचलेल्या कवितांमधून या विचारांचा प्रभाव जाणवतो. 1879 मध्ये हेनरिक इब्सेन यांनी 'डॉल्स हाऊस' या नाटकातून 'नोरा' नावाची व्यक्तिरेखा घडवली. त्यामुळे युरोप, अमेरिकेतील स्त्रियांना नोरा म्हणजे आपणच आहोत किंवा तसे असायला पाहिजे असे वाटत होते. त्याच प्रकारे बाबुराव बागूल यांच्या 'विद्रोह' या कथेतील जयचंद राठोड हा देव देश आणि धर्मापेक्षा माणूस मोठा आहे; या विचाराने झपाटलेला आहे. तो परंपरेने लादलेले भंग्याचे काम नाकारतो. अशा प्रकारे समाज जागृतीसाठी जाणीवपूर्वक व योग्य लेखन हे आवश्यक असते.

1957 मध्ये प्रथमच त्यांची कथा आचार्य अत्रेंच्या 'नवयुग' नियतकालिकेतून प्रकाशित झाली. पुढील काळात 'नवयुग' व 'युगांतर' या नियतकालिकेतून त्यांच्या कथा एकामागून एक प्रकाशित होऊ लागल्या. प्रस्थापित समाजव्यवस्थेतील दोषाचे दर्शन घडवणाऱ्या त्यांच्या कथा 1963 साली 'जेव्हा मी जात चोरली होती' हा कथासंग्रहाच्या रुपाने प्रकाशित झाला. नंतर 1969 सालात 'मरण स्वस्त होत आहे' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. 'आंबेडकर भारत', दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान हे वैचारिक साहित्य रुपाने प्रकाशित झाले. 'वेदाआधी तू होता' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्याच प्रकारे 'अघोरी' (1983), 'कोंडी'(2002), 'पावशा'(1971), 'सरदार', 'भूमिहीन', 'मूकनायक', 'अपूर्वा', 'सूड' या कादंबरी रुपाने प्रकाशित झाल्या. या कादंबऱ्यांनी मराठी साहित्यात नवा प्रवाह आणला. बागुलांच्या लेखनामुळे प्रभावित झालेल्या दलित वर्गातील लेखक व त्यांच्या लिखणातून मराठी साहित्यात दलित साहित्य लेखनाची मोठी नवीन लाट आली.

**2) वामनदादा कर्डक**

वामनदादा कर्डक यांचा जन्म 15 ऑगस्ट1922 रोजी देशवंडी,ता. सिन्नर,जि. नाशिक येथे झाला 'सांगा आम्हाला बिर्ला बाटा कुठे आहे हो, सांगा धनाचा साठा न आमचा वाटा कुठे आहे हो' अशा कवनांनी

साम्राज्यशाहीला वामनदादांनी आव्हान दिले होते. वामनदादा यांचे पूर्ण नाव वामन तबाजी कर्डक असे होते. ते मराठी शाहीर, कवी आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते होते. त्यांच्या हयातीत त्यांचे चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले. कर्डकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर 10,000 हून अधिक गीते रचली आहेत. लोकशाहीर वामन कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या ओंजस्वी वाणीतून आणि समर्थ लिखाणातून महाराष्ट्राच्या घराघरात, खेड्यापाड्यात, वाडीतांड्यात पोहोचवण्याचे काम केले. बुद्ध, फुले, आंबेडकर यांचा विचार हा वामनदादांचा श्वास होता, ऊर्जा केंद्र होते. हे विचार प्रभावीपणे प्रसारित करत वामनदादा जिवनाच्या शेवटपर्यंत फिरत राहिले. त्यामुळे समाज जागृत होत राहिला.

वयाच्या 19-20 व्या वर्षी त्यांचे लग्न अनुसया नावाच्या मुली सोबत झाले. पुढे त्यांना मीरा नावाची मुलगी झाली. परंतु त्यांना त्यांची बायको सोडून गेली व आजारपणात मीराचेही निधन झाले. हा त्यांच्या जीवनातला फार मोठा धक्का होता, ते मिराचे दुःख कधीही विसरू शकले नाही. शिवडीच्या बीडीडी चाळीत राहत असतांना ते समता सैनिक दलात सामील झाले. इथपर्यंत त्यांना अक्षर ज्ञान नव्हते त्यांना लिहिता वाचता येत नाही म्हणून खूप अवघड वाटू लागले, ते देहलवी नावाच्या मास्तरांकडून बाराखडी, मुळाक्षरे हे शिकले . तेव्हापासून त्यांनी हळूहळू वाचन व लेखनास सुरुवात केली.

सन 1920 ते 1956 हा आंबेडकर चळवळीचा कालखंड होता. या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर वामनदादांनी फिरून समाजजागृतीचे काम केले होते. बाबासाहेबांबरोबर फिरत असताना आपल्या कवनांनी वामनदादानी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. वामनदादांनी 150 हिंदी, तर 100 पेक्षा अधिक मराठी गझल देखील लिहिल्या आहेत. वामन दादांनी केवळ आंबेडकरी चळवळीवर गझल लिहिलेल्या आहेत. ‘काय सांगू तुला वामन भीम माझा कसा होता, साथ थिगळाच्या बंडीला माझा खिसा होता’ अशा गझलांनी वातावरण भारून जात असे. वामनदादा यांनी पहिली गझल 1955 साली लिहिली, ‘माणसा इथे मी तुझे गीत गावे, असे गीत गावे तुझे हित व्हावे,एकाने हसावे लाखाने रडावे तुझे दुःख सारे गळुनी पडावे’.

1943 मध्ये राणी बागेत बसले असता वामनदादा कर्डक यांनी पहिले हिंदी गीताचे विडंबन गीत करायचे सुचले व ते त्यांनी 3 मे 1943 रोजी चाळीतील लोकांसमोर गाऊन दाखवले. लोकांनी प्रशंसा केली, टाळ्या वाजवल्या आणि वामन कर्डक कवी झाले. त्यानंतर 2004 पर्यंत कर्डकांनी गीतलेखनाचा व गायनाचा कार्यक्रम चालू ठेवला. त्यांची प्रकाशित आणि अप्रकाशित मिळून साधारणत: दहा हजारावर गीतरचना आहेत. त्यांनी काही चित्रपट गीतेही लिहिलेली आहेत. त्यानंतर चाळीसगाव, मनमाड,

टिळकनगर येथे त्यांनी आंबेडकरांच्या भाषणांच्या दरम्यान कवितांचे गायन देखील केले.

वामनदादा यांची साहित्याकडे वाटचाल त्यांनी 'वाटचाल' गीतसंग्रह (1973) 'मोहळ' गीतसंग्रह (1976) 'हे गीत वामनाचे' गीतसंग्रह (1977) हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. गद्य संपादन 'माझ्या जीवणाचं गाणं' (आत्मकथन) 1996 तसेच ध्वनिफीत व चित्रपट गीते 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट', 'भीमज्योत', 'जय जय भीम गीते', 'सांगा या वेडीला माझ्या गुलछडीला' (चित्रपट- सांगते ऐका) आणि 'चल ग हरणे तुरु तुरु' (चित्रपट- पंचारती) अन्य गीतरचना 'ह्यो ह्यो पाहुणा, शकुचा मेहुणा, तुझ्याकडे बघून हसतोय गं, काहीतरी घोटाळा दिसतोय गं' अशा अनेक काव्यांच्या,गझलच्या व विविध लेखनाच्या माध्यमातून त्यांनी समाज जागृती केली.

या लेखकांच्या जीवन कार्यावरून त्यांची सामान्य जनतेच्या विकासाची असलेली तळमळ ही दिसून येते व त्या दृष्टीने त्यांचे कार्य हे अमुल्य आहे. त्यांच्या या कार्यासंदर्भात शेवटी मी माझ्या स्वरचित शब्दात त्याचे ऋण व्यक्त करण्याचा अल्पशा प्रयत्न केला आहे .

धगधगत्या त्या अंधारात प्रकाश वाटा शोधत फिरती ||धृ||
फिरता फिरता ज्ञानाचा तो अथांग सागर समोर दिसती
त्या प्रकाशात साऱ्या जगतास न्हावून निघण्यास ते प्रेरित करती
धगधगत्या त्या अंधारात प्रकाश वाटा शोधत फिरती ||1||
त्या प्रकाशातून दिन दुबळयांच्या कष्टास ते वाचा फोडती
त्यांचे अज्ञान दूर करण्या शक्य ते सर्व प्रयास करती
धगधगत्या त्या अंधारात प्रकाश वाटा शोधत फिरती ||2||
प्रकाशाचा तो अथांग सागर लोटतो हो किनाऱ्या वरती
दिन,दुबळे,अज्ञानी त्यात सारे न्हावून निघती
धगधगत्या त्या अंधारात प्रकाश वाटा शोधत फिरती ||3||

**संदर्भ**

1) डॉ.अशोक जोंधळे व डॉ.शत्रुघ्न जाधव, आंबेडकर प्रतिभेचा महाकवी: वामनदादा कर्डक.
2) प्रा. डॉ. व्ही.पी. बिरारी, आधुनिक महाराष्ट्र
3) प्रा. डॉ.मालती इंगळे, बाबुराव बागूल व्यक्ती आणि वाङ्मय
4) www. Wikipedia

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# निः स्पृह समाजसेवक कर्मवीर दादासाहेब बिडकर

**प्रा. डॉ. रवींद्र मु .पगार**
डॉ. विजय बिडकर महाविद्यालय
अभोणे ता. कळवण जि. नाशिक

आधुनिक महाराष्ट्रात ज्यांच्या जीवनाचा शोध घ्यावा, महत्ता अजमावण्याचा प्रयत्न करावा तसेच निरनिराळ्या भागात सामाजिक जीवनात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालेल्या मोजक्याच व्यक्ती आहेत. अशा थोर पुरुषांच्या मालिकेत कर्मवीर दत्तात्रेय मल्हारराव बिडकर ऊर्फ दादासाहेब यांची गणना होते. श्री.मल्हारराव व पार्वतीबाई यांना दत्तात्रेय ऊर्फ दादासाहेबरूपी पुत्ररत्नाचा जन्म 19 मार्च 1910 रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील तासगाव या गावी झाला. परिस्थितीवर मात करीत खडतर परिश्रम करून त्यांनी विज्ञान शाखेपर्यंतचा शिक्षणक्रम पूर्ण केला. पुढे विद्यार्थी दशेतच काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीत त्यांनी स्वतःला वाहून घेतले.

महात्मा गांधी हे दादासाहेबांचे आराध्य दैवत होते. कारण त्यांच्या स्वतःच्या प्रेरणांना ते पोषक होते. 'सुधारणावाद आणि राष्ट्रवाद हे एकाच व्यासपीठावर हातात हात घालून पुढे गेले पाहिजेत' हे दादासाहेबांचे मत महात्मा गांधीजींच्या कार्यक्रमात मूर्त स्वरूपात प्रकट झालेले त्यांना दिसले. दरिद्री नारायणाची सेवा ,अस्पृश्यता निवारण, श्रमप्रतिष्ठेचे प्रतीक म्हणून खादीचा प्रचार इत्यादी रचनात्मक कार्यक्रमाची कलमे दादासाहेबांना मनोमन पटली होती.शहरे आणि खेडी यांच्यातील अंतर कमी झाल्याखेरीज देशाची प्रगती होणार नाही अशी दादासाहेबांची धारणा होती. महात्मा गांधीजींनी काँग्रेसच्या स्वयंसेवकांना पोशाखीपणा सोडून खेड्यात जा असा संदेश दिलेला होता म्हणून दादासाहेबांनी गांधीजींचे अनुयायित्व स्वीकारले. अन्यायाविरुद्ध निकराने लढा दिला पाहिजे अशी नैतिकतेची भूमिका त्यांना नेहमीच ग्राह्य वाटली. महात्मा गांधींच्या हरिजन सेवा व तळागाळातील समाजाचा उद्धार या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागात त्यांनी कार्य सुरू केले. स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीतही त्यांचा सक्रिय सहभाग होता, अनेक वेळा तुरुंगवास झाला.

१९४६ ते ५२ मध्ये ते बागलाण व चांदवड या मतदार संघाचे आमदार म्हणून निवडून आले. पुढे राजकारण थांबवून त्यांनी संपूर्णपणे आदिवासींच्या सेवेतच कार्यरत राहण्याचा निर्धार केला. 1932 च्या सुमारास स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतल्यामुळे दादासाहेब बिडकर यांना अटक झाली आणि त्यांची रवानगी धुळे येथील जेलमध्ये झाली. तेथे त्यांची विनोबा भावे यांच्याशी भेट झाली. विनोबाजी तुरुंगात सर्व सहकार्यांना मार्गदर्शन करीत.सत्याग्रहाची माहिती देत. सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान अशा प्रकारे कार्यकर्त्यांना समजत असे. यानंतर जवळजवळ दोन वर्ष बिडकर धुळे, विसापूर, येरवडा येथील तुरुंगात होते. तुरुंगातून सुटल्यावर गांधीजींच्या आदेशावरून 1934 मध्ये बिडकर बिहार मधील भूकंप ग्रस्तांच्या मदत कार्यासाठी

जागोजागी गेले. तेथे सेवा व मदत कार्य करताना त्यांना जीवन म्हणजे काय ? या बरोबरच मृत्यू म्हणजे काय ? याचे दर्शन घडले. धर्म, जातपात, पंथभेद याचे कोणतेही बंधन मृत्यूला नसते हे शाश्वत सत्य समजले. या अनुभवातून पुढे त्यांनी अस्पृश्यता निवारण या बरोबरच आदिवासींच्या उत्थानाचे कार्य हाती घेतले. डांग सेवा मंडळाची स्थापना केली. डांग सेवा मंडळ म्हणताच कर्मयोगी दादासाहेब बिडकर यांचे नाव घेतले जाते इतका त्यांच्या कार्याचा ठसा उमटला आहे. आदिवासींवरील अत्याचार, जुलूम त्यांचा मागासलेपणा घालविण्यासाठी स्वतः ला कार्यकर्त्यांबरोबर वाहून घेतले. आदिवासींवर दादासाहेबांचे प्रेम आणि महात्मा गांधींची समतेची शिकवण त्यांच्या ध्यानीमनी रुजलेली होती म्हणून त्या ओढीने जेव्हा दादासाहेब मुल्हेर येथे आले तेव्हा तेथील वास्तव्यात आदिवासींच्या दुःख दारिद्र्याने त्यांचे मन गलबलून आले. आदिवासींना अज्ञानातून बाहेर काढण्याचा त्यांनी निश्चय केला. तेथे त्यांनी झोपली झोपडीत जाऊन आदिवासींना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यास सुरुवात केली हे 1937-38 चे वर्ष होते.

शिक्षणाचा प्रसार हा दादासाहेबांच्या जीवनातील मानबिंदू. अंधश्रद्धा ,जादूटोणा यांनी वेढलेल्या आदिवासी समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे ओळखून दादासाहेबांनी 23 जून 1937 मध्ये डांग सेवा मंडळ संस्थेची ख्रिस्ती मिशनरी मिस् लॅथम यांच्या मदतीने पायाभरणी केली. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण हे शहरापुरते मर्यादित होते व विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. दादासाहेबांनी ग्रामीण व आदिवासी भागात प्राथमिक शाळा सुरू करून शिक्षणाचे दरवाजे पिढ्यान् पिढ्या अज्ञानाच्या खाईत आयुष्य जगणाऱ्या समाजासाठी उघडी करून दिली. ज्ञानाची गंगोत्री खेडोपाडी सुरू केली, बाहेरगावाहून शाळेत येणाऱ्या अनाथ दलित विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यासाठी विद्यार्थी वसतिगृहे, कन्या वसतीगृहे सुरू केली. आश्रमशाळा सुरू करून गरज असेल अशा प्रमुख ठिकाणी विद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये सुरू केली. नागरवेशीत अडकून पडलेल्या ज्ञान गंगेला खेडोपाडी विद्या मंदिराचे दरवाजे खुले करून आदिवासी भागाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविली. आज तेथे सरस्वती फळाफुलांनी बहरलेली दिसत आहे. डांग सेवा मंडळ संस्थेला वटवृक्षाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आदिवासी विकासाच्या इतिहासात 'डांग सेवा मंडळ' म्हणजे एक 'सोनेरी पान' आहे. तेथील 1937 पूर्वीचे जीवन आणि आज एकविसाव्या शतकातील तेथील आदिवासींचे जीवन यात आमूलाग्र बदल घडून आला आहे.आदिवासींच्या विकासाला शिक्षणाची जोड मिळाल्याने त्याला गती मिळाली. समाज परिवर्तन, व्यापारवाढ, राजकारण, नोकऱ्या, उद्योग-व्यवसाय आणि महिलांची प्रगती या सर्व क्षेत्रात आदिवासी बांधवांचा सहभाग वाढून त्यांची घोडदौड प्रगतिपथावर असलेली दिसून येते. आदिवासींच्या या प्रगतीसाठी डांग सेवा मंडळाच्या माध्यमातून दादासाहेब बिडकर यांचे अमोल कार्य झालेले आहे. सर्व कार्यकर्त्यांची कामाची सुरुवात या मंडळातून झाली. त्यामुळे डांग सेवा मंडळ म्हणजे अनेक समाजसुधारक, राजकारणी व समाजसेवकांचे 'माहेरघर' म्हटले जाते.

डांग सेवा मंडळाचा इतिहास अतिशय स्फूर्तीदायक असा आहे. डांग सेवा मंडळाच्या 1937 सली झालेल्या स्थापनेपासून मंडळाचे काम वाढत गेले. सामाजिक, शैक्षणिक तसेच कायद्याची माहिती, दारूबंदी, स्वदेशी भावना जागृती, मुला-मुलींचे शिक्षण इत्यादी अनेक कामे मंडळाने सुरू केली. असंख्य सुशिक्षित

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

आदिवासी तरुणांचा यात सहभाग वाढीस लागला. डांग सेवा मंडळाच्या सभासदांमध्ये अनेक थोर माणसे येत गेली. त्यात डांग सेवा मंडळाचे अध्यक्ष संस्थापक कै.श्री. दादासाहेब बिडकर यांच्या समवेत कै. दादासाहेब पोतनीस,कै. भाऊसाहेब हिरे, लालचंद हिराचंद वैकुंठभाई मेहता, सरदार विंचूरकर वामनराव यार्दी पंडित धर्मा पाटील, श्री होमी तल्यार खान इत्यादींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांचे या मंडळाला सदैव मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले. डांग सेवा मंडळाने आदिवासी भागात अनेक उत्तोमत्तम कार्यकर्ते तयार केले आहेत. तसेच मंडळातून शिकून तयार झालेले असंख्य आदिवासी तरुण आज शासनात मोठमोठ्या हुद्द्यावर काम करीत आहेत. अनेक जण लोकप्रतिनिधी म्हणून शासनात काम करीत होते आणि अनेक आज काम करीत आहेत. यामध्ये आदिवासी मंत्री कै. ए. टी.पवार ,कै. खासदार कहांडोळे , खासदार माणिकराव गावित, माजी आमदार जीवा पांडू गावित, कै. खासदार कचरूभाऊ राऊत, कै. खासदार हरिभाऊ महाले ,खासदार कै. सिताराम भोये असे अनेक लोक मंडळातून वेळोवेळी शिकून तयार झालेले आहेत.

डांग सेवा मंडळाच्या आजमितीला 05 इंग्लिश मीडियम स्कूल, 07 आश्रमशाळा, 11 वसतीगृहे, 05 माध्यमिक शाळा, 04 कनिष्ठ महाविद्यालये, 04 वरिष्ठ महाविद्यालये आहेत.

सावकार आणि जमीनदारांच्या पिळवणुकीतून आदिवासींची सुटका व्हावी यासाठी दादासाहेबांनी 'धान्य कोठार योजना' सुरू केली. त्याद्वारे धान्य पुरवठा व्हावा बियाणे वेळेवर मिळावे हा योजनेचा हेतू होता. वन खाते, महसूल खाते यांच्या जुलूमांपासून आदिवासींना वाचविण्यासाठी 'जंगल कामगार सोसायटी'ची स्थापना केली. दादासाहेबांचे 'जंगल' या विषयाचे ज्ञान प्रचंड होते. त्यांच्या कपाटात निरनिराळ्या देशातील फॉरेस्ट्रीची पुस्तके, मासिके, पुस्तके यांचा भरणा असे. कॅनडा, स्वीडन आफ्रिका खंडातील जर्नल्स व मासिकांचे ते नियमित वाचन करीत. जपानमधील बांबू उद्योगाविषयी तर त्यांचे नेहमी चिंतन असे. त्याकरिता आपण जपानला जावे व पाहणी करावी असे नेहमी त्यांच्या मनात वाटे परंतु पैशाची सोय होत नसे शेवटी त्यांनी पैसे जमविले आणि 1971 मध्ये भारत-जपान संघटनेमार्फत त्यांना जपानला जायची संधी मिळाली. त्यांनी चार आठवडे जपानचा दौरा केला. त्यानंतर परतल्यावर बांबू पासून वेगवेगळया वस्तू बनविण्याची मशिनरी जपान मधून मागविण्याची धडपड सुरू केली. बांबूवर आधारित उद्योग चालू हवा म्हणून नासिक औद्योगिक वसाहतीत बार्हे जंगल सोसायटीमार्फत जागा मिळवली व काम सुरू केले. परंतु तो उद्योग फारसा चालू शकला नाही मात्र त्यांची बांबू उद्योगाची धडपड मात्र कमी झाली नाही. त्यांचे बांबू विषयीचा अभ्यास प्रचंड होते हे मात्र नक्की.

नाशिकचे श्री.दादासाहेब फाळके यांना चित्रपट सृष्टीचे जनक म्हणून ओळखले जाते तसेच श्री.दादासाहेब बिडकर यांना नाशिक मधील जंगल कामगार सहकारी सोसायट्यांचे जनक म्हणून संबोधले जाते. त्यांनी जंगल कामगार क्षेत्रातील पहिली जंगल कामगार सहकारी सोसायटी नाशिक जिल्ह्यात प्रथम स्थापन केली. त्यांचे सहकारी श्री. धर्माजी गायकवाड हे बार्हे विभाग जंगल कामगार सहकारी संघाचे पहिले चेअरमन होते.तर पहिले सेक्रेटरी श्री. रामचंद्र चिंतामण उर्फ कुलकर्णी मास्तर होते. त्यांच्या या

कार्यामुळे त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांनी श्री. दादासाहेब बिडकर श्री. धर्मा गायकवाड आणि कुलकर्णी मास्तर यांचा सन्मान केला. श्री. खेर यांच्या आदेशाचे पालन झाल्याचे पाहून तसेच सहकारी संस्थांमार्फत आदिवासींमध्ये विधायक कार्य आणि विधायक नेतृत्व निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश सफल झाल्याचे पाहून त्यांना समाधान वाटले होते. नाशिक जिल्ह्यात 32 आणि धुळे जिल्ह्यात 07 जंगल कामगार सहकारी संस्था पुरस्कृत केल्या गेल्या. पुरस्कृत करणारी अभिकर्ता संस्था म्हणून डांग सेवा मंडळाची कामे 10/06/1964 रोजी स्थापन अभिकर्ता संस्था म्हणून स्थापन झालेल्या नाशिक जिल्हा जंगल कामगार संयुक्त सहकारी संघ लिमिटेड नाशिक आणि धुळे जिल्हा जंगल कामगारांच्या सहकारी संस्थांचा सहकारी महासंघ यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. या सहकारी संस्थांचे कार्यकर्ते डांग सेवा मंडळाचे सभासद आणि हितचिंतक असल्यामुळे या जंगल कामगार सहकारी संस्था आणि डांग सेवा मंडळ यांच्यामधील संबंध चांगले राहू शकतील याची शक्यता लक्षात घेतली गेली. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात डांग सेवा मंडळाने 5 गृहनिर्माण सहकारी संस्था 19 बहुउद्देशीय विविध कार्यकारी सहकारी संस्था 01 सहकारी पतपुरवठा करणारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, 01 संयुक्त कृषी सहकारी संस्था स्थापन करण्यात आणि विकसित करण्यात हातभार लावला आहे.

दादासाहेब एक सर्वोदयी नेते होते. लोकशाही समाजवादावर त्यांची श्रद्धा होती. त्यानुसारच त्यांनी शिक्षणाचा विचार केला आहे, महात्मा गांधी, विनोबा भावे यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या विचारांवर होताच पण त्याचबरोबर पाश्चात्य राष्ट्रांमधील विज्ञाननिष्ठेचे व संशोधन प्रवणतेचे ते पुरस्कर्ते होते. मुलांवर नैतिक संस्कार होतील असे शैक्षणिक वातावरण निर्माण होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. दादासाहेबांच्या कार्याला महाराष्ट्राच्या इतिहासात तोड नाही त्यांना अनेक थोर माणसांचा सहवास लाभला. विनोबा भावे, मोरारजी देसाई, शंकरराव देव ,वैकुंठभाई मेहता, भाऊसाहेब हिरे ,यशवंतराव चव्हाण आणि दादासाहेब पोतनीस अशी अनेक माणसे त्यांनी मित्रत्वाने जोडली. दादासाहेब पोतनीस त्यांचे जिवलग मित्र होते.

दादासाहेबांना अनेक पुरस्कार लाभले शासन व विविध सामाजिक संस्थांनी दलित मित्र (महाराष्ट्र शासन), आदिवासी सेवक (महाराष्ट्र शासन) ,सारडा प्रतिष्ठानचा नंदिनी ,नाशिक महानगरपालिकेकडून नाशिक भूषण, पुणे विद्यापीठाकडून जीवन साधना, डांग सेवा मंडळ संस्थेला महाराष्ट्र शासनाचा उत्तम संस्था पुरस्कार यांचा समावेश आहे. त्याखेरीज भारतीय आदिम जाती सेवक संघ नवी दिल्ली या भारतातील आदिवासी संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थेचे ते आठ वर्षे उपाध्यक्ष होते.

दादासाहेबांनी समाजाची निष्काम सेवा केली. वृध्दापकाळाने गात्र थकलेली असतानाही आदिवासी गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत ज्ञान गंगा कशी पोहोचेल हाच ध्यास मृत्यूपर्यंत म्हणजे वयाच्या ९५ वर्षांपर्यंत सदैव मनाशी बाळगला.दि. १२ मार्च २००५ रोजी दादासाहेबांचे दुःखद निधन झाले.

दादासाहेबांच्या समाजकार्याचा वारसा कै.डॉ.विजय बिडकर यांच्याबरोबरच डांग सेवा मंडळ संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती हेमलता बिडकर,उपाध्यक्ष श्री.दामु पांडु ठाकरे,सचिव सौ. मृणाल जोशी व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी समर्थपणे चालविला आहे

**संदर्भ सूची**


1. धारणकर सरल,आदिवासी सेवक दादा बिडकर,डांग सेवा मंडळ नाशिक
2. दीक्षित सदाशिव,डांगचा सिंह ,सदाशिव दीक्षित प्रकाशन पुणे
3. धारणकर सरल,दादासाहेब बिडकर वसा: आदिवासी सेवेचा, राजहंस प्रकाशन पुणे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# स्वातंत्र्य चळवळीत येवला तालुक्याचे योगदान

**प्रा. अजय एकनाथ अहिर**
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग
महाराजा सयाजीराव गायकवाड कला,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव

भारतातील प्रत्येक भागात स्वातंत्र्य चळवळीचे लोण पोहोचले होते. मुंबई प्रांत हा स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर होता. अनेक क्रांतिकारक, स्वातंत्र्य योद्धे, समाजसुधारक मुंबई प्रांतातून पुढे आले होते. या प्रांतातच व्यापारासाठी प्रसिद्ध असलेले येवला गाव स्वातंत्र्य चळवळीने प्रभावित झाले होते. सशस्त्र उठाव, जहाल राजकारण आणि सत्याग्रही आंदोलन अशा तिन्ही प्रवाहांनी गतीशील स्वातंत्र्य चळवळ येवल्यात सुरू झाली. क्रांतिकारक आंदोलनापासून सनदशीर गांधीवादी राजकारणापर्यंत येवले कोणत्या सामाजिक, आर्थिक वैशिष्ट्यासह गेले त्याचा ऊहापोह प्रस्तुत निबंधात केला आहे.

१८५७ मधील स्वातंत्र्यसंग्राम अयशस्वी ठरल्यावर शस्त्रबळावर इंग्रजांना या देशातून हाकलून लावणे शक्य नाही, याची जाणीव भारतातील विचारवंतांना झाली. देश स्तंत्र करण्यासाठी मोठ्या प्रमाणता जनजागृती व जनआंदोलन हेच सनदशीर मार्ग शिल्लक राहिले होते. १८८४ ते १९२ हे प्रामुख्याने लोकमान्य टिळकांचे पर्व होते. येवल्यात या पर्वातच 'अभिनव' भारताचा गटही संघटित झाला. येवल्यात शंकरराव वाघ, अण्णासाहेब दाणी, डॉ. साठे, वामनशास्त्री दातार इत्यादी सावरकरांचे अनुयायी होते.

**राजकीय जागृती**

सेनापती बापट यांनी केलेल्या मुळशी सत्याग्रहामुळे येवले तालुक्यात राजकारणाचे वारे वाहू लागले. आपटे गुरुजी व वैशंपायन गुरुजी तालुक्यातून प्रथमतः स्वातंत्र्य प्राप्तीसाठी तुरुंगात गेले. लो. टिळक व महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने १९२१ मध्ये 'टिळक विद्यालय येवले' या राष्ट्रीय शाळेची स्थापना करण्यात आली.येवल्यात राष्ट्रीय स्वतंत्र्याच्या संस्थात्मक चळवळीला प्रारंभ टिळक राष्ट्रीय विद्यालयाच्या स्थापने पासून झाला.इ.स १९२१ ते १९३२ असे एक तप हे विद्यालय स्वातंत्र्याच्या ध्येयवादाने कार्यरत होते.नव्या मध्यम वर्गातील जहालमतवादी तरुणांनी पुढाकार घेतला होता त्यामध्ये डॉ साठे ,श्री वाघ वकील,डॉ भट, श्री.व. के.दातार,श्री बच्चू हलवाई हे अग्रेसर होते.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

येवले शहर राजकीयदृष्ट्या जागृत शहर म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध होते. अभिनव भारत चळवळीने येवल्याचे नाव महाराष्ट्रातील जहाल केंद्र म्हणून पुढे आणले. या क्रांतिकारी केंद्रात महाराष्ट्रातील विविध राजकीय प्रवाह येऊ लागले. टिळक विद्यालयसांस्कृतिक राष्ट्रवादाचे केंद्र म्हणून उदयास आले. येवल्याच्या स्वातंत्र्य आंदोलनात ब्राम्हण, खत्री, नागपुरे, कोष्टी, भोई, शिंपी, निऱ्हाळी, साळी, गुजराथी-पाटीदार, परदेशी, राऊळ-राऊत अशा निरनिराळ्या जातीतून विशेषतः विणकर जातीतून स्वातंत्र्यसैनिक निर्माण झाले. या सर्वात टिळक विद्यालयाने प्रेरणा दिली, मार्गदर्शन केले.

येवल्यातील वनिता संघाची चळवळ आणि स्त्री कार्यकर्त्या यांनाही प्रेरणा राष्ट्रीय विद्यालयाने दिली. यामध्ये राधाबाई आपटे, कमळाबाई वाडेकर, उषाताई महाजन या कार्यकर्त्या पुढे आल्या.

**आपटे गुरुजींचे योगदान**

पांडुरंग श्रीधर आपटे यांचा जन्म येवल्या मध्ये इस १८९० साली झाला.येवल्यातील लोक त्यांना आपटे गुरुजी या नावाने संबोधत.आपटे गुरुजी हे येवल्यातील स्वातंत्र्य चळवळीचे नेते होते.आपटे गुरुजींनी धार्मिक संस्काराची जोडणी हि समतावादी मूल्यांशी केली. आपटे गुरुजींचे योगदान म्हणजेच येवल्याच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आहे. गुरुजींनी १९२३ साली मुळशी सत्याग्रहात भाग घेतला. यासाठी त्यांना ४ महिने तुरुंगवास घडला. टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापकपद स्वीकारून त्यांनी अनेक सत्याग्रही निर्माण केले. येवल्यात राष्ट्रवादाची विचारसरणी रुजवण्याचे महत्त्वाचे कार्य गुरुजींनी केले. येवल्याच्या शैक्षणिक सांस्कृतिक व राष्ट्रीय घडणीत आपटे गुरुजींचा फार मोठा वाटा होता.

**सत्याग्रही जनआंदोलन**

नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याच्या खुनाच्या खटल्यात डॉ. विष्णू महादेव भट यांना ५ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. पंडितराव बर्वे, विष्णू कुलकर्णी, काशिनाथ टोणपे हे सर्व क्रांतिकारी सैनिक होते. सशस्त्र चळवळ येवल्यात पाय रोवू शकली नाही. सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग अवलंबण्यात सुशिक्षित मध्यम वर्गातील ब्राम्हण तरूण पुढाकारावर होते. ब्रिटिश सत्तेचा मुकाबला शेतकरी-श्रमिक जनतेच्या मागण्यांभोवती लढे संघटित करून होऊ शकला असता परंतु या बुद्धिजीवी वर्गास या प्रकारच्या जनआंदोलनाचा वारसा भारताच्या जाती व्यवस्थेने उपलब्ध होऊ दिला नव्हता. अशा परिस्थितीत वैयक्तिक स्तरावरील सशस्त्र प्रतिकाराचा मार्गच त्यांना उपलब्ध होता. शिक्षण, आर्थिक विकास आणि राजकीय जागृती यांच्या विकासामुळे समाजातील शेतकरी व मागास जातीतून नवे वर्ग उदयास येण्यास प्रारंभ झाल्यावर त्यांच्या असंतोषाची दखल घेणे राष्ट्रसभेला आवश्यक झाले. म. गांधींना म्हणूनच आपल्या लढ्याची पद्धती व तंत्रे बदलावी लागली. गांधीजींच्या

असहकार लढ्यात येवल्यातील उच्चशिक्षित तरूण हिरीरीने सहभागी झाले. परंतु हा असहकाराचा कार्यक्रम मध्यमवगर्गियांपुरताच मर्यादित राहिला. मागास जाती व कनष्ठि वर्ग या लढ्यात सहभागी झाला नाही.

नाशिक जिल्हयात येवला हे कापड उद्योगाचे प्रमुख केंद्र होते रेशमी पासून १७०३ स.इ येवल्यात. च गुजरात यांनी नाईक राघोजी.झाली सुरुवात वापराला कापडाच्याे एक वाणी शामदास वालजी यांना सांगितले कि रेशीम येवल्यात पासून तेव्हा.करावी वसाहत येथे येवला करणाऱ्याची विणकाम सिल्कचे त्यांनी, .झाली सुरुवात मालाविणकायेवल्यात २००० लूम होते त्यावर मुसलमान मजूर काम करीत असत.२००० मजुरांपैकी ९०० मोमिन विणकर आणि ११०० वाराणसीचे मुसलमान होते.मोमिन विणकर हे १८५७ च्या क्रांतीनंतर तर बनारसी मुसलमान हे इ.स १८६४ च्या बंगालच्या दुष्काळानंतर आले होते. नाशिक जिल्हयात रंगकाम करणारे २०० ते २५० कुटुंबे होती घरे ५० ते ४० आणि मालेगावात १२५ तयेवल्या यापैकी. जि संपूर्ण कि येते लक्षात यावरून.होतील्हयातील २०० रंगकाम करणारी कुटुंबे फक्त येवला व मालेगाव या दोन तालुक्यात केंद्रित झालेली होतीयेते प्रचीती याची होते अग्रेसर किती उद्योगात कापड तालुके दोन्ही हे. वनस्पतीपासून नैसर्गिक .होते ज्ञान पारंपारिक बनविण्याचे रंग कुटुंबांकडे करणाऱ्या रंगकाम या. निरनिराळे रंग बनविले जात असतनिळ्या रंगाचे काम करणारे मुस्लिम कारागीर हे मारवाड . होते मधून आले .

येवले शहरातील कापड उद्योगापुढे ब्रिटीश आर्थिक धोरणाने संकट उभे केले होते. गांधी प्रणीत बहिष्कार धोरणामुळे साळी,कोष्टी,निऱ्हाळी,नागपुरे,या विणकर जातीतील कारागीरांच्या उपजीविकेला संरक्षण मिळण्याची शक्यता निर्माण झाली. परिणामी या जात गटात मोठ्या प्रमाणावर तरुण १९३० च्या आंदोलनात सहभागी झाले.ब्रिटीश अधिकाऱ्याला लक्ष बनवून शासकीय दहशतवादाला दहशतवादाने प्रत्युत्तर देण्यात तत्कालीन उपयोगिता होती. त्यामुळे पराकोटीचा त्याग,राष्ट्रासाठी हौतात्म्य स्वीकारण्याचा ध्येयवाद हि मूल्ये ठसविली जात होती. परंतु हि उपयोगिता मर्यादित होती.समाजातील कायदा, व्यापार,शिक्षण, कुटुंब जीवन या सर्व क्षेत्रातून शासन विरोधात प्रतिकार उभा करण्याचे सामर्थ्य त्यात नव्हते. ब्रिटीश आयात धोरणाने उध्वस्थ होणारे विणकर, शेतीसाऱ्याने संतप्त शेतकरी, कापड उद्योगातील असंतुष्ट जनसामान्य या सर्वांना कृतीचा समान कार्यक्रम देण्याची व्यूहरचना क्रांतिकारकांच्या कार्यक्रम पत्रिकेत नव्हती.त्यामुळे इ.स. १९२५-३० नंतरच्या कालखंडात येवले परिसरातून क्रांतिकारक चळवळ प्रभावहीन झाली त्याच बरोबर सांस्कृतिक राष्ट्रवादी टिळक राष्ट्रीय शाळेचे स्थित्यंतर उदारमतवादी गांधीवादी विनय मंदिरात होण्यास प्रारंभ झाला.

**स्त्रियांचा सहभाग** : येवल्यातील राष्ट्रीय चळवळ महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारी होती. या

चळवळीतून राधाबाई आपटे,कमलाबाई वाडेकर, उषाबाई महाजन,नलिनीताई दानी, सुभद्राबाई पटेल, या स्त्री कार्यकर्त्या निर्माण झाल्या.या स्त्रियांच्या सहभागामागे त्यांच्या पतीचा व कुटुंबाचा वाटा मोठा आहे. राधाबाई आपटे यांनी 'उमटलेली पावले' या आपल्या आत्मचरित्रातून येवल्यातील स्वातंत्र्या चळवळीची माहिती देतात. कमलाबाई वाडेकर आणि सहकारी स्त्रिया संगमनेर येथे बंदीहुकूम मोडून हनुमान जयंतीची मिरवणूक शहरातून काढतात.पारंपारिक धार्मिक अस्मिता आणि आधुनिक राष्ट्रीय अस्मिता यांच्या संयोगाने साकार होणाऱ्या उपक्रमातून स्त्रियांना अभिव्यक्तीचा अवकाश प्राप्त झाला. दारू अथवा परदेशी मालाच्या दुकानावरील पिकेटिंग हा कार्यक्रम स्त्रियांच्या सहभागाला संधी देणारा होता.इ.स १९३० सालच्या चळवळीत तर पिकेटिंग मध्ये फक्त स्त्रियांनीच भाग घ्यावा असा निर्णय कॉंग्रेसनेघेतला होता.पिकेटिंग हा उपक्रम गावाच्या सीमेतच पार पाडता येऊ शकेल असा होता त्यामुळे दैनदिन घरकाम आणि बालसंगोपन या जबाबदाऱ्या पार पाडून पिकेटिंग करता येऊ शकत होते त्यामुळे येवल्यात मोठ्या प्रमाणात स्त्रिया पिकेटिंग या उपक्रमात सहभागी झाल्या. येवल्यातील असहकार आंदोलनात स्त्रियांचा सहभाग मोठा होता. या राजकीय सहभागाचा वारसा पुढे स्त्रियांच्या वनिता संघाच्या रूपाने विकसित होऊ शकला.

येवल्यात आर्य समाज आणि सत्यशोधक समाज यांच्या धर्म सुधारणा चळवळी देखील सुरु होत्या. येवल्यात आर्यसमाज स्थापनेच्या प्रारंभी जोरदार वादविवाद झाले.आर्यसमाज सनातनी धर्मवाद्यांच्या विरोधात स्त्री शिक्षण,विधवाविवाह,जातीभेद निर्मुलन यांचा पुरस्कार करीत होता. त्यासाठी वैदिक धर्म परंपरेचा सुधारक अर्थ लावत होता. आर्य समाजाच्या वाद्सभानी प्रारंभी सनातनी वर्गात खळबळ माजली.अनेक सुधारणावादी कार्यक्रम आर्य समाजाने येवल्यात राबवले. हि सुधारणा चळवळ येवल्यात मर्यादित राहिली कारण शेतकरी,विणकर,बलुतेदार,आणि दलित जातींचे आर्थिक आणि सामाजिक दास्यांचे प्रश्न जातीय उत्पादन संबंधाशी जोडले गेले होते त्यामुळे हे लोकसमूह आर्य समाजाच्या चळवळीची वाहक शक्ती बनू शकले नाहीत. सत्यशोधक चळवळीचा सुद्धा येवल्यात प्रभाव होता. भालेकर,गणपतराव,आणि मुकुंदराव यांचा येवल्यातील सत्यशोधक चळवळीशी संबंध होता. येवल्यातील राघव भूषण च्या शिळाप्रेसवर दिनमित्र मासिक छापले जात होते.

नाशिक माधिल येवला हे महत्वाचे आर्थिक केंद्र होते त्यामुळे येवल्यातील स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास हा आर्थिक जडण घडणी च्या दृष्टीने देखील महत्वाचा आहे.

संदर्भ :

१) नाशिक जिल्हा गैजेटीअर,महाराष्ट्रशासन प्रकाशन, १९७६
२) जिजीविषा : स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास : १९वे शतक, स्त्रीअभ्यास केंद्र,समाजशास्त्र

विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे मार्च १९९६

३) फडके,य.दि,विसाव्या शतकातील महाराष्ट्र,खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

४) ऑमव्हेट गेल, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड,सुगावा प्रकाशन,१९९५

५) आपटे गुरुजी जन्मशताब्दी वर्ष, येवले द्वारा प्रकाशित “पुरुषोत्तम”,१९८६

६) डॉ. सिद्दीकी इलियास,पेशवाईतील एक प्रमुख हिरा नारो शंकर राजेबहाद्दर आणि मालेगावचा इतिहास( अनु) मेहमूद शेख,प्रशांत पब्लिकेशन,जळगाव,२०१८

७) डॉ.ढेकणे,के.डी,महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी, अथर्व पब्लिकेशन, जळगाव,२०१५

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# वंचित घटकांचा साम्यवादी आणि मार्क्सवादी विचार – एक अभ्यास

**प्रा.योगिता रविंद्र मठपती**
**मुधोजी महाविद्यालय, फलटण, इतिहास विभाग**

**इतिहास या विषयाचे आकलन करण्यासाठी अनेक विषयांच्या, संकल्पनांचा अभ्यास करावा लागतो. आज तत्त्वज्ञानाच्या आधारे इतिहासाविषयी अनेक दृष्टिकोन पहावयास मिळतात. यामध्ये प्रामुख्याने साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, केंब्रिज सबाल्टन (वंचित) व स्त्रीवादी असे अनेक दृष्टिकोन आहेत. लोकशाहीच्या काळात राजकीय व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याचे व दुसरी राजकीय व्यवस्था प्रस्थापित करणारी, 'भारतीय राष्ट्रीय चळवळीला' विशेष महत्व आहे. कारण या चळवळीमध्ये वैचारिक सिद्धांत व तांत्रिक स्तरावर मोठा संघर्ष करून ही चळवळ घडत असताना, जो विविध स्तरावर वैचारीक संघर्ष झाला त्यातूनच अनेक दृष्टिकोन निर्माण झाले. श्रेष्ठ पुरुषांची चरित्रे, लोककथा, नैतिक मूल्य व त्याचे स्पष्टीकरण, घटनांच्या शृंखला व मानवी अविष्कार अशा विविध दृष्टिकोनातून इतिहास लिहिण्याचा मोठा यशस्वी प्रयत्न झाला. आधुनिक भारतातील इतिहास लेखनामध्ये विशिष्ट पद्धतीने इतिहास यांचा विचार करण्याची सवय, गृहिते, पद्धती सैद्धांतिक भूमिका यांच्या आधारे इतिहास लेखन केल्यामुळे वसाहतवादी राष्ट्रवादी, मार्क्सवादी, स्त्रीवादी, वंचित, साम्राज्यवादी अशा अनेक पातळ्यांवर लेखन केले गेले आहे.** [1]

नाशिक जिल्ह्याची ऐतिहासिक पाश्वर्भूमी-

**नाशिक जिल्ह्याच्या अस्तित्वाचा उल्लेख पुरातन काळातील पाषाण युगापासून केला जातो. तसेच पौराणिक उल्लेखानुसार थेट रामायण काळाशी संबंध येतो. प्रभू रामचंद्राने मुख्यत्वे बारा वर्ष नाशिक परिसरात गोदावरीच्या काठी पंचवटीत वास्तव्य केले. नाशिक शहर हे प्राचीन काळापासून तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. पवित्र गोदावरीच्या तीरावर वसलेले नाशिक हे शहर पुण्यभूमी.... हिंदूं चे पुण्यक्षेत्र..... ज्या ठिकाणी दर बारा वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा साजरा केला जातो.....)**[2]

**हजारो साधुसंत त्या काळात या ठिकाणी वास्तव्याला येतात. लाखो-करोडोंच्या संख्येने श्रद्धाळू त्यादरम्यान नाशिक पुण्यक्षेत्री पतित-पावन होण्यासाठी गर्दी करतात.**

**असे हे पुण्य क्षेत्र म्हणजे 'नाशिक' होय. नाशिक जिल्ह्याचा विचार करता ऐतिहासिक वारसा तर या शहराला लाभलेला आहेच पण, सोबतच अगदी रामायणातील और पौराणिक काळाशी ही नाशिकचा फार मोठा संबंध आहे. रामायण या महाकाव्यानुसार, 'लक्ष्मणाने रावणाची बहीण शूर्पणखा हिचे नाक कापले होते' त्यामुळे या जागेचे नाव 'नाशिक' असे पडले. अशी एक पौराणिक कथा सांगितली जाते.**

**नाशिकला पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक असे अनन्यसाधारण महत्त्व**

**आहे. नाशिक जिल्हा हा शेतीप्रधान जिल्हा असून येथील बहुतांश लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहे. या शिवाय येथील लोकांनी स्वतंत्र चळवळीतील अनेक लहान मोठ्या चळवळीमध्ये सहभाग घेतला होता. विसाव्या शतकामध्ये नाशिक जिल्ह्यातील अनेक लोक स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी होऊन त्यांनी हा लढा यशस्वी केल्याचे दिसून येते. याशिवाय नाशिक जिल्ह्याला अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती देवून नाशिक जिल्ह्याचे नाव अजरामर केले त्यामध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्यवीर सावरकर, अनंत कान्हेरे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, दादासाहेब पोतनीस, बाबूभाई राठी, वि. वि. शिरवाडकर, वसंत कानेटकर इ. चा समावेश होतो. नाशिक जिल्ह्याला मिनी महाराष्ट्र असेही म्हटले जाते.** [3]

**द्राक्ष, कांदा, डाळिंब तसेच ऊसाचे पीक येथे मोठ्या प्रमाणात घेतले जाते. समाज म्हटला की तेथे भेदाभेद हा दिसून येतो. अशा समाजातील भेदाभेद नष्ट करण्यासाठी समाजातील अनेक थोर नेत्यांनी, सर्वांना समान हक्क मिळण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. नाशिक जिल्ह्यामध्ये अनेक औद्योगिक वसाहती असल्यामुळे तेथे भांडवलदार व मजूर हे वर्ग असल्याचे दिसून येते. त्यांच्यामध्ये अनेक समस्या निर्माण होत असल्याचे दिसून येते. आणि त्यामुळे त्यांना काही गोष्टी पासून दूर ठेवल्या जाते. आणि अशा लोकांनाच 'वंचित लोक' असे म्हटले जाते.**

**समाजाने ज्यांना सर्व अधिकारापासून वंचित ठेवले, उपेक्षित ठेवले, अशा समूहाच्या इतिहासाला 'वंचिताचा इतिहास' असे म्हणतात. मार्क्सवादी इतिहास लेखनाच्या परंपरेतून वंचितांचा इतिहास लिहिण्याची परंपरा सुरू झाली. इटालियन तत्वज्ञ ॲटोनियो ग्रामची याने इतिहास लेखनाची सुरुवात समाजाच्या तळाशी असलेल्या सर्वसामान्य लोकांपासून करण्याची कल्पना मांडली. भारतात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखन शैलीतून वंचिताचा इतिहास लिहिल्याचे दिसून येते. लोकपरंपरा हे वंचितांच्या इतिहास लेखनाचे महत्त्वाचे साधन मानले जाते.** [4]

वंचिता ची पार्श्वभूमी-

**'सबाल्टन' या शब्दाचा अर्थ कनिष्ठ दर्जाचे, कमी दर्जाचे, दुय्यम असे अर्थ दिलेले आहेत. मराठी भाषेमध्ये 'वंचित' हा शब्द आलेला आहे आपल्या जन्मापासून विविध अधिकारापासून वंचित असलेले लोक समाज अथवा विशिष्ट गट यांचा समावेश या गटांमध्ये होतो. ॲंटोनीयो गेम चीने 'प्रिझन नोट्स 'नावाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये दी नोट्स ऑन इटालियन हिस्ट्री या ग्रंथामध्ये वंचिताचा किंवा तळागळातील इतिहासाबाबत आपली इतिहासाची संकल्पना मांडली आहे.**

**दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये दुसऱ्या जागतिक महायुद्धातपूर्वी अनेक वर्ष वसाहतवादी साम्राज्यवादी युरोपियन राष्ट्राचे वर्चस्व होते. या काळात देशातील स्थानिक लोकांनी अनेक वेळा परकीय राज्यकर्त्यांशी उठाव केले या उठावात सर्वसामान्य लोकांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता परंतु**

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

**इतिहास ग्रंथांमध्ये त्यांच्या सहभागाचा अथवा कामगिरीचा उल्लेख केला गेला नाही.**

**आधुनिक हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये सबाल्टन (वंचित) हा नवा दृष्टिकोन मांडण्यात आला आहे. मानवाच्या मनावर अनेक गोष्टींचा, विचारांचा, तत्त्वज्ञानाचा, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. त्यामुळे इतिहासाच्या स्पष्टीकरणमध्ये मतभिन्नता निर्माण होणे स्वभाविक आहे. तरीसुद्धा समाजातील तळागाळातील वंचित त्यांच्या कार्याचे, विचारांचे स्पष्टीकरण होणे आवश्यक गोष्ट आहे. त्यातूनच इतिहास विचारवंतांनी सबाल्टन दृष्टिकोन पुढे आणलेला आहे.**

**वंचित समूहाचा इतिहास लिहिण्याची परंपरा मार्क्सवादी इतिहास लेखनाच्या परंपरेतून झाल्याचे दिसून येते. वंचितांच्या इतिहासाला स्थान देण्याचे कार्य 'रणजित गुहा' यांनी केले. रंणजीत गुहा यांच्या आधी महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या लेखनातून वंचितांचा इतिहास मांडला.**

**'गुलामगिरी' या ग्रंथात जोतिबांनी शूद्रातिशूद्रांच्या इतिहास नव्याने उघडला तसेच स्त्रियांच्या शोषणाकडेही लक्ष वेधले. 1857 च्या राष्ट्रीय उठावात इंग्रजी भाषा आत्मसात केलेला भारतीय लोकांचा वर्ग उदासीन व निष्क्रिय राहिला याचे ही स्पष्टीकरण ते देतात. भारतातही सबाल्टन स्टडी ची पायाभरणी करण्याचे श्रेय डॉ. रणजित गुहा यांचे कडे जाते. त्यांनी अनेक लिखाण केल्याचे दिसून येते यातून वंचिताचा इतिहास जाणून घेण्यास मदत होते.** [5]

1. **Rule of property for Bengal.**
2. **Swadeshi movement in Bengal.**
3. **Writing social History -Modern India,1885-1947.**

डॉ. रणजित गुहा-

**रणजीत गुहा यांचा जन्म 1922 मध्ये झाला शिक्षण घेत असतानाच ते मार्क्सवादाकडे वळले ते मार्क्सवादी पक्षाचे सदस्य होते. त्यांनी काही काळ अध्यापनाचे कार्य केले ते ऑस्ट्रेलियातील कॅनबेरा विद्यापीठात प्राध्यापक म्हणूनही काम केले. भारतीय इतिहास लेखनाच्या क्षेत्रातील सबाल्टन लेखन प्रवाहाचे प्रणेते म्हणून डॉ. रणजित गुहा यांचे नाव सुप्रसिद्ध आहे.**

हरफान हबीब

**प्रा. हरफान हबीब यांनी रणजीत गुहाच्या सबाल्टन स्टडीज बद्दल आपले विचार मांडले आहेत. रणजीत गुहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी तळागळातील लोकांचा इतिहास किंवा वंचिताचा इतिहास ही संकल्पना ॲंटोनियो ग्राम ची च्या विषयावर उभी केली आहे. हबीब म्हणतात, "तळागळातील लोकांचा वर्ग नसतो तर त्या जाती जमाती अशा स्वरूपात असतात." अशा रीतीने समाजामध्ये मार्क्सवादी व साम्यवादी दृष्टीकोण समोर आल्याचे दिसून येते. वंचित गटाचा इतिहास त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास**

**नव्हे तर कृतीमधील त्यांची मानसिकता, अंत:प्रेरणा, जीवन पद्धती, रूढसंस्था यांचा विचार करणे आवश्यक आहे. समाजातील अभिजन वर्ग त्यांना नैसर्गिक अधिकारापासून वंचित ठेवतो असे विचार सबाल्टन विचारप्रणालीच्या विचारवंतांनी मांडले. अशाप्रकारे सबाल्टन इतिहासकारांनी आपले मत व्यक्त केले असल्याचे दिसून येते.**

मार्क्सवादी दृष्टिकोण (Marxist Approach)

**इ. स. 1950 सालानंतर भारतामध्ये मार्क्सच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेल्या विचारवंतांनी भारतीय इतिहासाचे लिखाण मार्क्सवादी दृष्टिकोनातून करण्यास सुरुवात केली. भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या मार्क्सवादी विचार प्रणालीनुसार केलेल्या लिखाणाची माहिती घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी मार्क्स च्या तत्वज्ञानाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.**

कार्ल मार्क्स-

**कार्ल मार्क्स चा जन्म पश्चिम जर्मनीत 5 मे 1818 रोजी एका वकिलाच्या घरात झाला. सन 1835 ते 1841 या काळात त्यांचे बर्लिन आणि ब्रान येथे कायद्याचा आणि न्याय शास्त्राचा अभ्यास झाला. तेथेच त्यांची एंगल्स या व्यक्तीशी मैत्री झाली. फ्रान्स, इंग्लंड मधील मानवतावादी, समाजवादी प्रागतिक इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ व हेगेल इत्यादींशी त्यांचा संपर्क आला त्यातूनच शास्त्रीय समाजवादी कार्ल मार्क्स तयार होऊ शकले. सन 1844 मध्ये मार्क्स व एंगल्स यांचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हा ग्रंथ प्रकाशित झाला कम्युनिस्ट मॅनिफेस्टो म्हणजे साम्यवादाचा जाहीरनामा होय. या जाहीरनाम्याची प्रेरणा युरोपियन राष्ट्रातील कामगार चळवळ यांना मिळाली. कार्ल मार्क्सने दास कॅपिटल हा ग्रंथ 1867 मध्ये प्रकाशित केला. इतिहास म्हणजे वर्ग संघर्षाची गाथा अशी त्यांनी इतिहासाची व्याख्या केली आहे माणूस जे कृत्य करतो त्याच्या मुळाशी आर्थिक स्वार्थाची प्रेरणा असते असे मार्क्स म्हणतो.**

मार्क्सवादी विचारसरणी व भारतीय राष्ट्रीय चळवळ:-

**भारतातील राष्ट्रीय चळवळीच्या मार्क्सवादी दृष्टिकोनातूनच अभ्यासाचा पाया रजनी पामदत्त व ए. आर. देसाई यांनी मांडला पुढे अनेक संशोधकांनी त्यांचा विकास केला आहे. मार्क्सवाद म्हणजे रशियन लेखक कार्ल मार्क्स यांचे तत्त्वज्ञान होय. कार्ल मार्क्स वादास 'साम्यवाद' असेही म्हटले जाते ते जगभर प्रसिद्ध आहे तसेच जगातील अनेक देशात मार्क्सवाद यावर आधारलेले राजकीय पक्ष आहेत. परंतु रशिया, चीन, व इतर काही देशात प्रमुख राजकीय पक्ष हे मार्क्सवादी आहेत. भारतात केरळमध्ये आणि पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी पक्षाचे राज्य अनेक वर्ष होते. कार्ल मार्क्सचे म्हणणे होते की, 'सर्वांना समान न्याय मिळायला हवा. समाजामध्ये कोणीही वेगवेगळ्या प्रकारे जीवन न जगता समानतेच्या भावनेतून जगायला पाहिजे. उदा.एकाने विमानाने प्रवास करावा आणि दुसऱ्याने मात्र**

**सायकलवर प्रवास करणे हे योग्य नाही.' यातूनच साम्यवादाची भावना उदयास आली.**

साम्यवादी दृष्टिकोन-

**'समाजात जीवन जगत असताना काही व्यक्ती जवळ अतोनात पैसा आणि दुसऱ्या बाजूने पाहिले तर लोकांना खायला किंवा जीवनावश्यक गरजा सुद्धा पूर्ण होऊ शकत नाही अशी अवस्था आहे. तर या सर्व व्यवस्थेला बदलून सर्वांकडे समान संपत्ती समान दर्जा, समान वागणूक मिळायला पाहिजे अशी भावना म्हणजेच साम्यवादी भावना होय'**

**कामाची सर्वांना समान विभागणी, योग्यतेनुसार आणि आवश्यकतेनुसार सर्व लाभ इत्यादी साम्यवादी विचारसरणीचे मुख्य पैलू आहेत. भांडवल वादाच्या प्रसारामुळे विसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी साम्यवादी विचारसरणी मागे पडत गेली आहे असे दिसून येते. भारतातील साम्यवादाचे नेतृत्व पी.सी.जोशी , ए. के . गोपाल व पी. सुंदरप्पा यांनी केले. साम्यवाद ही एक राज्यव्यवस्था किंवा समाजव्यवस्था आहे या व्यवस्थेत उत्पादनाच्या मुख्य साधनावर काही स्त्रोत्रावर कुणा एका व्यक्तीचे अथवा गटाचे अधिपत्य मान्य नाही म्हणजेच उत्पादनाची मुख्य साधने आणि स्त्रोत संपूर्ण समाजाच्या एकत्रित अधिपत्याखाली असावेत अशी मान्यता असते.**

**पुनर्रचना करणे व मानवी जीवन सुखी आणि समृद्ध करण्याचे आवाहन समाजवादाच्या संकल्पनेत अभिप्रेत आहे थोडक्यात समाजवादी विचारसरणीने समता व न्याय यावर आधारित नव्या समाज रचनेचा पुरस्कार केला या विचार प्रणालीचा पुरस्कार त्यांच्या मते व्यक्ती हितापेक्षा समाजहित अधिक महत्वाचे असते.**

**उत्पादन विभाजन आणि विनिमय यांची साधने जनतेच्या म्हणजे समाजाच्या मालकीची व्हावीत प्रत्येक व्यक्तीला आपल्या गुणांची जोपासना करण्याची समान संधी दिली जावी व त्यातून समाजाच्या उत्पादन शक्तीचा विकास व्हावा ही तत्त्वे मुख्य आहेत. दारिद्य आणि शोषण संपुष्टात आणून न्याय पातळीवर समाजाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.**

**"इतिहास हा मानवी समाज जीवनाचा वाहता प्रवाह असल्याने मुलांचे चरित्र घडविण्यात त्याचा महत्त्वाचा वाटा असतो" असे वी.सी.चितळे यांनी आपल्या इतिहास लेखनात नमूद केले. औद्योगिक क्रांती नंतर निर्माण झालेली आर्थिक विषमता आणि व्यक्तिवाद व भांडवलशाही या सर्वांच्या प्रतिक्रियेतून समाजवादी विचार निर्माण झाला.[6] भांडवलशाही, समाजरचना केव्हा अस्तित्वात आली आणि समाजाच्या अर्थव्यवस्थेतील दोषांवर आपले अधिपत्य गाजवले. एकोणिसाव्या शतकात समाजवादाचा विचार पुढे आला आणि स्वातंत्र, समता व बंधुता या मुलभूत अधिकारावर आधारलेले लोकशाही मध्ये क्रांती घडून आली .**

**या नाशिक नगरीला थोर असे पुरुष व समाजसेवक लाभलेले असल्यामुळे या जिल्ह्याचे महत्त्व अधिक**

**वाढल्याचे दिसून येते.**

संदर्भ सुची –


१) **संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान, माधव पोतदार,** 2010, **पुणे पान नं.** 44, 102

२) **सोनहिरा, बाबुराव पवार, मार्च** 1998, **नाशिक पान नं.** 35, 38

३) **भारतीय समाज व समस्या, कांडेकर ए. वाय., फडके प्रकाशन कोल्हापूर, पान नं.** 87

४) **२० व्या शतकातील महाराष्ट्र, य. दि. फडके, मौज प्रकाशन पुणे पान नं.** 37

५) **नाशिक जिल्हा महाराष्ट्र शासन**

६) **https://www.google.com**

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# नाशिक जिल्ह्यातील १९४२ चे आंदोलन आणि वसंतराव नारायणराव नाईक

**प्रा. चंद्रप्रकाश गंगाराम कांबळे**
*के.व्ही.एन. नाईक महाविद्यालय, नाशिक*

**प्रा. डॉ. दिपक सोपान वेडे**
*सरस्वती नाइट कॉलेज, पुणे*

***सारांश:***

***अशा पद्धतीने १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये नाशिकमधील क्रांतिकारकांनी आपला सहभाग नोंदवला.त्यामध्ये वसंतराव नारायणराव नाईक यांनीआपले संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी अर्पण करून स्वातंत्र्य लढ्यामध्ये झोकून दिले. वसंतराव हे अविवाहित होते. त्यांनी सायमन कमिशन पासून ते स्वातंत्र्यापर्यंत भारतीय आंदोलनामध्ये बहुमोल योगदान दिले.***

**गोषवारा:**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत १९४२ च्या आंदोलनाला अनन्य साधारण महत्त्व आहे. १८५७ च्या उठवानंतर सर्वात मोठे आंदोलन म्हणून या आंदोलनाकडे पाहिले जाते. गांधीजींच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या आंदोलनात भारतीय जानेतेने मोठ्या स्फूर्तीने सहभाग नोंदवला. त्यात नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी सहभाग घेतला त्यात सर्वात अग्रभागी असलेले नाव म्हणजे वसंतराव नारायणराव नाईक यांचे. त्यांनी या आंदोलनामध्ये भूमिगत राहून सक्रीय सहभाग घेतला. यावेळी त्यांच्यावर ब्रिटिश सरकारने अटकेचे आदेश दिले होते. व बक्षीस जाहीर केले होते. या दरम्यान आईचे निधन झाले त्यावेळी त्यांनी वेषांतर करून आईचे अंत्यदर्शन घेतले. अशा पद्धतीने वसंतराव नारायणराव नाईक यांनी १९४२ च्या चलेजाव आंदोलनामध्ये भाग घेऊन नाशिक जिल्ह्याची धुरा सांभाळली.

**प्रस्तावना:**

१८५७ च्या उठवानंतर ब्रिटिश सरकारच्या विरोधात जे काही आंदोलन घडून आले त्यात १९४२ चे चलेजाव आंदोलन हे सर्वात मोठे होते. म. गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली असहकार चळवळ, सायमन कमिशन, सविनय कायदेभंग त्यातील मिठाचा सत्याग्रह हे आंदोलन घडून आले. या प्रत्येक आंदोलनाचे वेगळे वैशिष्ट्ये आहे. त्यातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आंदोलन म्हणून १९४२ च्या चलेजाव आंदोलनाकडे पाहिले जाते. १९४२ मध्ये म्हणजे दुसरे महायुद्ध सुरू असताना भारतीयांना काहीतरी सुधारणा देण्यासाठी ब्रिटिश सरकारने क्रिप्स मिशन भारतात पाठविले. परंतु यामुळे भारतीयांचे विशेषतः गांधीजींचे समाधान झाले नाही. आता गांधीजींनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली होती. त्याशिवाय आपले कोणत्याही गोष्टीने समाधान होणार नसल्याचे जाहीर केले. आणि त्यासाठी त्यांनी जनतेला 'करो या मरो' चा मंत्र दिला. त्यानंतर लोकांनी चळवळ सुरू केली. ही चळवळ जनतेने चालवलेली ही चळवळ लवकरच देशभर पसरली. नाशिकपरिसरात ही चळवळ चालविण्यात ज्यांनी पुढाकार घेतला त्यात अग्रस्थानी असलेले नेते म्हणजे वसंतराव नारायणराव नाईक हे होते.

**महत्त्वाचे शब्द :** वसंतराव नारायणराव नाईक, १९४२ चा लढा

**Peer Reviewed Refereed Journal** **ISSN : 2278 – 5639**
**Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)**
**{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022**

**भौगोलिक स्थान:**नाशिक हे १९.३३° आणि २०.५३° उत्तर अक्षांशतसेच ७३.१६° आणि ७५.६°पूर्व रेखांश यावर स्थित आहे.[१]

**उदीष्ट्ये:**१९४२ च्या लढ्यातील वसंतराव नारायणराव नाईक यांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

**गृहीतके:**१९४२ च्या लढ्यात वसंतराव नारायणराव नाईक यांचा सहभाग होता.

**व्याप्ती:** प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती १९४२ च्या लढ्या संबंधित असेल.

**मर्यादा:** प्रस्तुत शोधनिबंधाचे अध्ययन वसंतराव नारायणराव नाईक यांच्या सहभागापुरते मर्यादित राहील.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**संबंधित साहित्याचा आढावा:**

या आधी डॉ. संतोष बोडके यांचे नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्रामातील जैनांचा सहभाग तसेच डॉ. गणेश रूपवते यांचा अप्रकाशित पीएच. डी प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०२० या साधनामध्ये प्रस्तुत शोध निबंधाविषयी अल्प उल्लेख आढळून आला.

**विषय विवेचन:**

**वसंतराव नारायणराव नाईक यांचा जीवन परिचय:**

वसंतराव नारायणराव नाईक यांचा जन्म १३ डिसेंबर १९१२ रोजी नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील वेहळगाव[२] या ठिकाणी एका समृद्ध परिवारात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नारायणराव नाईक[३] होते तर आईचे नाव उमाबाई[४] होते. वसंतराव नाईक हे सावकारी कुटुंबातील होते.त्यांच्या आई ह्या मुंबई येथील बरिस्टर डोंगरे[५]यांच्या कुटुंबातील होत्या. शिक्षणासाठी वसंतराव नाईक हे मुंबई येथे गेले. हा काळ स्वातंत्र्य आंदोलनाचा होता. ज्यावेळी भारतामध्ये सायमन कमिशन आले तेव्हा वयाच्या सोळाव्या[६] वर्षी वसंतराव नाईक यांनी स्वतःलाभारतीय स्वातंत्र्य आंदोलांनामध्ये झोकून दिले. त्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्य आंदोलन आणि देशसेवेमध्ये व्यतीत केले.

**१९४२ चा लढा:**

दुसरे महायुद्ध १९३९ मध्ये सुरू झाले. भारतीयांना न विचारताच ब्रिटीशांनी भारताला दुसऱ्या महायुद्धात सहभागी[७] केले. या गोष्टीचा निषेध म्हणून भारतीयांनी मंत्रिमंडळाचे राजीनामे दिले. भारतीयांना काही सवलती देण्यासाठी क्रिप्स शिष्ट मंडळाची[८] नियुक्ती करण्यात आली. परंतु त्यांच्या शिफारशीने भारतीयांचे समाधान होऊ शकले नाही. यावेळी जर आपण स्वस्थ बसल्यास भारतीयांची इच्छा विचारात न घेता भारताचे भवितव्य ठरविण्याचा ब्रिटिश सरकारचा हक्क मान्य केल्यासारखे होईल.असे भारतीय नेत्यांना वाटत होते.

१४ जुलै १९४२ च्या वर्धा[९] येथे भरलेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत कोंग्रेसने चळवळीची कल्पना प्रथमच मान्य केली. यानंतर मुंबईतील गोवालिया टॅंक मैदानावर ऑगस्ट १९४२ मध्ये भरलेल्या सभेमध्ये[१०] मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. गांधीजींनी याठिकाणी 'पूर्ण स्वातंत्र्याशीवाय आता दुसरे काहीही नाही'[११] आणि यासाठी 'करेंगे या मरेंगे'[१२] हा मंत्र दिला. ९ ऑगस्टच्या मध्यरात्रीस कॉंग्रेसच्या महत्त्वपूर्ण नेत्यांना अटक[१३] करण्यात आली. त्यामुळे आंदोलनाचे नेतृत्त्व तरुणांच्या हाती

आले. आणि आंदोलनाला सुरुवात झाली.

**लढ्याला सुरुवात:**

१९४२ चा हा लढा जनतेने चालवला. सरकारी कचेऱ्यावर तिरंगा फडकविण्यात[१४] आला. पूल उडविण्यात आले,[१५] टेलिफोन लाइन कापण्यात आल्या,[१६] शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्यांनी हरताळ[१७] केला, आणि भूमिगत कार्यकर्त्यांना सहकार्य केले.[१८]हे आंदोलन आता सर्वसामान्यांचे झाले होते. यामध्ये सर्वसामान्य जनतेने सहभाग नोंदवला होता.

**वसंतराव नारायणराव नाईक यांचा सहभाग:**

१९४२ च लढ्याला आता मोठे स्वरूप प्राप्त झाले होते. ते आता देशाच्या कानाकोपऱ्यात पसरले होते. नाशिकमध्ये अनेक लोक या लढ्यात सामील झाले होते. नाशिकमध्ये वसंतराव नाईक हे भूमिगत[१९] राहून कार्य केले. हरताळ पाळणे,[२०] सभा घेणे,[२१] तारखाते,[२२] पोस्ट खाते,[२३] टेलिफोन खाते[२४] यांच्या कामात ते अडथळे आणत होते. पोलिस स्टेशन चावड्या,[२५] लष्कराची रसद लुटणे[२६]इ. कार्य ते करत होते. इंग्रज सरकारने त्यांच्यावर जाहीर केलेल्या बक्षिसामुळे[२७] ते सतत वेशांतर करून निरनिराळ्या ठिकाणी फिरत असत.

१९४२ च्या चळवळीत वसंतरावांनी वामनराव यार्दी, दादासाहेब पोतनीस, दत्तात्रय बीडकर,रावसाहेब ओक, माधवराव लिमये, अण्णासाहेब पटवर्धन यांच्या बरोबरीने नाशिक जिल्ह्यात भूमिगत राहून सरकार विरोधी जनमत तयार केले. यावेळी सरकारने वसंतराव नाईकांना फरारी घोषित करून त्यांची नाशिक जिल्ह्यातील वेहळगाव आणि मनमाड येथील संपत्ती जप्त केली. पण त्यांच्या आदरापोटी त्यांची संपत्ती कोणीही विकत घेतली नाही. वसंतराव नारायणराव नाईक हे भूमिगत असताना त्यांच्या आईचे निधन[२८] झाले. यावेळी वसंतराव नाईक या ठिकाणी येतील हे पाहून पोलिसांनी या ठिकाणी पहारा दिला, परंतु वसंतराव नाईक यांनी वेशांतर[२९] करून आपल्या आईचे अंत्यदर्शन घेतले.

त्यानंतर इ. स. १९४४ साली वसंतरावांना भारत संरक्षण कायद्याखाली अटक झाली. परिणामी नाशिक नगर पालिकाडिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड, प्रेस कामगार संघटना, विडी कामगार संघटना यांच्यासह नाशिकमधील शेकडो लोकांनीरस्त्यावर उतरून सरकारचा निषेध केला. यावेळी गांधीजींनी मुंबईचे कायदेपंडित के. एम. मुन्शी, पारडीवाला, धिरूभाई देसाई यांना पत्र पाठवून वसंतरावांच्या खटल्याची तसेच बचावाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. हा खटला सहा महिने चालला. शेवटी वसंतरावांची यातून निर्दोष मुक्तता झाली.

**संदर्भ:**

1. Gazetteer of Bombay presidency, Nashik District, Government of Maharashtra, Bombay, volume XVI, page no.1
2. काचरे विजय (२०१२), क्रांतिवीर वसंतराव नाईक: काळ आणि कर्तृत्त्व, राजहंस प्रकाशन प्रा. लि., पुणे, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. ३९
3. कित्ता पृ. क्र. १५
4. कित्ता पृ. क्र. १५

5. कित्ता पृ. क्र. १६
6. कित्ता पृ. क्र. २३
7. बीपन चंद्र, मुखर्जी मृदुला व इतर(२००३), इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, के. सागर पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. ५४५
8. कित्ता पृ. क्र. ५४७
9. कित्ता पृ. क्र. ५४७
10. कित्ता पृ. क्र. ५४७
11. राजाराम कल्पना, मुख्य संपादक, आधुनिक भारत का इतिहास, स्पेक्ट्रम बुक्स प्रा. लि. न्यू. दिल्ली, आठवी आवृत्ती पृ. क्र. २६६
12. कित्ता पृ. क्र.२६६
13. कित्ता पृ. क्र.२६६
14. बीपन चंद्र,उ.नि. पृ. क्र. ५४९
15. कित्ता पृ. क्र. ५४९
16. कित्तापृ. क्र. ५४९
17. कित्तापृ. क्र. ५४९
18. कित्तापृ. क्र. ५४९
19. काचरे विजय (२०१२), उ. नि. पृ. क्र. ३७
20. कित्ता पृ. क्र. ३७
21. कित्ता पृ. क्र. ३७
22. कित्तापृ. क्र. ३७
23. कित्ता पृ. क्र. ३७
24. कित्तापृ. क्र. ३७
25. कित्तापृ. क्र. ३७
26. कित्तापृ. क्र. ३७
27. कित्ता पृ. क्र. ३७
28. दराडे डी. बी., स्मृतीतील वसंतराव नाईक (२०१२), सुप्रभा प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. १६
29. कित्ता पृ. क्र. १६

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# 20 व्या शतकातील वंचितांची सामाजिक परिस्थिती

**प्रा. छाया भावलाल सैंदाणे**
*दादासाहेब बिडकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,पेठ*
*ता. पेठ जि. नाशिक*

**प्रस्तावना:**

वंचित, गरिबीत अडकलेले, गरीब, निराधार, गरजू, उदासीन, व्यथित, निराधार, कष्टाळू, अविचारी, उणीव, बेवारस, हव्या असलेल्या, गरजू, टाच खाली, बगाड, मोडलेले, सुधारलेले, पेनिलेस, दिवाळखोर, विस्थापित, विल्हेवाट लावलेला, कठोर, *'पोटाला चिमटा काढून जगणारे'*, इ. (Disadvanteged, Unprivileged, Poverty-sticken, Poor, Destitute, Needy, Depressed, Distressed, Forlorn, Penurious, Impecunious, Necessitous, Lacking, Bereft, In-want, In-need, Denuded, Down at heel, Baggared, Broke, Improverished, Indigent, Penniless, Insolvent, Pinched, Reduced, Straitened, Displaced, Disposed, Hard-up, etc. )

"सामाजिक वंचितता म्हणजे एखादी व्यक्ती आणि समाजातील इतर लोकांमधील सांस्कृतिकदृष्ट्या सामान्य संवाद कमी करणे किंवा प्रतिबंध करणे. ही सामाजिक वंचितता सामाजिक बहिष्कारात योगदान देणाऱ्या निर्माण केलेल्या घटकांच्या विस्तृत नेटवर्कमध्ये समाविष्ट आहे. या घटकांमध्ये मानसिक आजार, गरिबी, गरीब, शिक्षण यांचा समावेश आहे. आणि कमी सामाजिक आर्थिक स्थिती.

("Social deprivation is the reduction or prevention of culturally normal interaction between an individual and the rest of society. This social deprivation is included in a broad network of created factor that contribute to social exclusion. These factors include mental illness, poverty, poor, education, and low socioeconomic status.)

समाजातील काही महत्त्वपूर्ण घटक व व्यवस्था यांमध्ये समाजहिताच्या बाजूने बदल घडवून आणण्यासाठी अथवा त्यांमध्ये होणाऱ्या समाजघातक बदलांना संघटितपणे विरोध करण्यासाठी समाजातील असंख्य व्यक्ती, वंचित घटक एकत्र येऊन हेतुपूर्वक केलेला प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय . सामाजिक चळवळी समाजातील समाजव्यवस्थेत अनुकूल स्वरूपातून सामाजिक बदल घडवून आणतात त्यामध्ये काही महत्वपूर्ण प्रश्नांना समोर ठेवून चळवळी आकारास येतात त्यामध्ये मिरवणूका ., मोर्चे, घोषणा, आंदोलने इत्यादी कृतींचा उपयोग केला जातो .ते दृष्य स्वरूपात असतात .

**सामाजिक चळवळीचे प्रवाह :**

समाजापुढील विविध प्रश्न, सामाजिक उद्दिष्टपूर्तीच्या प्रक्रिया, तसेच सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीच्या आधारे सामाजिक चळवळींची प्रवाह .

**(१) सांस्कृतिक प्रवाह:** एखाद्या समाजव्यवस्थेत पिढ्यानपिढ्या चालत आलेली परंपरागत सात्विक वैशिष्टे व वर्तनप्रकार यांत होणाऱ्या बदलांना सांस्कृतिक प्रवाह म्हणतात. साधारणपणे सर्वच समाजामध्ये सांस्कृतिक प्रवाहाची प्रक्रिया मंद गतीने चालू असते. या मंद गतीचा वेग वाढावा व समाजाची प्रगती जलद गतीने व्हावी, या उद्देशातून सामाजिक चळवळी आकाराला येतात.

**(२) सामाजिक विघटन:** सामाजात उद्भवणाऱ्या अनेक समस्या तसेच व्यक्तींच्या स्वैर वर्तनामुळे समाजातील नीतिनियम, प्रमाणके, मूल्यव्यवस्था इत्यादींप्रमाणे व्यक्ती वर्तन न करता स्वमताप्रमाणे वर्तन करतो आणि विघटनाची प्रक्रिया घडून येते. यामुळे समाजातील ही विघटनात्मक परिस्थिती व्यक्तींना विचलित करते. त्यांच्या मनात असुरक्षितता, वैफल्य इत्यादी भावना जागृत होऊन त्यातून सामाजिक चळवळ उदयास येते.

**(३) सामाजिक असंतोष:** प्रस्थापित समाजव्यवस्थेविषयी लोकांच्या मनातील व्यापक सर्वसामान्य असमाधान म्हणजे सामाजिक असंतोष होय. व्यापक व बहुसंख्य लोकांच्या मनात असमाधानाची भावना सापेक्ष वंचितता, अन्यायाचे संवेदन आणि सामाजिक दर्जा – विसंगती या कारणांमुळेही सामाजिक चळवळी निर्माण होतात.

- **समाजशास्त्रीय विचारवंत व मतप्रवाह**

(१) काही समाजशास्त्रज्ञ इतर प्रकारचे सामूहिक वर्तनप्रकार आणि सामाजिक चळवळी या दोघात जवळचा संबंध असल्याचे मानतात, तर काहीजण सामाजिक चळवळी या एका विशिष्ट स्वरूपाचा सामूहिक वर्तनप्रकार आहे, असे मानतात.

(२) काहींच्या मते आंदोलने म्हणजे सामाजिक व्यवस्थेवरील नकारात्मक मतप्रदर्शन होय.

(३) सामाजिक आंदोलने संस्थात्मक संरचना, विचार करण्याच्या पद्धती, नियमने, नैतिक मूल्ये यांना आव्हान देतात आणि काही वेळा पर्यायही पुढे ठेवतात.

(४) आंदोलने संघर्षात्मक दृष्टीकोनातून सामाजिक घटनांचा अन्वय लावतात, म्हणून ते स्थैर्यविरोधी असतात.

(५) आजच्या आपल्या सामाजिक आयुष्याची अनेक वैशिष्ट्ये आंदोलनाचे फलित म्हणूनच अस्तित्वात आलेली असतात. वरील मुद्द्यांवरून शास्त्रज्ञांमध्येही सामाजिक चळवळींबद्दल एकमत नसल्याचे दिसून येते.

चळवळी हा वंचितांच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहेच. परंतु केवळ चळवळी पुरताच वंचितांचा विकास चळवळी पुरताच मर्यादित न राहता. भारतात एकविसाव्या शतकात अखंड एकात्म राष्ट्र म्हणून उभे राहायचे असेल तर वंचितांच्या विकासाचे नवे धोरण अंगीकारले पाहिजे. कल्याणामागे दया, सहानुभूतीचे तत्व असेल तर विकास हा हक्क केंद्रित असतो. वंचितांच्या कल्याणाची

उपकारी वृत्ती सोडून देऊन शासन व समाजाने वंचितांना त्यांच्या हक्क, वाटा, अधिकार म्हणून द्यायला हवा. तो देणे शासनाला घटनात्मकदृष्ट्या बंधनकारक आहे त्यासाठी केंद्र व राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची व निकालाची वाट बघू नये. येथून पुढील काळात दलित, वंचित व दुर्बल अशा सर्व घटकांसाठी राजकारण निरपेक्ष विकास आराखडा हवा. तो आर्थिकस्थिती, सामाजिकस्थिती यांच्या आधारे ठरविला जावा. विकास म्हणजे भौतिक सुविधा हे समीकरण बदलायला हवे. भौतिकीतील भावनिक, मानसिक, सामाजिक पुनर्वसन महत्त्वाचे असते. नागरिक उभारणीचे तत्त्व **मनुष्य** या एकाच निकषावर असायला हवे. मानवी अधिकाराचे अंमलबजावणीबाबत केंद्र व राज्य शासनाचे धोरण चाल ढकलचे आहे हे अनुभवातून सांगता येते. अशामुळे देखील वंचित घटकांवर एक प्रकारे अत्याचार होत राहिला आहे. उपेक्षा व दुर्बलता हा केवळ अपमान असं नाही तर ती अवहेलना असते हे लक्षात घेतले पाहिजे. समाज विकासाच्या आजवरचा प्रवास अभिजन वर्गाकडून बहुजन वर्गाकडे आला खरा पण तो जर **सर्वजण** केंद्रित होईल तर तो **मानवलक्षी** बनेल. कायदे, योजना, तरतुदीं वंचितांना समान सामाजिक न्याय मिळणार केव्हा? गरज आहे वंचितप्रति असलेल्या सध्याच्या सामाजिक मानसिकतेत बदल होण्याची गरज आहे.

संदर्भ:


- https://marathivishwakosh.org/37053/
- लवटे सुनील कुमार, मराठी वंचित साहित्य,2018
- खैरनार दिलीप, *समाजशास्त्र परिचय*, पुणे, २००८.
- धनागरे, द. ना., *संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव*, पुणे, २००५.
- भोळे, भास्कर, बेडकिहाळ, किशोर, *बदलता महाराष्ट्र*, सातारा, २००४.
- व्होरा राजेंद्र, पळशीकर, सुहास, *भारतीय लोकशाही : अर्थ आणि व्यवहार*, पुणे, २०१०.
- शाह घनश्याम, *भारतातील सामाजिक चळवळी*, पुणे, २०१०.
- साळुंखे सर्जेराव, *समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना*, पुणे, २०१७.
- सुमंत यशवंत, *भारतीय लोकशाहीचे चर्चाविश्व: काही निरीक्षणे*, पुणे, २०१२.
- Fucha and Linken bach , *The Oxford Indian Campanion to Sociology and Social Anthropology*, New Delhi, 2003.
- Oommen, T. K., *Social Movement*, New Delhi, 2010.
- Rao M. S., *A Social Movements and Social Transformation*, New Delhi, 1979.
- Singh Rajendra, *Social Movements, Old and New a Postmodernist Critique*, New Delhi, 2001.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# 20 व्या शतकातील स्त्रीयांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती व जागृती.

**प्रा. बागुल एल के.**
*डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणा,*
*ता. कळवण, जि. नाशिक.*

**प्रस्तावना–**

शिक्षणामुळे स्त्रीयांचे सामाजिक क्षेत्रात कार्य करण्यासाठी पाऊल पडले. परंपरागत एकत्र कुटुंबपद्धती, रूढी–परंपरा या जीवन मूल्यांचे जतन करून स्त्रीवरील अन्यायाला विरोध करण्याचे धाडस या काळातील स्त्रीयांनी केले. भारतीय संस्कृतीत मातृदेवता म्हणजे मातेची पूजा केली जाते. ''जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी'', असे स्त्रीचे महत्व व माहात्म्य वर्णन केले जाते. ही माता सुशिक्षित असेल तर सर्व कुटुंब सुशिक्षित होते, हा स्त्री शिक्षणतील महत्वाचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी महात्मा फुलेंनी मुलींसाठी शाळा काढल्या व शाळेत शिकवायला स्त्री–शिक्षिका मिळत नसल्याने त्यांनी आपल्या पत्नीस म्हणजे सावित्रीबाईंना शिकवले.

समाजातील उच्चवर्णीयांनी व पुरूषांनी सावित्रीबाईंना याबद्दल टिंगलटवाळी करणे, शेणगोळे मारणे, दगड मारणे वगैरे मार्गाने हेटाळणी करण्याचा पुरूषार्थ दाखविला; पण सावित्रीबाईंची निष्टा अजिबात ढळली नाही, त्यांचे हे, धर्मबुडवेपणाचे कार्य आहे असे सांगून समाजातील सनातनी लोकांनी ज्योतीबांच्या वडिलांवर दबाव आणला. या कारणास्तव महात्मा फुलेंनी घर सोडले पण स्त्री–शिक्षणाचे कार्य सोडले नाही. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत स्त्रीयांना शिक्षण देण्याचा या कार्याबद्दल खुद्ध इंग्रज सरकारने सरकारी मदत देऊन त्यांचा सत्कार केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीयांविषयी विचार–**

डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीयांविषयी सांगितले की स्त्रीयांनी सुधारणा केवळ कायदे करून होणार नाही तर कायद्याने दिलेले अधिकार मिळवता आले पाहिजे. या सर्व बाबींकरीता त्यांनी प्रथमता स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला आणि स्त्रीयांचे प्रबोधन करण्यासाठी सभा, परिषदा व भाषणे या माध्यामातून त्यांनी आपले कार्य केले. हिंदू संस्कृतीत स्त्रीयांची जी–जी अवहेलना या समस्यांचा उहापोह करणाऱ्या आणि त्यांचे विषयांवर बाबासाहेबांनी प्रखरपणे मांडणी व महिलांना मार्गदर्शन केले आहे. स्त्री शिक्षण, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता ही मूल्य शिक्षणच्या माध्यमातून कळू लागली. शिक्षणाच्या नवप्रवाहामुळे नवे विचार प्रवाह व स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने नवे जीवन मुल्यांचा परिचय तसेच समाज प्रबोधनाचे नवीन चळवळ उदयास आली.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

महात्मा ज्योतीराव फुले यांच्या रूपाने शुद्राती शुद्र बहुजनात अस्पृश्य वंचित घटकात शोषीत, स्त्री, कष्टकरी, कामकरी, कामगार, शेतकरी यांच्यासाठी प्रकर्षाने लढा उभा केला. महात्मा ज्योतीराव फुले यांना गुरू मानून त्यांचे समाजकार्य पुढे नेटाने चालविले.

डॉ. बाबासाहेबांनी स्त्री स्वातंत्र्याचा, सन्मानाचा आणि तिच्या हक्काचा विचार आग्रहपूर्वक मांडला. डॉ. बाबासाहेब हे तर स्त्री वर्गाचे आधारच होते. स्त्री शिक्षणाच्या सुधारणेचा त्यांनी आग्रह धरला होता. स्त्रीयांनाही पुरूषांच्या बरोबरीने माचे स्थान मिळाले पाहिजे. हिंदु कोड बील म्हणजे संपूर्ण भारतीय स्त्री हक्काचा जाहिर नामाच होता.

**वंचित घटकांविषयी समाजाची भूमिका–**

वंचित घटकातील स्त्रीयाविषयी विचार, कार्य, भूमिका या बाबींचे अवलोकन करणे, स्त्रीयांना जागृत करण्यासाठी घतले त्या सभा घेणे व स्त्री विषय समाजिक, आर्थिक, शैक्षणिक बाबींचा आढावा घेणे स्त्रीयांच्या प्रगतीवरून समाजाची प्रगती होते. याकडे कटाक्षाने लक्षण देणे, वंचित घटकांचा उद्धार करणे, स्त्री शिक्षण यामध्ये सुधारणा घडवून आणणे हा मुख्य उद्देश आहे.

स्त्रीवाद हा स्त्रीयांच्या हक्काशी निगडीत आहे. स्त्रीयांच्या अस्तिवासाठी आणि अधिकारासाठी पुरूषावर अवलंबून न राहता स्त्रीयांनी आपली स्वतःची ओळख निर्माण करावी स्वावलंबी व्हावे. या दृष्टीकोनातूनच स्त्रीवादी चळवळीकडे पाहिजे जाते. स्त्री–पुरुष संघर्षाच्या विचारधारेला स्त्रीवाद असे म्हणता येईल. स्त्रीयांना पुरूषासोबत समान हक्क मिळावेत यासाठी स्त्रीवाद कार्यरत आहे.

**स्त्री व समानता–**

निसर्गतः– सर्व व्यक्ती समान व स्वतंत्र आहे. त्याचप्रमाणे व्यक्तीला जन्मसिद्ध नैसर्गिक हक्क प्राप्त झालेले असले तरी श्रीमंत, गरीब, परकीय, स्वकीय, उच्च, कनिष्ट हा भेद नष्ट करण्यासाठी जागतीक स्तरावर स्त्रीवादी चळवळीचा उगम 1970 च्या दशकापासून झाला. हळूहळू ह्या चळवळीच्या प्रवाहात भारत स्वातंत्र्यपूर्ण काळापासून आग्रेसर होता.

विविध कालखंडात ही चळवह आपले स्वरूप बदलतांना दिसून येते म्हणून आजच्या जागतिक परिपेक्षात स्त्रीवादी चळवळ किती स्त्रीभीमुख आहे याचे अभ्यास होणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्रातील स्त्रीवादी संघटनाची भूमिका–**

महाराष्ट्रातील स्त्रीयांचे प्रश्न समोर आणण्याच्या उद्देशाने स्त्रीवाद संघटनांचा उदय महाराष्ट्रात झाला. अशा संघटनांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांची बैठकही प्राप्त झाली अशा संघटनांना निर्माण होण्यामागील मुख्य हेतू तळागाळातील ग्रामीण स्त्रीयांना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे व स्त्रीयांचे सबलीकरण करणे हा होता. महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचे अस्तित्व त्यांनी त्यांच्या प्रयत्नातू जाणवून दिल्यानंतर महाराष्ट्रात स्त्रीयांच्या हक्कांचा आणि प्रश्नांचा विचार करण्याकरिता राज्य

महिला आयोगाची 1994 मध्ये स्थापना करण्यात आली. हे महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचे यश म्हणता येईल या आयोगाद्वारे शासकीय स्तरावर महिलांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न केले जातात. असे असले तरी, महाराष्ट्रात स्त्रीवादी संघटनामध्ये ग्रामीण, आदिवासी, मागास महिलांचा समावेश झाल्याने दिसून येत नाही. महाराष्ट्रातील स्त्रीवादी संघटना व त्यांच्या माध्यमातून स्त्रीवादी वर्गातील उच्च जातीच्या श्रीमंत घराण्याच्या स्त्रीपुरती मर्यादित झाल्याने प्रकर्षाने दिसून येते. त्यामुळे खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळीना बळकटी देणारे नेतृत्व निर्माण होऊ शकले नाही.

**नाशिक मधील स्त्री मंडळाची स्थापना–**

नाशिकमधील स्त्री मंडळाची स्थापना हा एक महत्वाच्या घटक स्त्री जीवनामध्ये दिसतो. या महिलामंडळाकडून कला कौशल्याला उत्तेजन देणारे उपक्रम राबविले जात होते. हळदीकुंकू सारख्या समारंभाच्या निमित्ताने स्त्रीयांच्या कलागुणांना उत्तेजन देणारे काही कार्यक्रम आयोजित केले जात होते. यातून विचारांची देवाण घेवाण होऊन राष्ट्रप्रेम व समाजकार्य इ. संबंधित विचार रूजवली जाण्यास मदत होत गेली. अर्थात हा कालावधी विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून विशेष जाणवतो. या उपक्रमांमुळे स्त्रीयांचा घराबाहेरील जगाशी संपर्क येत जावून वैचारिक बदलाला अनुकूल वातावरण निर्मिती होत गेली.

**नाशिक व वैद्यकीय सेवा–**

नाशिकला वैद्यकीय व्यवसायाची परंपरा आहे. आरोग्य वैद्यक शास्त्रात शिक्षण घेण्याबरोबर इतरही उच्च शिक्षण घेण्याकडे स्त्रीयांचा कल वाढत गेला. विसाव्या शतकाच्या मध्यममध्ये काही डॉ. महिला नाशिकमध्ये डॉक्टर या व्यवसायाबरोबरच सामाजिक कार्ये करतांना दिसतात. त्यासाठी संसार सांभाळून समाजासाठी त्यांनी सेवा केली. आरोग्यदृष्ट्या समाज जागृती व्हावी यासाठी जसे प्रयत्न झाले तसेच संतती नियमांच्या दृष्टीनेही विचार रूजवण्याचा प्रयत्न त्यांनी या काळात 1950 पूर्वी केला. या काळाची विचारसरणी पाहता संतती नियमन विषयीचे विचार रूजवणे म्हणजे एक प्रकारे क्रांतीचे कार्ये होते.

पुरूषप्रधान समाजपद्धतीमध्ये स्त्रीयांना नेहमीच गौण स्थान दिले गेलेले आहे. मुलगी, पत्नी आणि आई म्हणून तर तिने पुरूषांवर अवलंबून राहायला हवच पण पुरूषांशिवाय– विशेषतः पतीशिवाय तिच आयुष्य दूरापास्त करणं ही जणू समाजाची रितच दिसते.

**नाशिक उद्योजकता व स्त्री–**

स्वातंत्र्यपूर्व काळात नाशिकमध्ये उद्योजक स्त्रीयांना आजच्या प्रमाणे अनुकूल परिस्थिती नव्हती. मार्गदर्शन मिळणे शक्यच नव्हते आणि उद्योग उभारणीसाठी स्त्रीयांसाठी कर्जाची सोय करणे हा विचारही नव्हता. अशा परिस्थितीत पैशाचे पाठबळ नसतांना समाजाचा पाठिंबा नसतांना आणि त्या त्या

उद्योगांना आवश्यक उच्चस्तरीय शिक्षण नसतांना उद्योग क्षेत्रात काही स्त्रीयांनी पाऊल टाकले. त्यात त्यांची जिद्द, कष्ट करण्याची तयारी आणि जबरदस्त इच्छाशक्ती हे महत्वाचे घटक म्हणता येतील. नाशिकमधील पेढे विद्यालयात शास्त्राचे शिक्षक फाळले सर होते. त्यांच्या कल्पनेतून नाशिक मधून मॉडर्न सायंटीफिक उदयाला आली.

**संदर्भ ग्रंथ–**

1) स्त्री जीवन विषयक स्थित्यंतर (जिल्हा नाशिक) 876 ते 1950.
2) देसाई संभाजी– महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळ.
3) सक्षम समीक्षा (मासिक) जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर 2021
4) साने गीता– भारतीय स्त्री जीवन
5) निकम गौतम– क्रांतीकारी आदिवासी जननायक.
6) येवले तालुका स्त्री विशेषांक, कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला, जि. नाशिक. प्रकाशक, अध्यक्ष– प्र. वि. खंडार. 1990–91

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणनाऱ्या पदमश्री अनुताई वाघ

**डॉ. देवीदास आनंदा सोनवणे**
**अर्थशास्त्र विभाग**
**दादासाहेब बिडकर महाविद्यालय पेठ**
**ता. पेठ जि. नाशिक**

**विधान - अनुताई वाघ या आदिवासींकरीता काम करणा-या समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ होत्या त्यांनी शिक्षणाच्या सहाय्याने आदिवासींच्या जीवनात जागृती निर्माण करुन बालशिक्षणाचे कार्य आदिवासीं भागात केले आहे.**

सुप्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्या व शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ याचा जन्म पुणे येथे दिनांक १७ मार्च १९१० मध्ये झाला. त्यांचे वडील बाळकृष्ण वाघ हे सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरी करीत होते. त्यांच्या आई यमुनाबाई सोनोरी येथील सरदार पानसे यांच्या घराण्यातील होत्या. अनुताई वाघ यांचे सन १९२३ मध्ये वयाच्या १३ व्या वर्षी श्री.शंकर वामन जातेगावकर यांच्याशी विवाह झाला. परंतु सहा महिन्यांतच त्या विधवा झाल्यात, विवाहाच्या दिवसानंतर त्याचे सासरचे किंवा पतीचे दर्शनही झाले नाही. म्हणून त्यांनी पुढे आपले माहेरचे आडनाव चालू ठेवले. त्याकालावधीतील सामाजिक बंधनाची, रुंढी,परंपरा, चालीरीती, स्त्रीयावरील असलेले बंधने हे सर्व झुगारुन त्यांनी आपले पुढील शिक्षण चालु ठेवले. १९२५ मध्ये वर्नाक्युलर फायनल परीक्षेत त्या प्रथम आल्यात नंतर त्यांनी १९२९ मध्ये पुण्याच्या महिला प्रशिक्षण महाविद्यालयात प्राथमिक शिक्षकाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला. १९२९ ते १९३३ या कालावधी नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील खेड्यातील शाळेत तीन वर्ष त्यांनी शिक्षिका म्हणून नोकरी केली. १९३३ नंतर त्यानी पुण्यातील हुजूरपागा प्राथमिक विद्यालयात त्या नोकरीस लागल्या आणि १९३७ मध्ये रात्र शाळेत जाऊन मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. १९६१ मध्ये मुंबई येथील श्रीमती नाथीबाई दामोदरा ठाकरसी महिला विद्यापीठाची बी.ए. परीक्षा त्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

ग्रामीण भागात सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात त्या मग्न झाल्या महात्मा गांधीच्या खेड्याकडे चला या आदेशातुन त्यांनी प्रेरणा घेऊन १९४५ साली मुंबई मधील बोरीवली भागात भरलेल्या ग्रामसेविकांच्या प्रशिक्षण शिबिरात दाखल झाल्या तेव्हा त्याचा ताराबाई मोडक यांच्याशी परीचय झाला. अनुताईनी पालघरमधील आदिवासींमध्ये काम करण्यास इच्छूक असल्याचे विचारले . त्यावेळेस ताराबाई आदिवासी मुलांसाठी प्रायोगिक शाळा सुरु करण्याचा विचार करीत होत्या. त्यातुनच अनुताईनी कोसबाड भागात डहाणू तालुक्यातील पालघर येथे काम सुरु केले. ताराबाई मोडक यांच्या समवेत अनुताईनी बोर्डी येथे घनदाट जंगलाच्या आदिवासी भागात बालवाडी (नाटक शाळा) उभारली तेथे रस्ता, वीज, किंवा कोणत्याही प्रकारचे संवाद नाहीत. २४ डिसेंबर १९४५ रोजी तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सीचे मुख्यमंत्री बी. जी. खेर यांनी शाळेचे उद्घाटन केले.त्यांनी त्याच वर्षी बोर्डी जिल्हा ठाणे येथे मुलांसाठी ग्राम बालशिक्षण केंद्र ही प्राथमिक शाळा सुरु केली अनुताई वाघ या त्या शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाल्यात.१९४७

ते १९९२ असे सतत ४७ वर्ष त्यांनी ग्रामीण शिक्षणाचे कार्य केले. हे कार्य चालू असतांना त्यानी १९६१ मध्ये मुंबई येथील श्रीमती नाथीबाई दामोदरा ठाकरसी महिला विद्यापीठाची बी.ए. परीक्षा त्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

पुढे त्या कोसबाडच्या नुतन बाल शिक्षण केंद्रांच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंसाध व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकारणी सदस्य, अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले.आदिवासीच्या शिक्षणसाठी अनेक संस्था स्थापन करुन त्यांनी आपले सर्व आयुष्य आदिवासींच्या मुलांसाठी वाड्या पाड्यांवर जाऊन शिक्षणांचे धडे गिरवील आहेत. अनुताई वाघ यांनी पायी फिरुन द-या खो-यातुन,डोगर द-यातून आदिवासींच्या मुलासाठी मार्ग आणि त्यांच्या बरोबरीनं पळापळ केली आहे. त्यांनी आपल्या अकरा बालवाड्या, चार पाळणाघर, एक प्राथमिक शाळा,प्राथमिक व पूर्वप्राथमिक प्रशिक्षण विद्यालये, बालसेविका वर्ग, वसतिगृहे, किसानशाळा, रात्रशाळा प्रौढ शिक्षणाची केंद्र असे अनेक प्रयत्न त्यांनी आदिवासींच्या शिक्षणासाठी केलेले दिसून येतात.अनुताई वाघामुळे आदिवासींच्या घराघरांत नवं ज्ञान चाल गेले आहे असा अखंड आणि अवघड वाटचाल त्यांनी केली आहे.ताराबाई मोडक या बोर्डीला आल्या तेव्हा त्या ५३ वर्षाच्या होत्या आणि अनुताई वाघ या ३५ वर्षाच्या होत्या तर कोसबाडला आल्या तेव्हा ताराबाई या ६५ वर्षाच्या होत्या तर अनुताई वाघ या ४७ वर्षाच्या होत्या. अनुताई वाघ या ताराबाईच्या प्रत्येक कामात पुढे होत्या. आदिवासींना स्वच्छ राहण्यासाठी शिकविले आणि सकस आहार घेण्यास शिकविण्याचे काम केले. आदिवासींमध्ये मुख्यतः वार्ली मुले शिक्षण घेत होती. मुले नियमित शाळेत जातील याची खात्री करण्यासाठी अनुताईनी कोणतीही कसरत सोडली नाही, जेव्हा त्यांना असे आढळले की, मुले फेब्रुवारी ते जुन या महिन्यांत जास्त गैरहजर राहण्याचे कारण म्हणजे मुलांच्या घसरात जेवन नसते.एखाद्या दिवशी अनुताई हातत टाळ घेऊन रघुपती राघव राजाराम या गजरात दिंडी काढीत तर मुलांना शाळेपर्यंत आणण्यासाठी बैलगाडीतून मिरवणूकीतून त्या शाळेपर्यंत आणत असत. मुलं शाळेत येत नाहीत तर आणच मुलांकडे जायचे आणि मग वस्तीतच झाडाखाली अंगणवाडी सुरु केली.आदिवासीं भागातील शिक्षण म्हणजे त्यांना अनुताईनी मुलांना आघोळी घातल्या, मुलींच्या डोक्यातल्या उवा काढल्या, खरजेला औषध लावली, संडास तयार करुन त्याचा वापर कसा करावा यासाठी त्यांनी एका लहान मुलांकडून प्रात्यक्षिकही करुन घेतले.१९४६ साली पाड्यांवरील बालवाडी चालविण्याचासाठी अनुताईंचा मासिक अर्थसंकल्प तीन रुपयांचा होता. अनुताईनी मुलांना औपचारिक अभ्यासक्रम म्हणजे गाणी, गप्पा, खेळ, ओढ्यात आंघोळ, फुल जमा करणे, मारलेला साप अस्थिपजंर झाला म्हणजे त्याचं निरीक्षण करणं, एकाच वेळी दगड आणि चिंचोकी जमिनीत पुरुन त्यापैकी कशात जीव आहे हे ठरवणं, ओहोळावरुन उडी मारण्याच्या खेळात काठीनं त्यांनी लांबी मोजणे, असे अनेक प्रयोग करुन अनुताईनी भूगोल, जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, अंकगणित, कालमापन, स्वच्छता, सहकार असे धडे मुलांना आपोआपच मिळत गेले आणि शाळा म्हणजे मुलांच्या अंगणातील झाडे झाली पाहिजे असे अनुताई वाघाच्या शैक्षणिक पध्दती मागील तत्वज्ञान होत.

अनुताई वाघाच्या मुलांचे शाळेत गैरहजर राहण्याचे कारण काय तर ही मुले फेब्रुवारी ते जुन या महिन्यांत जास्त गैरहजर राहतात कारण म्हणजे मुलांच्या घसरात जेवन नसते. तेव्हा अनुताईंनी त्यांना शाळेत पोसण्याची

व्यवस्था केली. यातूनच अशा प्रकारे भारत एकात्मिक बाल विकास योजना (आयसीडीएस) च्या मध्यवर्ती अंगणवाडी संकल्पनेचा जन्म झाला.

कोसबाडच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकरणी सदस्य, अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले तर त्यांनी शिक्षण विषयक लिहिलेली ग्रंथ आणि पुस्तके याचे अनुवादन इंग्रजी, हिंदी, गुजराथी यामधुन झाले आहे. लोकांमध्ये प्रबोधन व्हावे यासाठी त्यांनी शिक्षणपत्रिका आणि स्त्रीयांमध्ये जागृती व्हावी यासाठी त्यांनी सावित्री मासिकाचे संपादिका म्हणून काम केले आहे.तसेच कोसबाडच्या टेकडीवर आदिवासींच्या विकासासाठी एक संस्था स्थापन केली या संस्थेला कोसबाड प्रकल्प म्हणून ओळख आहे त्यामध्ये आदिवासींच्या शिक्षणासाठी पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका ट्रेनिंग कॉलेज इ. शैक्षणिक संस्था त्यांनी सुरु केल्या आहेत.

अनुताई वाघांनाी बालवाडी कशी चालवावी १९५६, कुराण शाळा, विकासाच्या मार्गावर, शिक्षणमित्र माला, अजब सातभाई, आटपाट नगरात, सकस आहार गीते, टिल्लूची करामत, कोसबाडच्या टेकडीवरुन १९८०, सहजशिक्षण आणि गुरुमाऊलीचा संदेश, दाभणेच्या जंगलातआणि विकासवाडी दर्शन नाटक अशी अनेक पुस्तेके लिहिलेली आहे.

अनुताई वाघानी आदिवासींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले काम याची दखल घेऊन शासनाने त्यांनी विविध पुरस्कार देऊन गौरवलेले आहेत.

१९७२ - महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षिका किताब
१९७५ - दलित मित्र किताब
१९७८ - इचलकरंजीकचा फाय फाऊंडेशन पुरस्कार
१९८० - आदर्श माता सावित्रीबाई फुले,बालकल्याण राष्ट्रीय पुरस्कार
१९८५ - जमनालाल बजाज पुरस्कार
१९८५ - पद्मश्री पुरस्कार
१९९२ - अशा भोसले पुरस्कार (दीनानाथ प्रतिष्ठाण)

अनुताई वाघानीं शिक्षण क्षेत्रात जी कामगिरी केली आहे ती उल्लेखनीय आहे. अशा या शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसेविका याचे दिनांक २७ सप्टेंबर १९९२ रोजी कोसबाड येथे अल्पशा अजाराने निधन झाले.

**निष्कर्ष-** अनुताई वाघ यांनी आपल्या सामाजिक सेवेच्या कार्यातुन आदिवासी मुलांना शिक्षणाची गोडी लावली आणि त्यांच्या विकासासाठी विविध शिक्षणाच्या सुविधा कशा उपलब्ध होतील यासाठी त्यांनी प्रयत्न केला. तर अंगणवाडीची सुरुवात ही अनुताई वाघाच्या वाडी व पाड्यावरील झाडाखाली भरवलेल्या शाळेतूनच झाली आहे.

**संदर्भ-**

१. अनुताई वाघ यांची मराठी माहिती
२. वाघ अनुताई मराठी विश्वकोष प्रथमावृत्ती
३. आदिवासींना शिक्षण प्रवाहात आणणाऱ्या शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ
४. अनुताई वाघ (१९१० ते १९९२) यांच्या बद्दल संपूर्ण माहिती
५. माहितीजाल वरील माहिती

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नाशिक जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग

**प्रा. डॉ. खैरनार कैलास कारभारी**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मानूर,
ता. कळवण, जि. नाशिक.

*सारांश–*

***भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नाशिक जिल्ह्यातील स्त्रियांनी सहभाग घेतला होता. त्यांच्यापैकी काही स्त्रियांनी साहसी कृत्य केले होते. या काळात येथील स्त्रियांनी ब्रिटीशांच्या विरोधात स्वदेशी, बहिष्कार या चळवळीत महत्वाची भूमिका बजावली होती. काहींनी तर वेषांतर करून ब्रिटीशांच्या विरोधात वापरण्यात येणारी स्फोटक साहित्य योग्य त्या ठिकाणी पोहचविण्यास मदत केली होती. अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य चळवळ जिल्हाभर प्रसारीत करून वाढ केली होती.***

**प्रस्तावना–**

ब्रिटीशांनी एका हातात तराजू व दुसऱ्या हातात बंदुक घेऊन भारतात प्रवेश केला होता. 19 व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर आपली एक छत्री सत्ता निर्माण केली होती. ब्रिटीशांच्या खऱ्या ध्येय धोरणाची जाणीव फार कमी कालावधीत भारतीय समाजाला झाली. यातून पुढील काळात अनेक चळवळीचा, आंदोलनांचा उदय झाला. या चळवळी, आंदोलने यांचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या संबंध नाशिक जिल्ह्यातील जनतेशी आला. त्यात येथील पुरूष–स्त्री यांनी सहभाग घेतला होता.

ब्रिटीशांचा भारतातील प्रवेश आर्थिक हेतूने केलेला असल्याने त्यांनी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करून भारतीय जनतेचे आर्थिक शोषण केले. ब्रिटीशांच्या या धोरणातून व पारतंत्र्यातून सुटका करण्यासाठी देश प्रेम, स्वदेश अस्मिता उदय होऊन अनेक चळवळी सुरू झाल्या होत्या. परंतु ब्रिटीशांनी अमानुषपणे दडपून टाकल्या होत्या. त्यामुळे सामान्य जनता सशस्त्र क्रांतीपासून बाजुला लोटली गेली होती. इ.स. 1885 मध्ये 'राष्ट्रीय कॉग्रेसची' स्थापना झाली. राष्ट्रीय काँग्रेसचे प्रारंभीच्या काळात अगदी मवाळ धोरण होते. त्यानंतर इ. स. 1905 पासून जहाल मतवाद उदयास आला होता. तर इ.स. 1920 नंतर महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाने जनसामान्याचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग झाला. त्यातून जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. महात्मा गांधीचींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय काँग्रेसने अनेक आंदोलने केली. या आंदोलन चळवळीत नाशिक जिल्ह्यातील जनतेनेही सहभाग घेतला होता.

स्वा. वि. दा. सावरकर यांनी स्थापन केलेल्या 'अभिनव भारत' या संघटनेचा उदय आणि विकास नाशिक जिल्ह्यात झाला होता. त्यांचे मोठे बंधु बाबाराव सावरकर हे जून 1908 मध्ये काही कामानिमित्त मुंबई येथे गेले होते. त्यावेळी ब्रिटीशांनी त्यांना पकडून एक महिन्यांची सश्रम कारावसाची शिक्षा दिली

होती. त्यावेळी त्यांच्या पत्नी येसूबाई या निराधार झाल्या होत्या. तेव्हा त्यांनी 1905 मध्ये स्थापन झालेल्या 'आत्मनिष्ठ युवती संघ' यांत 50–60 युवतींना संघाचे सदस्य केले. त्यातून हळदी कुंकू कार्यक्रम घडवून आणत. या आत्मनिष्ठ युवती संघाच्या प्रचारक येसूबाई होत्या. नाशिक जिल्ह्यातील येवला शहरातील शेवंताबाई या अस्पृश्य समाजातील स्त्रीने महात्मा गांधीजी गोलमेज परिषदेतून परत आले. त्यावेळी त्यांनी भाऊच्या धक्यावर काळा बावटा दाखविण्यात सहभाग घेतला होता.

बागलाण तालुक्यातील चिराई गावातील यमुनाबाई भिका पाटील यांनी इ.स. 1930 च्या जंगल सत्याग्रहात भाग घेतला होता. त्याबद्दल त्यांना 3 महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. कायदेभंग चळवळीच्या काळात विलेपार्ले या ठिकाणी करण्यात येणाऱ्या सत्याग्रहात सहभाग घेण्यासाठी नाशिक जिल्ह्यातून स्वयंसेवक तुकड्या रवाना होत होत्या. जिल्ह्यातील सर्व भागातून येणारे स्वंयसेवक एकत्र आल्यावर त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सभा घेतली जात होती. तेव्हा या स्वंय सेवकांना गंध, कुकुम तिलक करून सत्याग्रहींना महिलांनी शुभेच्छा दिल्या होत्या. येवला तालुक्यातील राधाबाई पांडुरंग आपटे यांनी कायदेभंग चळवळीच्या काळात सभा, मिरवणुका, यात सहभाग घेतला होता. त्याबद्दल त्यांना तीन महिने सक्त मजुरी शिक्षा झाली होती. तसेच नाशिक शहरातील पार्वताबाई इंगळे, लक्ष्मीबाई कुलकर्णी, कमलाबाई देवरे, वत्सलाबाई पोतनीस, मालतीबाई सबनीस, लिलाधर उपाध्ये या स्त्रियांनी स्वदेशी चळवळीत सहभाग घेऊन बुलेटिन वाटणे, स्वदेशीचा प्रचार करणे, मोर्चे काढणे इ. कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्याबद्दल त्यांना तुरूंगवास भोगावा लागला होता. तर पार्वताबाई इंगळे यांना तीन महिने सक्त मजूरीची शिक्षा झाली होती.

कायदेभंग चळवळीच्या काळात दारू दुकानावरील विरोध कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या कार्यक्रमाला नैतिक व सामाजिक अधिष्ठान असल्याने स्त्रियांचा सहभाग वाढला होता. तेव्हा येवला शहरात राधाबाई आपटे यांनी किर्तनाच्या माध्यमाचा वापर करून परिसरातील स्त्रियांमध्ये जनजागृती केली होती. तसेच त्यांनी स्वदेशी चळवळीचा प्रसार करण्यासाठी 'वनिता संघाची' सभा घेऊन या संघामार्फत स्वदेशी मालाची दुकाने सुरू करण्याचे आव्हान केले होते. तसेच इ.स. 1941 मध्ये त्यांनी 'स्त्रीसंघ स्वावलंबन' माध्यमातून गांधी विचार खादीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी व्याख्याने आयोजित केली होती.

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे इ. स. 1939 मध्ये 'लोकमान्य मेळा' स्थापन करण्यात आली. या मेळ्यात मुलांबरोबर स्वातंत्र्याची तळमळ असणाऱ्या मुलींना सहभागी करण्यात आले होते. या मेळ्यात जनमन जागृतीसाठी राष्ट्रभक्तीची गीते गाईली जात असत. गोदुताई खरे यांनी हिंदु, वनिता मंडळ स्थापन केले होते. या मंडळात सुमारे 150 स्त्रियांचा समावेश होता. त्यातून स्त्री जागृतीचे कार्य करण्यात येत होते.

वैयक्तिक सत्याग्रह चळवळीत सहभाग घेणाऱ्यांच्या कारणावरून नाशिक शहरातील मालतीताई

सबनीस यांना तुरूंगवास व दंड करण्यात आला होता. याच चळवळीच्या दरम्यान नोव्हेंबर 1941 मध्ये कमलाताई माधवराव जानोरकर यांनी नाशिक शहरात झालेल्या युद्ध विरोधी सभेत स्वातंत्र्याचा प्रचार व घोषणा दिल्या होत्या. याच महिन्यात नाशिक जवळील म्हसरूळ येथे जैन धर्मिय समाजाची सभा होती. या सभेत कमलाताई जानोरकर यांनी व्याख्यान दिले होते.

महात्मा गांधीजीनी चालवलेल्या स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी सक्रिय सहभाग घेण्यासाठी व कॉंग्रेसची ध्येय धोरणे समजावून देण्यासाठी जानेवारी 1942 मध्ये महिला संघाची नाशिक येथे सभा घेण्यात आली. या सभेला राधाबाई आपटे यांनी मार्गदर्शन केले होते. तसेच एप्रिल 1942 मध्ये मालेगांव शहरात सभा झाली होती. या सभेत सिताबाई रामचंद्र गणपुले, मनुताई गोपळराव जोशी यांनी क्रिप्स योजनेतील फोल पणा व भारताविषयी ब्रिटीशांच्या राजकारणाची जाणीव करून दिली.

महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या 'चले जाव' चळवळीत बुलेटिन वाटणे, भूमिगत कार्यकर्त्यांना सहकार्य करणे, बॉम्ब नेणे इ. कार्यात सहभाग घेण्याच्या कारणाने इंदूबाई दत्तात्रय उपासणी यांना सक्त मजूरीची शिक्षा करण्यात आली होती. या चळवळीत कळवण तालुक्यातील हातनूर गावातील आहिल्याबाई रघुनाथ जोशी यांनी सहभाग घेतला होता. याबद्दल त्यांना सक्त मजुरीची शिक्षा करण्यात आली होती. ती शिक्षा त्यांनी धुळे व ठाणे येथील तुरूंगात भोगली होती. तसेच नाशिक येथील उषाबाई शंकर मंगरूळकर यांनी पिकेंटिंग केले. त्याबद्दल त्यांना चार महिने सक्त मजुरीची शिक्षा व 50 रूपये दंड करण्यात आला होता. बागलाण तालुक्यातील सटवाईचीवाडी येथील अमृता राघू यांना दोन महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. या दरम्यान काळात जीवनावश्यक वस्तूंच्या भावात वाढ झाली होती. त्यावेळी लहान वयाच्या शांताबाई बोरा यांन चळवळीत सहभाग घेऊन तत्कालीन ब्रिटीश सरकार विरोधी घोषणा दिल्या होत्या. आझाद मैदानावरील झेंडा वंदनाच्या कार्यक्रमात नाशिक शहरातील डॉ. शांताबाई कुलकर्णी यांनी सहभाग घेऊन पिकेंटिग, सत्याग्रह, उपोषण या मार्गाचा अवलंब करून स्त्री वर्गात स्वातंत्र्याची चळवळ प्रसारीत केली होती. त्याबरोबर नाशिक मधील शिवाजीनगर येथे सत्याग्रह करण्याचे निश्चित केले. तेव्हा ब्रिटीश सरकारने अटक केली होती. त्यांच्या समवेत स्त्रियांना कुसुम पटवर्धन, डॉ. कमल पी. जोशी, माई पंडीत, यमूबाई गोंगटे इत्यादी ऑक्टो. 1942 ते जुलै 43 पर्यंत तुरूंगात ठेवण्यात आले होते. त्यांच्या या कार्यक्रमाचा आदर्श घेऊन नाशिक शहरात 30 ऑक्टोंबर 1942 रोजी लहान मुलींनी प्रभातफेरी काढून सरकार विरोधी निदर्शने केली होती.

संदर्भ–

1. येवले तालुका स्त्री विशेषांक, कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला, जि. नाशिक. प्रकाशक, अध्यक्ष प्राचार्य प्र. वि. खंडार. 1990–91
2. आपटे राधाबाई– उमटलेली पाऊले, साधना प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 1961.

3. गर्व्हमेंट ऑफ बॉम्बे होम डिपार्टमेंट, स्पेशल ब्रॅच फाईल नं. 1070 (58) अ (11) सी.डी. मुव्हमेंट, डेलि रिपोर्टस् नाशिक. 1942.
4. होम डिपार्टमेंट, स्पेशल ब्रॅच फाईल नं. 1020 (5) सी. (11) सी.डी. मुव्हमेंट, डेलि रिपोर्टस् नाशिक.
5. होम डिपार्टमेंट, स्पेशल ब्रॅच फाईल नं. 924 डी. डी. ख–खख– 1940–42. I-II- 1940-42. Weekly contidentional report for the week ending.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# नाशिक मधील १९४२ची चलेजाव चळवळ
## ( विशेष संदर्भ : दत्तात्रय मल्हारराव बिडकर )

**डॉ.रामदास भोंग**
*इतिहास विभाग,*
*एच.पी.टी.आर्ट्स आणि आर.वाय.के सायन्स कॉलेज, नाशिक.*

**गोषवारा-**

आधुनिक भारताच्या इतिहासात भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व त्या आंदोलनात सहभागी झालेली सामान्यातील सामान्य स्तरातील घटक यामध्ये मुख्यतः नाशिक जिल्ह्यातील आंदोलनामध्ये दादासाहेब बिडकर त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. दादासाहेबांनी स्वातंत्र्य आंदोलनात सामान्य आदिवासी शेतकरी यांना जोडून घेतले वेळप्रसंगी तुरुंगातील शिक्षा भोगली. आदिवासी, शेतकरी यांना आपल्या कृतीशील कार्याने देश सेवेसाठी प्रेरित केले. या त्यांच्या कृतिशील योगदानामुळे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात त्यांच्या कार्याचे महत्व असाधारण असे राहिले आहे.

**प्रस्तावना-**

भारताच्या इतिहास आधुनिक कालखंडातील स्वातंत्र्य आंदोलनाच्या घडामोडीत नाशिकचे आपले वेगळे महत्व राहिले आहे. कारण विसाव्या शतकात जगभरात यांच्या राज्यावरील सूर्य कधीही मावळत नव्हता अशा ब्रिटिशांविरुद्ध भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा तीव्र झाला होता. या लढ्यात समाजातील सर्व घटकांनी आपले योगदान दिलेले दिसून येते. यामध्ये नाशिक मधील दत्तात्रेय बिडकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. कारण ब्रिटिशांच्या धोरणाने समाजातील शेतकरी, आदिवासी, कामगार व सामान्य माणूसाचे खूप आर्थिक नुकसान होऊन त्यांची स्थिती हलाखीची बनत चालली होती. यापासून मुक्तता मिळवण्यासाठी देशभरात आंदोलने पेटली, त्यातिल निर्णायक आंदोलन म्हणजे १९४२ ची चलेजाव चळवळ या चळवळीत नाशिकमध्येही मोठे आंदोलने घडून आली. महात्मा गांधी यांच्या आदेशावरून नाशिक मधून अनेक कार्यकर्ते नेते चळवळीत सक्रिय सहभागी झाले. यामध्ये दादासाहेब बिडकर अग्रस्थानी होते१.मात्र त्यांच्या योगदानाची पूर्ण दखल घेतलेली दिसून येत नाही. आणि म्हणूनच प्रस्तुत संशोधकाने शोधनिबंधा साठी नाशिक मधील १९४२ ची चलेजाव चळवळ (विशेष संदर्भ : दत्तात्रय मल्हारराव बिडकर) हा विषय निवडला आहे.

**शीर्ष शब्द** - दादासाहेब बिडकर, चलेजाव चळवळ,नासिक.

**दत्तात्रय मल्हारराव बिडकर चरित्र-**

दत्तात्रय (दादासाहेब) बिडकर यांचा जन्म महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील तासगाव येथे १९ मार्च १९१०[२] रोजी झाला. त्यांचे दत्तात्रय हे नाव त्यांच्या आजोबाच्या नावावरून ठेवण्यात आले. त्यांचे बालपण तासगाव मधेच गेले. प्राथमिक शिक्षण तासगाव येथे तर इंग्रजी पाचवी पर्यंतचे शिक्षण कोल्हापुरातील राजाराम हायस्कूल[३] मध्ये झाले. तर महाविद्यालयीन शिक्षण हैदराबाद येथील मद्रास युनिव्हर्सिटी मधील निजाम कॉलेज[४]मध्ये झाले. याच कॉलेजमध्ये सरोजिनी नायडू यांच्या देशभक्ती या विषयाचे व्याख्यान[५] ऐकून ते स्वातंत्र्य आंदोलनात ओढले गेले.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे तसेच संदर्भासाठी ए. पी. ऐ. या पद्धतीचा वापर केला आहे.

**संबंधित साहित्याचा आढावा-**

प्रस्तुत विषया संबंधाने आदिवासी सेवक दादा दादासाहेब बिडकर, दादासाहेब बिडकर वसा : आदिवासी सेवेचा हे ग्रंथ तसेच पीएच.डी, एम.फिल साठी नाशिक जिल्ह्यातील ऐतिहासिक संबंधाने मध्ययुगीन व आधुनिक कालखंडाच्या राजकीय, सामाजिक तसेच धार्मिक अंगाने अध्ययन झालेले आहे. मात्र कुठेही दत्तात्रय बिडकर यांच्या १९४२ आंदोलनातील योगदानाबद्दल सविस्तर अभ्यास आढळून आला नाही. हेच प्रस्तुत शोधनिबंधाचे वेगळेपण व उपयोगिता आहे.

**१९४२ च्या आंदोलनाची पार्श्वभूमी-**

१८५८ च्या ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर १८८५ मध्ये कॉंग्रेसच्या स्थापनेने खऱ्या अर्थाने अखिल भारतीय स्तरावर संघटितपणे ब्रिटिशांना विरोध करण्याची सुरुवात झाली. याच क्रमामध्ये दुसऱ्या महायुद्धादरम्यान हा संघर्ष अधिक तीव्र होत गेला. या संघर्षाच्या अंतिम टप्प्यामध्ये महात्मा गांधींनी *करो या मरो* हा नारा दिला. याचे मुख्य कारण म्हणजे १९४२ मध्ये क्रिप्स मिशनला आलेले अपयश तसेच या महायूद्धा दरम्यान भारतीयांना कोणतीही घटनात्मक अधिकार न मिळण्याची परिस्थिती तसेच ब्रिटिशांना कोणत्याही परिस्थितीत युद्धात भारतीयांचे सहकार्य आवश्यक होते.तसेच आणखी एक कारण म्हणजे क्रिप्स मिशनच्या अटीवर काही प्रतिक्रिया दिली नाही तर एक प्रकारे भारतीयांना कोणते अधिकार द्यावे हा अधिकार इंग्रजांना मिळणार होता, हे भारताच्या दृष्टीने हानिकारक होते. त्यामुळे स्वातंत्र्यासाठी अंतिम लढाई देण्याची हीच योग्य वेळ होती. म्हणून महात्मा गांधींनी निर्णायक लढ्याचा निर्धार करून चलेजाव आंदोलनाची हाक दिली[६].

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

**दादासाहेब बिडकर यांचा लढ्यात सहभाग व शिक्षा-**

९ ऑगस्ट १९४२ या दिवशी संपूर्ण भारतात चलेजाव चळवळीची सुरुवात झाली. नाशिकमध्येही मोठ्या प्रमाणात तरुण कार्यकर्ते या लढ्यात सक्रिय सहभागी झाले. त्यांनी वेगवेगळया मार्गांनी ब्रिटिशांना विरोध करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. यामध्ये टेलिफोन तारा तोडणे[७], गांधी जयंती[८] साजरी करणे रेल्वेचे रूळ उखडणे, पोस्ट ऑफिस लुटणे, पिकेटिन,धरणे आंदोलन[९] इ. नाशिक मध्ये गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून दादासाहेब बिडकर यांनीही या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे त्यांना अटक झाली व दोन वर्षाची शिक्षा[१०] सुनावण्यात आली.

**दादासाहेबांचा तरूण कार्यकर्त्यांवरील प्रभाव-**

दादासाहेबांनी चेलेजावच्या आंदोलन भाग घेतल्यामुळे त्यांना जेलमध्ये जावे लागले.परंतु जेल मध्ये असताना देखील त्यांनी बागलान आणि परिसरातील ब्रिटिश विरोधी चळवळ आपल्या सहकार्या मार्फत सुरू ठेवली, याविषयीची माहिती दादासाहेब शिक्षा भोगण्यासाठी धुळयातिल जेलमध्ये असताना त्यावेळी त्यांची भेट यदुनाथ थत्ते यांच्या बरोबर झाली होती या भेटीदरम्यान थत्ते व दादा साहेब यांच्या चांगलेच सख्य निर्माण झाले. कारण दोघेही एकाच ध्येयाने प्रेरित होऊन शिक्षा भोगत होते. त्यावेळेच्या जेल मधील आठवणी सांगताना थत्ते यांनी आपली एक आठवण नमूद केली आहे. ते म्हणतात की दादासाहेब बागलान मध्ये काम करते होते त्यामुळे चळवळ जोमात होती. नाशिक मध्ये बागलाण हे ब्रिटिश कार्यक्रमात अग्रभागी होते तेथील कार्यकर्त्यांमध्ये दादासाहेबांना बद्दल अत्यंत जिव्हाळा व आदर होता. कारण दादासाहेबाकडे हे तरुणांमध्ये देशप्रेमाची व सामाजिक कार्याची प्रेरणा निर्माण करण्याची चांगली हातोटी होती. याचे कारण म्हणजे दादासाहेब हे काम करताना तत्कालीन काँग्रेस नेत्यापेक्षा आपल्या सारख्या तरुणांमध्ये ज्यास्त रमत ते तरुणांनी आखलेल्या योजनांवर अंमलबजावणी करत[११]. त्यामुळे कार्यकर्ते दादासाहेबांवर विशेष प्रेम करत हे यावरून दिसून येते व त्यांच्या वरील दादासाहेबांचा प्रभावही दिसून येतो.

**नाशिक रोडची डिस्टलेरी उडवून देण्याची योजना-**

महात्मा गांधींच्या सूचनेनुसार अहिंसक पद्धतीने आंदोलन करून ब्रिटिशांना भारतातून घालून देणे हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. याच प्रेरणेने आंदोलने सुरू होते. मात्र दारू-ताडीच्या दुकानं वरील निरोधन करून, विलायती कपड्यांच्या होळया करून, मोर्चे, धरणे आंदोलने करून काही साध्य होताना दिसत नव्हते. उलट या मधून भारतीय स्वातंत्र आंदोलकांचे प्राण जात होते. तर काही वेळेस कठोर शिक्षेला सामोरे जावे लागत. त्यामुळे निशस्त्र क्रांतीचे महात्मा गांधीजींचे तंत्र आणि मंत्र सांभाळून आंदोलन सुरू असली तरी सरकारी दडपशाहीमुळे उठाव करणे व लोक जागृती करणे कठीण होत होते.

सरकारही पूर्ण ताकतीने उठाव दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत होते.यावेळी दादासाहेब बिडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनि जशास तसे उत्तर देण्यासाठी एक योजना आखली,यामध्ये नाशिकरोड येथील सरकारी डिस्टलेरी उडवून देण्याचे ठरले[१२] मात्र महात्मा गांधींच्या अहिंसक आंदोलनाच्या संदेशामुळे तसेच जर असे केले तर सरकार दडपशाही करून गोळीबार करेल व त्यात अनेक भारतीय क्रांतिकारकांचे प्राण जाऊ शकतील, अश्या वेळीही हानी परवडनारी नव्हती. त्यामुळे ही मोठी योजना अमलात आणली गेली नाही.

**बुलेटीनचे वाटर-**

देशप्रेम,देशासाठी काहीतरी करण्याची भावना निर्माण करणे तसेच काँग्रेस व महात्मा गांधीजींचे संदेश लोकांपर्यंत पोहोचवले हे काम अवघड होत होते. मात्र कितीही अवघड असले तरी ते करण्याची तयारी दादासाहेबांनी दाखवली होती. ब्रिटिशांच्या अन्याय अत्याचाराच्या कहाण्या,स्वशासनाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी बुलेटीनचा वापर करणे अगत्याचे होते. मात्र यावरही ब्रिटीशांची करडी नजर होती.बुलेटीन वापरताना कोणी आढळल्यास त्याला तुरुंगात टाकले जाई. मात्र दादासाहेब याही कार्यांमध्ये कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष सहभागी होत होते[१३]. व जनतेमध्ये स्वातंत्र्यप्रति जागरुकता निर्माण करण्याचे काम करीत होते.

**समतेचा अंगीकार-**

दादासाहेबांनी पेठ,बागलान परिसरातील चळवळीचे नेतृत्व आपल्याकडे घेतले होते. त्यामुळे तेथील संपूर्ण कार्यक्रमाची आखणी व व्यवस्था ते स्वतः करत विशेषता जमलेल्या कार्यकर्त्यांच्या जेवणाची व्यवस्था ते स्वतः जातीने लक्ष घालून करीत, त्यांनी आंदोलनात सामान्य ते सामान्य माणसाला जोडले होते वेळ प्रसंगी ते त्यांचे कपडे देखील धुवत[१४] व त्यातून त्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजून सांगत. हे करताना त्यांनी कधीही स्पृश्य-अस्पृश्य उच्चनीचता हा भेट केला नाही. तसेच हे काम करताना त्यांना कधीही कमीपणा वाटला नाही. यावरूनच ते महात्मा गांधींचे सच्चे अनुयायी होते हे दिसून येते. तसेच सर्व जातींमधील समानतेची भावना त्यांच्या अंगी दिसून येते ही प्रेरणा त्यांना महात्मा गांधी बरोबरच सत्यशोधक समाजाच्या कार्यातूनही मिळालेली होती[१५] असे म्हणता येईल.

**सारांश-**

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील १९४२ च्या लढ्याचे वेगळे महत्त्व सिद्ध होते. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील आंदोलनात दादासाहेब बिडकर यांनी आदिवासी भागात जाऊन सामान्यातल्या सामान्य माणसाला देश स्वातंत्र्यासाठी काम करण्यास प्रेरित

केले.हे काम करत असताना स्वतःही वेळप्रसंगी तुरुंगवास भोगला. तुरुंगामध्ये व तुरूंगाबाहेर पडेल ते काम केले. शेवटपर्यंत व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात जातीभेद विरहित वर्ग विरहित सत्यशोधकी तत्वे व गांधीजींच्या प्रभावातून जीवनभर देशसेवा केली. ४२च्या लढ्यात कृतिशील सहभाग घेऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले.

**संदर्भ-टिपा**

१. बोडके एस.,( २०१८), सोर्स फॉर हिस्टरी ऑफ द फ्रीडम मूवमेंट कुइट इंडिया मूवमेंट विथ स्पेशल रेफेरेंस टु नाशिक डिस्ट्रिक्ट कोन्फिडेंशल रीपोर्ट,होमडिपार्टमेंट(स्पेशल),रजि,एस.डी./७२४६.दि.०१.१०.१९४२.

२. धारणकर सरल,.(२००६),आदिवासी सेवक दादा बिडकर डांग सेवा मंडळ, नाशिक,प्रथम आवृत्ती, पृ.क्र.१.

३. कित्ता,पृ.क्र.१.

४. कित्ता,पृ.क्र.५.

५. कित्ता,पृ.क्र.७.

६. काळे,एम. व्ही., (२००८),(अनु), भारताचा स्वातंत्र्य संघर्ष, के. सागर पब्लिकेशन, पुणे, तृतीय आवृत्ती, पृ.क्र ५२७.

७. बोडके एस,उपरोक्त,कोन्फिडेंशल रीपोर्ट, होम डिपार्टमेंटस्पेशल,रजि,एस.डी./४३७०.दि.२३.१०.१९४२

८. कित्ता, रजि,एस.डी./७४०४.दि.१३.१०.१९४१.

९. कित्ता, कोन्फिडेंशल रीपोर्ट, नाशिक डिस्ट्रिक्ट,९.१०.१९४२.

१०. टीप-१९३७ मध्ये मिस.जे.एल.लेंथम या ७५ वर्षीय महिलेने बागलाण तालुक्यात मोफत शिक्षण व आरोग्याचे काम सुरू केले.१९३७ च्या दुष्काळात तिने मोफत धान्य व औषध या परिसरातील नागरिकांना पुरवली अश्या या मिशनरीबाईने व दादासाहेब बीडकर यांनी २३. जून १९३७ मध्ये आदिवासि साठी डांग परिसरातडांगसेवा मंडळाची स्थापना केली. या परिसरात पहीले

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

वस्तीग्रह सुरू केले. यावेळी संथेच्या अध्यक्ष लेंथम व सेक्रटरि दादासाहेब बीडकर होते.(एच.पी.टी. आर्ट आणि आर.वाय.के. सायन्स महाविद्याल,नाशिक, हिरक महोत्सव १९१४-१९८४ स्मृतिग्रंथ, प्रथमावृत्ती, १९८५ पृ. क्र. १७३,१८५.)

११. धारणकर सरल, उपरोक्त, पृ. क्र.२८.

१२. कित्ता, पृ. क्र.२८.

१३. कित्ता, पृ. क्र.२९.

१४. कित्ता, पृ. क्र.१९.

१५. टीप. दादासाहेब पुण्यात असताना सत्यशोधक समाज्याच्या कार्यात ते हिरीरिने भाग घेत. सत्यशोधक समाज्याच्या मेळाव्यात ते हातात भाला, घुंगरू, काठी, आणि ड्रम अश्या वेशात मिरवत असत. (धारणकर सरल., (२०१२), दादासाहेब बिडकर वसा आदिवासी सेवेचा, राजहंस प्रकाशन लिमिटेड, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.क्र. १९).

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# WORKERS MOVEMENT

**Mr. Udhav Kalu Kudase**
*Department of History*
*M.S.G. College, Malegaon Camp, Malegaon (Nashik)*

## INTRODUCTION

After 1920 there was a great interest in Marxist and socialist thinking which strengthened the labour movement. After 1860, there was an increased pace of industrialization. Earlier the British did not encourage new industries because they were out to protect British industries. They had always given the top priority to safeguard the interest of capitalist class of England but despite all adverse circumstance a number of industries like cotton cloth, paper, mining, tea, Indigo, juice, and railways continued to develop albeit slowly some specific cities were developing as the industrial centres; naturally the number of industrial workers in India was also increasing Reasons for formation of working class.

## COMMENCEMENT OF RAILWAYS IN INDIA

As the industrial Revolution progressed in England, so did the need for raw materials. This raw material was very cheaply available in India. As it was being manufactured in different parts of India, the British needed railways to collect it and send it to England. This was discussed during the time of lord Dalhousie as a necessity for the industrial policy of England and allowed the construction of new railway lined in India. It was a great revolution in the field of transportation. The first railway line from Mumbai to Thane was started in 1853. The railway line would be very lucrative for the company to do business in a short period of time the work of laying railway line started in many parts of Indi. Thousands of workers were needed for the construction of railway stations etc.

## RISING DEMAND FOR COAL

The train started. The locomotive of the train was running on steam and coal was needed to make this steam. The spirit of the industrial revolution is steam in fact, the industrial Revolution was based entirely on the steam. Coal was used to make steam in all places like Madhya Pradesh an Bihar. As the industry grew, so did the demand for coal. Thousands of workers were needed during this period to complete it, which created the working class.

**THE CIVIL WAR IN AMERICA**

At a time when the industrial revolution was in full swing in England there was a sudden crisis in England. The American colony of England started the war of independence against England – cotton as raw material from America in England But with the outbreak of the civil war, England's agricultural industry came to a standstill. Because the cotton they needed stopped coming from America. To meet this need, the British government encouraged cotton cultivation in India the ginning press was created the process the finished cotton in India for this, the working class was needed.

**COMMENCEMENT OF TEXTILE AND HEMP MILLS IN INDIA**

The industrial revolution also affected India. the first textile mill in Mumbai was started in 1854 as the traders here saw that wish the help of machines it was possible to produce cloth in less labour and time. Temp mills were started in Calcutta in the same year as hemp was being produced in large Quantities in Bengal.

**START OF VARIOUS FACTORIES**

As agriculture the main occupation in India, there was a lot of livestock here. The handicraft and home industries have been ground since ancient times. But during the industrial period it took on a mechanical form. In the 1869 Ad, the government set up factories based on the leather industry. The leather industry developed further in the cities of Kanpur & Agra in Uttar Pradesh. In 1913 as iron and steel factory was started at fata Nagar. This factory needed a large number of workers

**PROBLEMS CREATED BY WORKERS**

The increase in the working class to the extent of industrial development in India created many problems for the workers-

1) **Low pay** – In most factories workers had to work for very low wages. This salary is not enough for their livelihood.
2) **Working hours** – There was no fixed working hours for the workers.In most of the factories 12 to14hours work was done.
3) **Child Labour** – Many factories would recruit child labour. He also used to work as a big labourer but he was paid less as a child labourer.

4) **Health and issue** – There were no health facilities in the factory.Ventilation facilities were inadequate in many factories. It affected the health of the workers. As a result, the incidence of diseases among the mill workers was high.

5) **Loot from contractors** – During the period many contractors were created for recruitment. These contractors would provide low- wage labour to the manufacturers. The contractors used to loot a lot of many while getting wages from the workers and they used to rely on their salaries.

6) **The question of accommodation** – The workers could not be accommodated in the factory premises. As a result, they build huts near the factory. This created a new problem of slums. Some workers lived in their own homes but their homes were far away so it is very hectic for them to come and go.

**THE BEGINNING OF THE LABOUR MOVEMENT**

The rise of the labour movement in India was generally towards the end of the 19th century. The industrial revolution enriched the society on the one hand and the working class on the other. On the one hand, and the affluent class of factory workers was created and on the other hand these factories were financially cursed for the workers. As a large number of workers began to exploited, the labour movement started. The credit for the labour movement goes to Narayan Meghaji Lokhande a labour leader form Mumbai. He raised the issue of workers with the help of Mahatma Jyotiba Phule the leader of Satyashodhak Movement. Since Lokhande himself worked in the mill he saw first hand how the textile mill workers were exploited. Lokhande broke the news of the workers in the newspaper Dinbandhu. He wrote many articles form the 'Dinbandhu'' and demanded that the lives of he workers should be improved and their exploitation should be stopped. But when he realized that it was of little use, he organized a trade union called the Bombay mill trades association. As it is considered to be the first trade union in India Narayan Meghaji Lokhande refers to as the father of trade unions.

**DISINTEREST FOR LABOUR WELFARE**

Though the industrial labour force increased, neither government nor the industrialists were bothered with their plight. Indian labour was illiterate and unorganised so no one was interested in their welfare. They were treated very badly, there were no fixed working hours, wages were low and they had no job security. Efforts by social organization to alleviate their plight were few and

marginal and many loopholes; existed in the labour laws enacted by the government; hence these laws could not give any protection to the workers.

**AWAKENING IN THE LABOUR FORCE**

There was gradual awakening in the labour force after 1918. After the first world war was over, economy in India is suffered, dearness increased and unemployment soared. There were a spate of strikes and labour started getting united and organised. On 31th October, 1920 the ‘’ All India Trade Union Congress’’(AITUC) was established.

**LABOUR UNION OF COMMUNISTS**

The communists party play an important role in organising labour in Bombay , Calcutta, Kanpur and other cities. Between 1927 to 1929 there were a spate of strikes- with their activities the workers class was awakened; during 1927 to 1929 there was once again a spate of strikes.

In 1928 there were 203 strikes. Over five lakhs workers struck work. In Bombay the communist labour union conducted a strike of 1.5 lakhs textile workers that lasted over five months in 1929 in which railway workers also took part. Jute workers in Bengal also declared a general strike in Kharagpur the railway workers demanded increased wages and went on strike for two months.

**VARIOUS LABOUR UNIONS**

Many unions like ‘’Indian National Trade Union federation, “ Red Flag Trade Union Federation” etc. In addition to all India Trade Union Congress(AITUC) had Risen. After 1934 There were again many strikes in jute, textile and railways. In may 1947 , ‘’ The Indian National Trade Union Congress (INTUC) was formed.

**OBJECTIVES:-**

1) To regulate terms and conditions of employment.
2) To improve the working conditions at work place.
3) To raise the living standards of workers.
4) To protect the workers by exploitation of management.
5) To help in maintenance of discipline of organisation.
6) To ensure the proper implementation of personnel and welfare policies.

**CONCLUSION:**

The workers in India consists of about 487 million workers. The second largest after China. India has numerous labour laws such as those prohibiting discrimination and child labour, those that aim to guarantee fair and human conditions of work, those that provide social security, minimum wage, right to organise, form trade unions and enforce collective bargaining. India is considered to be a highly regulated and most rigid labour law countries in the world. They need to be flexible for their proper implementation and should be reviewed from time to time keeping in tune with the labour and economy's dynamics.

**REFERENCES :-**

1) Dr. Raut Ganesh D., Indian National Movement 1885 – 1947, Nirali Prakshan, Pune. Page No. 4.1
2) Dr. Shaha G. B. Adhunik Bhartacha Itihas 1857-1950, Prashant Publication, Jalgaon. Page No. 334
3) K. Sagar, History of Modern India 1757-2004, K Sagar Publications, Pune. Page No. 145
4) Gafhur Shaikh, Adhunik Bharatacha Itihas, Pritam Publication, Jalgaon. Page No. 290
5) Dr. Tamboli N. S., Modern India 1885-1992, Nirali Prakashan, Pune. Page No. 7.9
6) Raut Ganesh, Raut Jyoti, Maharashtratil Parivartanacha Itihas, Diamond Publications 2005, Pune. Page no. 279

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात शिक्षण चळवळीचे प्रणेते - कर्मवीर दादासाहेब बिडकर

**प्रा. दिनेश दौलत हळदे**
*डॉ. विजय बिडकर महाविद्यालय,*
*अभोणा, ता. कळवण जि. नाशिक.*

भारतात वेगवेगळ्या भागात प्राचीन आदिम जमाती आहेत त्यांना आदिवासी म्हणून ओळखले जाते. या समाजाची लोकसंख्या राज्यानुसार वेगवेगळी असून काही राज्यांमध्ये त्याचे प्रमाण 50% पेक्षा जास्त आहे. तर काही ठिकाणी फारच कमी आहे, त्यात 50% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेले राज्य म्हणजे मेघालय, मिझोराम, नागालँड, अरुणाचल प्रदेश हे होय. तसेच केंद्रशासित प्रदेशातही आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आढळून येतो.

महाराष्ट्राचा विचार करता 11% आदिवासी समाज महाराष्ट्रात असून त्यात धुळे, ठाणे, नाशिक, नंदुरबार, गडचिरोली हि जिल्हे आदिवासी बहुल जिल्हे आहेत. या आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी शासन स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जातात त्यात आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभाग, आदिवासी सहकार विकास महामंडळ यांची निर्मिती झालेली दिसून येते. आदिवासी समाजाच्या विकासासाठी करोडो रूपये खर्च होऊनही पाहिजे तसा विकास झालेला दिसून येत नाही. भारतीय स्वातंत्रपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात विविध राजकीय पक्षांनी आदिवासी समाजाचा उपयोग फक्त आपल्या फायद्यासाठी करून घेतल्याने आजही दुर्गम भागात दळणवणाच्या सुविधा व शिक्षणाच्या सुविधा आदिवासी समाजापर्यंत पोहोचवण्यास शासनाला पूर्ण यश मिळालेले दिसून येत नाही.

असे असले तरी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात आदिवासी समाजासाठी झटणारे, त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणारे नेतृत्व उदयास आलेले दिसून येते. त्यामागील खरे योगदान अथवा प्रयत्न याचा विचार होणे आवश्यक आहे अथवा गरजेचे आहे.

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ज्यांनी आपले सर्वस्व अर्पण केले व त्यांच्या कार्याची महाराष्ट्रातील जनतेने दखल घेतली, इतिहासात त्या कार्याला तोड नाही असे नाशिक जिल्ह्यात काम करणारे विशेषतः पेठ, सुरगाणा, कळवण, दिंडोरी व बागलाण या भागात आदिवासी समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेणारे थोर स्वातंत्र्यसेनानी, समाजसेवक व शिक्षणप्रेमी कर्मवीर दत्तात्रय मल्हारराव बिडकर म्हणजेच दादासाहेब बिडकर हे होय.

सुरुवातीला त्यांचा जीवनपट पाहता परिस्थितीवर मात करत व परिस्थितीशी दोन हात करत आपल्या विद्यार्थी दशेत स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले. याच चळवळीत त्यांना अनेक

थोरा मोठयांचा सहवास लाभला. त्यात विनोबा भावे, साने गुरुजी यांच्या सहवासामुळे त्यांच्या विचारांची छाप कर्मवीर दादासाहेबांवर पडली. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांना अनेकवेळा तुरुंगवासही भोगावा लागला तरीही ते डगमगले नाही अथवा आपल्या विचारापासून बाजूला गेले नाही. ते महात्मा गांधी, विनोबा भावे, साने गुरूजी यांच्या विचाराने प्रेरित झालेले असल्याने ठरवलेले ध्येय बाजूला केले नाही.

सज्जन सत्पुरुषांची जीवन जगण्याची रीतच निराळी असते. स्वतःच्या स्वार्था पेक्षा दुसऱ्यासाठी देह झिजविण्यात त्यांना विलक्षण आनंद वाटतो असेच एक महान सत्पुरुष म्हणजेच थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी, माजी आमदार कर्मवीर दादासाहेब बिडकर होय. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने दलित मित्र, आदिवासी सेवक, सारडा प्रतिष्ठानचा नंदिनी, पुणे विद्यापीठाचा जीवनसाधना गौरव, नाशिक महापालिकेचा नाशिक भूषण इत्यादी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी, विनोबा भावे, साने गुरुजी यांच्या विचारांचा वारसा घेऊन कर्मवीर दादासाहेबांनी स्वतःला समाज सेवेत झोकून दिले, त्याकाळी त्यांना अनेक लोकांचा सहवास लाभला त्यात - महात्मा गांधी, विनोबा भावे, ठक्करबाप्पा, वल्लभभाई पटेल, माजी पंतप्रधान मोरारजी देसाई, आचार्य कृपलानी, राजगोपालाचारी, कै. हृदयनाथ कुंजरू, कै. ढेबर भाई, शंकरराव देव, जगतराम दवे, वैकुंठभाई मेहता, गोविंदभाई श्रॉफ, रामभाऊ कडेपुरकर, व्यंकटराव रणधीर, श्रीमती शशी बात्रा, जयप्रकाश नारायण, मधु दंडवते, मधु लिमये, वामनराव यार्दी, दादासाहेब पोतनीस, यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे मिस.लेथम इत्यादी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील लोकांचा सहवास त्यांना लाभला.

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्यात जागृती व्हावी आणि शिक्षणाची गंगा त्यांच्या दारी नेऊन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी कर्मवीर दादासाहेबांनी प्रयत्न केले आणि यासाठी 'डांग सेवा मंडळ' या संस्थेची 23 जून 1937 मध्ये स्थापना केली. आदिवासी समाजाच्या विकासाच्या इतिहासात डांग सेवा मंडळ म्हणजे एक सोनेरी पानच जोडले गेले. 1937 पूर्वीचे आदिवासींचे जीवन आणि आज एकविसाव्या शतकातील आदिवासींचे जीवन यात आमूलाग्र बदल घडून आला आहे. स्वातंत्र्य आणि पारतंत्र्याच्या काळात म्हणजेच 1946 ते 1952 या दरम्यान त्यांनी मुंबई विधानसभेवर बागलाणचे पहिले आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले आणि राजकारणातही आपला ठसा उमटवला. त्यावेळी विधिमंडळात त्यांनी आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेविषयक प्रयत्न केले; कारण त्यांनी आदिवासींचे जीवन जवळून पाहिले होते. त्या काळी प्रवासासाठी कोणतीही साधने नसताना जंगल भागातून 30 ते 40 किलोमीटर पायी प्रवास करून ते त्यांच्या वस्तीत राहिले, तसेच स्वातंत्र्य चळवळीच्या काळात आदिवासी समाजाची परिस्थिती त्यांनी जवळून पाहिली. आदिवासींचे खरे रूप त्यांना त्यावेळी दिसले आणि त्यांनी भारतातील

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

आदिवासी समाज कसा वनवासी झाला हे प्रत्यक्ष अनुभवले.

हा आदिवासी समाज अज्ञानी, अशिक्षित, अंधश्रद्धाळू व पारंपारिक विचारांमुळे मागास राहिलेला आहे, विकासापासून वंचित राहिलेला आहे, त्यांचे विचार रानटी आहेत, हा समाज आपली जगण्याची चाकोरी सहजासहजी सोडत नाही अशा या परिस्थितीचा विचार करता या समाजाला शिक्षणा शिवाय तरणोपाय नाही हे कर्मवीर दादासाहेब बिडकर यांनी ओळखले. त्याकाळी शिक्षण फक्त शहरापुरते मर्यादित होते. ग्रामीण व आदिवासी भाग यापासून बाजूला होता, वंचित होता. त्यांना खऱ्या अर्थाने प्रवाहात आणणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन अनेक अनाथ, दलित, आदिवासी मुलांसाठी डांग सेवा मंडळ संस्थेच्या माध्यमातून वसतिगृहे सुरू केलीत. त्याकाळी पैसा उपलब्ध नसताना स्वतःच्या घरातून पैसा खर्च करून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था कर्मवीर दादासाहेब बिडकर यांनी केली. या आदिवासी समाजात त्यापरिस्थितीत काम करणे हेही एका अर्थाने आव्हानच होते. ते पेलण्याचे आणि यशस्वीपणे पूर्ण करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी डांग सेवा मंडळ या संस्थेच्या माध्यमातून केले.

कर्मवीर दादासाहेब बिडकर जरी आमदार म्हणून राजकारणात सक्रिय होते तरी राजकारणापेक्षा समाजकारणातच ते जास्त रमले. कारण "गरिबातल्या गरीब समाजात जाऊन कार्य करा" असा महात्मा गांधींचा आदेश त्यांनी शिरसावंद्य मानला आणि आपलं कार्य आदिवासी भाग हीच कर्मभूमी म्हणून आदिवासींच्या उत्थानाचा विडा उचलला. त्यांनी केलेल्या कार्याचा विचार करता त्यांचे कार्य इतके मोठे / अगाध आहे की आपण त्याचा विचारच करू शकत नाही.

डांग भागातील आदिवासी बांधवांच्या उत्कर्षाप्रत क्रांती घडवून आणणारे क्रांतिकारी, स्वातंत्र्य संग्रामात जीवाची पर्वा न करणारा एक स्वातंत्र्य सेनानी, आदिवासी भागात शिक्षणाचा विकास करून आदिवासी समाजाला प्रवाहात आणण्यासाठी धडपडणारा शिक्षणप्रेमी, याचबरोबर राजकारणापासून काही अंतर दूर राहून समाजाची निस्वार्थी सेवा करणारा समाजसेवक अशी ओळख महाराष्ट्रभर झालेल्या व एक आगळे वेगळे व्यक्तिमत्त्व म्हणून कर्मवीर दादासाहेब बिडकर यांचाकडे पाहिलं जातं.

डांग सेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या झोपडी - झोपडीत ज्ञानाचा नंदादीप पेटवणारे कर्मवीर दादासाहेब बिडकर यांचे कार्य शेवटच्या श्वासापर्यंत अव्याहतपणे चालू होते, स्वतःपेक्षा दुसऱ्यांसाठी देह झिजविणारा हा प्रवासी आयुष्यभर उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित समाजाची निखळ सेवा करीत राहिला. त्यांच्या कार्यामुळेच डांग सेवा मंडळ या संस्थेला मानाचा असा **"उत्कृष्ट संस्था"** हा पुरस्कार महाराष्ट्र शासनाकडून मिळाला. त्यांनी त्या काळात अनुभवातून जे पाहिले ते त्यांच्या ग्रंथरूपात समाजासमोर आलेले दिसून येते. त्यात **महाराष्ट्रातील आदिवासींची आर्थिक व सामाजिक पाहणी** आणि **गांधीजींचे अर्थशास्त्र** हे दोन ग्रंथ त्याचाच परिपाक आहेत.

आदिवासींच्या विकासाला शिक्षणाची जोड मिळाल्याने त्याला गती मिळाली आणि समाज परिवर्तन, राजकारण, नोकऱ्या, उद्योग-व्यवसाय, महिलांची प्रगती या सर्व क्षेत्रात होणारी आदिवासी

समाजाची प्रगती हीच खरी कर्मवीर दादासाहेब बिडकर यांच्या कार्याची पावती म्हणावी लागेल. अशा या कर्तृत्ववान व असामान्य व्यक्तीची आठवण सतत या भागात गेल्यानंतर तेथील वातावरण, परिस्थिती व शैक्षणिक विकास पाहता येते हे त्यांच्या कार्याचे व समाजसेवेचे आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानचे फलित आहे असे म्हणावे लागेल.

विशेष म्हणजे या डांग सेवा मंडळ संस्थेच्या माध्यमातून ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, ऋषितुल्य जीवन जगणारे असे कर्मवीर दादासाहेब बिडकर यांच्या समाज सेवेचा व शिक्षणप्रसाराचा वारसा असाच पुढे चालू ठेवण्यासाठी कर्मवीर डॉ. विजयजी बिडकर व संस्थेच्या अध्यक्षा आदरणीय हेमलताताई बिडकर यांनी तसाच पुढे चालू ठेवून आपले संपूर्ण आयुष्य आदिवासी भागातील समाजाची शैक्षणिक सेवा व आरोग्य सेवा करण्यातच खर्ची घातले. आजही कर्मवीर दादासाहेब बिडकर व कर्मवीर डॉ. विजय बिडकर यांच्या नंतर या कार्याची व समाजसेवेची धुरा स्वतः अध्यक्षा आदरणीय हेमलताताई बिडकर व माननीय सचिव सौ. मृणालताई जोशी यांनी आपल्या खांद्यावर घेऊन अहोरात्र परिश्रम घेत समर्थपणे ते पार पाडत आहे याचा आम्हाला रास्त अभिमान आहे. त्यांच्या सोबतीला डांग सेवा मंडळातील इतर संचालक मंडळ हे सुद्धा कार्य करतांना दिसून येते.

आम्हांला अशा या महान विभूतींच्या अथवा व्यक्तींच्या छत्र छायेखाली आदिवासी भागात काम करण्याची / सेवा करण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्य समजतो, नव्हे तर आम्ही स्वतःला त्यामुळे भाग्यवान समजतो.

जय हिंद !

संदर्भ -

1. आदिवासी सेवक दादा बिडकर ,डांग सेवा मंडळ महात्मा नगर नाशिक -7, डॉ. सरल धारणकर.
2. आदिवासी हक्क आणि परिपूर्ती, विजय साठे व रा. वी. भुस्कुटे.
3. जमातवाद, वसंत पळशीकर.
4. भारत एक पाहणी, संतोष दास्ताने.